म. ग्रं सं. ठाणें.
विषय चारित्र
सं. क्र. १२६४

REFBK-0014468

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८००८९ विः चरित्र
क्रमांक ८५८ नों दि: २८।४।५९
१२५८

# भगवान येशू ख्रिस्त

## (चरित्र)

८००८९
चरित्र
१२५८
२८.१२.५९

REFBK-0014468

REFBK-0014468

लेखक
डी. पी. अँड्र्यूज, बी. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४४६८

किंमत अडीच रुपये

श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २.

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन, ठोकळ भवन,
लक्ष्मी रस्ता, पुणे २.

* * *

पुढील आवृत्तीचे सर्व हक्क **सौ. वासंती अँड्रयूज**, विनय स्मृति, भवानी पेठ, पुणे २, यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

* * *

पहिली आवृत्ती : १९६५

* * *

मुद्रक :
रा. बा. चव्हाण
दि रमेश मुद्रणालय,
१३३ नारायण पेठ, पुणे २.

## श्री. डी. पी. अँड्र्यूज यांचा परिचय

ख्रिस्ती समाजातील श्री. अँड्र्यूज हे एक लेखक आहेत. त्यांचे लेख अनेक मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत. 'बायबलमधील सुरस व रम्य कथा, भाग पहिला व भाग दुसरा' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांचे बायबल-वरचे लेख व गोष्टी मसिकांतून प्रसिद्ध होत असतात. बायबलबरोबरच महाभारताचाही त्यांचा अभ्यास सुरू असून, महाभारतावरही त्यांचे लेख मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. महाभारतातील दुर्दैवी स्त्रिया, महाभारतातील खलपुरुष, महाभारतातील लोकशाही, महर्षी भीष्म, महारथी कर्ण वगैरे त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. खाडिलकरांच्या नाटकांचाही त्यांचा अभ्यास असून, खाडिलकरांच्या नाट्यकथा व खाडिलकरांची पाच गद्य नाट्यरत्ने ही त्यांची पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. माताहारी व इतर हेरकथा हे त्यांचे पुस्तक जगन्नाथ आणि कंपनीने प्रसिद्ध केले आहे. पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळाचे श्री. अँड्र्यूज हे ख्रिस्ती धर्म आणि त्याची शिकवण या विषयाचे व्याख्याते आहेत. महाभारतावरही ते व्याख्याने देत असतात.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रवासी . | १ |
| २. | वाङ्‌निश्चय | ७ |
| ३. | वेदीजवळ काय पाहिले ? | ९ |
| ४. | सर्व स्त्रियांमध्ये तू धन्य,आहेस | १८ |
| ५. | थोडेसे ऐतिहासिक | २६ |
| ६. | रोमचा जाहीरनामा | २९ |
| ७. | आम्ही नमन करावयाला आलो आहोत. | ३५ |
| ८. | नाझरेथ गावी | ४३ |
| ९. | आई, मला जाऊ देशील ? | ५१ |
| १०. | विशाल जीवनात | ५७ |
| ११. | अरण्यातील आवाज | ६२ |
| १२. | शिष्यसंप्रदाय | ६६ |
| १३. | द्राक्षारस संपला आहे | ७२ |
| १४. | परिवर्तन | ७५ |
| १५. | माझ्या मागून ये | ८५ |
| १६. | वर मागून घे | ९१ |
| १७. | दृष्टिलाभ | ९१ |
| १८. | मुलगी झोपली आहे ! | १०५ |
| १९. | आई, उठ ! | ११४ |
| २०. | लाजरा, बाहेर ये ! | १२० |
| २१. | वादळ जमत चालले ! | १२८ |
| २२. | पिलातासमोर | १४० |
| २३. | अखेर | १५० |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४००८१ वि: ७।२१
क्रमांक ८०८ १२६४ नोंद दि: २८।४।६५

# माझी ध्येयनिष्ठा

"मी या जीवनपथावरील एक सामान्य प्रवासी आहे. या पथावरून मला एकदाच जाता येईल. जाता जाता जर मला काही चांगले करता आले तर ते मला ताबडतोब करू द्या. कारण पुन्हा या मार्गावरून परत जाण्याची संधी मला कधीही मिळणार नाही."

—डी. पी. अँड्रयूज.

## श्री. डी. पी. अँड्रयूज यांची पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १ | बायबलमधील सुरस व रम्य कथा, भाग १ | १–०–० |
| २ | बायबलमधील सुरस व रम्य कथा, भाग दुसरा | १–८–० |
| ३ | खाडिलकरांच्या नाट्यकथा, ठोकळ प्रकाशन | ३–०–० |
| ४ | माताहारी व इतर कथा, जगन्नाथ प्रकाशन | ३–०–० |
| ५ | बलिदान (नाटक), इब्सेनच्या The Wild Duck या नाटकाचे मराठी रूपांतर, महाराष्ट्र प्रकाशन | २–०–० |
| ६ | भगवान येशू ख्रिस्त (चरित्र), ठोकळ प्रकाशन | २–५०–० |

## आगामी

७ भगवान येशू ख्रिस्त, संप्रदाय आणि शिकवण

८ बायबलमधील स्त्रीजीवन

# निवेदन

प्रिय वाचक—

हे पुस्तक आपल्या हाती देताना मला फार आनंद होत आहे. आतापर्यंत भगवान येशू ख्रिस्ताचे चरित्र कोणत्याही ख्रिस्तेतर प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेले नाही. तेव्हा 'श्री लेखन-वाचन-भांडारा 'चे श्री. ग. ल. ठोकळ यांनी हे चरित्र प्रसिद्ध करून एक नवाच पायंडा पाडला आहे.

धर्माकडे पाहण्याची लोकांची दृष्टी आता निवळत चालली आहे, सर्व धर्म ईश्वरप्रणीत अतएव सारखेच पवित्र आहेत. त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ, खरा-खोटा हा भेदच उरत नाही, असे मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे. हे आजच्या युगाचे सुचिन्हच मानावे लागेल. तसे नसते तर पूज्य साने गुरुजी 'इस्लामी संस्कृती ' हे पुस्तक लिहिण्यास का प्रवृत्त झाले असते व डॉ. कोलंगडे यांना झोरोष्ट्रियन ( पारशी धर्म ) हे पुस्तक लिहून पारशी धर्माचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याचे उत्तेजन का मिळाले असते? लो. टिळकां-सारखे साहित्यिक बायबल व पवित्र कुराणाचा अभ्यास करण्यास मंडालेच्या बंदीवासात वेळात वेळ कसा काढू शकले असते? शा. स. केळकर, वीर सावरकर, अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्यासारख्या थोर थोर साहित्यिकांना बायबलचा काही भाग भाषांतरित करण्यास कमीपणा का वाटला नसता ? यांचे भाषांतर जरी मासिकाच्या अंकात दडून बसले असले तरी त्याचा हात बायबलला लागलाच आहे. धर्माच्या बाबतीत संकुचित दृष्टी ठेवून भागतच नाही. धर्माला बांध नसतोच व अडसरही नसतो. प्रत्येक धर्म पवित्र व आदरणीय असे प्रत्येकाने मानल्यास पोकळ धर्माभिमान नष्ट होईल. भार-तात धर्माबद्दल संकुचित दृष्टी केव्हाच नव्हती. नाही तर ख्रिस्ती, मुसलमान व बोहरी हे भिन्न भिन्न धर्म भारतात सुखाने नांदलेच नसते. धर्माला सीमा नसतात, भिंती नसतात व क्षितिजेही नसतात. मक्केमध्ये ख्रिस्ती लोकांना प्रार्थने-करिता जागा नाही, म्हणून महंमद पैगंबराने मशिदीचा काही भाग त्यांना मोकळा करून दिला होता. भगवान येशू ख्रिस्ताने 'धर्म वाढवा ' असे कधीच त्यांच्या अनुयायांना सांगितले नाही, तर 'माझे मानवतेचे तत्त्वज्ञान प्रसारित करा,' असेच सांगितले व एकदा मानवतेचे तत्त्व पटले की, नम्रता, बंधुप्रेम व शांततामय

सहजीवन ओघाने आलेच! धर्माची संकुचित व्याख्या केल्याने जगात आजचे संघर्ष वाढले.

धर्मावरील आपली श्रद्धा उत्तमोत्तम धार्मिक वाङ्मय निर्माण करूनच वाढीला लागेल. धर्म म्हणजे मानवता, धर्म म्हणजे नम्रता, धर्म म्हणजे मानव-सेवा, धर्म म्हणजे सहोदराचे नाते, असा व्यापक अर्थ आपण धर्माचा केला तर हा संघर्ष टळेल. धर्माभोवती असलेली व मानवाने निर्माण केलेली तट-बंदी आपोआपच ढासळेल. श्री. ठोकळ यांनी अशीच व्याख्या केली असली पाहिजे. म्हणूनच त्यांनी माझ्यासारख्या सामान्य लेखकाकडून हे पुस्तक लिहवून घेतले व मला उपकृत केले.

भगवान येशू ख्रिस्ताचे सुबोध चरित्र लिहावे व ते ख्रिस्तेतर वाचकांनी वाचावे, अशी माझी फार दिवसांची मनीषा होती. ती मनीषा परमेश्वराने सफल केली व श्री. ठोकळ यांनी पुरी केली. श्री. ठोकळ यांचा मी सदाचा ऋणी राहीन. वाचकांनी या पुस्तकाचे चीज केले तर माझ्या श्रमाचे सार्थक झाले, असेच मी समजेन.

हे पुस्तक लिहिताना मी अनेक इंग्रजी ग्रंथांचा आधार घेतला आहे. दुर्दैवाने मराठीत बायबलसंबंधी समग्र टीकाग्रंथ नाहीत व कोणत्याही पौर्वात्य पडितांचे लक्ष या ग्रंथराजाकडे गेले नाही. पण बायबलचाही अभ्यास वाढून एखादा लोकमान्य टिळक, एखादा भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य व एखादा बाळशास्त्री हरदास यांचे लक्ष या पावन ग्रंथाकडे जावो, अशीच प्रभुचरणी माझी प्रार्थना आहे.

पुन्हा एकदा श्री. ठोकळ व ज्या इंग्रजी ग्रंथांचा मला फायदा झाला त्यांचे लेखक यांचे आभार मानून मी हे निवेदन संपवितो.

विनय-स्मृति
भवानी पेठ, पुणे २
दि. २४-७-६५

डी. पी. अँड्र्यूज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८००८१ वि: चरित्र
क्रमांक १२५४ नों: दि: २८।।५६

# भाग पहिला

# प्रवासी

पहाटेची रम्य प्रसन्न वेळ होती. धुके पडत होते व थंडीही बरीच पडली होती. रस्ता अगदीं ओसाड होता. फक्त एक प्रवासी आपल्या गाढवावर बसून अगदी शांतपणाने प्रवास करीत होता. हातात चाबूक असूनही त्याने गाढवाच्या पाठीला चाबूक लावला नाही. त्याने गाढवाचा लगाम सुद्धा अगदी सैल सोडला होता. त्याच्याच इच्छेने प्रवास करण्याची त्याची तयारी असावी. थंडी वाजत असल्याने या प्रवाशाने आपला मोठा झगा आपल्या अंगावरून चांगलाच लपेटून घेतला होता. गाढवावर बसल्या बसल्या तो गाढवाच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवी. तेवढीच ऊब त्या जनावराला मिळे व त्याचे अंग क्षणभर फुरफुरे.

आपला प्रवास लवकर संपावा व आपण एखाद्या घरात आश्रयाकरिता जावे असे या प्रवाशाला वाटत असावे, असे दिसले नाही. प्रवासी आपल्याच विचारतंद्रीत मग्न असावा. हा प्रवासी मोठा उमदा तरुण दिसत होता. सर्व-सामान्य यहुदी माणसाप्रमाणे त्याच्या चेहऱ्याची ठेवण होती. हाडपेरही मजबूत दिसत होते. उमर साधारण वीस-बावीस वर्षांची असावी. तो कसला बरे एवढा विचार करीत असावा ? आपण नाझरेथ गावी आलो आहोत, गावात कोणाकडे उतरावयाचे याची तर त्याला काळजी पडली नसेल ? हे पाहा, त्याचे ओठ हलल्यासारखे दिसतात. तो स्वत:शीच काय म्हणतो ते आपण ऐकू या.

'नाझरेथ गावी मी इतक्या वर्षांनंतर आलो. माझं हें जन्मग्राम. मी इथच जन्मलो. लहानाचा मोठा झालो, मेंढराच्या पाडसाप्रमाणं बागडलो, पण दुष्ट दैवाला हे माझं रम्य बाळपण पाहावलं नाही. त्या जुलमी हेरोद राजानं आमच्या घराण्याची वाताहात करून आम्हांला देशोधडीला लावलं. भटकत भटकत आम्ही नाझरेथपासून किती तरी लांब गेलो. शेवटी माझे आईबाप सुद्धा परमेश्वरचरणी लीन झाले. आणि मी पोरका झालो. इतक्या

वर्षांनंतर मी माझ्या मायभूमीला परत येत आहे, पण ती माझं स्वागत करील का? जी मुलगी मी वधू म्हणून निवडली आहे ती माझ्याच घराण्यातील. तीही या नाझरेथ गावचीच. पण—पण हा विवाह घडून येईल का? तिचं लग्न तर दुसरीकडे कुठं ठरलं नसेल?....

असा विचार करीत असलेला हा प्रवासी म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून योसेफच होता. त्याच्या घराची वाताहात झाल्यावर व त्याच्या आई-बापांचे निधन झाल्यावर पोरक्या झालेल्या योसेफचा संभाळ त्याच्या एका लांबच्या चुलत्याने केला व त्याला पिढीजात सुतारकीचा धंदाही शिकविला. यहुदी लोकांमध्ये अशी रूढी असे की, बापाचाच धंदा मुलाने पुढे चालवावा. योसेफचा बापही सुतारच होता व तोच धंदा योसेफने उचलला. नाझरेथ गावी स्थायिक व्हावे, घरदार उभारावे व चांगलीशी घरंदाज मुलगी पाहून संसारी बनावे अशी त्याची मनीषा होती. ती मनीषा सफल व्हावी म्हणूनच तो आता नाझरेथ गावी परत आला होता. त्याने असे ऐकले होते की, नाझरेथ गावातच मरिया नावाची एक उपवर वधू दाविदाच्या घराण्यातीलच असून तिची विधवा आई तिच्याकरिता वर पाहात आहे. यहुदी लोकांची जी घराणी होती त्यांपैकी दाविद राजाचे घराणे फार मोठे. अर्थातच मरियेच्या शिवाय दाविदाच्याच घराण्यातील श्रीमंत मुलीही होत्या; पण योसेफ हा सामान्य माणूस. सुतारकी करून पोट भरणारा. तो श्रीमंत मुली पाहण्याच्या नादी कसा लागेल? यहुदी लोक आपल्या घराण्याच्या बाहेर सहसा लग्न करीत नसत. मरिया व आपली जोडी परमेश्वराने आधीच ठरवून ठेविली असेल, या कल्पनेचा पगडा योसेफसारख्या तरुणाच्या मनावर पक्का बसावा, हे साहजिकच नव्हते काय? सामान्य कुलाची जर ही कथा, तर दाविद राजासारख्या अत्यंत वैभवशाली कुलात ज्यांचा जन्म झाला ते आपल्या विवाहाबद्दल किती दक्षता घेत असतील याची कल्पना करता येते.

धुके आता हळूहळू कमी होत होते. रस्ता स्पष्टही दिसत होता. नाझरेथ गाव दोन डोंगरांच्या कुशीत बसले होते. घरे धाब्याची असून एकमेकांपासून दूर दूर अंतरावर होती. प्रत्येक घराच्या मागेपुढे द्राक्षांचे किंवा अंजिरांचे मळे असून मधूनमधून हे लोक भाजीपालाही काढीत. नाझरेथ गावाचे एकंदर दृश्य फार नयनमनोहर दिसे. गावात एकच सार्वजनिक विहीर असून,

माणसांना व जनावरांना पाणी पिण्याला तीच विहीर पुरे. पाणी भरण्याचें काम स्त्रिया – मुलीच करीत.

नाझरेथ गाव हळूहळू जागे झाले. माणसांची ये-जा सुरू झाली. पुरुष-वर्ग फावडी, कुदळी घेऊन शेताकडे निघाला. गावाबरोबर मरिया व तिची आई हन्ना ह्या दोघीही उठल्या आणि कामधंद्याला लागल्या. यहुदी माणसाचे जीवनच धार्मिक विधींनी वेढिले होते. हन्ना व मरिया यांनी हात-पाय-तोंड धुऊन तोरा धर्मशास्त्राचें वाचन केले. सकाळची प्रार्थना कुटुंबप्रमुख पुरुषाने करावी असा जरी दंडक असला तरी हन्नाच्या घरात ती व तिची मुलगी मरिया या दोघीच असल्याने प्रार्थना म्हणण्याचा विधी प्रौढ स्त्री म्हणून हन्नालाच उरकावा लागे. मरियेला मरियामा नावाची दुसरी एक थोरली बहीण होती. ती त्याच गावात आपल्या नवऱ्याबरोबर राहात असे. तिला मूलबाळ नव्हते.

सकाळची प्रार्थना झाली कीं यहुदी स्त्री दुसरे कोणते महत्त्वाचे काम करीत असेल तर ते घरातील जनावरांचे अन्नपाणी व चाऱ्याची व्यवस्था. मरियेला जनावरे फार आवडत. घराच्या मागच्या बाजूला असलेला गोठा मरियेने साफ केला. जनावरांना चारापाणी दिले व मेंढपाळाच्या हवाली मेंढरे करून ती पाणी आणण्याला विहिरीवर गेली. मरियेजवळ दहापंधरा मेंढरे होती व प्रत्येकाला तिने नाव दिले होतें. त्या त्या नावाने ती मेंढराला हाक मारी. त्याला अंजारीगोजारी, त्यांच्या मुखांत कोवळा कोवळा चारा घाली. काही काही मेंढरे तिच्यावर रागावत, रुसत, फुगत. मग त्यांची समजूत काढता काढता, बाबा पुता करता करता मरियेला अगदी नकोसे होई. मेंढरांची नुकतीच जन्मलेली कोकरे तर तिचा जीव की प्राण ! या कोकरांच्या आयांना मेंढपाळाबरोबर रानात चरायला जावयाला नको असे. सतत आपल्या मऊ मऊ केसात मरियेने प्रेमाने हात फिरवीत राहावे असेच वाटे. पण यहुदी स्त्रीला कशी फुरसत मिळणार ? सदा कष्ट, कष्ट. रिकामा वेळ फारच थोडा. मेंढरांची तैनात झाली की गाढव तिची वाट पाही. गाढव हेच मुख्य वाहन असल्याने यहुदी लोक त्याला मोठ्या प्रेमाने वागवीत. मरियेने गाढवालाही अंजारले गोंजारले. त्याला पाणी दाखविले. चारा दिला. खरारा केला. इतकी सर्व सेवा झाल्यावर स्वारी एका कोपऱ्यात जाऊन रवंथ करीत बसली.

आता दिवस बराच वर आला होता. योसेफही आपल्या एका नातेवाइकाच्या घरी गेला. हा नातेवाईक मरियेच्या बापाचा जवळचा नातेवाईक असल्याने योसेफाने नाझरेथ गावाला येण्याचा आपला हेतू त्याला सांगून मरियेशी लग्न करण्याचा व याच गावात पुन्हा स्थायिक होण्याचा आपला विचार सांगितला. हा नातेवाईक चांगला प्रौढ असून तोरा – धर्मशास्त्राचे – वाचनही त्याने केले होते. समाजात त्याला मानही होता व त्याला रावी या सन्मान-पूर्वक नावाने लोक संबोधीत. त्यानें हन्नाला या सर्व गोष्टी सांगण्याचे कबूल केले व त्याच रात्री तो तिच्या घरी गेला.

दुपारचे जेवण झाल्यावर यहुदी स्त्री कधीही झोपत नसे. सूर्याचा ताप फार होत असल्याने बाहेरच्या कामाला जरी स्त्रिया जात नसल्या तरी घरा-तील काम त्यांना उरकावे लागे. दुपारच्या वेळेला द्राक्षे, अंजिरे वाळविण्यात, दिवाबत्तीकरतां तेल काढण्यात व सुवासिक तेले व अत्तरे तयार करण्यात त्यांचा वेळ जाई. या लोकांना सुवासिक तेलाची फार आवड ! पाहुणा घरी आला की त्याला पाय धुण्याला पाणी दिल्यावर ते लोक त्याच्या डोक्याला सुवासिक तेल लावीत व अंगाला अत्तर लावीत. सुवासिक तेलाकरिता व अत्तराकरिता श्रीमंत लोकांच्या फुलांच्या स्वतंत्र बागा असत. जखमां-करिता व औषधपाण्याकरिता ते लोक सुवासिक तेलाचा वापर करीत असल्याने प्रत्येकाच्या घरीं या तेलाच्या बाटल्या भरून ठेवलेल्या असत.

यहुदी गृहिणी दुपारी सुद्धा कामात गर्क असे. घरच्या लोकरीचे कापड तिलाच विणावे लागे. सूर्यास्तानंतर व दिवेलागणीच्या सुमारास मात्र यहुदी गृहिणीला थोडीशी फुरसत मिळे. पण हा फुरसतीचा वेळ सुद्धा ती सत्कारणी लावी. वरातल्या मुलीबाळी व इतर बायका जमवून ती त्यांना त्यांच्या धर्म-शास्त्रातील थोर थोर स्त्रियांची चरित्रे सांगून त्यांच्याबद्दलचा आदर ती वाढवी. सारा, रेचल, रूथ, एस्तेर वगैरे गतकालीन थोर स्त्रियांची चरित्रे स्त्रियांच्या मनावर बिंबविण्याचा ती प्रयत्न करी.

दिवसाला प्रारंभ जसा तोरा वाचनानें होई तसाच दिवसाचा शेवटही तोरा वाचनानेच होई. मरिया व तिची आई यांनी रात्र पडताच दिवे लावले व मोठ्या भक्तिभावाने तोरा वाचन करून रात्रीचे जेवण केले. स्वैंपाक-घरातील आवराआवर करून त्या मायलेकी झोपण्याच्या तयारीत असतांना कोणी तरी त्यांचे दार ठोठावले.

यहुदी लोकांत सहसा रात्रीचे एकमेकाकडे जात नसत. रस्त्यावर दिवाबत्तीची सोय नसल्याने व घरेही एकमेकापासून दूर अंतरावर असल्याने व प्रत्येक घराच्या मागेपुढे मळे असल्याने झाडझूडूप असेच. त्यामुळे किडामुंगीचीही भीती असे. त्यामुळे अगदी जरुरीचे काम असल्याशिवाय कोणी कोणाचे दार ठोठावीत नसे. दाराची कडी वाजल्याचे ऐकून या दोघी मायलेकी आश्चर्यचकित झाल्या. मरिया दाराकडे जाऊन तिने दार उघडले. "अग आई, काका आलेत. ये लवकर बाहेर."

"झाली का जेवणं?" काका आत येत म्हणाले, "अशा वेळी तुमच्याकडे येणं उचित नाही हे खरं, पण कामाचं महत्त्वच तसं आहे."

"बसाना काका!" मरिया त्यांना आसन देत म्हणाली व त्यांच्यापुढे वाळलेली द्राक्षे, खजूर ठेवून त्यांना खाण्याचा आग्रह करू लागली. काकांनी त्या पदार्थांला हात लावून परमेश्वराचे आभार मानले व खाण्यास सुरुवात केली. इतक्यात आईही आली.

"रात्रीचं येणं केलंत?" आईने सहज म्हणून विचारले.

"हो, जरा जरुरीचं काम आहे म्हणून आलो. माझ्या येण्याने तुमच्या कामात व्यत्यय तर नाही ना आला?"

"छे छे, व्यत्यय कसला! आमची जेवणं होऊन आम्ही आवराआवरच करीत होतो." नंतर मरियेकडे वळून ती म्हणते, "मरिये, तू जा झोपायला. सकाळी लवकर उठायचं आहेना? मी बसते काकांबरोबर बोलत. दार लावून घेईन मी." मरियाही तेथून निघून गेली. काका मरियेच्या आईकडे वळून म्हणाले,

"आपल्या नाझरेथ गावात याकोब हेली म्हणून एक माणूस होता तो आठवतो का तुम्हांला? मरियेच्या बापाचा तर तो मित्र?"

"हो, आठवतं की."

'याच याकोबाचा मुलगा आज सकाळीच माझ्याकडे आला व म्हणाला, "तुमच्या भावाचा मी मुलगा. म्हणजे तुमचा लांबचा का होईना पुतण्याच. मी नाझरेथ गावीच आता स्थाईक होणार!'

"असं! पण त्याच्या आईबापाचं काय?" आईने विचारले.

" ते दोघेही केव्हाच देवाघरी गेले. योसेफ अगदी एकटा आहे. मोठा उमदा तरुण दिसला मला. हाडपेर कसं अगदी मजबूत ! "

" म्हणजे तो आता याच गावात राहणार ? " आई म्हणाली.

" होय, येथेच आपला पिढीजाद सुतारकीचा धंदा तो करणार आहे. आई, तुम्हांला आठवतं, जेव्हा मरियेचा बाप अत्यवस्थ झाला तेव्हा माझ्याकडे पाहात तो म्हणाला होता, 'काही कर पण मरियेला दुसऱ्या घराण्यात देऊ नकोस. दाविदाच्याच घराण्यात दे.' त्याचा भाऊ म्हणून ही जबाबदारी माझ्याच डोक्यावर आहे ! "

" होय, मला चांगलं आठवतं. " डोळ्यांत पाणी आणून हन्ना म्हणाली, " मरियामाच्या पाठीवर जेव्हा मला ही मरिया झाली तेव्हा ते म्हणाले, ' हन्ना, घाबरू नकोस व निराश होऊ नकोस. ही मुलगी सुलक्षणी दिसते. ती मला मुन्नाच्याच ठिकाणी आहे ! " सिगल व डबल दोन्ही हवीत. तिला जास्त बोलू न देता काका मध्येच म्हणाले,

" तिच्या बापानं माझ्यावर टाकलेली जबाबदारी आता पार पाडण्याची संधी मला मिळत आहे. हा जो योसेफ माझ्याकडे आला आहे त्याचा मरियेचा पती म्हणून स्वीकार करा असं सांगण्यास मी आलो आहे. हा तरुण योसेफ सुद्धा दाविदाच्याच घराण्यातला आहे. त्याचा संसार थाटण्याचे श्रेय मला मिळू द्या. योसेफ सर्वस्वी मरियेला अनुरूप आहे. "

" मी तुमच्याबाहेर का आहे ? " हन्ना म्हणाली, " मुलीचं लग्न दाविदाच्या घराण्यातच कसं होईल ही चिंता मला रात्रंदिवस होतीच. यव्होव्हानंच माझं गाऱ्हाणं ऐकलं म्हणायचं ! तुम्ही इतकी चांगली बातमी आणली आहे की शाब्बाथ दिवशीच गावाला कळू द्या व मुलामुलीला एकमेकांना पाहून घेऊ द्या. दोघांनीही एकामेकांना पसंत केलं की हा आडार महिना संपण्याच्या आत आपण वाङ्निश्चय करून ठरवून टाकू ! "

आईने नंतर काकांना दिवा दाखविला व ते लांबपर्यंत जाईतो ती दिवा घेऊन दारातच उभी होती. तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.

* * *

# वाङ्‌निश्चय

मरियेच्या आईने जरी योसेफाला जावई म्हणून स्वीकारले होते तरी तो किती केलं तरी बाहेरचा माणूस. गावातील लोकांनी त्याचा स्वीकार करावयास हवा होता व त्याच्याकरिता वाङनिश्चयाचा विधी फार महत्त्वाचा मानला जाई. शाब्बाथ दिवशीं जेव्हा सर्व लोक मंदिरात जमले तेव्हा योसेफ हा वर म्हणून त्यांच्यापुढे आला. आज योसेफ व मरिया यांचा वाङनिश्चय आहे असे आधीच जाहीर झाल्याने सर्व लहान थोर लोक मंदिरात जमले होते.

नाझरेथ गाव तसे पाहिले तर फार महत्त्वाचे गाव नव्हे. व्यापार-उदीमहीं बेताचाच चाले. बहुतेक लोक शेतीचे काम करीत. लोहार, सुतार, चांभार गावात होते. योसेफाचे काका किंवा मरियेचा बाप हनान हे दाविदाच्या घराण्यातील म्हणून त्यांना एक प्रकारचे महत्त्व. नाझरेथ गावात इतरही मोठाली घराणीं होती. ते सर्व लोक आज मंदिरात योसेफाच्या वाङनिश्चयाला आले होते.

प्रत्येक घराण्याचा पिढीजात धंदा असे. दाविदांच्या घराण्यात सुतारकी होती, तर इशाचर घराण्यात चांभारकी व फळे सुकविण्याचा धंदा होता. हे घराणे जवळच्या डोंगरातून गावाला लाकूडही पुरवी. मंदिराला सिनेगॉग हे नाव होते व ते अजूनही प्रचारात आहे. योसेफ दाविदाच्या घराण्यातला म्हणजे उच्च घराण्यातला. तेव्हा योसेफ जरी बाहेरून आला असला तरी त्याचे मूळ नाझरेथ गावातच असल्याने गावाने त्याचा स्वीकार तावडतोब केला. तो आपल्या गावातील मुलीशीच विवाहबद्ध होऊन येथेच राहणार आहे, ही बातमी गावात पसरली तेव्हा गावाला मुळीच आश्चर्य वाटले नाही. योसेफाचा वाङनिश्चय बुधवारी मंदिराच्या कागदपत्रात रीतसर नोंदला जाईल हेही गावाला माहीत होते.

योसेफाला गावाने मान्यता दिल्यावर आज शाब्बाथ दिवशी मंदिरात रीतसर सर्व लोकांसमोर त्याला समाजात सामावून घेण्याचा विधी होणार होता व त्याकरिता हे सर्व लोक आज मंदिरात जमले होते. प्रत्येक गावात एक धर्ममंदिर व याजक असे. गाव फारच लहान असले तर जवळच्या गावातील मंदिरात

या गावातले लोक जात. मंदिरात वेदी असून वेदीकडे जाण्याला बारा पायऱ्या असत. या बारा पायऱ्या म्हणजे यहुदी लोकांची बारा कुले किंवा गोत्रे. त्यांचा एक महापुरुष याकोब याला बारा पुत्र असल्याने इस्रायल किंवा यहुदी लोकांचे कुल बारा कुलांत विभागले गेले. याकोबावरूनच या लोकांना इस्रायल हे नाव पडले. त्याच्या आधी हेबी हे नाव होते. यहुदी हे नाव नंतरचे.

सर्व लोक जमल्यावर याजकाने योसेफाला राबींच्या समोर उभे करून बारा पायऱ्या चढून जावयास सांगितले. वेदीवर तोरा पुस्तक ठेवले होते. पुस्तक म्हणजे मोठमोठ्या गुंडाळ्या. त्यांतून ठरलेला भाग त्याला वाचण्यास सांगितले. हा भाग वाचल्यानंतर योसेफाने त्या गुंडाळ्या लोकांच्या समोर धरल्या. नंतर एक वडील माणूस योसेफजवळ उभा राहून जमलेल्या लोकांना उद्देशून म्हणाला,

" अविवाहित योसेफ हा आपला बंधू आहे. राबी याकोब याचा हा मुलगा. हा दाविदाच्या घराण्यातला आहे व तो आपल्या वतनावर पुन्हा नाझरेथ गावी आला आहे. त्याचा व राबी हानान याची कुमारिका मुलगी मरिया यांचा वाङ्‌निश्चय व विवाह होणार आहे. तो याच गावात राहून येथेच संसार करणार आहे. वराबद्दल कोणाला काही सांगायचे असल्यास किंवा या विवाहाला हरकत घ्यावयाची असल्यास तसे त्याने आताच सांगावे."

जमलेल्या लोकांत थोडीशी चुळबूळ झाली. पण तसे आरोप करण्यास कोणीच उभे राहिले नाही. कोणीच हरकत घेत नाहीं असे पाहून योसेफाचे काका लोकांसमोर उभे राहून योसेफाला उद्देशून म्हणाले, " तुझे या गावातील आगमन तुझ्या घराण्याला, गावाला व मंदिराला सुखकारक व लाभदायक होवो. " लोकांनी त्याचा पुनरुच्चार केला. गावाने आता रीतसर योसेफाच्या आगमनाला, वाङ्‌निश्चयाला व विवाहाला मान्यता दिली.

इकडे वधूच्या घरीही तसाच विधी चालला होता. घरातल्या एका चांगल्या खोलीत मरियेला बसविण्यात आले. गावातील तरुण मुली फुलांच्या माळांनी तिला भूषवीत होत्या. आपले कौमार्य व्यक्त करण्याकरिता तिने आपले केस पाठीवर मोकळे सोडले होते. मंदिरातला विधी आटोपल्यानंतर सर्व मंडळी आता वधूच्या घरी जमली. वाङ्‌निश्चय झाल्याबद्दल मेवामिठाई देऊन सर्वांचे तोंड गोड करण्यात आले.

* * *

८००६७ चरित्र
२८।१।७५

## प्रकरण तिसरे

# वेदीजवळ काय पाहिले ?

यरुशलेममधील यहुदी लोकांचे भव्य मंदिर म्हणजे त्या काळचा उत्तम शिल्पाचा व कलाकुसरीचा एक भव्य नमुनाच होता. मंदिर किल्लेवजा असून त्याला असंख्य दालने होती. या दालनांना सुशोभित असे रेशमी व मखमलीचे पडदे लावून ते जास्तच सुशोभित केलेले असत. प्रत्येक तरुण यहुदी मुलीला वाटे, आपण एकदा ओलांड सणाच्या वेळेस यरूशलेमच्या मंदिरात जावे. आपल्या हातांनी विणलेला पडदा एखाद्या दालनावर पाहावा किंवा आपण शिवलेला झगा एखाद्या याजकाच्या अंगावर पाहावा. ही तिची महत्त्वाकांक्षा असे. सर्वसामान्य यहुदी मुलीला मात्र आपली ही इच्छा मनातल्या मनातच दाबून टाकावी लागे. ती कधीच सफल होत नसे.

मरियेचा बाप जिवंत असताना ओलांडण्याच्या सणाचे वेळी एखादे वेळेस तो तिला यरूशलेमला घेऊन जाई. यहुदी समाजात धार्मिक दृष्ट्या मुलीला जरा सुद्धां महत्त्व नसे. यहुदी स्त्री म्हणजे ती माता झालीच पाहिजे व तिला पुत्र झालेच पाहिजेत याच दष्टीने हा समाज स्त्रीकडे पाही. वांझ किंवा मुलीच झालेल्या स्त्रीला समाजात जरासुद्धा मान नसे. आपला विवाह चांगल्या सद्‌गुणी व पापभीरू माणसाशी व्हावा व आपल्या पोटी वीर पुत्र जन्मावेत, असे प्रत्येक यहुदी तरुणीला वाटे. मुलीबद्दल हे लोक इतकी अनास्था दाखवीत की ती जन्मल्यावर तिचे नावसुद्धा ठेवण्याची यातायात ते करीत नसत. मागे होऊन गेलेल्या एखाद्या थोर स्त्रीचे नाव तिला देत. मोशे याची बहीण मरिएम ही या लोकांची एक अत्यंत श्रेष्ठ व आवडती माता म्हणून गणली गेली होती. तिचेच नांव बहुतेक मुलींना बहाल करण्यात येई. कुटुंबात मुलाला जे महत्त्व ते महत्त्व यहुदी मुलीला कधीच प्राप्त होत नसे. मरियेच्या आईला दोन मुली. दोघींचे नांव मरिएमच, पण नावात घोटाळा होऊ नये म्हणून थोरलीला मरियामा हे नांव डॅरेमिक पद्धतीने देण्यात आले व धाकटी मरिया झाली. हेच नाव ख्रिस्ती धर्मात रूढ झाले. इंग्रजीमध्ये मरियेला मेरी म्हणतात.

यहुदी समाजात स्त्रीला जरी मान नव्हता तरी त्यांच्या गतकालीन इतिहासात ज्या थोर थोर स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्याबद्दल आदर या लोकांमध्ये नेहमीच वसत असे. आब्राहामाची पत्नी सारा ही त्यांची आदिमाता. हिच्यापासूनच हा वंश निर्माण झाला म्हणून तिला आपोआपच महत्त्व व पावित्र्य लाभले. तसेच मोशेची बहीण मरिएम. इस्रायल लोकांचे विलाप गीत गाणारी दिबोरा आपला वांझपणा नाहीसा होऊन परमेश्वराने आपल्याला पुत्रवती करावे म्हणून मनोभावाने त्याची आराधना करणारी शमुवेलची आई हन्ना. ही त्यांची पूज्यस्थाने होती एवढेच नव्हे तर फारोची राजकन्या जिने मोशेला वाचविले व त्याला लहानाचा मोठा करून नावा-रूपाला आणले व जा मोशे पुढे या लोकांना फारोच्या दास्यातून सोडविणारा मुक्तिदाता झाला. ही राजकन्या सुद्धा त्यांच्या आदराचे प्रतीक झाली होती. त्यांच्या इतिहासात रूथ या स्त्रीचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते ती तर परकीय. पण हीच रूथ पुढे दाविद घराण्याची माता झाली व यहुदी लोकांचे पूज्यस्थान बनली. याच दाविदाच्या घराण्यात त्याचा मुक्तिदाता जन्माला येऊन तो आपले गतवैभव पुन्हा आम्हांला प्राप्त करून देईल, हा त्याचा मोठा बळकट आशावाद होता. म्हणून हे घराणे पूज्य व त्याची माता रूथही पूज्य.

पण या सर्व थोर थोर स्त्रियांमध्ये जर आगळे व्यक्तिमत्त्व कोणाला लाभले असेल तर ते याकोबाची पत्नी रेचेल हिला. हिच्याकरता याकोब सासऱ्याच्या घरी चौदा वर्षे राबला. रेचेल व लिया या बहिणी त्याच्या बायका. पण रेचेलच त्याची आवडती बायको. पुत्राला जन्म देता देताच ती दुर्दैवी स्त्री मृत्युमुखी पडली. घराण्यातल्या दफनभूमीत चिरनिद्रा घेण्याचे भाग्य या दुर्दैवी स्त्रीला लाभले नाही. याकोबाने अत्यंत घाईने बेथलेम रस्त्यावर एका अज्ञातस्थळी तिला मूठमाती दिली. याच रस्त्याने बाबेलोनचा अजिंक्य म्हणविणारा सम्राट नबूखद्नेसर आपली झंझावाती स्वारी घेऊन यरूशलेमावर येऊन त्याने असंख्य यहुदी लोकांना गुलाम करून घेऊन गेला तो याच रस्त्याने. तेही दृश्य या दुर्दैवी स्त्रीने आपल्या कबरीतून पाहिले असेल; व या दुष्ट राजाने अजाणता या थोर स्त्रीची दफनभूमी तुडविलीहि असेल. या थोर स्त्रीच्या भोवती पुष्कळ दंतकथा व आख्यायिका नंतरच्या कालात

आपोआपच निर्माण झाल्या. इस्रायल लोकांच्या कपाळी जो वनवास आला त्याकरता ती परमेश्वराकडे जाऊन नेहमी शोक करते व तिचे शांतवन करण्याकरता परमेश्वर तिला आश्वासन देताना म्हणतो, " मुली, शोक आवर. हेही दिवस निघून जातील आणि तुझी मुले वनवासातून पुन्हा आपल्या प्रिय मायभूमीकडे परततील." अशी एक दंतकथा तिच्या नावाभोवती गुंफली आहे. बेथलेहेम गाव यरूशलेमापासून जवळ असल्याने रेचेल यरूशलेमाच्या मंदिरात भुयाराच्या मार्गाने येऊन संचार करते, अशी दुसरी एक दंतकथा या लोकांमध्ये प्रचलित आहे. हे मंदिर अत्यंत भव्य व किल्लेवजा असल्याने व परसत्तेचे हल्ले नेहमी या मंदिरावर होत असल्याने असले भुयारी रस्ते असणेही शक्य आहे. रेचेल यरूशलेमाच्या मंदिरात वावरते याची प्रचीतीही मरियेला नंतर लौकरच आली.

ही रेचेल सदा दु:खीकष्टी असल्याचा भास मरियेला होई. याच रेचेलचा आदर्श मरियेने आपल्यापुढे ठेवला होता. दिवसाढवळया ही शोकाकुल थोर स्त्री मरियेला दिसल्याचा भास होई. मरियेला ही रेचेल अगदी आपल्या जवळ आली आहे, ती आपल्या पाठीवरून हात फिरवीत आहे असा भास तिला होई. आपणही रेचेलप्रमाणे आपल्या लोकांकरिता दु:ख करावे, असे मरियेला नेहमी वाटे. यहुदी लोकांच्या मागे दुर्दैव अगदी हात धुऊन लागले होते. परदास्य तर पदोपदी त्यांना भेडसावीत असे. बाबेलोन, पर्शिया, इजिप्त, रोम या सर्व राजसत्तांनी त्यांच्यावर अधिकार गाजविला. असंख्य लोक गुलाम करून नेले लोकांचे हालहाल केले. हेच दु:ख रेचेलसारख्या त्यांच्या मातृस्थानी असलेल्या थोर स्त्रीला कसे पाहावेल ? रोमच्या सत्तेखाली लोकांचे किती हाल होत आहेत हें मरिया तर स्वत:च पाहात होती. रेचेलला जे दु:ख होत आहे ते दु:ख आपल्यालाही होते असा भास मरियेला उगाचच होई.

मरिया ही अत्यंत धर्मशील, पापभीरू व शालीन वृत्तीची मुलगी होती. कठोरपणाला तिच्याजवळ थारा नसे. मेंढरांची निष्पाप पाडसे तिचा सहवास व्हावा म्हणून धडपडत ते उगीच नव्हे! गाढवासारखा त्याज्य मानलेला प्राणी तिच्या हस्तस्पर्शासाठी धडपडे तेही उगीच नव्हे. मूर्तिमंत शालीनत्व, मांगल्य व पावित्र्य मरियेच्या ठायी वसत आहे असे तिच्याकडे

पाहणाऱ्याला वाटे. ती नेहमी निळ्या रंगाचा बुरखा अंगावर घेत असे. त्यामुळे तिच्या मुखकमलाला व शरीराला एक प्रकारचे शालीन सौंदर्य प्राप्त होई. तसे पाहिले तर मरिया ही काही सुंदर युवती नव्हती. यहुदी स्त्रीला अहोरात्र कष्ट करावे लागत असल्याने व नेहमी निसर्गाचे सान्निध्य तिला लाभत असल्याने तिच्या शरीरात एक प्रकारचा दणकटपणा आपोआपच येई. पण मरियेच्या ठायी शालीनत्वाचा अपूर्व ठेवा असल्याने पाण्याला निघालेल्या मरियेला पाहणाऱ्या चारगट पुरुषांचे डोळे आपोआपच तिच्या पायांकडे वळत. मरियेला यरूशलेमला जाण्याची संधी आपोआपच मिळाली.

नाझरेथ गावाजवळच्या एका लहानशा खेड्यात जखाऱ्या नावाचा एक पुरोहित किंवा याजक देवाच्या मंदिरात लोकांचे व देवाचे पौरोहित्य करीत असे. तो व त्याची पत्नी अलिशेबा फार वृद्ध झाली असून त्यांच्या पोटी संतान नव्हते. दोघेही फार धार्मिक वृत्तीचे. सर्व धर्मविधी व सर्व धर्माज्ञा ते अगदी कसोशीने पाळीत. आपल्याला पुत्रसंतान नाही, आपण निपुत्रिक म्हणूनच मरणार व आपल्याबरोबरच आपला वंश बुडणार म्हणून जखाऱ्या फार दु:खी असे. पण ही दोघेही मोठी धीराची माणसे होती. परमेश्वर ठेवील त्याच स्थितीत आपण आनंदाने राहिले पाहिजे हे तत्त्व त्यांना फार चांगले माहीत होते.

मरिया व अलिशेबा यांचा आप्तसंबंध होता. त्यामुळे जखऱ्या व अलिशेबा मरियेच्या आईबापांच्या घरी नेहमी जात येत असत. तेही जखऱ्याच्या घरी जात

यरूशलेमच्या मंदिरात जाऊन सणाचे दिवशी यज्ञविधी व इतर धार्मिक विधी करणे म्हणजे एक प्रकारचा मोठा मान मिळविणे असे प्रत्येक गावाच्या याजकाला वाटे. वर्षसणाच्या यज्ञविधींत भाग घेण्यास मिळणे म्हणजे त्या याजकाचा, गावाचाही मोठा सत्कार झाला असे सर्वांना वाटे. हे आमंत्रण मंदिराचा मुख्य याजकच पाठवी व ज्या याजकाला आमंत्रण गेले असेल त्या याजकाला त्या सणाची सर्व धर्मकृत्यं करावी लागत.

या वर्षसणाचे यज्ञविधी करण्याचे आमंत्रण जखऱ्याला आले. त्याला व अलिशेबेला मनस्वी आनंद झाला. आपल्याबरोबर यरूशलेमाला मरिया, तिची आई व योसेफ यांनी यावे म्हणून अलिशेबेने त्यांना आमंत्रणही देऊन टाकले.

जखान्याच्या वृद्धावस्थेत कधीही न मिळणारा मान त्याला मिळाला हे पाहून मरियेला व तिच्या आईला फार आनंद झाला व ते योसेफाला घेऊन यरूशलेमाला गेले.

ओलांडण्याचा सण म्हणजे यहुदी लोकांचा फार पवित्र व आनंदाचा सण. इजिप्तच्या फारोच्या दास्यातून परमेश्वराने या लोकांची सुटका केली, यव्होव्हा देवाने फारोवर अनेक आपत्ती पाठविल्यावर त्यांची सुटका झाली. शेवटची आपत्ती ज्येष्ठ पुत्राचा वध. त्याकरता यव्होव्हा इस्रायल लोकांची वस्ती ओलांडून फारोच्या वस्तीत गेला म्हणून हा सण ते मोठ्या आनंदाने व उत्साहाने पाळीत.

वर्षसण असल्यामुळे मंदिर फारच शृंगारले होते. हजारो नव्हे लाखो यात्रेकरी सणाकरता मंदिरात जमले होते. इतक्या लोकांसमोर वृद्ध जखान्या धर्मविधी करणार होता. आत्ता शेवटचा विधी म्हणून इस्रायल लोकांच्या कुलाच्या बारा पायऱ्या चढून वरती वेदीवर जाऊन तेथे धूपपात्रात धूप घालून वेदीला दाखविला की बाहेर येऊन शेवटची, प्रार्थना म्हटली म्हणजे सर्व विधी पूर्ण होणार होता. धूपपात्रात धूप घालून व त्यातील अग्नी प्रज्वलित करून एक एक एक पायरी चढून व गाभाऱ्याचा पडदा बाजूला करून जखान्या आत गेला व पुन्हा पडदा बंद झाला.

लोक बाहेर प्रार्थना म्हणतच होते. शेवटच्या विधीला फारच थोडा वेळ लागत असे. कारण वेदीवर धूप जाळून ठराविक प्रार्थनेचा मंत्र म्हटला की याजक बाहेर येत असे. पण जखान्याला आज वाजवीपेक्षा ज्यास्त वेळ का बरे लागला? मंदिरातील गर्दी व धर्मविधीचा त्रास याचा ताण तर त्याच्या थकल्या भागल्या शरीरावर पडला नसेल? मुख्य याजकही वाट पाहून थकला. त्याची नजर सारखी वेदीच्या पडद्याकडे होती. इतक्यात धावऱ्या धावऱ्या जखान्या बाहेर येऊन अगदी घाईने बारा पायऱ्या उतरून लोकां-समोर उभा राहिला. त्याचे सर्व शरीर थरथर कापत होते, सर्व अंगाला दरदरून घाम सुटला होता. मुद्रा अगदी कावरी बावरी झाली होती व त्याच्या तोंडातून शब्दही निघत नव्हता. ही त्याची स्थिती पाहून मुख्य याजक त्याच्या मदतीला आला व त्याला बाजूला बसवून शेवटचा मंत्र म्हणून त्याने धर्मविधी संपविला. लोकांचीही नंतर पांगापांग झाली.

बिचाऱ्या अलिशेबेच्या तर काळजाचे नुसते पाणी पाणी झाले होते. मंदिरातील गर्दी निघून गेल्यावर जवळ जवळ धावतच ती अंगणात आली. जखाऱ्याही आपला विधीचा पोषाक उतरून योसेफ व मरिया यांच्याबरोबर अंगणात आला. त्याच्या डोळ्यांतून सारखा अश्रुप्रवाह वाहात होता. चेहरा अगदी काळवंडलेला झाला. अंगांतून तर घाम नुसता निथळत होता. त्याचा घाम पुसून व त्याला धीर देत अलिशेबा त्याला म्हणते,

"आता घाबरू नका. आपण आपल्या गावी तात्रडतोब जाऊ या म्हणजे तुम्हांला बरे वाटेल. या गर्दीचा व धर्मविधीचा ताण पडला आहे तुमच्यावर!" जखाऱ्याला बोलताच येईना. शेवटी त्याने पाटी मागवून पाटीवर लिहिले, "वेदीजवळ मला देवदूत दिसला!"

अलिशेबेचा त्याच्यावर विश्वास बसेना. आयुष्यात कधीही न आलेली संधी आपल्या नवऱ्याला मिळाली. परंतु परमेश्वराचा कोप झाला म्हणून तर त्याची वाचा गेली नाही? विधीतले मंत्र तर याने बरोबर म्हटले ना? मग परमेश्वराचा कोप का व्हावा? या दोघांनी पापाचरण तर राहोच पण मुंगीलाही कधी दुखविले नाही. सर्व धर्माज्ञा तंतोतंत पाळल्या मग कोप का व्हावा? तो पुन्हा पुन्हा लिहीत होता, "वेदीजवळ मला देवदूत दिसला!"

पण असे म्हणणे म्हणजे परमेश्वराशी द्रोह करणेच होय हेही तिला समजत होते. मुख्य याजकाला जर हे समजले तर देहदंडाचीच शिक्षा तो त्याला देईल. आपला नवरा नुसता मुका झाला नसून वेडाही झाला आहे हे हे पाहून ती वृद्धा रडू लागली. मरिया तिला म्हणाली,

"मावशी, शांत व्हा. काका काय म्हणतात ते तरी ऐकू या, म्हणजे पुढची तजवीज करता यईल व तसे तिने जखाऱ्याला सुचविलेही. जखाऱ्याने पुन्हा लिहिले, "मी वेदीजवळ जाऊन धूप जाळीत असताना वेदीजवळ देवदूत असल्याचे मला दिसले. त्याच्या अंगाच्या कांतीचा प्रकाश पडला होता. आपले पख त्याने मिटून घेतले होते. मी फारच घाबरलो. मला काहीच करवेना!"

"बरे पुढे?"

तो देवदूत म्हणाला, "जखाऱ्या, घाबरू नकोस. तुझी मागणी परमेश्वराकडे रुजू झाली आहे. या वयातही तू पुत्रमुख पाहाशील.'" जखाऱ्याने लिहिले.

"अस्स!"

"देवदूत पुन्हा म्हणाला," जखाऱ्याने पाटीवर लिहिले, "तुझी बायको लवकरच पुत्रवती होईल. त्याचे नाव योव्हान ठेव." परंतु माझा विश्वास बसेना. मी म्हणालो "देवा, हे कसे व्हावे? आम्ही दोघेही वयातीत झालो आहोत. निसर्ग सुद्धा आमच्या विरुद्ध आहे."

देवदूत म्हणाला, "जखाऱ्या, मी परमेश्वरासमोर नेहमी असणारा गेब्रिएल आहे. ही शुभवार्ता तुला कळविण्याकरता परमेश्वराने मला मुद्दाम पाठविले आहे. तू अविश्वास का धरावा? ह्या सर्व गोष्टी घडून येईपर्यंत तुला बोलता येणार नाही हे चिन्ह समज."

आता सर्वच गोष्टीचा खुलासा झाला. मरियेला हा सर्व प्रकार नवा होता. ती जरी स्वप्नाळू मुलगी होती तरी तिला अशा गोष्टी प्रत्यक्ष घडतात हे सांगणारा कोणी अद्याप भेटला नव्हता. जखाऱ्याने या गोष्टी घडल्याचे तिला सांगितल्यावरून तिचाही या गोष्टीवर विश्वास बसू लागला होता. अर्थातच आपल्याभोवती रेचेल माता नेहमी वावरते असा तिला भास होत असे, पण तो नुसता भासच. संध्याकाळच्या वेळेला जेव्हा तिची आई या थोर थोर स्त्रियांच्या कथा सांगे तेव्हा रेचेलचीही कथा ती मोठ्या विस्ताराने सांगे. अलिशेबेबरोबर जेव्हा ती सणाकरता यरूशलेमात आली तेव्हा बोलता बोलता यहुदी लोकांचा मुक्तिदाता मशिया याच्याबद्दलही ती बोले. हा मशिया आपल्याच पोटी यावा असे प्रत्येक यहुदी तरुणीला वाटे. मरियेलाहि तसे वाटल्याशिवाय कसे राहील? पण जो जो ती विचार करू लागे तो तो मशिया आपल्या पोटी येण्याची महत्त्वाकांक्षा किती फोल आहे हे तिला पटू लागे. ती म्हणे, मशिया दाविदाच्या घराण्यात जन्माला येणार हे जरी खरे असले तरी माझे घराणे किती सामान्य? माझा बाप सामान्य माणूस. कावाडकष्ट करणारी मी मुलगी. तेव्हा माझ्या पोटी तो कसा येणार? शिवाय मशिया कुमारिकेच्या पोटी येणार आहे. माझे लग्न आता योसेफाशी होणार, तेव्हा हीही आशा आता दुरावली. परंतु आपल्या पोटी मशिया यावा ही आशा तिला सुटत नव्हती.

जखाऱ्याकाकांना वेदीजवळ झालेले देवदूताचे दर्शन व मशिया जन्मा-संबंधी मरियेच्या मनात आलेले विचार, या सर्वांचा ताण मरियेच्या मनावर पडला होता. सर्व धर्मविधी आता संपले असल्यामुळे यात्रा पांगली होती.

जखाऱ्याला व मरियेला एक दोन दिवसातच आपापल्या गावी जावे लागणार होते. वेदीजवळ तो तसा प्रकार झाल्यावर जखाऱ्या व अलिशेवा यांचेही मन:स्वास्थ्य बिघडले होते. इतक्या लांब आपण आलो आहोत, पुन्हा या पवित्र ठिकाणी येण्याला मिळते की नाही कोण जाणे, म्हणून एकदा मंदिरात मनसोक्त फिरावे म्हणून मरिया मागेच राहिली व भारावलेल्या मन:स्थितीतच.

यरूशलेमचे मंदिर अत्यंत भव्य व जुने. अशा जुनाट वास्तूभोवती दंतकथा, आख्यायिका आपोआपच निर्माण होतात व लोकांत पसरतात. त्याप्रमाणे या मंदिरासंबंधीही अनेक दंतकथा निर्माण झाल्या होत्या व त्यांनी जनमनाची चांगलीच पकड घेतली होती. रेचेल माता या मंदिरात रात्रंदिवस वावरते, व ती आपल्या लोकांकरता सतत आक्रोश करताना आढळते अशी एक आख्यायिका होतीच. मंदिराला असंख्य दालने होती व या दालनांखाली तळघरासारखे काही तरी दिसे. एक भुयारी रस्ता तर आदामाच्या एदेन बागेत जातो, व एका तळघरात इस्रायल लोकांच्या गतकालीन थोर स्त्रिया वास्तव्य करतात अशा या दंतकथा होत्या.

मरियेला या सर्व दंतकथा माहीत होत्या. भारावल्या मन:स्थितीतच ती आता मंदिराच्या ओसाड भागातून फिरू लागली. मंदिरात स्त्रियांकरिता स्वतंत्र सोय होती. त्यांचीही स्वतंत्र दालने होती. मरियेने एक दालन पाहिले. एका दालनातून तिला वेदीपुढचा भव्य मखमली पडदा दिसत होता. म्हणून ती गुडघे टेकून प्रार्थना म्हणू लागली.

प्रार्थना करण्यात ती दंग असताना कोणी तरी आपल्या डोक्यावर हात ठेवला आहे असा भास तिला झाला. हे काय रेचेल माता? "माते, तू का अशी दु:खी? तू का बरे सारखा अश्रुपात करतेस? आई, आपल्या लोकांचे, सर्व मानवांचे दु:ख नाहीसे होणार नाही का ग? सांग आई, जगाचें हे अश्रू कधीच पुसले जाणार नाहीत काय? आई, मी आता लवकरच विवाहित होणार आहे. माझ्या पोटी सुपुत्र जन्माला येऊन त्याने हे जगाचे अश्रू पुसावे असा वर दे ग आई मला." मरिया प्रार्थना करू लागली. रेचेल माता आपल्या डोक्यावर हात फिरवीत आहे असा भास तिला स्पष्टपणे होत होता. तिची प्रार्थना संपताच रेचेल माता अदृश्य झाली.

आपण स्वप्नात तर नाही ना, असे मरियेला वाटू लागले. ती घाईघाईने उठली. आपला बुरखा सावरला आणि घाईघाईने ती दालनावाहेर पडली. तिचे मन आता शांत झाले होते.

या मंदिराभोवती एक प्रकारचे पावित्र्याचे वातावरण दरवळत असल्याने वृद्ध स्त्री पुरुष आपल्या आयुष्याचा शेवट मंदिराच्या आवारातच व्हावा म्हणून येथेच वास्तव्य करून राहात व तशी त्यांची सोयही होती. प्रार्थनेचा पवित्र मंत्रघोष सतत आपल्या कानांवर पडावा अशी त्यांची मनीषा असे. या लोकांत अशीच एक वृद्धा होती. ती फार वृद्ध असून अगदी थकली होती. मरिया दालनातून बाहेर पडली व तिच्या खोलीवरून ती आता अंगणात जाणार तोच "थांब. थांब मुली, थांब. माझ्या थकलेल्या डोळ्यांना तुझे दर्शन होऊ दे. किती किती धन्य मी की मला मरियाच्या आईचे दर्शन होत आहे! पण मुली, तू येथे का थांबलीस? जा जा, आईच्या घरी जा. तुझी वेळ आता आली आहे." मरिया आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पाहू लागली.

* * *

# सर्व स्त्रियांमध्ये तू धन्य आहेस !

योसेफ व मरिया यांचा जरी वाङ्निश्चय झाला होता तरी प्रत्यक्ष विवाह झाला नव्हता. वाङ्निश्चय व विवाह यांच्यामध्ये निदान सहा महिन्यांचे अंतर असावे अशी त्यांची धर्माज्ञा होती. या सहा महिन्यांत वर वधूकडे जाऊन तिची भेट घेऊ शके. हे एक प्रकारचे प्रेमाराधनच होते. मात्र जर या कालात त्याच्याकडून स्वैर वर्तन होऊन वधू गर्भवती राहिली व चारचोघांत हे कृत्य आपण केले असे जर वराने कबूल केले तर लग्नबंधने ज्यास्त घट्ट व्हावीत व ती मोडली जाऊ नयेत म्हणून वराने हे कृत्य केले, असे समाज मानी. पण जर वराने तसे कबूल केले नाही तर तो कठोर समाज वधूला पापिणी, जारिणी असा शिक्का मारून धोंडमार करून तिला देहदंडाची शिक्षा देई. प्रत्येक मंदिरात धर्ममंडळ असे व या धर्ममंडळाला अशी शिक्षा देण्याचा अधिकार होता. रोमी सरकार लोकांच्या धार्मिक बाबतीत सहसा ढवळा-ढवळ करीत नसे. मात्र देहदंडाची शिक्षा रोमी गव्हर्नर किंवा प्रांताधिकारी मंजूर करी. पण पुष्कळ वेळेला समाजच हा कायदा आपल्या हातात घेई.

मरिया यरूशलेमाहून परत नाझरेथ गावी आली ती मशियासंबंधीचे विचार डोक्यात घेऊनच. घरात वावरताना, मळ्यात काम करताना पाण-वठ्यावर जाताना मशिया आपल्याभोवतीच वावरतो आहे असे तिला प्रत्यही वाटत असे किंवा तिला तसा भास होई. मशिया कुमारिकेच्या पोटी येणार असे जर प्राचीन काळचे भविष्य असले, तरी आपला रूढिप्रिय व कठोर समाज या कुमारिकेला जगू देणार नाही हेही तिला समजत होते. तिने कितीही कंठरवाने सांगितले की माझे मातृत्व पवित्र आहे, तरी त्या कुमारिकेवर कोण विश्वास ठेवणार? समाजाने हे मातृत्व कबूल केल्या-शिवाय त्याला मान्यता कशी मिळणार? आणि समाजाला हे मातृत्व कबूल करायला लावणे हे एक भयंकर दिव्य नव्हते का? यहुदी समाज रूढिप्रिय समाज होता तितकाच तो कठोरही होता. स्त्रीकडे पाहण्याची त्याची

दृष्टी नेहमीच वक्र होती. कुमारी मातेचे धिडवडे हा क्रूर समाज काढल्याशिवाय राहणार नाही हे तिला स्पष्टच दिसत होते.

तिची आई थोरल्या मुलीकडे – मरियामाकडे – गेली होती घरात मरिया एकटीच होती. दुपारची वेळ होती. सूर्याची तीव्रता अगदी असह्य झाली होती. गोठ्यात गाढव व मेंढराची दोन तीन लहान पाडसे होती. ती फार लहान म्हणून चरायला मेंढपाळाबरोबर गेली नव्हती. मरियेने गाढवाला व या पाडसांना चारापाणी दिले. त्यांच्या अंगावरून प्रेमाने हात फिरविला. जवळच मांडवावर द्राक्षांचा वेल बहरला होता. त्याची देखभाल केली. ऊन असह्य झाल्यामुळे ती घरात आली.

मरियेचे घर दगडाचे असल्याने घरात बराच गारवा होता. मागेपुढे झाडी असल्यामुळे घरात अंधार असे. घरात आल्यावर आई येईपर्यंत थोडे कापड विणावे म्हणून ती हातमागाच्या खटपटीला लागली. इतक्यात आपल्या सान्निध्यात कोणी तरी आहे असा भास तिला झाला.

मरिया तशी भित्री नव्हती. किती केलं तरी ती स्त्री. सगळीकडे अगदी शांत शांत. घरात तिच्याशिवाय दुसरे कोणी नाही असा तिचा समज. पण त्या कोपऱ्यात उजेड कसला? अगदी लख्ख प्रकाश तिने त्या कोपऱ्यात पाहिला. तिला एक मोठे विचित्र दृश्य दिसले. देवदूत तेथे उभा होता. त्याच्याभोवती प्रकाश होता. पंख त्याने झाकून घेतले होते. अगदी सौम्य शब्दांत तो म्हणाला, "परमेश्वराची शांती तुझ्यावर असो मुली!" मरिया जरी घाबरली नसली तरी आपण काही तरी असामान्य असे दृश्य पाहात आहो असे तिला वाटले. तिने आपली दृष्टी देवदूताच्या मुखावर स्थिर केली. तो पुन्हा म्हणाला, 'मरिये, भिऊ नकोस. परमेश्वराची कृपा तुझ्यावर आहे. तू कुमारिका असतानाच पुत्र प्रसवशील. त्याचे नाव यशाव (येशू) ठेव. त्याला देवाचा पुत्र म्हणतील. तो सर्व मानवजातीचे दुःख हरण करील." मरिया अगदी आश्चर्यचकित झाली. ती आता बरीच धीट झाली होती. ती देवदूताला म्हणते, "पण हे कसं शक्य आहे? माझा विवाह अजून व्हावयाचा आहे."

देवदूत म्हणाला, "पवित्र आत्म्याने तू गर्भवती होशील. परमेश्वर तुला आपल्या कृपाछत्राखाली घेईल. सर्व स्त्रियांमध्ये तू धन्य आहेस! हाच तो तुझ्या पोटी येणारा मशिया आहे."

पुन्हा सर्व शांत झाले. त्या क्षणापासून मरियाच्या शरीरात फरक पडू लागला व त्याची जाणीव तिला होऊ लागली. मरियेने आपले डोळे क्षणभर झाकून घेतले व पुन्हा कोपऱ्याकडे पाहिले. तेथे देवदूत नव्हता. सर्व काही पूर्वीसारखेच होते.

योसेफ-मरियेच्या लग्नाची तयारी आता जोरात सुरू झाली. दोघेही गरीबच. पै-पैसा जमवून लग्नाचा खर्च करावा लागला. तशात वराने वधूला एक ठराविक रक्कम देण्याचा करार करावा लागे. जर मागे पुढे वराने घटस्फोट घेतला तर तिला ही रक्कम मिळत असे. ही रक्कम वराला तयार ठेवावी लागे. योसेफाने दोनशे दिनार देण्याचे कबूल केले होते, व ती रक्कम त्याने तयारही ठेवली होती. शिवाय त्याला इतरही खर्च होताच. लग्नाला येणारा प्रत्येक माणूस रिकाम्या हाताने येत नसे. काहीना काही तरी आणीच. लग्नाच्या मेजवानीत मांसाहार निषिद्ध मानला गेला होता. कारण त्या गरीब समाजाला तो आहार परवडणारा नव्हता. मध, द्राक्षे, वाळवलेली अंजिरे, खजूर, इतर मेवामिठाई व सुका मेवा यांची मात्र रेलचेल असे. सर्वांत खर्चिक बाब म्हणजे द्राक्षरस. द्राक्षाचा हा देश. द्राक्षरस हेच त्यांचे पेय. तेव्हा द्राक्षरसाला एक प्रकारचा मान असे.

योसेफाने आता स्वतःचे बिऱ्हाड थाटले होते. तो अगदी शांत प्रवृत्तीचा, साधाभोळा, पापभीरू असा तरुण होता. आपले लग्न होणार, बायको येणार, मुलेबाळे होणार, तेव्हा पैसा हा जमविलाच पाहिजे म्हणून तो अगदी काटकसरीने वागे. जसे यहुदी स्त्रीला आपण पुत्रवती व्हावे असे वाटे, तसेच पुरुषाला सुद्धा आपण निपुत्रिक मरू नये असे वाटे. योसेफ दर शाब्बाथ दिवशी मरियेच्याच घरी राही. तो तिला म्हणे, "परमेश्वराची इच्छा असली तर आपण दोघेही नमुनेदार संसार थाटू या. माझे कष्ट आणि तुझे घर चालविण्याचे कौशल्य यांच्या जोरावर आपण आपले घरकूल स्थापू या. या घरकुलाची स्वामिनी तू हो. तुझा शब्द अखेरचा. परमेश्वर जे जे मला देईल त्यात तू सहभागी हो. खरोखर, तुझ्यासारखी कर्तबगार गृहिणी मला मिळते आहे, हे माझं केवढं भाग्य!" बिचारी मरिया लाजून स्वस्थ बसे. नंतर योसेफ पुन्हा म्हणे. "याकोबाला जशी रेचेल तशी तू माझी गृहिणी हो. आपण आपल्या पुत्राला चांगले शिक्षण देऊन सत्कार्याकडे त्याचा उपयोग करू"

मरिया योसेफाकडे पाही मात्र. योसेफाला तिच्या मुखावर कसले तरी दिव्य तेज झळकताना दिसले. तो तिला म्हणतो, "हे काय मरिये? तुझ्यात इतका फरक कसा झाला?"

"कसला बरं फरक? काय झालंय मला?"

"मला तुझी भीती वाटते बघ!"

"माझी भीती? मी तुझी पत्नी नाही का? माझी कसली भीती?"

"तुझ्यात कसला तरी फरक झाला आहे खास. तू इतकी दुःखी – मलूल – का दिसतेस?"

"नाही योसेफ! मी दुःखी नाही. आनंदी आहे. डाळिंबातल्या दाण्यांप्रमाणे आनंदाने माझे हृदय भरले आहे."

"आणि डाळिंबाप्रमाणेच परमेश्वर तुझ्या पोटी रसरशीत फळ देवो."

"परमेश्वराची इच्छा पूर्ण झाल्यावर माझ्या पोटाचे फळ मी परमेश्वरालाच अर्पण करीन."

मरियेची बदलणारी शारीरिक परिस्थिती हळूहळू गावाच्या नजरेस आली. गावाच्या नारीजगात यावर चर्चाही सुरू झाली आणि शेवटी हे सर्व प्रकरण धर्ममंडळाच्या कानांवर गेले. परंतु मरियेला कशाचीच भीती वाटत नव्हती. परमेश्वराचे कृपाछत्र आपल्यावर आहे. आपल्या पोटी मशिया आहे हे लोकांना कळले की लोक आपल्यावर विश्वास ठेवतील असेच तिला वाटत होते.

इकडे मरियेच्या शरीरात काही तरी स्थित्यंतर होत आहे, याचा मागमूसही योसेफला नव्हता. तो आपल्याच तंद्रीत. लग्नाची त्याची तयारी अगदी जोरात चालली होती. हे हवे, ते नको असेच त्याचे चालले होते. आणि शेवटी जेव्हा धर्ममंडळापुढे त्याला पाचारण करण्यात आले तेव्हा त्याला काहीच कळेना. योसेफ मंडळासमोर आल्यावर याजक म्हणाला,

"योसेफ, मला सांगायला दुःख होतं की, तुझी नियोजित वधू गर्भवती आहे. मंडळाने या बाबतीत नारीजनाकडून पूर्ण चौकशी करून खात्री करून घेतली आहे की मरिया गर्भवती आहे. तुझा आणि तिचा वाङ्निश्चय झाला आहे. वाङ्निश्चय आणि विवाह यांच्यात सहा महिन्यांचे अंतर असावे, अशी आपली धर्माज्ञा आहे. या मुदतीत वराला वधूचा सहवास लाभतो व

त्या सहवासापासून जर वधू गरोदर राहिली व तो गर्भ आपला आहे व लग्नबंधने घट्ट व्हावीत म्हणून आपण हे कृत्य केलें असे जर वराने कबूल केले तर वधूची सुटका होते. बोल, योसेफा, तुला काय सांगायचे आहे ?"

योसेफाला काय बोलावे हेच समजेना ! हा आरोप अगदी अनपेक्षित होता. आपणाकडून हा गर्भ राहिला नाही हे योसेफाला माहीत होते. मरिया किती सद्गुणी मुलगी आहे, तिच्याकडून असे पापाचरण व्हावयाचे नाही याची ग्वाही त्याचे मन देत होते. मग हा वाणेरडा आरोप का ?"

"बोल, योसेफ बोल !" याजक म्हणाला, "तुला काहीतरी सांगावेंच लागेल. बोल, तू या कृत्यात सहभागी आहेस काय ?"

सभेत गंभीर वातावरण पसरले. योसेफाने नाही म्हटले की वधूवर केवढा प्रसंग गुदरणार हे सर्वांना माहीत होते. तो प्रसंग तिच्यावर येऊ नये असेच सर्वांना वाटत होते.

पण योसेफ काही बोलेना. सभा अगदी शांत होती. योसेफाच्या तोंडून काय शब्द निघतात याच्याकडे सर्वांचे लक्ष होते. योसेफाने आकाशाकडे पाहात म्हटले, "हे स्वर्गस्थ पित्या, तू माझा पाठीराखा हो, आणि या भयंकर संकटातून एका निरपराधी स्त्रीला वाचीव ."

काय उत्तर आहे, काय उत्तर आहे, असे प्रत्येकजण विचारू लागला.. शेवटी याजक योसेफाला म्हणला, "तुझं उत्तर ऐकण्यास सभा आतुर झाली आहे योसेफ !"

"कोणी हे विष ओतले आहे आपल्या कानात ? कोण हा भयंकर आरोप करू शकतो ?" योसेफ म्हणाला. त्याला उत्तर म्हणून याजक म्हणाला, "हा आरोप मंडळाने केला नाही. मंडळाच्या कानांवर मात्र या गोष्टी आल्यावर मडळाने योग्य ती चौकशी करून खात्री करून घेतली. शिवाय तुझी वाग्दत्त वधूच आपण गर्भवती असून आपल्या पोटी मशिया येणार आहे,' असे सांगत सुटते. मग मंडळाने तरी काय करावे ? तुझं काय म्हणणं आहे ते मंडळाला एकदाचं कळू दे !"

"माझं म्हणणं हेच," योसेफ निश्चयी स्वरात म्हणाला की, "माझी वाग्दत्त वधू मरिया निष्पाप आहे. दोषच असेल तर तो माझा आहे आणि त्याबद्दल मी मंडळ सांगेल ती शिक्षा सोसण्यास तयार आहे !"

## २३ : सर्व स्त्रियांमध्ये तू धन्य आहेस!

योसेफाचे हे भाषण ऐकून सभेवरचे दडपण निघाले असेच सभेला वाटले. अर्थातच जे योसेफाचे विरोधक होते त्यांना मात्र बरे वाटले नाही. याजक म्हणाला, "योसेफ, धर्मशास्त्राने तुला तशी सवलत दिली असल्यामुळे व तुझे कृत्य धर्मबाह्य नसल्याने मंडळावरचे एक मोठे दडपण गेले म्हणून मंडळाला आनंद होत आहे. नाही तर किती तरी भयंकर प्रसंग तुझ्या वाग्दत्त वधूवर आला असता. जा, आता लवकर विवाह करून मरियेसह सुखाने नांद. संतती आणि संपत्ती तुला भरपूर मिळो. जा, इस्रायल वंशात नवीन घरकूल बांध. सुखी हो!" योसेफ धावतच मरियेकडे गेला.

"सांग, सांग, मरिये, लोक म्हणतात ते खोटे आहे असं सांग मला."

"शांत हो योसेफ. लोक खरंच बोलतात."

"काय?"

"हो, लोक खरंच बोलतात. मी गर्भवती आहे."

"मरिया, मरिया, केवढा आघात करीत आहेस माझ्यावर?" योसेफ स्फुंदत म्हणाला, "मला माहीत आहे तू निष्पाप आहेस म्हणून. मग तुझा हा का अट्टाहास?"

"योसेफ, कसं पटवू तुला? मला देवदूताचं दर्शन झालं. मशियानं माझ्या उदरात शयन केलं आहे हे त्यानं मला सांगितलं. मशिया कुमारिकेच्याच पोटी येणार यावर तरी तुझा विश्वास आहे ना?" मरिया म्हणाली.

"नाही मरिया, मला पटत नाही. मी तुला समाजाच्या रोषापासून वाचविलं आहे. तुझे आणि माझे मार्ग आता भिन्न झाले आहेत. जा, इस्रायलांचा देव यव्होव्हा तुझं रक्षण करो."

जड अंतःकरणाने योसेफ आपल्या घरी आला. त्याच्या हृदयात आता भयंकर खळबळ माजली. त्याचे शरीर नुसते आगीने पेटले होते. पॅलेस्टाईनचा तो आवडता भूमध्यसमुद्र त्याचे पाणी आणून शिपडले तरी आपली आग शमणार नाही असे त्याला वाटत होते. यहुदी लोकांची पवित्र अन्नदाती योर्दन नदी प्रत्यक्ष अमृतवाहिनी, पण तिचे अमृत सुद्धा आपलं पेटलेलं शरीर शांत करणार नाही असं त्याला वाटत होतं. योसेफ हा एक ध्येयवादी पुरुष होता. आपल्या सुखी संसाराचे विमल चित्र त्याने रंगविले होते व त्या चित्रावर मरियेच्या एका शब्दाने पाणी पडले असे त्याला वाटत होतें. तो

अगदी बेचैन झाला होता. आपण कोणत्या हेतूने नाझरेथ गावात आलो, कोणत्या हेतूने मरियेशी वाङनिश्चय केला आणि शेवटी होत आहे काय याच विचाराने तो अगदी हताश झाला होता. आता रात्र झाली होती. सकाळी तांबडं फुटण्याचे आत आपण आपले काळे तोंड घेऊन येथून निघून जावे असे त्याने ठरविले व तो आपल्या निघण्याची तयारी करू लागला.

तो अगदी हताश झाला होता. अंत:करणात तर नुसता वडवानल पेटला होता. गाव सोडताना त्याला मनस्वी दु:ख होणार होतं, पण करणार काय? हाच मार्ग त्याला उचित वाटत होता. मरियेपासून जितके दूर आपण जाऊ तितकी शांती आपल्याला लाभेल असे त्याला वाटत होते व त्याच विचारात तो झोपी गेला.

नाझरेथ एवढंसं गाव. अल्लड बालकाप्रमाणे निद्रादेवीच्या कुशीत तेव्हाच झोपी गेले. रस्त्यावर ना दिवा ना बत्ती. सगळीकडे अंधारच अंधार. तसाच अंधार आपल्या जीवनावर पसरला जाहे असे योसेफला वाटत होते.

पहाटेचा कोंबडा आरवला. गावावर अजून अंधारच होता. लोकांची झोप अजून झाली नव्हती. आपण अगदी उचउंच हवेत जात आहोत व आपल्यासमोर प्रकाशाचा समुद्र पसरला आहे असा भास म्हणा किंवा स्वप्न म्हणा, योसेफला पडत होते व कोणी तरी आपल्याला कोमल स्पर्शाने उठवीत आहे असाही भास त्याला झाला.

"योसेफ, योसेफ, ऊठ, मी काय म्हणतो ते नीट ऐक. मी परमेश्वरासमोर असणारा गेब्रिएल देवदूत आहे. तू काय हा अविचार मांडला आहेस? मरिया गर्भवती आहे ती पवित्र आत्म्याकडून; मानवाकडून नव्हे. तू तिचा स्वीकार कर. कुमारिकेच्या पोटी मशिया येईल हे भविष्य तू विसरलास काय? मरियेच्या पोटी मशिया येणार आहे. त्याचे नाव यशाव ठेव. तो जगाचे दु:ख व पाप नाहीसे करील. त्याचा लौकिक पिता तू हो आणि त्याला उतम शिक्षण दे."

योसेफ डोळे चोळीतच झोपेतून जागा झाला. स्वप्न म्हणावे तर आपण बोलणे तर स्पष्ट ऐकले व हा उजेडही आपण पाहात आहोत. छे, हे स्वप्न नसून समक्ष पाहिलेला प्रकार आहे. देवदूताने खरोखरच आपणाला दर्शन देऊन सर्व गोष्टींचा खुलासा केला. आता मरियेचा आपण तावडतोब स्वीकार केला पाहिजे. खरोखर, आपण तिला वृथा छळले! किती पवित्र

ती स्त्री आहे! उगीचच का परमेश्वराने मशियाची माता होण्याकरिता निवड केली? धन्य धन्य, मरिये, सर्व स्त्रियांमध्ये खरोखर तू धन्य आहेस! या यशावचा मी लौकिक पिता होईन. मी त्याला चांगले शिक्षण देईन व त्याचे व तुझे रक्षण करीन. योसेफाला आता एक प्रकारची शांती लाभली. तो आनंदी दिसू लागला सर्व कुविचार आता कुठल्या कुठे निघून गेले. आता या येशूचे लालनपालन करणे हेच आपले मुख्य ध्येय ठरले. असे त्याला वाटून त्या आनंदाच्या भरातच तो मरियेकडे गेला.

* * *

ठाणे. स्थळप्रत.
४००८९
८५६ चरित्र
२८।१।५६

प्रकरण पाचवे

# थोडेसे ऐतिहासिक

इतर सर्व यहुदी लोकांप्रमाणे योसेफ सुद्धा मशियाची वाट पाहत होता, व मशियाच्या आगमनाची या लोकांना उत्सुकता वाटावी अशी राजकीय परिस्थिती पॅलेस्टाईन देशात निर्माण झाली होती.

मशियाची कल्पना या लोकांना एकाएकी सुचलेली कल्पना नव्हे. यहुदी लोकांच्या इतिहासात जो भविष्यवाद्यांचा कालखंड इतिहासकार प्रस्थापित करतात, त्या कालखंडात यशाया, इज्रा, जरमिया हे भविष्यवादी किंवा द्रष्टे पुढारी प्रामुख्याने पुढे येतात. त्यांनी मशियाच्या आगमनाची कल्पना समाजात परिवर्तित केली. राजा ही व्यक्ती यहुदी लोकांच्या समोर असल्याने मशिया म्हणजे एक पराक्रमी राजा अशीच त्यांची कल्पना होती. नंतर आले बाबे-लोनचे साम्राज्य. यहुदी लोकांच्या नशिबी पुन्हा विजनवासात जाण्याचा प्रसंग आला. अशा या बिकट प्रसंगी लोकांना दिलासा देण्याकरिता व त्यांच्यामध्ये नवा आशावाद निर्माण करण्याकरिता या द्रष्ट्यांनी मशियाची कल्पना लोकांमध्ये फैलावली.

यशाया वगैरे भविष्यवाद्यांचा हा कालखंड एका दृष्टीने महत्त्वाचा आहे की, मशियाची कल्पना फक्त यहुदी लोकांपुरतीच व पॅलेस्टाईन देशापुरतीच त्यांनी संकुचित ठेवली नव्हती. सर्व जगच जुलूम, निराशावाद, पारतंत्र्य, वर्ग-कलह इत्यादी आपत्तींच्या खाईत सापडले होते. तेव्हा मशिया जो येणार तो फक्त यहुदी लोकांकरिताच व पॅलेस्टाईन देशाकरिताच, ही संकुचित कल्पना त्यांना करून भागणार नव्हते.

अर्थातच खुद्द पॅलेस्टाईन देशात मॅकाबीजसारख्या क्रांतिवीरांची बंडे निर्माण होऊन परकीय राजसत्ता उलथून पाडण्याची कारवाई सुरू झाली व यहुदी राजाच्या कारकीर्दीत जरी यहुदी लोकांना स्वातंत्र्य मिळाले तरी हा यहुदी राजा मशियाची जागा भरून काढणार नाही हे त्यांना स्पष्टच दिसत होते. मशियाच्या कल्पनेभोवती जे पावित्र्याचे, मांगल्याचे दिव्य

वातावरण दरवळत होते, ते वातावरण या यहुदी राजाभोवती नसणारच, हे उघडच होते; व म्हणूनच मूठभर क्रांतिकारक पक्ष सोडल्यास बहुजनसमाज खऱ्या मशियाकरिता तळमळत होता.

याच सुमारास हेरोद राजा यहुद्यांच्या गादीवर आला. त्याने यरूशलेम-मधले मंदिर दुरुस्त करून घेतले. जवळच ॲटनीयाचा किल्ला बांधला. या किल्ल्यावरून रोमी बादशहा या पवित्र मंदिरावर आपली काळी सावली पाडून मंदिरावर वर्चस्व ठेवी. तरीपण हेरोद राजाने यहुदी लोकांना एक प्रकारचे धार्मिक स्वातंत्र्य मिळवून दिले. त्याने मोठमोठ्या इमारती बांधल्या, रस्ते बांधले, व्यापार-उदीम वाढविला, लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. पण हे सर्व कोणाकरता? रोमच्या सम्राटाकरता? सर्व पैसा रोमच्या खजिन्यात जाऊ लागला व रोमी बादशहा नेहमी खूष राहावा म्हणून हा हेरोद राजा लोकांना पिळून व करांचे ओझे त्यांच्यावर लादून पैसे मिळवू लागला व रोमचा खजिना भरू लागला. तेव्हा येथे यहुदी राजाची कल्पना मशियाच्या कल्पनेशी मिळती जुळती होईना, व म्हणूनच भूतलावरचा कोणताही राजा आपले दैन्य नाहीसे करणार नाही, मशिया हाच आपला खरा मुक्तिदाता आहे असे या लोकांना वाटू लागले; व हा मशिया दाविदाच्याच घराण्यातून येऊन तो आपले दैन्य नाहीसे करील हा त्यांचा बळकट आशावाद जागृत झाला.

दाविदाच्या घराण्याला जे एक प्रकारचे राजकीय महत्त्व मागे प्राप्त झाले होते ते आता हेरोदच्या वेळेला राहिले नव्हते. हे घराणे आपल्याशी एकनिष्ठ नाही अशी खोटी कल्पना त्याने करून घेतली होती. थोडा जरी संशय आला की तो या घराण्यातील लोकांची लांडगेतोड करी व त्यांना देशोधडीला लावी.

हेरोदाच्या रोषापासून बचाव करण्याकरिता या घराण्यातील लोक शहरवस्ती सोडून दूर दूर खेड्यात जाऊन राहू लागले. यांपैकीच योसेफाचा बाप याकोब, भटकत भटकत नाझरेथ गावी आला. त्याची सर्व मालमत्ता हेरोद राजाने सरकारजमा केली होती व या याकोबाला सुतारकीचा व्यवसाय करून आपले पोट भरावे लागे. पण येथेही याकोबाला हेरोदने दोन घास सुखाने खाऊ दिले नाहीत. याकोब अज्ञातवासात नाझरेथ गावात

आहे हे कळताच तो त्याच्या पाठीमागे हात धुऊन लागला व त्याला देशो-धडीला लावले. दाविदाचे कुलच त्याला साफ पुसून टाकायचे होते. याकोबाला डोंगराचा व गुहांचा आश्रय घ्यावा लागला. अशाच गुप्त ठिकाणी याकोबाला मुले झाली. योसेफ हा त्याचा सर्वांत धाकटा मुलगा. याकोबाची दुसरी मुले दारिद्र्याला कंटाळून बंडखोर व दरोडेखोर बनली. आपल्या घराण्याचे गतवैभव आपण पुन्हा मिळवू ही त्यांची आशा आता कायमचीच दुरावली. योसेफ मात्र परमेश्वर ठेवील तसे राहावे या वृत्तीचा असल्याने काबाडकष्ट करून तो आपल्या बापाला मदत करीत असे. सुतारकीचा त्याचा धंदाही त्याने उचलला. कधी काळी मशिया आपल्याच घराण्यात जन्माला येणार आहे, हे स्वप्नसुद्धा तो आता विसरून गेला होता. परंतु यहुदी लोकांप्रमाणे तोही आता मशियाची वाट पाहू लागला. आईबापांचे निधन झाल्यानंतर योसेफ भटकत भटकत नाझरेथ गावी आला व तेथे वर सांगितलेल्या घटना घडल्या. योसेफ हा मूळचाच धार्मिक प्रवृतीचा होता. तेव्हा मशिया हातात तरवार व राजदंड घेऊन येणार ही कल्पना त्याच्या मनाला शिवली सुद्धा नाही. मशियाला परमेश्वर पाठविणार व तो सर्व जगाकरता, हीच त्याची कल्पना होती व देवदूताने सांगितल्याप्रमाण मशियाचे पालकत्व त्याच्याचकडे येणार असल्याने त्याला एक प्रकारचा आनंद झाला होता व या आनंदाच्या भरातच तो मरियेकडे गेला.

* * *

प्रकरण सहावे

# रोमचा जाहीरनामा

योसेफ आणि मरिया यांचा आता रीतसर विवाह झाला. मरियेची आई हन्ना एकटीच घरी असल्याने मरिया जर योसेफकडे गेली असती तर हन्नेला पाहायला घरी कोणीच राहिले नसते. शिवाय हन्नेचे शेतपोत, गुरेढोरे, मळेतळे होतेच. त्यांचीही देखभाल करण्यास कोणीतरी पुरुष माणूस पाहिजेच होता. तेव्हा मरियेची थोरली बहीण मरियामा व तिचा नवरा खईफा, योसेफाचे काका या सर्वांच्या संमतीने योसेफाने सासूच्याच घरी राहावे व शेतीभातीची देखभाल करावी व आपला सुतारकीचा धंदाही चालवावा असे ठरले व योसेफ आता मरियेच्याच घरी राहू लागला.

अलिशेबा नंतर लवकरच पुत्रवती झाली. हा मुलगा अगदी बाळसेदार असून चांगला सशक्त होता. त्याला जावळही भरपूर होते. वृद्ध जखाऱ्याचा आनंद तर गगनात मावेना. देवदूताच्या आज्ञेप्रमाणे या बाळाचे नाव योव्हान, परमेश्वराचा कृपाप्रसाद, असे ठेवण्यात आले. योव्हानाचा जन्म होताच जखाऱ्याची वाचा परत आली.

योसेफ व मरियेचा संसार अगदी आनंदात चालला होता. मरियेचे दिवसही भरत आले होते. इतक्यात रोमचा जाहीरनामा आला की, प्रत्येक यहुदी माणसाचे आपआपल्या कुळाचे जे गाव असेल तेथे जाऊन स्वत;ची नोंद करावी. ही नोंद म्हणजेच खानेसुमारी होय. खानेसुमारी करणे हा प्रकार यहुदी लोकांना काही नवा नव्हता. मोशेने हे लोक वाळवंटात वनवासात असताना एकदा त्यांची खानेसुमारी केली होती. कारण लढण्यास योग्य असे किती लोक आहेत, हे त्याला अजमावयाचे होते व त्या दृष्टीने त्याने ही मोजणी केली होती. रोमलाही मोजणी पद्धत नवी नव्हती. रोमच्या पद्धतीप्रमाणे प्रत्येक माणसाच्या गावी म्हणजे जेथे तो राहतो त्याच गावात त्याची नोंद करण्यात येई. पण यहुदी पद्धतीप्रमाणे यहुदी माणसाचे कूळ ज्या गावी असेल त्या गावी जाऊन मोजणी करून घ्यावी,,

अशी पद्धत होती. यहुदी लोक आपआपल्या कुळाला फार महत्त्व देत. प्रत्येक घराण्याचा वंशवृक्ष त्या गावाच्या मंदिरात काळजीपूर्वक जतन करून ठेवण्यात आला होता. मोजणीच्या वेळी हा वंशवृक्ष पुन्हा तपासण्यात येऊन त्याची छाननी होई. दाविदाचे कूल मूळचे बेथलेहेम गावाचे! योसेफ व मरिया दोघेही दाविदवंशीय, तेव्हा त्यांना स्वतःच्या मोजणीकरता बेथलेहेम येथेच जावे लागले.

नाझरेथ गावात जेव्हा हा जाहीरनामा दवंडीने प्रसिद्ध करण्यात आला तेव्हा योसेफ चांगलाच घाबरला. कारण आपल्या गर्भवती स्त्रीला, तिचे दिवस भरत आले असताना इतक्या लांब गाढवावर बसवून नेणे किती धोक्याचे आहे हे त्याला समजत होते. त्याला धीर देत मरिया त्याला म्हणाली, "योसेफ, देवदूत मला काय म्हणाला होता?"

"घाबरू नकोस. धीर धर."

"आणि तुला?"

"मलाही तेच म्हणाला."

"मग झाले तर. परमेश्वर आपला पाठीराखा आहे. तो सर्व गोष्टी सुरळीत पार पाडील."

"ते सर्व खरं, पण तुझे दिवस भरत आले आहेत ना?"

"पण योसेफ, मशिया बेथलेहेम गावातच जन्माला यावा असे भविष्य वर्तविण्यात आलं नाही का? आपण तर मोठ्या आनंदाने तिकडे गेलं पाहिजे."

"होय, ईश्वरी संकेत कधीच चुकत नसतात. उद्याच निघू या आपण."

नाझरेथ गावापासून बेथलेहेम गाव सुमारे ऐंशी मैल लांब आहे. प्रवास सर्व वाळवंटातूनच व डोंगरांतून व तोही गाढवाच्या पाठीवरून. तेव्हा मरियेला किती त्रास झाला असेल याची कल्पना येते. बेथलेहेम गाव यरूशलेमापासून जवळच आहे. गावाच्या भोवती डोंगर व द्राक्षांचे मळे आहेत. गावाला डोंगर असल्याने अनायासे मेंढरांच्या चरण्याची सोय झाली. गावात व आजूबाजूला मेंढपाळांची वस्ती बरीच आहे.

बेथलेहेम गावाजवळ येताच तिला पुन्हा रेचेल मातेची आठवण झाली व मागच्या स्मृती जागृत झाल्या. पण रेचेल मातेने आता का शोक करावा?

अश्रू का ढाळावेत ? केवढी मोठी आशा आता परमेश्वराने आपल्या उदरात निर्माण केली आहे. हजारो, नव्हे लाखो यहुदी लोक वेळोवेळी सत्ताधाऱ्यांनी गुलाम करून याच रस्त्याने नेले, पण माते, आता मशिया नाही का माझ्या उदरातून जन्माला येत! मशिया म्हणजे मुक्तिदाता, उद्धारक. तो या लोकांचे अश्रू पुसून त्यांचा उद्धार नाही का करणार ? ज्या उद्धारकाची आपण इतकी युगे वाट पाहात होतो तो उद्धारक लवकरच जन्माला येणार आहे. माते, मग तुझा शोक आवर. तुझ्या अश्रूचा अभिषेक का तू माझ्या बाळावर करणार ? थांबा, शोकग्रस्त झालेल्या माझ्या बंधूंनो, थांबा. मला तुमचे डोळे पुसू द्या. तुम्हांला मी आनंदाची बातमी देत आहे. मशिया जन्माला येत आहे, सर्व जगाचे दुःख तो नाहीसे करील, पाप, अन्याय, दुःख, शोक सर्व सर्व काही आता नाहीसे होईल. सबंध मानवजात आता सुखी होईल. हा दिलासा आता तुम्हांला पुरेसा नाही का ? आता दुःखाचे काय कारण ? रेचेल माते, मी आता बेथलेहेमला जाते. तेथूनच इस्राएलांचा राजा निर्माण होणार आहे ना ? आता तू शांत चिरनिद्रा घे. तुझ्या अश्रूंचे पारितोषिक तुला मिळाले आहे. वणवण फिरण्याची तुला आता जरुरी नाही. माते, शांत हो !

हे विचार मरियेच्या अंतःकरणात येत होते व तिच्या मुखावर एक प्रकारच्या पवित्र आनंदाचे तेज झळकत होते. योसेफला तिच्या मुखाकडे पाहावेना. मरियेला प्रसूतिवेदना तर होत नसतील ? आपण मूर्तिमंत पावित्र्य व मांगल्य यांच्या सान्निध्यात आहोत असाच भास योसेफला होत होता. मरिया रेचेल मातेच्या कबरीजवळ क्षणभर थांबली होती तेव्हाच हे विचार तिच्या मनात येत होते. तिला पुन्हा गाढवावर बसवून योसेफ लगाम धरून बेथलेहेम गावाकडे चालू लागला.

पण बेथलेहेम गावात तर ही गर्दी ! सर्व दाविदवंशीय लोक स्वत:ची मोजणी करून घेण्याकरिता राजाज्ञेप्रमाणे बेथलेहेम गावात आले होते. त्यांत गरीब, श्रीमंत, शेटसावकार, शेतकरी, मजूर सर्व प्रकारचे लोक होते. श्रीमंत माणसे मेण्यात अगर डोलीत बसून जात होती, तर साधारण प्राप्तीची माणसे गाढवावर बसून जात होती. काही श्रीमंत व्यापारी उंटांवर बसून जात होते. तर गरीब लोक बिचारे पायीच रखडत जात. सर्वांची एकच गर्दी बेथलेहेम या लहानशा गावी उसळली होती.

गावात एकच उतार शाळा किंवा सराई होती. अशा उतार शाळांना खान हे नाव होते. ही उतार शाळा लहानशा टेकडीवर बांधलेली होती. खानाची बांधणी ओबडधोबड दगडाची होती. सहसा खानाचा एकच मजला असे. आजूबाजूने चोक असून या चौकाला लागून ओवऱ्या किंवा पडव्या असत. याच पडव्यांत उतारूंची जनावरे बांधण्यात येत. या पडव्या चौकापासून दोन तीन फूट उंच असत व जमीन सर्व मातीची असे. प्रवाशांची सोय वरच्या किंवा तळमजल्यावर करीत. पण यांना पुढची भिंत नसल्याने प्रवाशांना एकान्त लाभत नसे. प्रत्येक खोलीत काय चालले आहे ते सर्वांना दिसे. प्रत्येक प्रवाशाने आपआपला बिछानाच काय पण जेवण सुद्धा आपल्या बरोबर आणले पाहिजे असा या उतार शाळेचा नियम असे. प्रवासी म्हणजे गाढवावर किंवा उंटावर बसून येणार ! पण या जनावराची देखभाल सुद्धा ज्याने त्याने करावी किंवा करून घ्यावी, असाही नियम असे. जवळच विहीर असे. लागणारे पाणी सुद्धा प्रवाशाने आपआपले आणले पाहिजे असाही नियम होता. म्हणजे या खानावळी नुसत्या रात्रीपुरता जनावरांना व माणसांना आश्रय देणाऱ्या उतारू शाळा असत. प्रवाशांकरिता ज्या खोल्या होत्या त्यांत जागा मिळाली नाही तर जनावरांच्या पडव्यांतच प्रवाशांना राहावे लागे. मात्र अशा प्रवाशांना कुरकुर करता येत नसे. जनावरांच्या सान्निध्यात त्याने खुशाल रात्र काढावी !

या खानांची किंवा उतार शाळेची रचनाच डोंगराच्या गुहेमध्ये केलेली असे. बेथलेहेममध्ये डोंगर होताच. डोंगर खोदूनच या गुहा तयार करण्यात आल्या होत्या व त्यांचे रूपांतर उतार शाळेत झाले होते. मशियाचा जन्म अशाच एका गुहेत झाला असे बायबलच्या संशोधकाचे म्हणणे आहे. अर्थातच अशाच गुहेत जनावरेही बांधण्यात आली होतीच. कारण त्या वेळी खानात प्रवाशांची अतोनात गर्दी झाली होती. ज्या खानात मशियाचा जन्म झाला त्या खानाचे रूपांतर पुढे Church and Convent Nativity मध्ये रूपांतर झाले. बायबलवरचा प्रसिद्ध पंडित सेंट जेरोमी याच ठिकाणी आपल्या आयुष्याच्या अंतिम काली वास्तव्य करून राहिला होता. या पंडिताने प्रथमच बायबलचे लॅटिन भाषांतर केले. असो. याच उतार शाळेकडे योसेफ मरियेला घेऊन आला.

" उतार शाळेत माझ्या गर्भवती पत्नीला जागा मिळेल का ? तिची वेळ भरत आली आहे." योसेफ मालकाला म्हणाला.

"काय म्हणालात ? वेळ भरत आली आहे ?" मालक म्हणाला. हा मालक ग्रेबिएल. उंचापुरा व बराच गलेलठ्ठ होता. तो योसेफकडे वळून पुन्हा म्हणतो,

" असं कसं ? भलत्याच वेळेला तुम्ही आला. ही गर्दी पाहिलीत ना ? कोणा-कोणाची म्हणून सोय करू ? तशात पुरुष माणसाचं भागलं असतो हो. पण बायकांची सोय कशी करू? तशात तुमची बायको प्रसूत होणार म्हणता !"

"होय, तिची वेळ अगदी भरत आली आहे बघा. तुमचे जे काही पैसे होतील ते मी देऊन टाकीन." योसेफ अगदी अजीजीने म्हणाला.

"ते सर्व खरं हो, पैशाशिवाय का कोणी तुमची सोय करणार ? पण या गर्भवती स्त्रीला कुठं बरं ठेवू ? नंतर जरा विचार करून ग्रेब्रिएल म्हणाला, "थांबा हं. पाहातो विचारून." असे म्हणून आपल्या बायकोला सारा-सारा म्हणून हाका मारण्यास त्याने सुरुवात केली. चार-पाच हाका मारल्यावर एक अत्यंत लठ्ठ स्त्री गेब्रिएलपुढे येऊन उभी राहिली व रागात म्हणाली,

" काय झालं हो एवढं ओरडायला ? एखादा रोमन सैनिक का लागला आहे तुमच्या मागं ? "

" तो कशाला लागेल बिचारा माझ्या मागं ! पण हे प्रवासी मात्र लागले आहेत माझ्या मागे खानात जागा द्या म्हणून ! हे काय म्हणतात ते तरी पाहा एकदा ! " गेब्रिएल म्हणाला. योसेफाने नंतर आपली अडचण तिला समजावून सांगितली. आपल्या बायकोची प्रसूतीची वेळ कशी जवळ आली आहे व तिला कोठे तरी आसरा मिळणे कसे आवश्यक आहे हे त्याने त्या बाईला समजावून सांगताच ती सुद्धा विचार करू लागली. नंतर नवऱ्याकडे वळून म्हणाली,

" बरं का गेब्रिएल, आपण काही तरी केलं पाहिजे या स्त्रीकरता ! आता त्यांना परत कसं पाठविता येईल ? ती शेवटची पडवी आहे ना, तेथे करू या हिची सोय !" नंतर योसेफाकडे वळून ती म्हणाली, "चला, आणा हो तुमच्या बायकोला !"

एका गुहेत मालकाची पाच-सहा मेंढरे व एक गाढव बांधलेले होते. तेथेच एक ओटा असून ओट्यावर पुष्कळसे गवत घालून व त्यावर चादर घालून साराने मरियेला बिछाना घालून दिला. गरम पाणीही आणून दिले व प्रसूतीला लागणाऱ्या इतर जिनसाही आणून दिल्या. मरियेची सर्व सोय झाल्याचे पाहून यासेफालाही आनंद झाला व तो पडवीच्या बाहेर येऊन पुढील घटनेची वाट पाहात बसला,

गेब्रिएल व सारा हे एक प्रेमळ जोडपे होते. खानावळीचा किंवा खानाचा धंदा पॅलेस्टाईनमध्ये फारसा प्रतिष्ठेचा मानला गेला नव्हता आणि खानावळवाल्याच्या बायकोलाही समाजात मान नव्हता. यहुदी समाजात जो रात्री व याजकांचा वर्ग असे त्यांनी खानावळवाल्या स्त्रियांना कमी लेखले असून इतर यहुदी स्त्रियांप्रमाणें त्यांना मान मिळत नसे. याचे कारणही उघड आहे. यहुदी स्त्रिया अगदी कडक नव्हे पण गोषा पाळीत. त्या सहसा पुरुषांच्या पुढे येत नसत व त्यांच्यात मिसळतही नसत. आणि खानावळ किंवा खान म्हटले की पुरुषांशी संबंध आलाच. प्रवासी पुरुषांचे काय हवे नको ते मालकिणीलाच पाहावे लागे व तिचा हरघडी पुरुषांशी संबंध येई. याच कारणामुळे खानावळवाल्या स्त्रियांना समाजात मान नव्हता.

काही जरी असले तरी साराने मरियेबद्दल ताबडतोब आपुलकी दाखविली. मरिया कोण आहे, किती अघटित घटना आपल्या या ओबडधोबड ओवरीत घडत आहे, याची कल्पना सुद्धा या जोडप्याला नव्हती. परंतु मरिया एक स्त्री आहे व स्त्रीने स्त्रीला साह्य केले पाहिजे याच भावनेने सारा पुढे सरसावली. या अगदी सामान्य स्थळी आजूबाजूला मेंढरे, गाढवे असताना, अगदी सामान्य वातावरणात जगाला शांतीचा संदेश देणारा शांतिदूत जन्माला आला.

* * *

# आम्ही नमन करावयाला आलो आहोत

यरूशलेमपासून बेथलेहेम सात-आठ मैलांवर आहे. हे गाव यहुदा प्रांतात मोडते तर नाझरेथ गाव गॅलली प्रांतात येते. गालील हा मूळ शब्द आहे आणि तो ग्रीक आहे. याचा अर्थ वर्तुळ असा आहे. खादेश नेपाथाली या भागात जी वीस मोठी शहरे येतात या सर्व भागाला गालील असे नाव मिळाले. यहुदी लोकांचा प्रभावी राजा शलमोन याने यरूशलेम येथील मंदिर व इतर मोठमोठ्या इमारती बांधल्या. या इमारतींना हीराम हा माणूस लाकूड पुरवीत असे. त्याच्या कामगिरीवर खूष होऊन शलमोन राजाने हा भाग त्याला देऊन टाकला. परंतु हीरामला हा भाग मुळीच आवडला नाही व त्याने आपले नाक मुरडले. त्याने काबूल म्हणजे तुच्छ हा शब्द वापरला आणि दुर्दैव असे की, गालील प्रांतातील लोकांना इतर लोक तुच्छच मानीत आले आहेत. हा भाग नंतर गालील किंवा गॅलली या नावाने संबोधिला जाऊ लागला. या गालील प्रांताला इतर प्रांतांतील यहुदी नाक मुरडू लागले किंवा तुच्छ मानू लागले याचे कारण या प्रांतात इतर धर्मांचे व देशांचे लोक राहू लागले. ही भेसळ त्यांना आवडली नाही. या भागाची ग्रीक भाषा जवळ जवळ मायबोली झाली होती.

बेथलेहेम गावात डोंगराळ भागच जास्त आहे. येथे मेंढपाळांची वस्ती जास्त असल्याने ते आपली मेंढरे या डोंगरावर सतत चरण्यास नेत. पुष्कळदा त्यांना रात्रीची वस्तीही तेथेच करावी लागे.

मशियाच्या जन्माच्या दिवशी हे मेंढपाळ तेथेच डोंगरावर आपली मेंढरे घेऊन वस्तीला राहिले होते. थंडीचे दिवस असल्याने थंडी मी म्हणत होती. आकाशात एकाएकी एक तारा चमकू लागला व आकाशवाणीही झाली की, जगाचा उद्धारक व शांतिदूत जन्मला आहे. हे दृश्य पाहून मेंढपाळ भयभीत झाले. त्यांपैकी जो पोक्त मेंढपाळ होता तो म्हणाला, "गड्यांनो, काही तरी

अघटित घडत आहे. चला, आपण गावात जाऊन तपास करू. मशिया याच गावात जन्मावा असे भाकीत आहे. तर चला." सर्व मेंढपाळ सर्व मेंढरे एकत्र करून व त्यांना तेथेच सुरक्षित ठेवून बेथलेहेम गावाकडे निघाले.

मरियेचा गोठा मेंढपाळांच्या रस्त्यावरच होता व स्वर्गीय ताराही तेथेच थांबला. तेव्हा याच उतारशाळेत मशिया जन्माला आला असावा अशी त्यांची खात्री झाली. योसेफ दाराच्या तोंडाशीच होता. एकाने विचारले,

"काय हो, येथे एखादे बालक जन्माला आले आहे काय ?"

"होय !"

"मुलगा ना ?"

"होय !"

त्यावर तो पोक्त मेंढपाळ आपल्या सोबत्यांना म्हणाला, "गड्यांनो, आपल्या येण्याचे सार्थक झाले. ताराही येथेच थांबला आहे !" नंतर योसेफाकडे पाहून तो म्हणाला, "आम्हांला या बालराजाचे दर्शन घडवा. आम्ही त्याच्याकरताच येथे आलो आहोत." नंतर या मेंढपाळांनी आत जाऊन मशियाचे दर्शन घेतले व नजराणा देऊन ते आपल्या डोंगराकडे परतले. मेंढपाळ निघून गेल्यावर मरिया योसेफाला म्हणाली, "माझ्या बाळाच्या दर्शनाला मेंढपाळ यावेत हे एक सुचिन्ह आहे. आपले सर्व नेते मेंढपाळच होते, नाही योसेफ !"

"होय ! आपल्या कुलाचा संस्थापक दाविद मेंढपाळ होता. मेंढरे चारायला गेला असताना राजा म्हणून त्याची निवड परमेश्वराने केली."

हा तारा जसा मेंढपाळांनी पाहिला तसा हेरोद राजाने व इतरांनीही पाहिला. मरियासंबंधीचे भविष्य ऐकून व प्रत्यक्ष तारा पाहून हेरोद राजा बेचैन झाला होता. हा उद्धारक किंवा राजा जर जन्माला आला तर रोमन साम्राज्याचे सिंहासनच डळमळीत होईल, व त्यामुळे आपलेही सिंहासन स्थिर राहणार नाही, असे या दुष्ट राजाला वाटत होते. हा राजा फार दुष्ट, क्रौर्याचा मूर्तिमंत पुतळा ! त्याने किती हत्या केल्या असतील याची गणतीच नाही. मानवी रक्त पाहून याला मनस्वी आनंद होई. किती तरी

निरपराध्यांना त्याने अमानुषपणे मारून टाकले होते. तेव्हा " हा कोण नवा राजा जन्माला येत आहे, " असा विचार येऊन त्याचा क्रोध उसळी मारून वर यावा हे त्याच्या स्वभावानुसारच होते.

हा तारा पूर्वेकडच्या लांब देशांतही दिसला व या लांबच्या देशांतून तीन मागी किंवा पंडित पॅलेस्टाईनकडे आले. या मागी पंडितांचे आगमन म्हणजे यहुदेतर लोकांना या मशियाची माहिती झाल्याची खूणच होती. कारण हे पंडित काही यहुदी नव्हते. या पंडितांचे आगमन म्हणजे मशिया-संबंधी जी यहुदी लोकांची कल्पना होती की, तो काही यहुदी लोकांकरताच येत नसून यहुदेतर लोकांकरताही येत आहे, या कल्पनेशी जुळते.

येशूच्या जन्माचे वेळी तारा जगाला दिसला, ही घटना सुद्धा लोकांना अपरिचित नव्हती. एखादी महान् व्यक्ती जन्माला यावयाची असली किंवा तिचा अंत व्हावयाचा असला म्हणजे नभोमंडळात घडामोडी होतात, ही कल्पना पौर्वात्य देशांतच काय पण पाश्चिमात्य देशांत थेट शेक्सपियरच्या कालापर्यंत प्रचलित होती. ग्रीक व रोमन लोकांतही ही कल्पना सर्वांच्या परिचयाची होती. कोणती तरी महान् व्यक्ती यहुदा प्रातात जन्माला येणार आहे, हे भविष्य पूर्वेकडच्या देशांनाही माहीत होते. हे भविष्य व समोर दिसणारा तारा पाहून हे मागी लोक यरूशलेम-कडे आले व सरळ हेरोद राजाच्या पुढे येऊन उभे राहिले.

आधीच हेरोद राजा म्हणजे मूर्तिमंत क्रोध. कोणी तरी आपल्या व रोमच्या सिंहासनाला धक्के देऊन रोमच्या गरुड पक्ष्याचे पंख उपटून टाकीत आहे, अशी या हेरोद राजाने आपली कल्पना करून घेतली होती. मागी लोकांच्या दृष्टीने ही महान् व्यक्ती म्हणजे राजाच असणार व आपण त्या बालराजाच्या दर्शनाला आलो आहोत, त्याला आपण नमन करणार आहोत, असा आपला यरूशलेमला येण्याचा हेतू त्यांनी राजाला कळविला.

हेरोदाने आपला राग व्यक्त न करता मागी लोकांना विचारले, " हा बालराजा कोठे जन्माला येणार आहे ? "

" बेथलेहेम गावात. आम्हांला हा दिव्य तारा मार्गदर्शन करीत आहे. "

" बरं, तुम्ही असं करा! " हेरोद समजावण्याच्या स्वरात म्हणाला, " तुम्ही

या बालराजाचे दर्शन घ्या. त्याला नजराणे द्या व मला येऊन सांगा, म्हणजे मीही जाऊन या बालराजाला वंदन करीन. "

हे मागी लोक नंतर बेथलेहेमला गेले. मशियाला वंदन केले व त्याला सोन्यारुप्याचा, सुवासिक अत्तराचा, तेलाचा व धूपाचा नजराणा वाहिला. हे लोक मात्र परत हेरोदाकडे गेले नाहीत. स्वप्नात त्यांना तसा इशारा मिळाला व दुसऱ्या वाटेने ते आपल्या देशाला निघून गेले.

हेरोद किती क्रूर आहे, तो लोकांचा किती अमानुष छळ करतो हे मागी लोकांना माहीत असल पाहिजे. आपण या बालराजाला वंदन करायला जाऊ असे जरी हेरोद म्हणाला असला तरी त्याचे हे ढोंग आहे. या बालराजाचे आगमन आपल्या सिंहासनावर किती अनिष्ट परिणाम करील, हे या पंडितांना समजले असले पाहिजे व जर आपण त्याच्याकडे परत गेलो, तर हा दुष्ट व कोपिष्ट राजा या बालकाला मारून टाकल्याशिवाय राहणार नाही हेही या मागी लोकांना कळले असले पाहिजे व ते हेरोदाकडे न जाता दुसऱ्या रस्त्याने आपल्या मायदेशी गेले. जाताना योसेफाला सुद्धा त्यांनी तसा इशारा दिला असावा. योसेफालाही स्वप्नात परमेश्वराने तसा इषारा दिल्यामुळे योसेफ मरियेला व बाळाला घेऊन मिसर देशाकडे गेला. मिसर देश म्हणजे इजिप्त हा त्या वेळी निर्वासितांचा देश झाला होता. दुष्काळ पडो, छळ होवो किंवा दुसरी कसलीही आपत्ती येवो, लोक आश्रयाकरिता इजिप्तकडे जात. यहुदी लोक दुष्काळातून वाचण्याकरिता योसेफाच्या वेळेला इजिप्तच्या गोशेन प्रांतात गेले होतेच. तेव्हा योसेफाने मिसर देशाचा आश्रय घ्यावा यात नवल नाही. मागी लोकांनी सोन्यारुप्याचा नजराणा येशूला वाहिला होता त्याचा या वेळी योसेफाला चांगला उपयोग झाला.

मागी लोकांनी आपणास फसविले, ते पुन्हा आपल्याकडे आले नाहीत, बालराजा आता आपल्या हातातून निसटणार म्हणून हेरोद राजा भयंकर क्रोधवश झाला. दरबारातल्या नोकरांना तर त्याने सळो की पळो करून सोडले. तो काही केल्या शांत होईना. मागी लोकांना खाऊ की गिळू असे त्याला झाले होते. दरबारचे नोकर त्याने सगळीकडे पाठविले. त्याचे हेर जिरीको,

ट्रान्सजॉर्डीनिया देशापर्यंत गेले, पण मागी लोकांचा मागमूस लागला नाही. प्रत्येक हेर रिकाम्या हाताने येई आणि तसतसा हेरोदाचा राग वाढीला लागे. " मला फसविलं काय ? पाहीन हा कोण राजा जिवंत राहातो ते ! आकाशपाताळ एक करीन, पण या बालकाला चिरडल्याशिवाय राहणार नाही. बालक जर जिवंत राहिले तर ते माझे व रोमचे सिंहासन डळमळीत करील. रोमची राजसत्ताच नाहीशी करील. छे, हे कार्टं माझ्या हातून मेलंच पाहिजे. हो, मेलंच पाहिजे ! " हेरोद आपल्याशीच म्हणे.

तो आता अगदीं बेचैन झाला होता. त्याला काही एक सुचेना. त्याच्या मनात एकच विचार ! हे बालक कसे नाश पावेल ! असाच तो विचार करीत असताना त्याच्या मनात एक अत्यंत क्रूर असा विचार येऊन गेला. क्रोधी, तापट व पापी माणसाच्या मनात तसेच वाईट विचार यावयाचे. चांगल्या विचारांचे ते थोडेच उगमस्थान आहे ! तो स्वतःशीच म्हणू लागला, " मागी काय बरे म्हणाले ? हा बालराजा बेथलेहेम गावातच जन्माला येणार ! दोन वर्षाखालील सर्व बालके जी बेथलेहेममध्ये असतील त्या सर्वांचा नाश केला म्हणजे याही बालकाचा नाश होईल ! सोपा उपाय आहे हा !

हा क्रूर विचार या नरराक्षसाच्या मनात येताच त्याचे सुद्धा शरीर शहारले. बेथलेहेममधील या निष्पाप बालकांची ही हत्या अत्यंत क्रूर आहे हे त्यालाही पटले. पण आपले व रोमचे सिंहासन जर सुरक्षित ठवावयाचे तर या बालराजाबरोबर इतरही बालकांची हत्या झालीच पाहिजे असे त्याच्या मनाने घेतले ते काही त्याच्या मनातून निघेना. मग काय, राजा बोले आणि दळ हाले. त्याच्या मुखातून निघणारा प्रत्येक शब्द झेलण्यास त्याचे दास तयार होतेच. त्याने ताबडतोब आपल्या सैन्याला बेथलेहेमला जाऊन सर्व बालकांची हत्या करण्याचा हुकूम दिला. हा हुकूम इतका क्रूर व अमानुष होता की, तो ऐकून हे सैनिक सुद्धा स्तंभित झाले. हेरोदानें हा हुकूम तर दिला. नंतर तो विचार करू लागला, आपले हे कृत्य रोमच्या सम्राटाला पसंत पडेल काय ? रोमचा सम्राट सीझर आगस्टस जितका शांत व सौम्य प्रवृत्तीचा तितकाच हेरोद कोपिष्ट. आगस्टसला अत्याचार सहन होत नसत. पण अत्याचार, जाळपोळ, रक्तपात हा तर हेरोदाचा स्थायी

भाव. तेव्हां या नराधमाकडून हे बालहत्याकांडाचे अमानुष कृत्य झाले नसेलच असे म्हणवत नाहीं. त्याला स्वतःचे व रोमचे सिंहासन सुरक्षित ठेवायचे होते.

योसेफ मरिया व येशू यांना घेऊन इजिप्तमध्ये गेला. आजच्या कैरोच्या आसपास हें कुटुंब राहात असावे. इजिप्तमध्ये या कुटुंबाचे वास्तव्य सुमारे दोन वर्षें होते. बालहत्याकांड झाल्यानंतर अत्यंत हालात हेरोदाचे निधन झाले व पॅलेस्टाईनने सुटकेचा उसासा टाकला!

* * *

# भाग दूसरा

# नाझरेथ गावी

मिसर देशात योसेफ, मरिया व येशू दोन वर्षे राहिले, पण तेथले वास्तव्य त्यांना सुखदायक झाले नाहीं. इजिप्शियन लोकांशी हे कुटुंब कधीच समरस झाले नाहीं. एके काळी यहुदी लोक आपले गुलाम होते. आपण त्यांच्यावर वर्चस्व गाजवीत होतो व म्हणूनच हे लोक आपल्यापेक्षा हीन आहेत असेच मिसरी लोकांना वाटत असे. फारोने या लोकांची जी सुटका केली ते हे लोक महारोगी होते म्हणून, अशी या लोकांची समजूत असल्याने यहुदी लोकांकडे हे लोक तुच्छतेनेच पाहात. एकंदरीत मिसर देशातील वास्तव्य या कुटुंबाला त्रासदायकच गेले व नाझरेथ येथील आपल्या घरी आपण केव्हा जातो असे मरियेला झाले होते.

नाझरेथ गावी येताना येशू सुमारे दोन वर्षांचा होता. त्याचे बोबडे शब्द लोकांना सतत ऐकत राहावे असे वाटे. सकाळच्या वेळेला बाळ येशूला न्हाऊ-माखू घालून त्याला स्वच्छ कपडे घालून मरिया दारात उभी राहिली की योसेफ किंवा तिची आई यांना आपल्याला काही तरी पवित्र व काही तरी मांगल्याचेच दर्शन होत आहे असे वाटे.

योसेफ हा काही येशूचा जनक पिता नव्हता. तरी पण त्याने आपले सर्व वात्सल्य येशूच्या ठायी निगडित केले होते. एखाद्या संसारी पित्याप्रमाणे तो येशूची काळजी वाहू लागला. येशू अगदी लहान असताना सुद्धा त्याची नजर चौफेर फिरे. "हा नाझरेथ गावाच्याही बाहेर आतापासूनच पाहू लागला आहे!" असे योसेफ मोठ्या कौतुकाने म्हणे. लहानपणापासून त्याला निसर्गाच्या सान्निध्यात राहायला आवडे. पशुपक्षी, जनावरे, मेंढरे, फुले, वेली त्याला फार आवडत. मरियेच्या घरी मेंढ्यांचा कळप असे. गाढव हेच मुख्य वाहन असल्याने प्रत्यक यहुदी माणसाचे घरी गाढव अगर गाढवीण असेच. मरियेच्या घरी अशीच एक गाढवीण होती. तिचे मरियेवर भारी प्रेम. तिला पिलेही फार सुंदर होत. येशूच्या या पशुपक्ष्यांच्या मित्रपरिवारात एक

लहानसा रंगीबेरंगी पक्षी असे. मरिया येशूला घेऊन अंगणात बसली की ही स्वारी नाचत बागडत त्यांच्याजवळ दाणे टिपीत राही. हा पक्षी जितका सुंदर तितकाच आळशी. त्याला काम करून स्वतःचे अन्न मिळविणे अगदी आवडत नसे. तो सतत नाचत बागडत राही म्हणून आईने त्याला नाचऱ्या हे नाव दिले होते. नाचताना त्याचा मऊ मऊ पिसारा मोठा नयनमनोहर दिसे. इतर पक्ष्यांबरोबर यालाही आई दाणे टाकी व सर्व पक्षी मोठ्या आनंदाने या आई-लेकरांच्या जवळ दाणे टिपीत.

एके दिवशी सकाळी सर्व कामधाम आटोपून मरिया येशूला घेऊन कोवळ्या उन्हात अंगणात बसली होती. हवा मोठी आल्हादकारक पडली होती. मरियेजवळ कबुतरे व कोंबड्याही होत्या. कबुतरांना या लोकांत फार महत्त्व होते. कबुतरे मेंढरांऐवजी गरीब लोक यव्होव्हाला अर्पण करीत. नाचऱ्याही मोठ्या आनंदाने दाणे टिपीत होता. इतर पक्ष्यांना आपल्या चोचीने तो टोचा मारून त्यांच्यापुढचे दाणे टिपी. या मेळाव्यात त्याचा रंग मोठा खुलून दिसत होता. या स्नेहसंमेलनात आपणही सामील व्हावे म्हणून गाढवाचे पिलू धडपडत होते. मेंढरांच्या पाडसांचीही मोठी धडपड चालली होती. पण ते आले की हे सर्व पक्षी उडून जातील म्हणून आईने त्यांना बांधून टाकले होते. इतक्यात एक बेडकाचे लहानसे पिलू उड्या मारीत त्या लहानशा मेळाव्यात येऊ लागले. नाचऱ्याचे त्याच्याकडे लक्ष होतेच. या बेडकाच्या मागून सापाचे एक लहानसे पिल्लूही त्याला खाण्याकरिता येऊ लागले. बेडकाचे पिल्लू बरेच घाबरलेले दिसले. नाचऱ्या आपले खाणे सोडून आपल्या तीक्ष्ण डोळ्यांनी या सापाकडे पाहू लागला. बेडूक इतका घाबरला की तो धापा टाकीत येशूकडे जाऊ लागला. सापही त्याच्या मागे होताच. साप आता पिलावर झडप घालणार इतक्यात नाचऱ्याने मोठ्या त्वेषाने सर्व शक्ती एकवटून उडत जाऊन सापाच्या पाठीत आपली चोच खुपसली व त्यामुळे साप अगदी गतप्राण होऊन पडला. ही संधी साधून बेडूकही येशूच्या पायाजवळ आला.

" पाहिलंस टिनोकी ? " मरिया येशूला म्हणाली, " परमेश्वर आपल्या लेकरांची कशी काळजी वाहतो ती ? नाचऱ्या साऱ्या मुलखाचा आळशी ! पण त्याच्याच मनात परमेश्वराने प्रेरणा उत्पन्न करून सापापासून बेडकाचं

रक्षण केलं. नाचऱ्या जर आळसापायी आला नसता तर सापाने वेडक्याला खाऊन टाकलं असतं ! "

यहुदी स्त्रिया आपल्या लहान मुलांना टिनोकी म्हणजे बाळ, या अॅरॅमिक शब्दाने संबोधीत असत, व लहान मुलं आपल्या आईला एमी म्हणत.

अशा प्रेमळ छत्राखाली व प्रेमळ वातावरणात येशू वाढत होता. तो दोन वर्षांचा होऊन गेला होता. वयाच्या मानाने तो बोलतही असे बराच. आईने या वयातच आपल्या धर्मशास्त्रातील लहान लहान प्रार्थना व दाविदाची स्तोत्रे त्याला शिकविण्यास सुरुवात केली होती. आपल्या बोबड्या शब्दांनी प्रार्थना व स्तोत्रे म्हणताना येशू सर्वांची मने आकर्षित करी. त्याच्या मावशीला – मरिआमाला – तर फार आनंद होई. ती त्याचे पटापट मुके घेई, त्याला छातीशी धरून कुरवाळी. तिला मुले नव्हती म्हणून की काय तिने आपले सारे वात्सल्य, सर्व मातृप्रेम येशूवरच एकवटले होते. पण तिच्या नवऱ्याला हे मुळीच खपत नसे. तो म्हणे, " आपल्या गाढवाकडून दुसऱ्याचे शेत नांगरण्यात काय अर्थ ? दुसऱ्याच्या मुलावर प्रेम करून आपला वांझपणा का झाकता येतो ? "

त्यावर मावशी विव्हळ होऊन उत्तर देई, " दुर्दैवाने माझी कूस वांझ राहिली पण माझ्या बहिणीची कूस तर सफल झाली ना ? येशू मला परका का आहे ! माझी मातृत्वाची भूक येशूला पाहून नाही का शमत ? "

सबंध पॅलेस्टाईन देशात पाण्याचे फार दुर्भिक्ष्य. एखादे वर्षी पाऊस लांबला की या लोकांच्या तोंडचे पाणी पळे. अशा वेळी कोणी तरी म्हणे, " टिनोकी, तू तरी माग परमेश्वराजवळ पाऊस, तुझं नक्की ऐकेल बघ परमेश्वर ! " मग बाळ येशू आपले चिमुकले हात वर करून म्हणे, " बाप्पा, बाप्पा, लहान मुलांसाठी तरी पाऊस पाड. त्यांना उपाशी मारू नकोस ! " त्याचे हे शब्द ऐकताच जमलेल्या स्त्रिया येशूला कुरवाळीत.

हळूहळू येशू वाढत होता. तो आता चार वर्षांचा झाला असेल. मरियेच्या आईचे शेत होते. दोन्ही जावई मिळून जमीन करीत. पण कापणीचा हंगाम आला की सर्व शेतकरी एकजूट करून एकमेकांची शेते कापून देत. येशूच्या बोलण्याकडे सर्वच आकर्षिले गेले होते. दिसायलाही

तो मोठा तेजस्वी दिसे. त्याची आई न चुकता पांढरा शुभ्र पोषाख त्याला घाली, त्यामुळे तो मोठा आकर्षक दिसे.

एके दिवशीं दुपारी सर्वजण शेतात काम करीत असताना येशू त्यांचा डोळा चुकवून खेळत खेळत कुंपणाकडे जाऊ लागला. त्याच्याबरोबर त्याचे एक पांढरे शुभ्र लहानसे कोकरू होते. तेही मोठ्या आनंदाने नाचत बागडत त्याच्याबरोबर जात होते.

मरिया सुद्धा पेंढ्या बांधण्याच्या कामात गुंतली होती. पेंढ्या बांधून ती ढिगाऱ्यात टाकीत होती. येशू कुंपणाकडे गेला आहे हे काही तिच्या लक्षात आले नाही. बऱ्याच पेंढ्या बांधून झाल्यावर कपाळावरचा घाम पुसण्याकरता सहज तिने मागे वळून पाहिले, तो तिला मोठाच धक्का बसला. येशू व मेंढरू पुढे जात होते व त्यांच्यापुढे एक भला मोठा नाग आपला फणा उभारून उभा आहे. हे भयंकर दृश्य पाहून मरियेची तर भीतीने बोबडीच वळली. तिच्या तोंडातून शब्द निघेना व कोणाची मदतही मागता येईना. येशू व मेंढरू पुढे पुढेच जात होते. लोक कापणी करता करता आनंदाने गात होते. या भयंकर दृश्याकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. मरियेच्या सर्व अंगावरून घामाच्या धारा वाहू लागल्या. सर्व शरीर थरथर कापू लागले. येशू आता वाचत नाही असे पाहून तिने आपले तोंड झाकून घेतले व ती परमेश्वराचा धावा करू लागली.

तिच्या मनात विचारांचे काहूर माजले. क्षण दोन क्षण गेल्यावर हळूच बोटाच्या फटीतून तिने येशूकडे पाहिले. तो काळसर्प आता आडवा पडून येशूच्या पायाजवळ विनम्र झाला होता. येशू त्याच्यावर आपला हात फिरवीत होता. मेंढरूही आपल्या पायाने त्याला गोंजारीत होते. हे पाहताच एखाद्या वाघिणीचे बळ अंगी आणून ती धावतच येशूकडे गेली व खसकन् त्याला व मेंढराला ओढून आपल्या छातीजवळ धरून दूर उभी राहिली. सापही आपल्या बिळात निघून गेला. ही घटना तिने कोणाला सांगितली नाही.

येशू तीन वर्षांचा असताना मरियेला याकोब नावाचा दुसरा मुलगा झाला. त्याची प्रकृती जरा नाजूक असल्याने थंडीवाऱ्यापासून त्याला फार जपावे लागे. येशू व याकोब वाढत होते व याकोबची भक्ती येशूवर जडत

गोली. तो येशूच्या पाठीमागे अगदी सावलीप्रमाणे असे. येशू म्हणजे सर्व-सुखाचे निधान, आनंदाचा ठेवा व आपले विश्रांतिस्थान असे याकोबला वाटे. येशूही त्याला धर्मशास्त्रातल्या गोष्टी सांगे व प्रार्थना शिकवी. यहुदी मुलांचे बालपण फार लवकर संपत असे व ते आपल्या बापाच्या मदतीला येत. मेंढरे तर त्यांना अगदी लहानपणापासूनच राखावी लागत. येशू मेंढरांच्या मागे असला म्हणजे याकोबही त्याच्या मागे दुडदुड धावत येई.

यहुदी मुलांचे बालपण फार लवकर संपे. सहाव्या वर्षीच त्याला धर्मगुरूच्या हवाली करण्यात येई व त्याचे धर्मशिक्षण सुरू होई. पाच ते बारा वर्षांचा काळ यहुदी मुलांच्या आयुष्याचा मोठा महत्त्वाचा काल मानण्यात येई. बारा वर्षांपर्यंत त्याचे सर्व शिक्षण पुरे होई व तो आपल्या बापाचा पिढो-जात धंदा उचली. अठरा वर्षांचा झाला की यहुदी मुलगा विवाहबद्ध होऊन संसारास लागे. यहुदी मुलांचे शिक्षण धर्ममंदिरात धर्मगुरूच्या नजरेखाली होई. या शिक्षणात तोरा धर्मशास्त्राचे अध्ययन होई व इतरही सामान्य ज्ञान मुलांना देण्यात येई. मुलगा बारा वर्षांचा झाला की तो प्रौढ झाला असे मानण्यात येऊन आईबापांच्या वर्चस्वापासून तो सुटे. यहुदी लोकांमध्ये गुलामाची पद्धत होती. परंतु आईबापांना आपल्या बारा वर्षांच्या मुलाला गुलाम म्हणून विकता येत नसे. बारा वर्षे वयाला झाली की मुलगा आई-बापांचा मुलगा राहात नसून तो " कायद्याचा पुत्र " म्हणून मानण्यात येई. हा कायदा म्हणजे तोरा धर्मशास्त्र होय.

मुलाला धर्मशिक्षणाकरिता धर्मगुरूच्या हवाली करणे, हा एक मोठा धर्मविधी असे. मुलाचे याच वेळेस जावळ काढण्यात येई. यहुदी लोकांत पुरुषही लांब केस वाढवीत. जावळ काढणे म्हणजे सर्व डोके साफ करणे नव्हे. फक्त लांब बटा विधिपूर्वक काढण्यात येत. एक दोन बटा कुटुंबाचा जो मौल्यवान वस्तुसंग्रह असे त्यात स्मृतिचिन्ह म्हणून ठेवण्यात येत. नंतर त्या लहान मुलाला इतर लहान मुलांबरोबर मेजवानी देण्यात यई. दुसऱ्या दिवशी मुलाला मंगल स्नान घालून व नवे कपडे घालून गावच्या धर्म-मंदिरात नेण्यात येई. नंतर मोठा धार्मिक विधी होऊन सर्व लोकांच्या समक्ष मुलाला धर्मशिक्षणाकरिता धर्मगुरूच्या स्वाधीन करण्यात येई. येशूलाही विधिपूर्वक धर्मगुरूच्या हवाली करण्यात आले.

बालवयातच जेथे अन्याय, दुःख व जुलूम दिसेल तेथे जाऊन येशू त्या दुःखी माणसाचे दुःख शमविण्याचा प्रयत्न करी. येशूला पशू, पक्षी, मेंढरे, गाढवे यांचे फार प्रेम! एकदा तो व याकोब असेच शेताच्या बाजूने फिरत असताना मेंढरांच्या केविलवाण्या ओरडण्याने त्यांचे लक्ष तिकडे वेधले. ते जाऊन पाहतात तो एका लहानशा कोकराला आपल्या तोंडात धरून एक कुत्रा त्याचे नरडे फोडीत होता. येशूने कुत्र्याला हाकलून दिले. कोकरू अगदी रक्तबंबाळ झाले होते. याकोब म्हणाला, "आपण याला घेऊत घरी जाऊ. एमी (आई) काही तरी उपाय करील."

पण काहीच उपाय करण्यासारखे नव्हते. कोकरू अगदी घायाळ झाले होते. येशूने त्याला आपल्या मांडीवर घेतले होते व त्याला तो पाणी पाजीत होता. तो आईला म्हणतो, "किती गोजिरवाणं आहे नाही हे बछडं? तो कुत्रा किती दुष्ट आहे. काय केलं होतं या पाडसानं त्या कुत्र्याला की त्यानं असं निर्दय वर्तन करावं! आई, जगेल का ग हे?" येशूच्या डोळ्यांवर हात फिरवीत ती म्हणाली, "नाही जगणार बाळ ते, तुझ्या मांडीवरच त्याला मरण येऊ दे. हेच त्याचे भाग्य! कोकराने येशूच्या व आईच्या तोंडाकडे पाहात आपला प्राण सोडला. दोघांच्याही डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. आई स्वतःशी म्हणाली, "येशू, तुला अगदी लहानपणीच जगातल्या दुःखाची, अन्यायाची व जुलमाची तोंड-ओळख होत आहे, हे किती तरी चांगले आहे. तुझ्या जन्माच्या वेळेला त्या दुष्ट हेरोद राजाने बेथलेहेम गावातील निष्पाप व निरपराधी बालकांची नाही का अशीच हत्या केली? या बालकांचा व त्यांच्या मातांचा आक्रोश परमेश्वराकडे गेला असेल काय? जबरदस्ताने गरिबावर जुलूम करावा, राजसत्तेने प्रजेला लुबाडावे, एका देशाच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन शेजारच्या प्रबळ देशाने त्यावर स्वारी करून त्या देशातील लोकांना देशोधडीला लावावे किंवा गुलाम करून न्यावे, स्त्रियांचा अपहार करावा, असे अमानुष प्रकार या जगात कधी थांबणार आहेत काय? रेचेल माता जी सारखी रडत असते तिचे रडणे थांबणार आहे काय? येशू, तू ते रडणे थांबवू शकशील काय? जगाचे दुःख तू नाहीसे करू शकशील काय? याकरिताच ना तुझा जन्म?

मानवच मानवाला कसे छळतो याचा प्रत्यक्ष अनुभव येशूला लवकरच आला.

येशू साधारण दहा-अकरा वर्षांचा झाल्यावर तो आपल्या बापाला सुतारकीच्या धंद्यात मदत करू लागला. इकडे धर्मशिक्षणही चालूच होते. पण येशूचे व गुरुजींचे काही पटले नाही. प्रत्येक शब्दात तो गुरुजींना अडवी. यज्ञच कशाला केला पाहिजे? सद्वर्तन परमेश्वराला प्रिय का होऊ नये? शाब्बाथ दिवशी जर सत्कर्म केले तर त्यामुळे धर्माज्ञेला बाध कोठे येतो? वगैरे प्रश्न तो गुरुजींना विचारी. येशूची ही विचारसरणी जर विद्यार्थ्यांमध्ये फैलावली तर धर्मावर एक प्रकारचे संकटच कोसळणार हे गुरुजींना स्पष्टच दिसत होते व त्याचे शिक्षण लवकर पुरे करून त्यांनी येशूला रजा दिली.

स्टेफोरीस हे गॅलली प्रांताचे मुख्य गाव व राजधानी. येथे आठवड्याचा बाजार भरे. आजूबाजूच्या गावांचे लोक आपला माल विकण्याकरतां व लागणाऱ्या वस्तू घेण्याकरिता येथे जमत. नाझरेथ गावाचे लोकही आपापल्या गाढवावर माल लादून बाजाराला येत, त्याप्रमाणे योसेफ येशूला घेऊन येई. प्रत्यक्ष जीवनाशी त्याचा आता संबंध येऊ लागला व जगात किती दैन्य, किती दुःख, किती जुलूम, अन्याय आहे, याचा अनुभव त्याला येऊ लागला.

स्टेफोरीस येथे रोमी सरकारचे ठाणेही होते. बाजार अगदी गच्च भरला होता. लोकांची देवघेव चालली होती. भर दुपारची वेळ. ऊन मी म्हणत होते. वाळवंटही तापले होते. इतक्यात लांबून एक माणसांचा तांडा येताना येशूला दिसला. तांड्याबरोबर रोमन सैनिकही होते. हा तांडा पाहून येशू बापाला म्हणतो, "आबा, हे लोक कोण? त्यांची अशी दशा का झाली? हे सैनिक कोण? त्यांना घेऊन कोठे चालले आहेत हे लोक?"

योसेफ उसासा टाकून म्हणाला, "काय सांगू तुला टिनोकी? हे लोक गुलाम आहेत. हे रोमी शिपाई आहेत. कोठे नेणार आहेत हे चांडाळ या दुर्दैवी लोकांना कोणास माहीत! आमची गुलामगिरी नष्ट व्हावी, आमचं स्वातंत्र्य परत मिळावं म्हणून तर आम्ही त्या मशियाची वाट पाहात आहोत. केव्हा आमचे नष्टचर्य संपणार परमेश्वर जाणे!"

येशूला मोठे नवल वाटले. अंगावर धड कपडा नाही, वर ऊन्ह मी म्हणतंय. खाली वाळू तापून पाय सोलून निघत आहेत. सर्वांच्या हातापायांत भरभक्कम दोरखंड, तहानेने सर्व लोकांचे प्राण व्याकुळ झालेले. हा काय प्रकार आहे ? गुलाम झाले तरी ही माणसेच ना ? परमेश्वरानेच त्यांना निर्माण केले आहे ना ? मग इतका निर्दयपणा का ? हे दृश्य पाहून येशूच्या अंतःकरणात मोठी खळबळ उडाली. तो या दुर्दैवी लोकांकडे पाहातच राहिला.

जवळच पाण्याचा एक आड होता. पाणी पिण्याकरिता हा तांडा आडा-जवळ थांबला. जवळच एक झाड होते. त्याच्या सावलीत रोमी सैनिक हुश्य हुश्य करीत थांबले. गुलाम उन्हातच उभे होते. जवळपास बरेच बरे लोक जमले होते. सर्वजण या दुर्दैवी प्राण्यांबद्दल हळहळत होते. एका माणसाला हाताशी धरून रोमी अधिकाऱ्याने त्याला पाणी काढायला लावले. सर्व रोमी शिपाई भरपूर पाणी प्याले. कैदी मात्र त्यांना पाणी पितांना पाहून मोठ्या आशाळभूतपणाने त्याच्याकडे पाहात जिभल्या चाटीत उभे होते. रोमी लोक त्यांना काही पाणी देईनात. हे पाहून येशूला अत्यंत दुःख झाले. "काय ही मानवतेची थट्टा ! पाणी सुद्धा आपल्या गुलामांना मिळू नये, ही कोठली नीती ? हीच का रोमसारख्या सुधारलेल्या राष्ट्राची संस्कृती ? येशू विचार करू लागला. गुलामांपैकी एकाला चाबकाचा बराच मार लागला होता. त्याच्या पाठीतून रक्त निघत होते. जखमा उघड्या पडल्या होत्या. तहानेने तो अगदी कासावीस झाला होता. त्याची आणि येशूची दृष्टादृष्ट झाली मात्र, येशूला एकदम त्याची करुणा आली. रोमी लोकांची नजर कैद्याकडे नाही हे पाहून येशूने पोहऱ्याने पाणी काढले व पोहरा त्या गुलामाच्या तोंडाला लावणार इतक्यात त्या रोमी शिपायाने ते पाहिले. तो तीरासारखा धावत आला व लाथेसरशी त्याने पाणी उडवून दिले व चाबकाचा फटकारा इतक्या जोराने त्या गुलामाच्या पाठीवर ओढला की तो गुलाम विव्हळतच जमिनीवर कोसळला. त्याच्या पोटात पाण्याचा एकही थेंब गेला नाही. सर्व लोक हळहळू लागले. हा प्रकार पाहून येशूचे अंतःकरण दुःखाने अगदी पिळवटून निघाले !

* * *

अ.क्र. ४००८७ दा. स्थलप्रत.
वर्ग. ८७९ दि. २८।११।५५

प्रकरण नववे

# आई, मला जाऊ देशील?

कालचक्र सारखे फिरत होते. काळ कोणासाठी थांबत नव्हता. सृष्टि-क्रमानुसार नवी पालवी येत होती, जुनी पाने गळून पडत होती. लहान मुले मोठी होत होती व म्हातारी माणसे निधन पावत होती. अव्याहतपणे हा सृष्टिक्रम चालला होता. बोलता बोलता येशू चवदा वर्षांचा झाला व बोलता बोलता योसेफ कालवश झाला. दुखणें नाही, खुपणे नाही, आजार नाही, पाजार नाही की औषधपाणी नाही. एके सकाळीं हे बापलेक आपले गाढव घेऊन डोंगराकडे जातात काय आणि योसेफाचा शक्तिपात होतो काय! सर्वच अघटित. लाकडे तोडता तोडता योसेक येशूला म्हणतो, "येशू, हा आज अंधार का बरं लवकर पडला?"

"अंधार? आबा, अजुन दुपार सुद्धा झाली नाही अन् अंधार कसा पडेल?" येशू म्हणाला.

"येशू, माझ्या डोळ्यांपुढे अंधारी येते. मला चालवत नाही. मला घरी घेऊन चल, एमीकडे घेऊन चल." योसेफ म्हणाला.

"काय होतंय आबा तुम्हांला? तुम्ही येथे या झाडाखाली बसा, मी ही लाकडे आवरतो. मग तुम्हांला घेऊन जातो मी एमीकडे?" येशू म्हणाला. येशूला समजले की आपल्या आबाला काही तरीं होत आहे. त्याने लगेच लाकडे गोळा केली व योसेफाला गाढवाच्या पाठीवर बसविले. लाकडे आपल्या पाठीवर घेऊन तो घराकडे निघाला. योसेफला गुंगी आली होती.

दारातूनच मरियेने हे दृश्य पाहिले व ती धावतच त्यांच्याकडे आली. "काय झालं रे येशू?" असे तिने घाबरतच विचारले. येश् म्हणाला, "आई, झटपट आबांचा बिछाना तयार कर, त्यांना बरं नाही!" नंतर योसेफाला त्यांनी बिछान्यावर झोपविले. योसेफाजवळ जाऊन त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत मोठ्या केविलवाणीने मरिया म्हणते, "तुम्हांला काय होतंय?"

"मरिया, माझी वेळ आली आहे. मी माझ्या पित्याकडे आता चाललो. माझं कर्तव्य मी केलं आहे. येशू तुझं रक्षण करील. मला तू चांगली गृहिणी मिळाली होतीस. गरिबीचा पण टापटिपीचा संसार तू केलास. पण आता तू एकटी राहणार. पण ...पण आपला येशू आहे ना ? तो तुला निराधार सोडणार नाही." असे म्हणून त्याने आपला प्राण सोडला. आत्मा निर्मात्याकडे गेला. देह मात्र जमिनीवर राहिला. सर्व काही शांत झाले.

अवघ्या चवदाव्या वर्षी संसाराचा भार येशूवर पडला. मरियेला येशूच्या पाठीवर चार मुलगे झाले. पण ते सर्व मरिआमा मावशीच्या मांडीवर वाढले. कपाळाच्या घामात केवढा पवित्र आनंद असतो हे योसेफाने येशूला शिकविले होते. निढळाच्या घामाने मिळविलेल्या भाकरीत अमृताची गोडी असते, हे तत्त्व त्याने येशूच्या मनावर बिंबविले होते. आणि कष्ट करून आपले व आपल्या आईचे पोट भरावयाचे असे ठरवून येशू बापाच्या नंतर सुतारकीचा धंदा करू लागला.

स्टेफोरिस येथे झालेला गुलामांचा प्रकार, योसेफचा मृत्यू या सर्व घटना येशूच्या मनावर एक प्रकारचे दडपण आणून त्याला विचार करण्यास भाग पाडीत होत्या. तो सारखा विचार करीत राही. यहुदी लोकांची घरें-धाब्याची किंवा गच्चीची होती. या गच्चीवर येशू एका संध्याकाळी पडल्या पडल्या वर आकाशात पाहून विचार करीत होता. आकाशात तारकांची एकच गर्दी उसळली होती. देवाने आपले सर्व रत्नभांडार जणू काय आकाशात उधळून दिले होते. परमेश्वराच्या अगाध लीलेचे येशूला मोठे कौतुक वाटत होते. घराचा धाबा बराच मोठा होता. दुसऱ्या एका कोपऱ्यात मरिया एकांतात प्रार्थना म्हणत होती. तिला हाक मारून येशू म्हणतो,

"एमी, एमी !"

"काय रे येशू ?" एमी म्हणाली.

"एमी ! मला तू आब्राहाम व इसाकाची गोष्ट नाही कधी सांगितलीस ? मी काल मावशीकडे गेलो होतो तेथे ते आजोबा येतात ना, त्यांनी सांगितली मला ही गोष्ट !"

"अस्सं का? काय सांगितली गोष्ट?"

"आब्राहामला पुत्र नव्हता. तो फार पापभीरू होता. शेवटी देवाला करुणा येऊन आब्राहाम व सारा यांना इसाक हा सुलक्षणी पुत्र झाला. परंतु त्याचाच यज्ञ करण्यास परमेश्वराने सांगितले व यज्ञाची सर्व सिध्दता करून आब्राहाम आपल्या पुत्राला घेऊन डोंगराकडे निघाला. गाढवावर यज्ञाचे सामान बांधले होते व वेदीकरता लाकडेही बांधली होती. यज्ञ-स्थळ जवळ येताच आब्राहामाने सर्व सामान व लाकडे इसाकाच्या पाठीवर बांधली व यज्ञस्थळी गेले. वेदी तयार झाली. लाकडे रचली गेली. अग्नी प्रज्वलित केला गेला तेव्हा इसाक म्हणाला,

"आबा, आपण तर यज्ञाची सर्व तयारी केली आहे, पण यज्ञपशू कोठे आहे? यज्ञपशूशिवाय का आपण यज्ञ करणार?"

"मग आब्राहामाने काय केलं असेल बरं?" मरिया म्हणाली.

"आब्राहाम इसाकला म्हणाला, बाळ इसाक, यज्ञबली म्हणून परमेश्वराने तुझी निवड केली आहे." येशू म्हणाला. त्यावर मरिया म्हणते,

"मग इसाक काय बरें म्हणाला असेल?"

"इसाक म्हणाला, 'परमेश्वरानेच जर माझी निवड केली आहे, तर मला नाही कसं म्हणता यईल? परमेश्वराने मला उत्पन्न केलं ना? मग माझं सर्व जीवन त्यालाच अर्पण करणं माझं कर्तव्य नाही का? आबा, आता काही विचार करू नका. माझं हातपाय बांधा, कारण शरीर नेहमीचं बंडखोर असतं. तुमचा सुरा पाहून कदाचित माझे शरीर धडपड करील. आबा, घाई करा, वेदीवर मला अर्पण करा आणि माझी रक्षा माझ्या सारा मातेला दाखवा. आबा, सारा मातेचं तुम्ही सांत्वन कसं कराल? मी तिचा लाडका पुत्र! माझा वियोग तिला कसा सहन होईल? पण तुम्ही सांगा, परमेश्वराच्या इच्छेपुढं मानव हतबल होतो.'" येशू थांबला. त्याचे मन इतके भारावलेलें होते की त्याचा कंठ दाटून आला व त्याच्या डोळ्यांतून नकळत अश्रू गळू लागले. मरिया त्याच्या जवळ जाऊन बसली, "आजोबांनी ही गोष्ट सांगायला नको होती येशू तुला, मी मुद्दामच तुला सांगितली नव्हती ही गोष्ट!"

"पण आई, मला हे सांग, बलीनं आपला वधस्तंभ स्वतःच न्यायचा असतो का? इसाकच्या पाठीवर आब्राहामने लाकडे का बांधली? हा त्याचा वधस्तंभ होता काय?"

"येशू, येशू, आज काय झालं आहे तुला? असले भलतेच विचार तुझ्या मनात कसे आले आज?" मरिया म्हणाली.

"आई, इसाकाच्या गोष्टीवरून मी विचार करीत होतो. इसाका-प्रमाणे माझ्यावर जर बलिदानाचा प्रसंग आला तर माझा वधस्तंभ मलाच न्यावा लागेल काय? एमी, मला सारा मातेप्रमाणे तू यज्ञाकरिता जाऊ देशील का?"

"येशू येशू, नको रे असं कठोर बोलू? माझ्या काळजाला घरं पडतात बघ. इतकं कठोर तुला बोलवतं तरी कसं? सारा मातेची आणि माझी तुलना कशी करतोस? सारा माता कोठे आणि मी सामान्य काबाडकष्ट करून संसार करणारी येशूची आई कोठे? सारा मातेचं धैर्य कसं माझ्या अंगी येईल? हे भलतेच विचार मनातून काढून टाक आणि वर पाहा. आकाशाकडे पाहा. परमेश्वर आपल्यावर या ताऱ्यांच्या रूपाने केवढी तरी कृपा पसरवीत आहे. चल, दे सोडून हे अभद्र विचार! चल, मी तुला अंगाई म्हणून झोपविते." आणि खरेच, एखाद्या लहान मुलाप्रमाणे आईने येशूचं डोकं आपल्या मांडीवर ठेवून ती त्याला थोपटू लागली.

* * *

# भाग तिसरा

# विशाल जीवनात

काल झपाटचानं चालला होता. योसेफाचा मृत्यू होऊन आता पंधरा वर्षे झाली होती. येशू आता एकोणतीस वर्षांचा झाला होता. परंतु त्याने अद्याप गृहस्थाश्रम स्वीकारला नव्हता. त्याचे चौघेही भाऊ संसारी बनून आपआपल्या मार्गाला लागले होते. घरी आई आणि येशू दोघेच असत. मरियामाचा नवरा आता तिच्या शेताची व मळयाची देखभाल करी. येशूचे वय वाढते आहे, यहुदी समाजाच्या रूढीप्रमाणे त्याने केव्हाच विवाहबद्ध झाले पाहिजे होते असे मरियेच्या बहिणीच्या नवऱ्याचे म्हणणे होते. तो म्हणे, "बाई, तुम्ही चुकता आहात. यहुदी लोकांत का कोणी संन्यास घेतो ? अठराव्या वर्षीच आपल्या मुलांचा विवाह होतो व तुमच्या इतर मुलांनी आपापले संसार थाटलेही ! मग येशूच्याच बाबतीत तुम्ही ही नवीन प्रथा पाडून समाजाचा व धर्माचा रोष का ओढवून घेता ?"

येशूचे – मशियाचे – स्वरूप मरियाला जितके कळले तितके तिच्या मेहुण्याला कळले नव्हते व म्हणूनच तो संसारी माणसासारखे बोलत होता. पण मरिया काय उत्तर देणार ? ती एवढेंच म्हणे, "येशू, आता राबी झाला आहे ना, त्याला सर्व काही कळते आणि जे चांगले असेल तेच तो करील. मी कशाला त्याच्या भानगडीत पडू ?"

आणि खरेच, येशूच्या भानगडीत आई पडतच नसे. त्याला मोठी महान् आणि पवित्र कामगिरी करावयाची आहे हे तिला माहीत होते. म्हणून ती त्याला कोणत्याही प्रकारचा विरोध असा करीतच नसे. त्याची सेवा हेच ध्येय तिने आपल्यापुढे ठेविले होते. त्याच्या बारीकसारीक गरजे-कडे सुद्धा ती अगदी जातीने लक्ष देई. त्याच्या आवडीनिवडी, त्याच्या लहरी सर्व काही ती सांभाळी. त्याच्या कपडयांकडे तर ती फार लक्ष देई. त्याचे कपडे नेहमी स्वच्छ धुऊन अगदी पांढरे शुभ्र करीत असे. आपण जरी गरीब असलो तरी लोकांनी येशूच्या कपडयांत दोष काढू नयेत,

असेच तिला वाटे. कारड्यांप्रमाणेच येशूला कोणते पदार्थ आवडतात, कोणते आवडत नाहीत याकडे ती फार लक्ष देई.

या लोकांत बाहेरचा माणूस घरात आला की घरधन्याला त्याचे पाय धुवावे लागत. मरिया येशू बाहेरून दमून भागून आला की त्याचे पाय गरम पाण्याने धुऊन पुसून काढी. त्यावर येशू म्हणे,

"एमी, हे तू काय आरंभलं आहेस ? मला धर्माज्ञेविरुद्ध का वागायला लावतेस ?" त्यावर मरिया म्हणे,

"हे काय येशू ? मी तुला धर्माज्ञेविरुद्ध वागायाला कशी शिकवीन ?"

"नाही तर काय ?" येशू म्हणे, "आपल्या आईबापांचा सन्मान कर, अशी आपली धर्माज्ञा नाही का ? आणि तू तर माझे पाय धुतेस !"

"येशू, तुला का, ही धर्माज्ञा लागू आहे ?" एवढेच बोलून आई विषय बदली.

एवढे मात्र खरे की, आपली सर्व एकनिष्ठता, आपले सर्व वात्सल्य, आपले सर्व मातृत्व तिने येशूच्या ठायी केंद्रित केले होते. "मी केलेली सेवा त्याला मान्य आहे ना ? तिच्यापासून त्याला सुख होते ना, त्याला कार्याचे प्रोत्साहन मिळते ना ? मग मी माझ्या सुखाची का पर्वा करू ? त्याला केवढं महान् कार्य करावयाचं आहे हे मला समजत का नाही ? माझ्या सेवेने जर त्याच्या कार्याला मदत होत असेल तर मी माझ्या कष्टांची पराकाष्ठा करायला नको का ? त्याचा मार्ग निष्कंटक करायला नको का ?"

नाझरेथ गावात व आजूबाजूला द्राक्षांचे व अंजिरांचे अनेक मळे होते व त्यांत पुष्कळ कामकरी मजुरीने काम करीत. या लोकांना जेवणाची सुटी सोडून सुटी नसे. मात्र सूर्यास्तानंतर जेव्हा कामाचा दिवस संपे तेव्हा या मजुरांना फुरसत मिळे. दिवसभर शारीरिक श्रम केल्यावर हे लोक इतके थकत की लगेच दोन घास पोटात ढकलून निद्रादेवीच्या अधीन होत.

येशूने या लोकांमध्ये काम करण्यास आता सुरुवात केली. सूर्यास्त झाल्यानंतर तो या लोकांच्या मळयात जाई, त्यांना तोरा धर्मशास्त्र सांगे, आपल्या पूर्वजांच्या, थोर थोर पुरुषांच्या कथा सांगे, परमेश्वराला यज्ञापेक्षा स्वच्छ व निर्मळ अंतःकरणच कसे आवडते हे त्यांना तो निरनिराळे दाखले

देऊन व गोष्टी सांगून पटवीत असे. श्रमाची प्रतिष्ठा यशू योसेफापासून शिकला होताच. काम करून भाकरी मिळविण्यात कसलाच कमीपणा नाही, उलट सतत काम करणारा माणूसच परमेश्वराला कसा आवडतो, हे तो या लोकांना समजावून सांगे.

"पण आपले याजक व धर्मशिक्षक सांगत नाहीत काय, की अस्वच्छ हातानं भाकर धरली तर ती भाकर सुद्धा अस्वच्छ होते?" असे कोणी तरी म्हणे.

"हातापेक्षा अंतःकरणच कोणतीही वस्तू स्वच्छ किंवा अस्वच्छ करते. जर तुमचे अंतःकरण स्वच्छ असेल तर तुमच्या अस्वच्छ हाताने तुम्ही धरलेली भाकरी सुद्धा स्वच्छ व पवित्र राहील. पण तुमचे अंतःकरणच जर घाणेरडे, कुविचाराने व स्वार्थाने भरलेले असले तर आपल्या पवित्र योर्देन नदीच्या पाण्याने जरी हात धुऊन स्वच्छ केले तर हात अस्वच्छच राहणार! मी तुम्हांला एक कथाच सांगतो म्हणजे माझे म्हणणे तुम्हाला पटेल!" असे म्हणून येशूने एका गरीब व श्रीमंत माणसाची कथा या लोकांना सांगितली.

एका गावात एक श्रीमंत सावकार राहात असे. त्याचे अनेक द्राक्षांचे व अंजिरांचे मळे होते व त्याला या मळ्यांपासून उत्पन्नही भरपूर मिळे. तरी पण त्याला फार हाव सुटली होती. त्याच्या शेजारी एक गरीब शेतकरी होता. त्याचा एकच द्राक्षाचा मळा होता. तो शेतकरी या मळ्यात रात्रं-दिवस कष्ट करी. पण त्याला कर्ज होऊ लागले. या श्रीमंत सावकाराचा या मळ्यावर डोळा होताच. शेतकऱ्याला पैशाची गरज आहे असे पाहून हळूहळू या सावकाराने आपले सावकारी पाश शेतकऱ्यावर टाकले व त्याला कर्ज दिले. परंतु या गरीब शेतकऱ्याला कर्ज काही फेडता आले नाही. शेवटी त्या सावकाराने शेतकऱ्याची जमीन बळकावली व मजूर म्हणून शेतकऱ्याला त्या मळ्यात राबायला लावले. बिचारा शेतकरी दिवसभर मळ्यात काम करी. त्याला क्षणाचीही फुरसत मिळेनाशी झाली. हळूहळू तो सर्व धर्मशास्त्र विसरून जाऊ लागला. भोजनाच्या आधी हात-पाय स्वच्छ धुवावे लागतात हे सुद्धा तो विसरून गेला व हातपाय न धुताच तो भाकर खात असे. इकडे हा श्रीमंत सावकार मात्र आपले हात-पाय अगदी घासून घासून स्वच्छ धूत असे. त्याची जेवणाची पात्रेसुद्धा

अगदी स्वच्छ ठेवण्याची तो खबरदारी घेई. तो सर्व धर्माज्ञा व सर्व रूढी अंगदी कसोशीने पाळी. शाब्बाथ दिवस तर तो अगदी मोठ्या धार्मिकतेने पाळी.

कालांतराने हे दोघेही मृत्युवश झाले व दोघेही स्वर्गलोकात गेले. तेथे एक भव्य दिवाणखाना होता व भव्य सिंहासनावर आब्राहाम हा यहुद्यांचा पितर विराजमान झाला होता. तो आता पृथ्वीवरून आलेल्या सुपुत्रांना आपल्या जवळ बोलाविणार होता. द्वारपालाने जाहीर केले, "ज्यांचे हात स्वच्छ आहेत अशांनीच आत यावे. तेच आब्राहामाचे सुपुत्र आहेत."

श्रीमंत सावकार आपल्याशीच म्हणाला, "बरं झालं, मी धर्माज्ञा व रूढी कसोशीने पाळली म्हणून. मी नियमाने तोरा वाचन करीत होतो. पवित्र शाब्बाथ दिवस पाळीत होतो. प्रत्येक जेवणाला मी हातपाय स्वच्छ धुऊन भोजनाला बसत असे. द्वारपाल, मला आत घ्या. माझे हात स्वच्छ आहेत."

"अरे मूर्खा, तुझे हात स्वच्छ आहेत, पण तुझं अंत:करण स्वार्थ व कुविचारानं सडलं आहे. त्याची घाण येथपर्यंत येत आहे, त्याची काय वाट? तू स्वार्थाला बळी पडून शेजारच्या माणसाचा मळा घेतलास, त्याला काबाडकष्ट करायला लावलंस. जा, दूर हो, तुझी घाण फार सुटली आहे!" द्वारपाल म्हणाला. त्यावर हा सावकार म्हणतो, "महाराज, माझ्यावर अन्याय होतो आहे हा! मी किती कसोशीने धर्माज्ञा व रूढी पाळत होतो हे सिद्ध करणारे साक्षीदार पाहिजे तर आणतो. मग मला आत घ्या."

द्वारपाल म्हणाला, "तू आपले हात स्वच्छ ठेवले असशील, पण अंत:करण धुण्याचा विचार तू कधी केला होतास का? तेथे तर कुविचारांची, स्वार्थाची व दुसऱ्याचे लुबाडण्याची हाव ही घाण साचली होती, त्याकडे तू कधी लक्ष दिलेस काय? पश्चात्ताप करून तुला ही घाण काढता आली असती! दुसऱ्यावर दया करून स्वार्थाचे परिमार्जन करतां आलं असतं तुला! पण तू काहीच केलं नाहीस. जा, तुझ्यासारख्यांना येथे जागा नाही."

हा सर्व प्रकार तो गरीब माणूस पाहात होता. तो स्वत:शी म्हणाला, "माझ्या धन्याची जर ही गत तर माझी काय गत होणार? मी तर

माझे हात कधीही धुतले नाहीत. द्वारपाल मला कसा आत घेईल ? "
म्हणून तो दूर जाऊ लागला. द्वारपाल त्याला हाक मारीत म्हणाला, " चल चल, आत चल, आब्राहामाचा सुपुत्र तूच आहेस. आत चल आणि सुखी हो ! "

त्यावर तो गरीब माणूस म्हणतो, " महाराज, आपण चुकता आहात. हे पाहा माझे हात. काबाडकष्ट करून कसे अमंगल–घाणेरडे झाले आहेत. मला कसं जाता येईल आत ? "

त्या माणसाचे दोन्ही हात मोठ्या प्रेमाने आपल्या हातात घेऊन द्वारपाल म्हणतो, " नाही, हे हात अमंगल नाहीत. पवित्र आहेत. श्रमाची प्रतिष्ठा व पावित्र्य राखले आहे या हातांनी. तुझ्या हाताबरोबरच तुझं अंतःकरणही स्वच्छ व पवित्र आहे. हा सुवास सुटला आहे तो तुझ्या पवित्र अंतःकरणाचा. तू कोणाचा हेवादावा केला नाहीस, की दुसऱ्याची मालमत्ता लुबाडण्याचा प्रयत्न केला नाहीस. निढळाच्या घामात भाकरी बुडवून तू खात होतास, हात धुण्याला सुद्धा तुला फुरसत मिळाली नाही. हात धुण्याला तुला पाणी सुद्धा मिळालं नाही. अश्रूंनी तू आपले हात धूत होतास व अंतःकरणात सद्‌विचार व सद्‌भावना तू पोशीत होतास. परमेश्वराला हेच प्रिय आहे. जे अंतःकरणाचे शालीन आहेत, जे परमेश्वरापुढे नेहमी विनीत होतात त्यांनाच परमेश्वर जवळ करतो. चल, आत ये. "

येशूची कथा संपली. पण तिचा इष्ट तोच परिणाम त्याच्या श्रोत्यांवर झाला होता. कथेचे मर्म त्यांच्या मनावर बिंबल्याचे स्पष्टच दिसत होते. ते त्याच्या जवळ जवळ येऊ लागले. एकाच्या डोक्यावर हात ठेवून येशू म्हणाला,

" बंधूनो, कष्टाला–श्रमाला–कमी लेखू नका. स्वार्थरहित श्रम करणे म्हणजे परमेश्वराजवळ जाणे आहे. आनंदी राहा. तुम्हांला जरी कमी लेखण्यात आलं असलं तरी स्वर्गात तुम्हांला उच्च पद प्राप्त होईल. येथे जरी तुम्हांला भरपूर अन्न मिळत नसलं तरी स्वर्गात भरपूर मिळेल' कथेतल्या गरीब माणसाप्रमाणे अंतःकरण स्वच्छ ठेवा. जास्त काय सांगू ? '.

ह्या रात्री येशू त्या मजुरांबरोबर राहिला. त्यांचे खडतर जीवन त्याने आनंदित केले. विशाल जीवनात शिरण्याकरिता येशूने आता आपले पहिले पाऊल उचलले होते.

* * *

# अरण्यातील आवाज

जखाऱ्या याजकाला त्याच्या वृद्धपणी जो पुत्र झाला होता त्याचे नाव योव्हान ठेवण्यात आले होते हे वाचकांना आठवत असेलच. योव्हानाचा बाप व आई अत्यंत वृद्ध झाली व सृष्टिनियमानुसार दोघेही कालवश झाली. योव्हान उघडा पडला. परंतु त्याच्या एका लांबच्या नातेवाइकाने त्याला आश्रय दिला व लहानाचा मोठा केला. पुढे या नातेवाइकाच्या घराची वाताहत झाली. योव्हान नंतर अरण्यवासी बनून लोकांना उपदेश करू लागला. त्याच्या प्रवचनामध्ये पश्चात्ताप करा, स्वर्गाचे राज्य जवळ येत आहे, हा भाग विशेष असे. यहुदी लोकांत ही एक समजूत होती की, मशिया येण्याच्या आधी एलिजा हा मागे होऊन गेलेला द्रष्टा–संदेष्टा–पुन्हा भूतलावर येऊन तो मशिया येण्याकरिता लोकांची मनोभूमिका तयार करणार आहे व त्याचा रस्ता साफसूफ करणार आहे. अरण्यात राहून लोकांना सदुपदेश करणारा अरण्यवासी योव्हान म्हणजेच हा एलिजा अशी लोकांची हळूहळू समजूत होऊ लागली. हा योव्हान येशूच्याच वयाचा म्हणजे तीस वर्षांचा होता. तो संन्यस्त वृत्तीने अरण्यात राहात असे. हा योव्हान प्रेषितांच्या परंपरेतील शेवटचा प्रेषित होय. येशूचे आगमन हा योव्हानच जाहीर करतो, त्यामुळे येशूच्या चरित्रात त्याला एक प्रकारचे आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मशियाचे आगमन तर हा जाहीर करतोच, पण त्याचबरोबर स्वर्गाच्या राज्याचीही कल्पना तो लोकांत फोफावतो. ही त्याची महत्त्वाची कामगिरी आहे. हन्ना व त्याचा जावई खइफाज मुख्य धर्माधिकारी होते. ते जुलुमाने धर्माच्या नावाखाली लोकांकडून पैसा उकळीत होते. तर रोमी सम्राट व गव्हर्नर असह्य कर लोकांवर लादून लोकांना दे माय धरणी ठाय करीत होते. भरीला भर म्हणून की काय, गॅलली प्रांतात बडाचा वणवा पेटला होता. सबंध पॅलेस्टाईन देश हवालदिल झाला होता व अशाच वेळेला योव्हान मशियाचे आगमन जाहीर करीत होता व स्वर्गाची राज्याची कल्पना

लोकांना देत होता. योव्हानाचा उपदेश ऐकून लोक भांबावून गेले होते. खात्री करून घेण्याकरता ते त्याला विचारीत होते,

"तू ख्रिस्त आहेस का? जो येणार येणार म्हणून आम्ही वाट पाहात आहोत तो तूच का?"

योव्हान फक्त म्हणत होता, "परमेश्वराचे राज्य जवळ येत आहे. तयार राहा."

लोकांना नक्की उत्तर मिळत नव्हते. आपण मशिया नाही असे योव्हान जरी स्पष्टपणे म्हणत नव्हता तरी तो मशिया नाही याची खात्री त्यांना होती. ते म्हणत होते, "नाही. हा मशिया नाही. हा एलिसा आहे. तो आपणांला पापाबद्दल पश्चात्ताप करण्यास सांगतो. तो देवाच्या राज्याची कल्पना परिवर्तित करीत आहे. तो मशियाच्या आगमनाची तयारी करण्यास आपणांस सांगत आहे."

येशूच्यामध्ये व आपल्यामध्ये किती अंतर आहे हे योव्हान ओळखून होता. येशूची बरोबरी त्याने कधीच केली नाही. "त्याच्या पायाजवळ बसण्याची सुद्धा माझी लायकी नाही. मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, पण माझ्यामागून येणारी असामान्य व्यक्ती इतकी श्रेष्ठ व समर्थ आहे की, 'तुमचा बाप्तिस्मा पाण्याऐवजी पवित्र आत्म्याने केला जाईल' असे स्पष्टपणे बोलून आपण येशूपेक्षा किती कनिष्ठ दर्जाचे आहोत हे तो व्यक्त करी. तो म्हणे, "मी तो नव्हे. जो येणार आहे तो मी नव्हे. मी फक्त त्याचा संदेशवाहक आहे. माझा अरण्यातला आवाज आहे. त्याचे आगमन जाहीर करायचे, त्याच्या रस्त्यातील खाचखळगे भरून काढून रस्ता सारखा करायचा, दऱ्या भरून काढून डोंगरमाथा उतरावयाचा एवढीच माझी कामगिरी! योव्हानाचे भाषण मोठे सडेतोड व निर्भीड असे. त्याच्या भाषणाने हृदयाला घरे पडत. पण तरीही लोक त्याचे भाषण ऐकावयास वाळवंट तोडून त्याच्याकडे येत.

अफाट जीवनात जाण्याकरता आता येशू तयार झाला होता. तेव्हा या जीवनात जाण्याच्या आधी प्रथम योव्हानाकडे जाऊन त्याच्याकडून बाप्तिस्मा म्हणजे त्या कार्याची दीक्षा घ्यावी म्हणून आईची परवानगी घेऊन येशू योव्हानाकडे निघाला.

बराच प्रवास केल्यानंतर येशू यार्देन नदीच्या काठी आला. तेथे वाळवंटात अफाट जनसमुदायापुढे योव्हान आपल्या प्रभावी वाणीने लोकांची अंतःकरणे हलवून सोडीत होता. पाठीमागे यार्देन नदीचे प्रशस्त पात्र ! तिच्याकाठचा प्रदेश फार सुपीक ! बाकीच्या ठिकाणी सतत रखरख, पाऊस कमी व सगळीकडे वाळवंट. पण यार्देन नदीचा भाग हिरवागार, डोळयांना आनंद देणारा. अशाच रमणीय ठिकाणी जनसमुदायासमोर योव्हान आपले प्रचारकार्य करीत होता.

येशूने तो अफाट जनसमुदाय पाहिला. यार्देन नदीचे ते अफाट पात्र पाहिले, दोघांच्यामध्ये कितीतरी फरक दिसत होता. एक शांत, गंभीर, सोज्ज्वळ, पावित्र्याची आणि मांगल्याची जणू काय मूर्तीच, तर दुसरी क्रुद्ध, अग्निवर्षाव करणारी एखाद्या मेघनादाप्रमाणे व वजनदार आवाजाने लोकांना स्तंभित व भयभीत करणारी. अशा या दोन तेजस्वी व्यक्ती प्रथमच एकत्र येत होत्या. दोघांचेही भवितव्य हसत होते. येशू धीरगंभीरपणाने योव्हानाजवळ येऊन म्हणाला,

" मीं बाप्तिस्मा घेण्याकरता आलो आहे ! "

" म्हणजे ? हे काय म्हणता ? माझी लायकी तितकी नाही ? उलट मीच तुमच्याकडून बाप्तिस्मा घेतला पाहिजे ! "

" तसं नाहीं. मी सांगतो तसंच होऊ दे. त्यात दोघांचेही हित आहे ! "

योव्हानला काहीच बोलता येईना. त्याने आपले मस्तक येशूपुढे नम्र केले व त्याचा हात धरून यार्देन नदीच्या विशाल पात्रात नेऊन येशूला बाप्तिस्मा दिला. येशू बाप्तिस्मा घेऊन प्रार्थना करीत असताना आकाश उघडले, पवित्र आत्मा देहरूपाने कबुतराप्रमाणे त्याच्यावर उतरला आणि अशी आकाशवाणी झाली, "तू माझा प्रिय पुत्र आहेस. तुजविषयी मी संतुष्ट आहे ! "

या बाप्तिस्म्यामुळे येशूचे आता खाजगी चरित्र संपत होते. तो आता त्याचा आईचा अगर नाझरेथ गावाचा राहिला नव्हता. तर विशाल जीवनाचा झाला होता. त्याच्या आयुष्यातील नव्या कालखंडाला येथूनच सुरुवात होत होती. योव्हानाने या बाप्तिस्म्याआधी धर्माचे पुनर्जीवन केले होते व लोकांना तो नवा मार्ग दाखवीत होता. येशू हा मशिया आहे असे लोकांना

मान्य करावेच लागले, कारण योव्हान आपण मशिया नाही असे म्हणत होता. पण एवढ्यानेच भागणार नव्हते. हा मशिया आहे हे कोणत्या तरी गुप्त शक्तीने सांगावयास हवे होते व ते कार्य आकाशवाणीने व कबुतराने केले आहे.

येशूचा बाप्तिस्मा होत असताना आकाशवाणीने व कबुतराने तो व परमेश्वर यांचा संबंध जोडून दिला आहे व तेही सर्वांसमक्ष. त्याच्यावर लोकांनी विश्वास ठेवला नाही ही गोष्ट अलाहिदा. कबुतर (डोव्ह) म्हणजे शुचिता, पावित्र्य, मांगल्य व शालीनत्व यांचे प्रतीक असेही हे लोक मानीत आले आहेत. तेव्हा पवित्र आत्मा कबुतराच्या रूपाने येशूवर यावा हे त्यांच्या कल्पनेला धरूनच होते. सार्वजनिक कार्य करण्यास योव्हानाने येशूला बाप्तिस्मा देऊन त्याला एक प्रकारची शिक्षा दिलीच होती, तर आकाशवाणी-मुळे सुद्धा परमेश्वराने त्याच्यावर ही जबाबदारी टाकली.

* * *

# शिष्यसांप्रदाय

योव्हानाकडून येशूला सार्वजनिक कार्याची दीक्षा मिळाल्यावर त्याने आपल्या कार्याला सुरुवात केली. परतु त्याच्या आधी सैतानाने त्याची परीक्षा घेतली आहे. या महान् कार्याकरतां येशू कितपत लायक आहे, याची कसोशीनें परीक्षा या दुरात्म्यानें घेतलेली. ही परीक्षा एकदोन दिवसांची नव्हती तर सबंध चाळीस दिवस ही परीक्षा चालू होती. या कालात त्याच्या मुखात अन्नाचा एक कण किंवा पाण्याचा एक थेंब गेला नाहीं हें विशेष. या परीक्षेत येशू यशस्वी झाल्यावर त्याला आता आपल्या महान् कार्यास सुरुवात करण्यास कोणताच प्रत्यवाय नव्हता. योव्हानाशीं संबंध येण्यापूर्वी आपणाला किती मोठे कार्य करावयाचे आहे याबद्दल येशू आपल्या मनात विचार करीत असावा. आपल्यापुढें कोणत्या अडचणी निर्माण होतील, त्यांतून मार्ग कसा काढावयाचा याचा सांगोपांग विचार येशू आपल्या मनामध्ये करीत असावा. तेव्हा या महान् कार्यापासून येशूला परावृत्त करावे व जगात पापच नांदावे म्हणून येशूला पुढे येऊ देऊ नये या हेतूने तो येशूची परीक्षा घेत असावा. ज्याला परमेश्वराचे राज्य स्थापावयाचे आहे त्याला सैतानाच्या राज्यातील अनिष्ट प्रकारांशी तोंड देणें किती उचित होते हे या परीक्षेपासून आपणांला कळू लागते.

सैतानाने केलेल्या या परीक्षेचे कथन येशूने स्वतःच आपल्या शिष्यांना नंतर केले असावे. त्याचे चार चरित्रकार आहेत. मत्तय, मार्क, लूक व योव्हान. हा योव्हान म्हणजे जब्दीचा पुत्र. हा येशूच्या शिष्यसंप्रदायात आला होता.

ही परीक्षा चालली असताना ही एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की, सैतान किंवा दुरात्मा किंवा (Evil) देहरूपाने येशूच्या समोर उभा राहिला नसावा. तर येशूच्या मनात जे साधक बाधक विचार चालू होते त्याचे एक प्रातिनिधिक स्वरूप असावे. येशू हा निष्पाप. महान् कार्य

करण्यास तो जीवनाच्या रंगभूमीवर येत आहे. पण याच रंगभूमीवर दुरात्मे आपआपल्या भूमिका उठवीत आहेत, याची जाणीव येशूला व्हावी, हाच कदाचित् या परीक्षेचा हेतू असावा. परंतु येशूला जर देवपुत्र मानायचे, त्याचे मशिया स्वरूप मानायचे, एवढेच नव्हे तर त्याचे परमेश्वर स्वरूपही मानायचे. तो निष्पाप होता, त्याच्या मनाला पाप शिवले नाही असे म्हणायचे, मग अशा पूर्णत्वाला पोचलेल्या येशूची परीक्षा ती काय म्हणून पाहायची ? हा प्रश्न उद्भवतोच. येशूचे सर्व गुण मान्य करून असेच म्हणावे लागेल की, तो मनुष्याचाही पुत्र ( Son of man ) होताच. व सामान्य माणूस ज्या अवस्थेतून जातो त्याच अवस्थेतून येशूलाही जाणे भाग होते. जग पापाने भरलेले आहे. तू जरी निष्पाप असा मनुष्याचा व देवाचा पुत्र असलास तरी मोह तुला भेडसाविणार नाही, पाप तुझ्याजवळ येणार नाही हे कशावरून ? कारण माणूस म्हणूनच तुला जगात वावरावे लागेल, हा बहुमोल धडाच ही परीक्षा येशूला देत होती असे म्हणावे लागते.

सत्प्रवृत्त माणसाच्या अंतःकरणात नेहमी काही ना काही तरी खळबळ चाललेली असते. सत्कार्य करायचे पण ते करताना सुद्धा मागे पुढे पाहून, साधकबाधक विचार करून तो माणूस ते कार्य करणार हे उघडच आहे. या परीक्षेने येशूचा मानवी स्वभावच विशद केला आहे. शिवाय येशूला चाळीस दिवस उपवास पडला म्हणजे उपवासाने त्याचे आत्मिक बळ वाढले हे सुद्धा आपणांला कबूल करावे लागेल. येशू हा काही बाप्तिस्मा करणाऱ्या योव्हानाप्रमाणे संन्यासी नव्हता. त्याला प्रदीर्घ उपवासाची सवय नव्हती. चाळीस दिवस अन्नपाणी वर्ज्य म्हणजे काही सामान्य गोष्ट नव्हे ! येशू दुरात्म्याच्या बरोबर एकटाच. जवळपास कोणी नाही. तेव्हा मोहाला वश होऊन दुरात्म्याचा विजय होऊ देणे किती शक्य होते ?

दुरात्म्याने येशूची तीनदा परीक्षा घेतली. दगडाच्या भाकरी, उंच मनोऱ्यावरून उडी व पृथ्वीतलावरचे राज्य मिळण्याचे आमिष, पण या तिन्ही परीक्षांत येशू यशस्वी झाला व परमेश्वराचे कार्य करण्यास तो तयार झाला.

येशूने आपल्या कार्यास सुरुवात करताना त्याच्यावर तीन प्रकारचे संस्कार झाले आहेत : (१) आईचा आश्रय सोडून स्वावलंबी होणे, (२) बाप्तिस्मा (३) परीक्षा व शिष्यसंप्रदाय निर्माण करणे.

लोकांना चांगल्या गोष्टी सांगून त्यांना सन्मार्गावर आणणे हा उपक्रम येशूनेच प्रथम सुरू केला असे नव्हे. त्या वेळी अशी प्रथा होती की, समंजस, ज्ञानी व तोराचे अध्ययन पूर्ण झालेला कोणताही राबी चार शिष्य गोळा करून गावोगावी प्रवचन करी. ज्या ठिकाणी अनेक मजूर व कामकरी शेतकरी काम करतात असे सधन मळेवाले किंवा शेतकरी मुद्दाम आपल्या मळ्यांत अशा धर्मशिक्षकांना पाचारण करून आपल्या लोकांना चार शब्द सांगण्यास सांगत. तेव्हा येशूने काही नवी प्रथा पाडली होती किंवा नवा संप्रदाय निर्माण केला होता असे नाही. जुन्याच मार्गाने तो जात होता. येशूने आता आपला शिष्यसंप्रदाय स्थापण्यास सुरुवात केली.

बाप्तिस्मा करणाऱ्या योव्हानाच्या श्रोतृवृन्दात आंदियास व योव्हाना (जब्देचा पुत्र) हे दोन सामान्य तरुण कोळी होते. योव्हानाचे प्रवचन ते अगदी मन लावून ऐकत. पण आपला उद्धारक हा नव्हे हे पाहून ते दुःखित होत. पश्चात्ताप करण्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग योव्हान सुचवीत नव्हता. तेव्हा या दोन साध्याभोळ्या व धोपट मार्गाने जाणाऱ्या तरुणांच्या मनांत विचारांचे काहूर माजावे यात नवल नाही. स्वतःविषयी खात्रीलायक साक्ष देण्याऐवजी योव्हान येशूविषयीच साक्ष देत होता. येशू हा परमेश्वराचा पुत्र असून पापहरण करणारा परमेश्वराचा कोंकरा आहे. असे योव्हान म्हणत होता. आपण मशिया नाही, ख्रिस्त नाही, व एलियाही नाही, असे योव्हान स्पष्टपणे बोलत होता. कोंकरूं हे पावित्र्याचे व मांगल्याचे प्रतीक म्हणून यहुदी लोक मानीत असत, फारोच्या दास्य-विमोचनाचे प्रतीक म्हणून दरवर्षी ओलांडण सणाच्या दिवशी जगाचे सर्व पाप या कोंकराच्या माथी लादून परमेश्वराला ते अर्पण करण्यात येई. तेव्हा ज्या सत्पुरुषाबद्दल योव्हान बोलतो तोच हा मशिया नसेल ना, असे या दोघांना वाटणे अगदी साहजिकच होते. इतक्यात येशूही येताना त्यांना दिसला व ते त्याच्या मागे गेले. येशू ते येताना पाहून थांबला व म्हणाला, "कोणाला शोधता आहात?" या दोघांना काय उत्तर द्यावे हे कळेना. ते एवढेच म्हणाले, "गुरुजी, आपण कोठे राहता?" येशू म्हणाला, "माझ्या बरोबर या." ते काही न बोलता त्याच्या मागून चालू लागले. दुपारचे चार वाजण्याची वेळ होती. ते त्याच्याबरोबर चालतच होते. येशूने त्यांना

४००८७ चारि... २८।।५।६५

आपल्या घरी नेले. येशूच्या शिष्यपरंपरेत येणाऱ्या पहिल्या दोन शिष्यांचा मान या दोन साध्या कोळयांना मिळाला. रात्री ते येशूच्याच घरी राहिले.

पण आपले शिष्यत्व सुखाचे, समाधानाचे व शांतीचे नाही हे येशूने समजावून सांगितले. अजूनही परत जाण्याची त्यांना संधी होती. या तिघांमध्ये विचारांची बरीच देवघेव झाली असेल. आपले जनसेवेचें कार्य व परमेश्वराच्या राज्याची कल्पना येशूने त्यांना दिली असावी. सर्व शंका-कुशंकांचें निरसन झाल्यावर येशू त्यांना म्हणाला, " माझ्या शेजारी उभे राहून माझ्या कार्यात मला मदत करावी लागेल तुम्हांला ! आहे कबूल ?" या दोघांचाही आता पक्का निर्धार झाला होता. त्यांना आता जास्त विचार करण्याची जरुरीच नव्हती. ते त्याचे शिष्य झाले. एका रात्रीत त्यांच्या जीवनाचा मार्ग कायमचा बदलला.

या आंदियासचा शिमोन नांवाचा एक थोरला भाऊ होता. स्वारी मोठी उंचीपुरी व भरभक्कम. दाढी भरपूर ठेवली होती. डोक्याला टक्कलही होते. हा विधूर होता व मासळी धरण्याचा धंदा करी. या भावाला जर आपण येशूच्या शिष्यपरंपरेत आणले तर ? नाहीतरी शिमोनला आता संसार असा कुठे उरला आहे ! दोघांचेही आईबाप वारले होते. शिमोनाची बायकोही देवाघरी गेली होती. मग याने मासे धरण्यापेक्षा येशूच्या शिष्यसंप्रदाय का येऊ नये ? आंदियसला असे वाटले व तो त्याला म्हणतो, "चला दादा, मला ख्रिस्त सापडला आहे. तुम्हीही माझ्या आनंदात सहभागी होऊन त्याचा शिष्य बना. तुम्हांला तेच काम योग्य आहे." त्याने शिमोनला येशूकडे आणले. येशू म्हणाला, " शिमोन, मला तुझी सर्व माहिती आहे. शिमोन, तुला नवीन शक्ती प्राप्त होईल. तुझ्यामध्ये जी कमतरता आहे ती नाहीशी होईल. उद्या लोक तुला खेपाज – खडक – म्हणतील !" काय असेल ते असो, पण या आडदांड दिसणाऱ्या माणसाच्या मनावर येशूच्या बोलण्याचा योग्य तो परिणाम होऊन बाहेर जाऊन तो ढसढसा रडू लागला. तोही येशूचा शिष्य बनला.

या तीन शिष्याना घेऊन येशू काणा गावी गेला. मरियेच्या एका लांबच्या नातेवाइकाच्या मुलीचे लग्न होते. या सर्वांना आमंत्रण होतेच. रस्त्यावर

त्यांना फिलीफ हा तरुण भेटला. तो सुमारे तीस वर्षांचा असावा. फिलीफ हे ग्रीक नाव आहे. राजे लोकांची नावे मुलांना देण्याची त्या वेळी प्रथा होती. फिलीफ हा पॅलेस्टाईनमध्ये राजा होता व त्याचेच नाव या तरुणाला मिळाले असावे. गेनसरेर सरोवराच्या काठावर जे गॅलली लोक राहात त्यांत पुष्कळ ग्रीक लोकही राहात होते व या ग्रीक लोकांशी या फिलीफचा बराच संबंध येत असावा. येशूच्या अंतिम कालात काही ग्रीक लोकांना त्याला भेटावेसे वाटे व त्याकरिता यांनी या फिलीफलाच मध्यस्थी करण्यास सांगितले होते. येशूला हा फिलीफच माहीत असावा. कारण त्याला पाहून माझ्या मागे ये असे म्हणताच तो येशूच्या शिष्यवर्गात सामील झाला.

म्हणजे आंदियास, योन्हान, शिमोन (पेत्रस) व फिलीफ असे चार शिष्य येशूला दोन तीन दिवसातच मिळाले. या फिलीफचा नथेनल नावाचा एक मित्र होता याला नथेन बार्थालोमी असे जोडनाव देण्याची प्रथा आहे. पण ते याचे नाव नव्हे. त्याचे नाव नथेनल बार टोलमी म्हणजे टोलमीचा पुत्र असे आहे. हा काणा गावाचा तर फिलीफ बेथ सैदा गावाचा. या फिलीफसनें या नथेनला येशूबद्दल बरेच सांगितले असावे व आपण त्याचा शिष्य कसे झालो आहोत हेही सांगितले असावे व त्याचे मनही वळविले असणे शक्य आहे. हा नथनेल फिलीफसपेक्षा बराच वयस्कर होता. त्याची सर्व माहिती ऐकून घेतल्यावर नथेनल फिलिफसला म्हणतो, " हा येशू कोण आहे ? "

" नाझरेथच्या योसेफाचा पुत्र येशू ! "

नथेनल कोणतीही गोष्ट तावडतोब स्वीकारणारा माणूस नव्हे. धार्मिक मतासंबंधी तर तो फार साशंक असे. जवळ जवळ नास्तिकच. मशिया इतक्या साध्या रीतीनें येईल व तोही नाझरेथ गावातून—यावर त्याचा विश्वास नव्हता. सर्वसाधारणपणे नाझरेथ गावाबद्दल लोकांचे काही चांगले मत नव्हते. त्याच्याकडे लोक तिरस्कारानेच पाहत. म्हणून तो नेहमीच्या प्रथेप्रमाणें म्हणतो, " नाझरेथ गावातून का कधी चांगले निघणार आहे ? " फिलीफने ताडले की याच्याशी वादविवाद करण्यात अर्थ नाही. शब्दाने शब्द मात्र वाढत जाईल. तेव्हा तो त्याला एवढेच म्हणतो, " ये आणि

पाहा ! " आणि खरोखरच तो येशूकडे आला. येशूने त्याच्याकडे पाहिले मात्र, नथेनचा संशय पार वितळून गेला. येशू त्याच्याकडे पाहून म्हणतो, " निर्मळ मनाचा हा यहुदी पाहा. " पण तेवढ्यावरून हा संशयात्मा फुगून जाणारा माणूस नव्हता. येशूला तो प्रत्युतर करतो.

" तुम्हांला माझ्याबद्दल काय माहिती आहे ? "

" मला पुष्कळच माहिती आहे तुझ्याबद्दल." येशू म्हणाला. " फिलीफनें बोलावण्याच्या आधी तू अंजिराच्या झाडाखाली बसला होतास. "

नथेनलची आता खात्री झाली. धर्ममताबद्दल किंवा तोराबद्दल अंजिराच्या झाडाखाली बसून विचार करणे ही एक प्रथा यहुदी लोकांत होती. जसा आपल्याकडे आम्रवृक्ष श्रेष्ठ तसें हे अंजिराचें झाड त्यांना श्रेष्ठ काही चांगले विचार याच झाडाखाली येऊन करण्याची त्यांची रूढी होती. आपले मनातले येशूने कसे बिनचूक ओळखले हे पाहून नथेनला फार आश्चर्य वाटले. तो ताबडतोब म्हणाला, " राब्बी, तुम्ही देवाचे पुत्र आहात. यहुद्यांचे राजे आहात. " असे पाच शिष्य आता येशूला मिळाले.

येशूला आणखी बरेच लोक येऊन मिळाले व शिष्यांची संख्या बारा झाली. त्यांची नावे अशी : (१) आंद्रेयस. (२) योव्हान. (जब्दीचा पुत्र) (३) शिमोन यालाच येशूने पेत्र हे नाव दिले. (पिटर). (४) याकोब (जब्दीचा पुत्र व योव्हानाचा भाऊ). (५) फिलीफस. (६) नॅथनेल किंवा बर्थलमय. (७) मत्तय. (८) थोमा. याकोब (अल्फीचा पुत्र). (९) शिमोन कनानी. (१०) यहुदा इस्कर्योत. यानेच पुढे येशूला धरून दिले. (११) तद्देय. (१२) जेम्स. या शिष्यांना हाताशी धरून येशूने आपल्या कार्यास सुरुवात केली

* * *

# द्राक्षारस संपला आहे

आपले शिष्य घेऊन येशू आपल्या घरी नाझरेथ येथे आला. बिचारी मरिया पतिनिधनानंतर वैधव्याचे आयुष्य कंठीत होती. आपल्या महान् कार्याकरता येशू आता घराबाहेर पडला होता. तो कधी घरी येई, कधी येत नसे. मरिया एकटीच घरी असे. बाकीच्या मुलांनी आपआपले संसार थाटले होते. येशूचे मशिया स्वरूप मरियेला माहीत होते. त्याचे कार्य कितीतरी भिन्न व अफाट आहे हे तिला समजत होते. त्याच्या कार्याचें महत्त्व व विशालत्व पाहून या माउलीने येशूला कधीही विरोध केला नाही. येशूच्या शिष्यांची तिन चांगली बरदास्त ठेवली.

पण आज आईची धावपळच होती. त्यांच्या नात्यापैकी एका मुलीचे लग्न जवळच काणा गावी होते तिकडे जाण्याची आईला घाई होती. तरी पण शिष्यांना तिने काही कमी पडू दिले नाही. पाहुण्यांची सेवा हे तर या लोकांचे ब्रीद होते. अर्थातच नात्यातले लग्न. आईने येशूला व शिष्यांना लग्नाला येण्याचे आमंत्रण दिले. वधूतर्फे त्यांना आमंत्रण आलेच होते. ते सर्व काणा गांवी लग्नाला गेले.

यहुदी लोकांत लग्ने बहुतेक संध्याकाळी सूर्यास्तानंतरच लागत. कारण दिवसभर कोणाला फुरसत नसे. लग्नाचा पुढचा सोहळा मात्र मध्यरात्रीपर्यंत चाले. दिवाबत्तीची सोय नसल्याने ज्याने त्याने आपल्या मशाली आणाव्यात अशी प्रथा होती. येशूने पुढे दहा कुमारींचा दाखला दिला तो या प्रथेला धरूनच होता. मेजवानी वगैरे समारंभ बंदिस्त घरात किंवा आपल्याकडील वाड्याप्रमाणे इमारतीत होत.

लग्नाची तर एकच घाई उडून गेली होती. लग्नाला बरीच मंडळी जमली होती. या लोकांच्या रिवाजाप्रमाणे सर्व पाहुण्यांना द्राक्षारस देण्यात आला. अपेक्षेबाहेर लोक जमल्यामुळे द्राक्षारस संपत आला. वधूपित्याच्या तर तोंडचे पाणी पळाले. वधूपिता अगदी हवालदिल झाला होता. माणूस पाठवून जवळपास

कोठे द्राक्षारस मिळेल याची शक्यता नव्हती. बरे, द्राक्षारस म्हणजे त्या लोकांचे मानाचे पेय. मरिया ही वधूकडची प्रौढ नातेवाईक म्हणून मोठ्या मानाने ती वावरत होती. पाहुण्यांची ऊठबस, हवे नको करीत होती. तिच्या नजरेस ही गोष्ट पडली व तिलाही मोठा पेच पडला. येशू व त्याचे शिष्यही मोठ्या आनंदाने व उत्साहाने पाहुणे मंडळीत वावरत होते. द्राक्षारस संपला आहे हे कळताच मरिया येशूजवळ येऊन म्हणाली, " पाहिलस येशू द्राक्षारस कसा एकाएकी संपला, आणि पाहुणे तर येतच आहेत, काय करावं ?" त्यावर तिच्या मुखाकडे पाहात येशू म्हणतो, " बाई, माझा तुझा काय संबंध ? माझी वेळ अजून आली नाही." पण आईला या म्हणण्याचे मुळीच वाईट वाटले नाही. चाकर माणसाला ती म्हणाली, " येशू सांगेल तसे करा."

यहुदी लोकांत बाहेरून येणारा माणूस पाय धुऊनच आत येई व त्याकरता अंगणांत पाण्याचे रांजण भरून ठेवावे लागत व पाण्याने रांजण भरले आहेत हें दर्शविण्याकरिता रांजणाच्या तोंडावर अंजिराच्या किंवा इतर झाडांच्या डहाळ्या ठेवण्यात येत. आपल्याकडे पाण्याची भांडी आंब्याच्या डहाळ्यांनी झाकतात तशातलाच हा प्रकार. आपल्यामध्ये व यहुदी लोकांच्या चालीरीतींमध्ये कितीतरी साम्य दिसते !

चाकर माणसांनी पाण्याचे रांजण काठोकाठ पाण्याने भरले व त्यावर झाडाच्या डहाळ्या ठेवल्या. येशूने त्यातून एक पेलाभर पाणी घेतले व म्हटले, " जा, बाहेर पाहुणे मंडळींना द्राक्षारस द्या." आणि आश्चर्य म्हणजे हा नवा द्राक्षारस अगदी चवदार व उत्तम होता. जो तो वधूपित्याला इतका चांगला द्राक्षारस आणला म्हणून धन्यवाद देऊ लागला. येशू तेथे जास्त वेळ न थांबता आपल्या घरी नाझरेथ गावी शिष्यांना घेऊन आला. या चमत्काराने येशूच्या अलौकिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली.

हे जे पाण्याचे रांजण अंगणात भरून ठेवले होते. ते एकंदर सहा होते व त्यांच्यात एकंदर शंभर गॅलनपर्यंत द्राक्षारस मावला असावा.

हे लग्न मरियेच्या नातेवाईकाच्या मुलीचे दिसते. ही वधू लहान बालिका असताना मरियेच्या घरी येत असावी. येशूला लहान मुले फार आवडत. त्यांच्यासमवेत तो आनंदी व उत्साही दिसे. त्यांना गोष्टी सांगण्यात तो नेहमी गर्क असे; व या बालिकेलाही त्याने त्याच्या घरी किंवा सुताराच्या

दुकानात अनेक गोष्टी सांगितल्या असतील व आपले लग्न आहे व आपण हजर राहिलेच पाहिजे असा स्त्रीहट्ट सुद्धा या मुलीने धरला असावा.

सर्व मंडळी आनंदात असताना एकाएकी द्राक्षारस संपला. आणि मोठा पेचप्रसंग वधूपित्यावर येऊन पडला. वधूपित्याबरोबर मरियेलाही काळजी वाटू लागली व ती येशूला म्हणाली "बघितलंस येशू, द्राक्षारस कसा संपला ?" हे ऐकताच येशूने जवळ असलेले रांजण पाण्याने भरण्यास नोकरास सांगिले. नंतर त्यातून सर्व पाहुण्यांस द्राक्षारस द्या असे तो नोकरास म्हणाला. पाण्याचा खरोखरच द्राक्षारस झाला होता. येशूच्या अंगी कोणत्या दैविक शक्ती आहेत याची जाणीव मरियेला आतापर्यंत फारशी नव्हती. परंतु त्याचा अद्भुतरम्य जन्म, त्याच्याबद्दल केलेली भविष्ये सर्व सर्व काही मरियेला आठवले असावे व काही तरी चमत्कार करून लग्नवरावर आलेली अवकळा दूर करणें येशूला अशक्य नाहीं असेंच तिला वाटलें असावे, म्हणूनच ती त्याला म्हणते, "बघितलंस येशू, द्राक्षारस कसा संपला ?" तिला तशी खात्री असल्याशिवाय आपल्या काळजीचें कारण तिने त्याला सांगितलेच नसते.

काणा लग्नसमारंभासंबंधी ही एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की, येशूचा हा पहिलाच चमत्कार होय. मागे जेव्हा सैतानाने त्याची अरण्यात परीक्षा घेऊन दगडाच्या भाकरीं करण्यास सांगितले तेव्हां येशूने तसा चमत्कार केला नाही. कारण तो त्याचा वैयक्तिक प्रश्न होता. येथें तो जो चमत्कार करून पाण्याचा द्राक्षारस करतो तो दुसऱ्याकरता, दुसऱ्याची अडचण नाहीशी करण्याकरता. जेथे जेथे म्हणून दुःख असेल तेथे तेथे येशूने चमत्कार करून त्या माणसाचें दुःख नाहीसे केले आहे. विधवेचा मुलगा जिवंत कर, कारण तिच्या जीवनाचे मुलगा हे एकमेव साधन होते. कोणाला दृष्टी दे, कारण दृष्टीशिवाय त्याला भीक मागण्याशिवाय दुसरा कोणता मार्ग होता ? या काणा लग्नातील चमत्कारामुळे येशूची दैविक शक्ती व्यक्त होऊन तो कोण आहे हे जगाला हळूहळू कळू लागले.

* * *

# परिवर्तन

मागच्या प्रकरणात येशूने द्राक्षारसाचा केलेला चमत्कार ऐकून आजूबाजूचे लोक चकित झाले. येशूचा हा चमत्कार एक कुटुंब अडचणीत सापडले होतें त्याची अडचण नाहीशी करून या घरात आनंद निर्माण करण्याकरता होता. हा चमत्कार करून येशूने शिष्यांना दाखविले की आपण जे त्यांना आपल्या शिष्यसंप्रदाय घेतले तेंत्यांनी सर्वसंगपरित्याग करून संन्यासी बनावें, जगाचा व त्यांचा संबंध तुटावा म्हणून नव्हे. शिष्यांनी व लोकांनी आनंदाने राहावे, पाप करू नये, परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागून एकमेकांना आनंदी करावे, म्हणूनच त्यांना आपले शिष्यत्व पत्करण्यास आपण सांगत आहोत. येशूला संसाराचा त्याग करावयाचा नव्हता, तर संसारांत प्रेम, आनंद व सहकारित्व निर्माण करावयाचे होते. विवाहसंस्थेबद्दल जर त्याने अनास्था दाखविली असती तर तो या विवाहप्रसंगीं हजरच राहिला नसता. मग चमत्काराची गोष्ट तर बाजूलाच! आपण जे कार्य आता लोकांत करीत आहोत ते कार्य किती सौख्याचे, आनंदाचे व शातीचे आहे, हेच तो या चमत्काराने आपल्या शिष्यांना शिकवीत आहे.

हा चमत्कार येशूने सर्वासमक्ष केलेला नाहीं. आईने चाकर माणसांना येशू सांगेल तसे करा, असे सांगताच चाकर माणसे पाण्याचे रांजण भरीत असताना तो रांजणाजवळ गेला आहे. पाहणाऱ्याला वाटावे हा वधूपक्षाकडील असल्याने पाहात असेल. एकंदर व्यवस्था व त्याच्याकडे कोणी लक्षहि दिले नसेल. पण त्याने चमत्कार केला व लोकांचे लक्ष त्याच्याकडे गेले.

नाझरेथ गावात ही बातमी वाऱ्यासारखी आली व मागोमाग येशूही नाझरेथ गावी आला. पण त्याच्या या जन्मग्रामाने त्याचा स्वीकार केला नाहीं. धिक्कारच केला व म्हणूनच येशूला म्हणावे लागले की, "संदेष्टा आपल्या गावी कधींच सन्मान पावत नाहीं!" नाझरेथ गावाचा व येशूचा संबंधही नंतर तुटला. नाझरेथ आपलें मुख्य केंद्र करण्याऐवजी येशूने कपर्ण-

हूम हेच केंद्र केले. कपर्णहूम हे एक व्यापारी केंद्र होते. मासळी, लोकर व द्राक्षारस यांचा मोठा व्यापार या केंद्रातून चाले. त्यामुळे या गावी अनेक देशांचे लोक जमले होते. काणा गावी केलेल्या चमत्काराची बातमी नाझरेथ गावी आल्यावर जो तो आपापल्या मताप्रमाणें त्या घटनेचा अर्थ लावी. कोणी म्हणे, येशूच्या आईनेच त्याला हा चमत्कार करण्यास भाग पाडले व मरियेला तो कोणी देवमाणूस आहे असे समजून बायका आपली आजारी मुले तिच्याकडे आणून तिने येशूला या मुलांना बरे करण्यास सांगावे म्हणून आर्जवू लागल्या.

नाझरेथ गावात जे राबी व याजक होते ते मात्र येशूच्या या चमत्काराकडे साशंक नजरेनें पाहात होते. येशूची नवी शिकवणही त्यांना पसंत नव्हती. गावात दोन तट पडले होते. कांहीं लोक म्हणत, "येशू हाच मशिया किंवा द्रष्टा आहे, तर दुसरा तट म्हणे, शहाणेच आहात ! मशिया का अशा सामान्य कुळातूनयेणार आहे ? हा सुताराचा मुलगा ना ? याचा बाप सुतारकी करता करता मेला. याची आई काबाडकष्ट करणारी स्त्री ! तिच्या पोटी का मशिया येणार आहे ?" त्यावर मरियेचा मेहुणा क्लियोपाझ म्हणे, "काय हो, मशिया किंवा संदेष्टा श्रीमंत घराण्यातच जन्माला यावा, असे परमेश्वरानें का तुमच्या कानांत सांगितले आहे ? अमॉस या संदेष्टयाला नाहीं का परमेश्वराने शेतातून उचलून संदेष्टा बनविला ? दाविद तर मेंढरे चारीत असताना राजा म्हणून परमेश्वराने त्याची निवड केली, मग माझ्या साडूचा मुलगा मशिया होऊ नये असे का ?" कोणी शहाणा राबी म्हणे, "या विषयावर भांडण्यात काय अर्थ ? येशू मशिया आहे किंवा दुसरा कोणी संदेष्टा आहे, हे आपोआपच कळेल आपल्याला कालांतराने. वाट पाहू या आपण."

शाब्बाथ आला. नाझरेथ गावाचे तें लहानसे मंदिर लोकांनी भरून गेले होते. झाडून सर्व गाव आज या मंदिरात येशूचे शास्त्रवचन व प्रवचन ऐकण्यास जमले होते. मरिया, तिची वहीण मरिआमा व इतरही स्त्रिया त्याच्याकरता राखून ठेवलेल्या जागी बसल्या होत्या. यहुदी लोक तर आले होतेच, पण यहुदोतर लोकही आपल्या गावाच्या राबीच्या मुखातून निघणारे शब्द आतुरतेने ऐकण्यास जमले होते. अर्थातच त्यांना मंदिराच्या दरवाज्यातूनच आत काय चालले आहे ते पाहावे लागले. येशू आपल्या गावातून लहानाचा

मोठा झाला, राब्बी झाला व तो मशिया असो कीं नसो पण तो आज मोठा प्रवचनकार झाला आहे. याचा या लोकांना मोठा अभिमान वाटत होता. त्यांच्या मुखावर समाधान व शांतता झळकत होती. आपल्याच गावाचा एक माणूस चमत्कार करतो व दोन चांगले शब्द सांगतो तेव्हा तो कोणीतरी सत्पुरुषच असावा याबद्दल त्यांची खात्री झाल्याचे स्पष्ट चिन्ह त्यांच्या मुखावर दिसत होते. पण याच गर्दीत येशूच्या विरुद्ध असलेले लोकही येत.

शाब्बाथाच्या धर्मविधीला याजकाने सुरुवात केली. सर्व मंदिर अगदी शांत झाले. येशू व त्याचे शिष्य मंदिराच्या रिवाजाप्रमाणे आपापल्या जागीं बसले. तोराचे अध्ययन करणारे विद्यार्थीही आपल्या नेमलेल्या ठिकाणी स्थानापन्न झाले. याजकाला एक राबी मदत करीत होता. यहुदी मंदिरात व आजच्या चर्चमध्यें 'वडील' किंवा 'महाजन' लोक असतात. ही मंडळी मंदिराची व्यवस्था पाहतात. हे वडीलही आपल्या जागी जाऊन बसले व प्रत्येकाची जशी पाळी येईल त्याप्रमाणें तोरा वाचन करीत. आजच्या विधीला जे वचन वाचण्याकरिता ठेवण्यात आले होते ते वचन येशू वाचणार होता. येशू हा काही याजकही नव्हता व 'वडील'ही नव्हता. पण तो राबी होता व तोराचा त्यानें याच मंदिरात अभ्यास केला होता. यहुदी मंदिराची अशी एक प्रथा होती कीं, बाहेरचा कोणी राबी आला तर तो मंदिरात वाचन करी. येशू तर त्याच गावचा. शिवाय मोठा झालेला व नावारूपाला आलेला. तेव्हा त्या शाब्बाथ दिवसाचे तोरा वचन त्याने वाचावे व प्रवचन करावे म्हणून त्याला आमंत्रण देण्यात आले होते. सर्व विधी यथासांग पार पडल्यावर वचन वाचनाची पाळी येशूवर आली तेव्हां याजक म्हणाला, "राबी यशाव, आता पुढे या व या शब्बाथाचें वचन वाचा!" येशू उठला. सभा तटस्थ झाली. सर्वांचे डोळे येशूकडे लागले. येशूने आपली प्रार्थनेची शाल अंगावर नीट केली व तो वेदीकडे निघाला. मदतीस असलेल्या राबीने पुस्तकाची गुंडाळी त्याच्यापुढें ठेवून कोणते वचन वाचायचे यावर बोट ठेवून त्याला दाखविले. परंतु येशूनें ते वचन वाचले नाही. दुसरेच वचन वाचले. ते असे होते :

"प्रभूचा आत्मा माझ्यावर आला आहे.
कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास त्याने मला अभिषेक केला आहे.

धरून नेलेल्यांची सुटका करण्यास,
व आंधळयास दृष्टी देण्यास
ठेचलेल्यास मोकळे करावयास
परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष विदित करावयास त्याने मला पाठविले आहे."

परंतु येशू जे तोरा वचन वाचतो आहे ते आजचे वचन नव्हे हे जेव्हा याजकांना, राबीना व विद्यार्थ्यांना कळले तेव्हा त्यांच्यामध्ये चुळबुळ, कुजबुज सुरू झाली. येशूकडून ही चूक जाणून बुजून तर झाली नसेल, असेही त्यांना वाटू लागले. आता काय वज्राघात होतो कीं येशूला आकाशातून वीज पडून तो जळून खाक होतो ! काय होते नी काय नाही ? कारण ठरलेल्या वचनाऐवजी येशूने भलतेच वचन वाचले होते. परंतु जास्त खळबळ माजू न देता याजक उठून म्हणाला. "यशाव बेन योसेफ, तुम्ही वाचलेले वचन आजच्या पाठात नाही ! " नंतर मदतीच्या राबीकडे वळून तो म्हणतो, "राबी, त्यांना आजच्या शाब्बाथाचे वचन काढून द्या. " तो राबी घाई घाईने उठला. थरथरत्या हाताने त्याने येशूपुढे ती गुंडाळी पुन्हा धरली व पुन्हा त्या वचनावर बोट ठेवले. पण येशूने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. तो म्हणाला, "हा शास्त्रलेख आज तुम्ही ऐकत असता पूर्ण झाला आहे."

जे वचन येशूने वाचले होते त्याचा अर्थ उघडच होता. म्हणजे परमेश्वराचे महान् कार्य करण्यास त्याचा अभिषेक करण्यात आला असून त्याची त्या कार्यावर नेमणूक झाली आहे. त्याने आता कोणते कार्य करावयाचे आहे याचाही खुलासा या वचनात आढळतो. हीन, दीन व त्याज्य मानलेल्या लोकांना सुवार्ता—आनंदाची बातमी—देण्यास, जे तुरुंगात असतील त्यांची सुटका करण्यास, आंधळयांना दृष्टी देण्यास म्हणजे जगातले दैन्यच नाहीसे करण्यास त्याची नियुक्ती झाली आहे हे येशूला सांगावयाचे आहे. हे भविष्य यशाया संदेष्टयाने सुमारे सातशे वर्षांपूर्वी करून ठेवले होते व ते आतां येशूच्या वेळेस परिपूर्ण होत आहे, हेही त्याला लोकांना सांगावयाचे होते. पण नाझरेथ गावाचे लोक ते ! मोठे आडमुठे आणि आडदांड. इतकी वर्षे ते मशियाची वाट पाहून पाहून थकले होते व तो

आला तरी त्याच्यावर विश्वास नाही. नथेनल शिष्याने जे म्हटले होते की, "नाझरेथ गावातून काही चांगले निघणार आहे" ते उगीच नव्हे. का

येशूच्या मुखातून शब्द निघतात न निघतात तोच लोकांत पुन्हा खळबळ सुरू झाली. आपण कोण आहोत, कशाकरता आलो आहोत, आपले कार्य काय, आपणाला कोणी पाठविले, याची ग्वाही येशू आपल्या मुखानेच देत होता. पण समाजाला कसे पटावे? अर्थातच येशूनें आपण मशिया असल्याचे चिन्ह दाखविले नव्हते. तेव्हा तो जें काय म्हणतो त्यावर विश्वास ठेवण्या-शिवाय लोकांनाही गत्यंतर नव्हते. जे समाजातील अत्यंत खालच्या थराचे गरीब व अशिक्षित लोक होते त्याचा येशूच्या बोलण्यावर विश्वास होता. पण वरच्या थरावरच्या लोकांना येशूच्या शब्दावर विश्वास बसणे शक्य नव्हते. कारण येशूला लहानाचा मोठा होताना त्यांनी आपल्या डोळयांनी पाहिले होते व आईबाप तर त्यांच्या मध्येच होते. तेव्हा येशू मशिया आहे हे त्यांना तरी कसे पटावे? शिवाय या महान् कार्या-करिता येशूचा अभिषेक कोठे झाला होता? राजाचा अभिषेक झाल्याशिवाय तो जसा राजा होत नाही, तसे मशियाचा अभिषेक झाल्याशिवाय तो मशिया होत. नाही, हे या लोकांना पटत होते. कोणत्याही कार्यासाठी कोणाची नियुक्ती करताना ते कार्य करणाऱ्यांचा सर्वासमक्ष अभिषेक झाला पाहिजे ही या लोकांची प्रथा होती. व जे वचन येशूने वाचले होते, त्यात त्याचा त्या कार्याकरिता अभिषेक झाला आहे असे म्हटले होते. हे कसे शक्य आहे, असे लोक म्हणू लागले.

लोकांमध्ये खळबळ माजली. "मला जाऊ द्या, त्याच्याजवळ जाऊ द्या. म्हणजे दाखवितो त्याचे मशिया स्वरूप!" कोणीतरी आडदांड माणूस रागाने म्हणे. तर कोणी म्हणे "मशिया, मला बरं कर!" तिसरा म्हणे, "चमत्कार करतोस ना, मग दाखव की एखादे चिन्ह?" बारा घरचो बारा तोंडं ती! ती का गप्प राहणार? परंतु पवित्र मंदिरात आता ज्यास्त गोंधळ माजविणे चांगले नाही. लोकांना शांत केले पाहिजे म्हणून याजक म्हणाले.

"बंधूंनो, शांत राहा. आपण जे शब्द आता ऐकले आहेत त्यामुळे आपली अंतःकरणे दुखावली गेली आहेत. असले निर्घृण शब्द इस्रायल लोकांमध्ये

कोणीच वापरले नसतील ? यशाव बेन योसेफाचे म्हणणे जर खरे असेल तर त्याने तसे चिन्ह दाखवावें जर त्याने तसें चिन्ह दाखविलें नाही तर त्याचे हे नुसते ढोंग आहे, नुसती फसवेगिरी आहे, त्याचे वर्तन धर्माज्ञेविरुद्ध आहे, तो ईश्वरी निंदा करीत आहे असेच आम्ही समजू." मंदिरात एकच आरोळी उठली—

"चिन्ह, चिन्ह दाखीव!"

"अहो, त्याला चमत्कार करू द्या. मोठा आला आहे मशिया, मग कर की म्हणावं एखादा चमत्कार?" एक आडदांड माणूस म्हणाला. त्याच्या भावानेही तीच आरोळी ठोकली. लोक अगदी श्वास कोंडून पाहू लागले.

मरियेची तर भीतीने गाळणच उडाली. सर्वांग थरथर कापू लागले. घामाच्या धारा तिच्या अंगातून वाहू लागल्या. ती परमेश्वराचा धावा करू लागली. इतक्यात येशू गंभीरपणे उठला व लोकांना उद्देशून म्हणाला, "ज्या गावात संदेष्टा जन्मतो ते गाव त्याचा कधीच सन्मान करीत नाही. पण मला असे सांगा, एलिया संदेष्टाचे वेळेला जेव्हा भयंकर दुष्काळ पडला, त्या वेळी इस्रायलामध्ये थोडया का विधवा होत्या? पण एलिया सीदोनाच्या प्रदेशातील सारपथ येथील विधवेकडेच तो का गेला? आणि अलिशा संदेष्टाचे वेळी इस्रायलात पुष्कळ कुष्ठरोगी होते, तरी सुरीय नामान याच्याशिवाय कोणीही शुद्ध झाला नाही!" लोक पुन्हा चुळबुळ करू लागले. म्हणजे "नाझरेथ गाव असं चिन्ह पाहण्यास योग्य नाही, असं का याला म्हणायचं आहे?" लोक आपापसात कुजबूजू लागले. नंतर तो आडदांड माणूस रागाने म्हणाला, "आपण काय निमूटपणे तो जे काय म्हणेल ते ऐकून घेत आहोत? एलिया, अलिशा या थोर व्यक्तींची तो निंदा करतो आहे आणि तुम्ही निमूटपणे ऐकून घेता?"

"नाही नाही, अशी निंदा आम्ही ऐकणार नाही." त्याच्या भावांनी आरोळी ठोकली.

"अहो, हा नुसता जादूगार आहे जादूगार! इतर गावचे लोक फसले म्हणून आम्ही नाझरेथ गावाचे लोक फसू काय?"

"फटके मारा, फटके!"

"नाही, नाही, दगडमार करा. हीच शिक्षा त्याला योग्य आहे."

तो दांडगा माणूस व त्याचे दांडगे भाऊ आता मारामारी करण्यास तयार झाले. बिचारी मरिया अगदी घाबरून गेली होती. तिच्या तोंडचे तर पाणीच पळाले. मरिआमा तिला सावरीत होती.

येशूभोवती गर्दी जमू लागली. तो माणूस तर अगदी मारण्याच्याच बेतात होता. इतक्यात याजक ओरडून "मत्तय, मत्तय, त्याच्या अंगावर हात टाकू नकोस. तो राबी आहे. शाब्बाथ दिवशी असं अकर्म करू नकोस!" मतय व त्याच्या साथीदाराने येशूला ओढीतच मंदिराबाहेर नेले. मरियाही त्यांच्यामागून जाऊ लागली. अर्थातच काही लोक त्यांना आवरीत होतेच. पण ते कोणाचेच ऐकेनात. मागे आलेच आहे की, या लोकांना जर कोणी काही धर्माविरुद्ध वर्तन केले तर शिक्षा करण्याचा हक्क होता. देहदंडाची शिक्षा मात्र रोमी प्रांताधिकाऱ्याला मंजूर करावी लागे. पण तेथे तेथपर्यंत काम जातच नसे. मधल्यामध्ये लोक अपराध्याचा काटा काढीत. मत्तयाने या हक्काचा पुरा फायदा घेण्याचे ठरविले.

गावाजवळच एक डोंगर होता. त्याचा एक कडा तुटला होता व त्याच्या खाली खोल दरी होती. जवळपास झाडी होती. मतयबरोबर मात्र इतर लोक नव्हते. फक्त त्याचे भाऊ व त्याचे दोनचार पित्त्ये होते, "करा या बडखोराचा कडेकोट आणि पडू द्या त्याला त्या दरीत! धर्माची नालस्ती करतोय काय?" मत्तय म्हणत होता.

बिचारी मरिया हताश होऊन त्यांच्यामागून जात होती. आता हे नराधम आपल्या सुकुमार पुत्राचे करणार तरी काय? तिला पुढे जाववेना. ती तेथेच मटकन् खाली बसली ... आता कशाचाच आधार नाही. "परमेश्वरा, आता तूच वाचव त्याला. माझा सुकुमार टिनोकी आता त्या दरीत पडणार ना? परमेश्वरा, तू सर्व पाहतो आहेसच. माझ्या येशूला वाचीव! मीं तुला शरण आले आहे. तू नेमून दिलेले कार्य त्याला अजून पुरं करायचं आहे. वाचव, वाचव त्याला!" असे म्हणून ती परमेश्वराचा धावा करू लागली व एकदम बेशुद्ध झाली.

"आई, आई–एमी–घरी नाही का जायचं?" येशू तिला उठवीत म्हणाला. आईला काही समजेना. त्या दुष्टांनी कडेलोट केला होता ना माझ्या

वाळाचा? मग हा माझ्याजवळ कसा? ती कावरीबावरी होऊन येशूकडे पाहू लागली. येशू तिला पुन्हा म्हणतो, "ऊठ आई, माझा घात करणारे सर्व निघून गेलें आहेत. अंधार पडू लागला आहे. चल, मी तुला घरी पोचवितो."

ही दोघे मायलेकरे घरी आल्यावर लोकांची खात्री झाली की कोणती तरी दैविक शक्ती येशूच्या पाठीशी आहे.

घरी येऊन सर्व स्थिर झाल्यावर येशू आईला म्हणतो, "आई, आता मला माझ्या कार्याला सुरुवात केली पाहिजे. गावानं माझा स्वीकार केला नाही, हे एका अर्थाने बरेच झाले. मला आता माझा रस्ता मोकळा आहे. मी आता पुन्हा कधीही या गावाला येणार नाही. तुझी व माझी, आई ही शेवटचीच भेट. आई, मला तू पुन्हा पाहाशील पण कोणत्या परिस्थितीत? आई, तुला हे दुःख सहन होईल का?"

"येशू, असं कठोर तुला बोलवतं तरी कसं?" आई रडत म्हणाली, "मी आता कोणाच्या तोंडाकडे पाहू? मी कोणाच्या आधारानं जगू? मला तुझा वियोग कसा सहन होईल?"

"हा वियोग, हे दुःख तुला सहन करावेच लागेल आई!" येशू निश्चयाने म्हणाला. "तुझं व माझं भवितव्य इतकं निगडित झालं आहे की ते टाळता येणं शक्य नाही तुला आणि मला! दुःखाचा हा पेला तू एकदा पचवून टाकलास की तूही माझ्याप्रमाणे विजयी होशील. अमर होशील आणि सदैव माझ्याबरोबर राहशील. आई, इतकं आश्वासन पुरं नाही का? मला आता तुझा आशीर्वाद दे. माझ्या शेवटच्या घटकेला मी तुला पुन्हा निरोप पाठवीन. त्या वेळी तुझ्या पुत्राचं, तुझ्या टिनोकीचं बलिदान पाहण्यास यरूशलेमास ये. आई, एमी, जातो मी!" आणि येशू पुन्हा कधीही नाझरेथ गावी आला नाही.

येशू निघून गेल्यावर मरियेच्या जीवनातला जणू काय सर्वच रस आटून गेला होता. जगायचे म्हणून ती जगत होती. हाताला काहीतरी उद्योग पाहिजे म्हणून ती येशूकरिता अखंड विणीचा झगा विणू लागली. हाच झगा येशूने वधस्तंभी जाताना घातला होता.

येशू नाझरेथ गावातून गेला तो परत आलाच नाही. त्याचे महान् कार्य इतरत्र पसरले होते. असेच एके दिवशी मरिया येशूचा झगा विणीत बसली होती. सगळीकडे कसे शांत शांत होते. घरातून तिला बाहेरचा रस्त्याचा भाग दिसत होता. तिला एक माणूस आपल्या घराजवळ घुटमळताना दिसला. असेल कोणीतरी म्हणून तिने त्याच्याकडे दुर्लक्ष केले व पुन्हा आपल्या कामात ती दंग झाली. थोडया वेळाने पाहाते तो हा माणूस तेथेच घुटमळतो आहे. आत येण्याचा त्याचा विचार होता. पण आत येण्याचे धाडस त्याच्याने करवत नव्हते असे तिला दिसले. जर हा कोणी प्रवासी अगर अतिथी असेल तर त्याला घरात घेऊन त्याला पाणी दिले पाहिजे असे तिला वाटून तिच्यातील यहुदी गृहिणी जागृत झाली. तीं उठली व त्याच्याजवळ जाऊन त्याची विचारपूस केली व त्याला घरात घेऊन आली. घरात आल्यावर तो माणूस म्हणाला, "आई, मला क्षमा कर!" हा माणूस चांगला उंचापुरा व बराच दणकट होता. पण तो फारच घाबरला होता. आईला तर काहीच उमज पडेना. त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत मरिया म्हणते,

"बाळ, भुकेला का आहेस तू! थोडं थांब, मी आणतेच काही तरी खायला!"

"आई, मी भुकेला आहे खरा, पण मी तुझ्या प्रेमाचा व क्षमेचा भुकेला आहे. पश्चात्तापाची तहान लागली आहे मला आई!" तो माणुस म्हणाला.

"पण नीट बैस. शांत हो आणि सर्व काही मला सांग. येशूप्रमाणे मी तुझी आईच नाही का?"

"होय आई, थोर माता आहेस तू!" नंतर थोडा वेळ थांबून तो म्हणतो,

"आई, येशूनं सांगितलेल्या स्वर्गाच्या राज्यात मला जाता येईल का?"

"का नाही जाता येणार?" मरिया म्हणाली, "हे राज्य म्हणजे शांतीचं, समाधानाचं, बंधुप्रेमाचं व समतेचं राज्य आहे. या महान् तत्त्वावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या राज्यात जाता येतं बाळ!"

"पण या राज्याचा दरवाजा मला बंद आहे आई!"

"असं कसं होईल?"

" आई, मला तू ओळखलं नाहीस ! " तो रडत म्हणाला, " कसं सांगू तुला ? मी तो दुष्ट मत्तय ! मी माझ्या शारीरिक शक्तीचा दुरुपयोग केला ? येशूचा कडेलोट करणारा मीच तो नराधम ! "

" अस्सं, अस्सं ! " आई म्हणाली, " तरीही तू येशूच्या राज्यात येण्याची मनीषा धरतोस काय ? "

" होय, मी येशूचा कडेलोट करायला निघालो व त्याला खाली ढकललट्टी. पण कड्याच्या खालीच देवदूतांनी आपले पंख पसरून त्याला वरच्यावर झेललं. हे मी प्रत्यक्ष पाहिलं आणि माझे डोळे साफ उघडले. परमेश्वराची भीती मला वाटू लागली. मला माझ्या पापाची घृणा येऊ लागली आई ! आई, मी पापी आहे ग ! मला क्षमा कर आणि येशूच्या राज्याचा दरवाजा मला उघडून दे ! "

दोघांच्याही डोळ्यांतून आता अश्रुधारा वाहू लागल्या. मत्तय एवढा राक्षसासारखा, पण या थोर मातेपुढे तो आता लीन झाला होता. त्याचे समाधान करीत आई म्हणते, " स्वर्गाच्या राज्याचा दरवाजा नेहमीच उघडा असतो बाळ. तुझ्या पश्चात्तापानेच तो तुला उघडा करून दिला आहे. तुझी सारी पापं या अश्रूंनी पार धुऊन टाकली आहेत. आजपासून येशूप्रमाणं तूही माझा टिनोकी आहेस. "

नाझरेथ गावचे लोक येशूकडून चिन्ह मागत होते ते चिन्ह त्यांना आपोआपच मिळाले. पण येशू नाझरेथ गावात कोठे होता ? तो आपले कार्य करीत हिंडत होता.

* * *

# माझ्या मागून ये.

नाझरेथ गावाने येशूचा स्वीकार केला नाही. उलट त्याच्याशी दांडगाई करून त्याचा कडेलोट केला वगैरे ज्या घटना नाझरेथ गावी मागच्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे घडून आल्या त्या पाहून येशूचे मन विदीर्ण झाल्याशिवाय राहिले नसेल. ज्या गावात आपण लहानाचे मोठे झालो त्या गावाने आपले मशिया स्वरूप ओळखले नाही म्हणून येशूला वाईट वाटणे साहजिकच होते. नाझरेथ गावाला वाटे की मशिया आकस्मिक रीतीने यावा. आणि येशू तर गावच्या नजरेसमोर वाढत होता. तेव्हा त्याचे काय म्हणणे आहे हे सुद्धा लोकांनी ऐकले नाही. अर्थातच त्याचा कडेलोट झाला व त्याची सुटकाही झाली हे प्रत्यक्ष मत्तयने पाहिले होते व त्याचे परिवर्तनही झाले, पण गावाचे परिवर्तन होण्याला संधीच मिळाली नाही. कारण येशू ते गाव सोडून गेला होता.

रोमन साम्राज्याचा विस्तार चोहोकडे झाला होता. हे साम्राज्य इतके प्रबळ झाले होते की, सर्व लहान राष्ट्रे या साम्राज्याच्या अंकित झाली होती. पॅलेस्टाईन देशही रोमन साम्राज्याच्या सत्तेखाली आला होता.

परकीय राज्याचा कारभार चालविण्याकरिता आपल्याच लोकांनी पुढे यावे व त्यांनीच परक्या राज्याकरता जुलमाने लोकांकडून कर वसूल करून त्या जुलमी राजाचा खजिना भरावा हे शल्य नेहमी पॅलेस्टाईन देशातील लोकांना बोचत होते. त्यातल्या त्यात जकातीचा कर तर फारच जाचक होता. चार रस्ते जेथे मिळत त्या ठिकाणी हे जकातीचे नाके असून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक मालावर व जनावरावर कर सक्तीने वसूल करण्यात येई. रोमन साम्राज्याचे हेच मुख्य उत्पन्नाचे साधन असल्याने हे कराचे उत्पन्न परकीय राजा अगदी कसोशीने वसूल करीत असे. हा कर बहुतेक स्थानिक लोकांना हाताशी धरूनच रोमन बादशहा वसूल करीत असे.

कर वसूल करणारा कोणताही अधिकारी हा नेहमीच लोकांमध्ये अप्रिय असतो. कपर्णहूम हे शहर तर व्यापाराच्या दृष्टीने नेहमीच गजबजलेले असे. निरनिराळ्या देशांचे लोक व्यापाराच्या निमित्ताने व इतर कारणा-करिता या शहरात येत असल्यामुळे जकातीच्या कराचे उत्पन्न नेहमीच भरपूर येत असे. त्यामुळे रोमन साम्राज्याचे अधिकारी या उत्पन्नाकडे एखाद्या घारीच्या तीक्ष्ण नजरेने पाहात असत व या करातून कोणीही सुटू नये म्हणून दक्षता घेत असत.

लेवी नावाचा असाच एक स्थानिक अधिकारी हा कर कसोशीने वसूल करीत असे. कर वसूल करण्यात जितका तो प्रामाणिक व दक्ष असे तितकाच तो आपल्या लोकांमध्यें अप्रिय असे.

तसे पाहिले तर लेवीमध्ये व्यक्तिशः तिटकारा निर्माण करणारे काहीच दोष नव्हते. तो कोणाशी विशेष मिसळत नसे. मूळचाच अबोल स्वभाव असल्यामुळें आपले काम बरे की आपण बरे, कोणाचे देणें नाहीं की घेणें नाही. नेहमी जकातीच्या नाक्यावर बसून तो जाणाऱ्या येणाऱ्यावर आपली बारीक नजर ठेवी. या नजरेतून बाहेरून आत येणारा किंवा आतून बाहेर जाणारा एकही माणूस किंवा वस्तू सुटत नसे. परकीय राज्यसत्तेकरितां तो हा जाचक कर वसूल करीत आहे एवढी एकच गोष्ट त्याला आपल्या देश-बांधवांमध्ये अप्रिय होण्यास पुरेशी होती. तो जगाचा कोणी नव्हता व जग त्याचे कोणी नव्हते. रोमन बादशहाचा खजिना भरायचा एवढाच त्याचा एकमेव उद्योग होता. आपण कोणाला दुखवीत नाही, एका शब्दानेही आपण कोणाला नाराज करीत नाही, किंवा इतर अधिकाऱ्यांप्रमाणें आपण जुलमाने कर वसूल करीत नाही व इतके करूनही लोक आपला द्वेष करतात, तिर-स्कार करतात म्हणून त्याला वाईट वाटे.

सकाळची वेळ होती. बाजारचा दिवस असल्याने लोकांची बरीच ये-जा चालली होती. कोणी भाजीपाला, कोणी मेंढरे, कोणी कबुतरे तर कोणी कोंबड्या, कोणी काही तर कोणी काही बाजारात विक्रीकरता घेऊन जात होते. लेवी व त्याचे इतर नोकर अगदी कसोशीने सर्वांची तपासणी करून नियमाप्रमाणें कर वसूल करीत होते. कोंबडीवर व कोंबडीच्या अंड्यांवरही कर होताच व तो कर लेवी अगदीं डोळ्यांत तेलवात घालून वसूल करीत

 अनुक्रम ४००८१ ..... दि: ...
क्रमांक ८५८ ... नों: दि: २८।५९

होता. त्याच्यापुढे कराचा बराच पैसा पडला होता व तो खजिन्याच्या पेटीत पडत होता.

त्याच रस्त्याने येशू जात होता. नाक्याजवळ तो आला. नाक्यात बरीच गर्दी होती व येशूकरताही लोक जमले होते. त्या गर्दीतून येशूने लेवीकडे पाहिले मात्र ! नजर नजरेला भिडली. हृदय हृदयाशी बोलू लागले व येशू लेवीला म्हणाला, " माझ्या मागे ये ! "

काय असेल ते असो, पण " माझ्या मागे ये " ही येशूची आज्ञा ऐकताच लेवी ताडकन् उठला. त्याने हिशेबाचे सर्व साहित्य व पैसाअडका आपल्या हाताखालच्या नोकरांच्या हवाली करून एखाद्या आज्ञाधारक शिष्याप्रमाणें तो येशूच्यामागे खाली मान घालून जाऊ लागला.

लेवीचे हे कृत्य खरोखरच आश्चर्यकारक होते. येशूने अनेक रोगग्रस्तांना बरे केले होते हे खरे, परंतु एकाएकी एखाद्या माणसाचा जीवनक्रमच बदलून टाकायचा, हा एक आश्चर्याचा धक्काच होता. सोन्यारुप्याच्या नाण्यावरून ज्याने आपली नजर तिळभरही इकडे तिकडे होऊ दिली नाही, तोच लेवी, " माझ्यामागे ये " असे येशूने म्हणताच एखाद्या आज्ञाधारक शिष्याप्रमाणे मुकाट्यानें येशूच्या मागे जातो ही घटनाच इतकी आश्चर्यकारक होती, की कोणाचा विश्वासच त्यावर बसेना. मात्र येशूच्या पावलावर पाऊल टाकून चालल्याने आपला जीवनपथ बदलत आहे, हे लोकांना स्पष्ट दिसत होते. येशूने आज्ञा केली व लेवीने ती एका क्षणात पाळली, हे दृश्य लोकांना स्तंभित करीत होते.

येशूने आपला शिष्यसांप्रदाय जमविण्यास सुरवात केली होती. त्यात या लेवी शिष्याची भर पडली. लेवीने आपल्या मागच्या आयुष्याचा पट आता पार बदलून टाकला होता. मत्तय म्हणून त्याला जग ओळखणार होते. येशूचा तो खराखुरा शिष्य झाला होता. त्यानें आपले जुने नावही बदलून टाकले होते. नव्या आयुष्यक्रमाला तो आता सुरवात करणार होता. येशूचे तो चरित्र लिहिणार होता. मिळविलेले ज्ञान तो जगाला देणार होता. सोन्यारुप्याची नाणी गोळा करण्याऐवजी तो येशूचे अनुयायी गोळा करणार होता.

परंतु लेवीचे येशूच्या शिष्यसांप्रदायातील अनुयायित्व त्या वेळच्या सामाजिक परंपरेला धक्का देण्यास कारणीभूत झाले. " समाजानें टाकलेल्या,

लाथाडलेल्या व बहिष्कृत मानलेल्या लेवीसारख्या पापी लोकांबरोबर तुमच्या गुरुजीने खाणेपिणे करावे काय ? असा एकाने प्रश्न केला. हा प्रश्न येशूच्या कानांवर गेला तेव्हा येशूने उत्तर दिले,

"जे निरोगी आहेत, त्यांना वैद्याची जरुरी नसते. रोग्यांनाच वैद्याची जरूरी असते." पण येशू येथेंच थांबला नाही. आपल्या उत्तराचे स्पष्टीकरण करताना तो म्हणाला, "सज्जनांना नव्हे, तर पाप्यांना पश्चात्ताप करण्यास शिकविण्याकरता मी आलो आहे." शंकेखोरांचे शंकानिरसन झाले. लेवीला येशूने आपल्या सांप्रदायात घेतले म्हणजे त्याला एक प्रकारची सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नाही तरी तो त्याज्य व बहिष्कृत मानला गेला होताच. त्याला कोणी जवळ करीत नव्हता व त्याला सामाजिक प्रतिष्ठा नव्हतीच. लेवीसारख्या माणसाला येशूच्या मार्गदर्शनाची जरूरी होतीच व त्यानें येशूचें शिष्यत्व पत्करून त्याने आपल्या जीवनाला किती तरी भिन्न वळण दिलें. माझ्या मागे ये, म्हणजे मागचे सर्व सोडून, जो जुना मार्ग तू आक्रमीत होतास तो सोडून मी जातो त्या मार्गाने गेलास म्हणजे तुझा आपोआपच उद्धार होईल हेच येशूला सांगायचे होते.

येशूचे जीवनकार्यच ते होते. पतितांचा उद्धार ! जे जे त्याज्य म्हणून लोकांनी दूर लोटले होते ते ते सर्व येशूने आपल्या जवळ केलें. मागदला गांवाची एक नृत्यांगना पतिताच होती. एक निंद्य जीवनक्रम तिने स्वीकारला होता. श्रीमंत प्रियकर तो जवळ करीत असे. पैसा भरपूर मिळे. तिची राहणीही पहिल्या दर्जाची होती. तिला अत्तरांची व सुवासिक तेलाची फार आवड व त्याच्याकरता तिने फुलांची एक स्वतंत्र बागच तयार केली होती. येशू शिमोन पंडिताच्या घरीं भोजनाला गेला असताना लोकांनी पापी मानलेली ही स्त्री तेथें येते व तिने आणलेले बहुमोल तेल त्याला लावते व आपल्या अश्रूंनी त्याचे पाय धुते व आपल्या लांबसडक केसानें ते पवित्र पाय पुसते. सर्वच अघटित. शिमोनाला अर्थातच हा प्रसंग आवडला नाही. एका जारिणीने आपल्या घरांत यावे व आपल्या पाहुण्याचे पाय धुवावे व त्याला तेल लावावे हे या धर्ममार्तंडाला कसे सहन होईल ! त्याच्या मनातला विचार ओळखून येशू म्हणतो, "शिमोन, मी तुझ्या घरीं तुझा पाहुणा म्हणून आलो. पण मला आपल्या रिवाजाप्रमाणें पाय धुण्यास पाणी दिले नाहीस, पण हिने आपल्या अश्रूंनी

माझे पाय धुतले. तसेंच आपल्या रूढीप्रमाणें माझे पाहुणा म्हणून तूं चुंबन घेतले नाहींस, परंतु तिनें माझ्या पायांचें चुंबन घेतले. माझ्या डोक्याला तूं तेल लावलें नाहीस. येथेही तू रूढी प्रमाणे वागला नाहीस. परंतु तिने माझ्या पायांना तेल लावलं. तिचं पाप पुष्कळच आहे. पण तिच्या पापाची क्षमा होत आहे" नंतर त्या स्त्रीकडे पाहून येशू तिला म्हणतो, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला तारिले आहे. तुझ्या पापाची क्षमा झाली आहे. जा, सुखी हो." याही पतिता स्त्रीचा पुढचा आयुष्यक्रम पार बदलून गेला. "सज्जनांना नव्हे, तर पाप्यांना पश्चात्ताप करण्यास शिकविण्याकरता मी आलो आहे." येशूचे बोलणे किती सार्थ आहे हे यावरून दिसून येते.

अशीच एक पतिता येशूकडे येते. लोक तिला धोंडमार करण्यास आले आहेत. येशू म्हणतो, "तुमच्यामध्ये जो पापी नसेल त्याने पहिला दगड उचलावा!" सर्वजण हिरमुसले होऊन परत जातात. ती स्त्री एकटीच तेथें राहाते. तिच्या डोळ्यांतून सारखा अश्रुपात होत असतानाच तिची सर्व पापे धूऊन निघत होती. कारण हा अश्रुपात म्हणजे खरा पश्चात्ताप होय. तेव्हा लेव्हीला येशूने आपल्या शिष्यसंप्रदायात घेऊन त्याचा उद्धारच केला आहे व त्याचे हे करणे त्याच्या विचारसरणीला धरून होते.

परंतु लेव्हीला अगर या दोन पतित स्त्रियाना येशूने आपला जीवनक्रम बदलण्याची संधी दिली हे धर्ममार्तंडाना सहन झाले नाही व समाजाचा व धर्ममंडळाचा रोष झाला.

आता प्रश्न असा येतो की, लेव्हीसारखा व्यवहारदक्ष व ज्ञानी विद्वान् माणूस एकाएकी येशूच्या म्हणण्यावरून सर्वस्व सोडून त्याच्यामागे कसा जाईल? मागें आपण पाहिले आहे की, आंद्रियस व योव्हान, फिलीकस व नथनेल यांनाही येशूने आपल्याकडे असेच बोलाविले आहे. तेव्हा लेव्ही सुद्धा ताबडतोब येशूच्या मागे जाईल यांत नवल ते कोणते? परंतु एवढे मात्र लक्षात ठेवले पाहिजे की, येशू कोणालाही आपल्याकडे बोलावीत नसे, एक पंडित त्याला म्हणाला होता, "गुरुजी, तुम्ही जाल तिकडे मी येईन." त्यावर येशू म्हणाला, "पक्षी-पक्ष्यांना सुद्धा घरे असतात. मला डोकं ठेवण्याला सुद्धा जागा नाही." हे ऐकताच हा धर्ममार्तंड मागल्या पावली परत गेला. एका श्रीमंत माणसाचीही तीच कथा. "जा, तुझं सर्वस्व वीक,

आलेला पैसा गरिबांना वाट आणि नंतर माझ्यामागे ये " असे म्हणताच हे पुंजीपती तेथेच गारठले. तेव्हा निवड करताना येशू किती काळजीपूर्वक निवड करीत असे हे दिसून येते.

कित्येकांच्या मते लेव्ही हा येशूच्याच नात्यापैकी असावा व येशूची सर्व माहिती त्याला असावी. शिवाय त्याचे तीन भाऊ येशूच्या शिष्यसांप्रदायात होतेच. परंतु जकातदाराचा व्यवसाय स्वीकारून लेव्हीने फार मोठा सामाजिक गुन्हा केला आहे असे त्याना वाटत असल्यामुळें त्यांचे सहोदरांचे नाते नष्ट झाले असावे. शिवाय लेव्हीलाही आपल्या या निंद्य व्यवसायाचा तिटकारा येत असावा, कारण सर्वच त्याचा तिरस्कार करीत होते. म्हणून हा निंद्य जीवनक्रम एकदाच संपलेला बरा, असे वाटून लेव्ही तात्काल येशूच्या शिष्यपरंपरेत आला.

* * *

# वर मागून घे !

बाप्तिस्मा करणाऱ्या योव्हानाची व आपली भेट होऊन बराच कालावधी लोटला आहे. या महान पुरूषाची पुढील कथा ऐकण्यास वाचक उत्सुक झाले असतील. तेव्हा या योगी पुरुषाचे काय झाले ते आपण या प्रकरणात पाहू.

येशूचा उदय व योव्हानाचा अस्त या घटना एकाच वेळेला घडून येत होत्या. आपला शिष्यसांप्रदाय स्थापन केल्यावर येशू जवळ जवळ आठ महिने यहुदा प्रांतात आपलें मानवतेचे कार्य करीत फिरत होता. गरीब शेतकरी व कामयरी यांच्यातच त्याचे कार्य चालू होते. परंतू या कार्याला यावा तितका जोर येत नव्हता. कारण त्याचे शिष्य कोळी होते, व मासे धरण्याचा तो एक मोसम असल्याने आपल्या रोजच्या व्यवसायात हे शिष्य गुंतले होते. येशूच्या सर्वकार्याचे तीन कालखंड पडतात. पहिला कालखंड म्हणजे कार्याची पूर्वतयारी. दुसरा, कामाचा ताण आणि तिसरा म्हणजे संकटपरंपरा व मृत्यू. पहिला कालखंड म्हणजे येशूचा अत्यंत आनंदाचा व समाधानाचा कालखंड मानावा लागेल. पॅलेस्टाईनमध्ये याच वेळेला वसंतऋतू सुरू झाला होता. तो व याचे शिष्य आनंदी व उत्साही दिसत होते. पुढच्या भयंकर संकटाची सावली त्यांच्यावर अजून पडली नव्हती. त्यांच्याजवळ पैसा नव्हता पण लोक आतिथ्यशील व प्रेमळ असल्याने त्यांना रोजच्या गरजा कशा भागतील याची चिंता नव्हती. हवा अगदी उत्तम, निसर्गाची शोभा सगळीकडे चित्तहरण करीत होती. जेथे जावे तेथे येशूचे उत्तम रीतीने स्वागत होई व अशा रम्य वातावरणात तो आपले मानवतेचे कार्य करीत होता. कोणाचा आजार बरा कर, कोणाला दृष्टी दे. व गरीब विधवेचे शांतवन कर. कोणाचा महारोग बरा कर व त्याबरोबरच स्वर्गाच्या राजाची कल्पना लोकांना दे, असे त्याचे कार्य चालू होते.

ज्या दिवशी योव्हानाने येशूचा बाप्तिस्मा केला त्याच दिवशी योव्हानाच्या कार्याची सांगता होऊन येशूच्या कार्याला सुरुवात झाली. योव्हान आता

अस्ताला जात होता. येशूला दीक्षा देऊन त्याचे मशिया स्वरूप व्यक्त केले की योव्हानाचे कार्य संपणार होते व त्याची जबाबदारीही संपणार होती. येशू येण्याच्या आधी योव्हान हा उत्कर्षाच्या शिखरावर होता. लोक त्याच्या भोवती जमत होते, स्वर्गाच्या राज्याची कल्पना तो लोकांना देत होता व त्यांची मने तयार करीत होता. पण येशू येताच ते सर्व कार्य थांबले. जो येणार आहे तो मी नव्हे. तो येत आहे असे योव्हानाने जाहीर करताच तो विष्प्रभ झाला आणि आश्चर्य म्हणजे येशूचा उत्कर्ष होण्याच्या सुमारासच योव्हान हेरोद अंतिपास राजाच्या तुरुंगातही पडला आणि येशू गॅलली प्रांतात गेला व येथेच त्याचे यहुदा प्रांताचे कार्य संपून गॅलली प्रांतातील कार्याला सुरुवात झाली. येशू जर यहुदा प्रांतात जास्त वेळ राहिला असता तर तेथील धर्ममार्तंडांनी व धर्ममंडळांने त्याच्यावर आपले पाश टाकून येशूला नेस्तानबूत करून टाकण्याचा प्रयत्न केला असता व येशूला हे आताच करावयाला नको होते. पण योव्हान तुरुंगात का पडला ?

गॅलली प्रांतावर हेरोद अंतिपा राजा होता. तो जुलमी नव्हता पण मनाचा दुबळा होता. येशूने त्याला खोकड हे नांव दिले होते त्यालाही बापाप्रमाणे मोठ्या इमारती बांधाण्याचा षोक होता. आता महान हेरोद याचा एक मुलगा हेरोद फिलीफ हा एक सुखवस्तु गृहस्थ म्हणून रोममध्ये राहात असे. याने महान हेरोद राजाच्या नातीशी लग्न लावले होते. हीच ती हेरोदिया. ती मक्काबी घराण्यातील असून अत्यंत क्रूर, कारस्थानी व महत्त्वाकांक्षी स्त्री होती. तिचा व हेरोद अंतिपाचा प्रेमसंबंध जमला व तिने नवऱ्याचा विश्वासघात करून हेरोद अंतिपाबरोबर ती राहूं लागली. तिला सलोमी नावाची पहिल्या घरची मुलगी होती.

योव्हान उघडपणे हेरोद राजाला म्हणे की, "तुला तुझ्या भावाची बायको ठेवणे धर्मबाह्य आहे. योव्हानासारखा क्षुद्र माणूस आपल्याबद्दल असे कठोर बोलतो हे पाहून हेरोदिया भयंकर चिडली व योव्हानाचा प्राण घेण्यास ती टपली. तिच्या रोषापासून योव्हानाला वाचवावे म्हणून हेरोद अंतिपाने योव्हानाला कैदेत टाकलें. कारण हेरोदिया ही फार क्रूर व कार-स्थानी स्त्री होती. योव्हान नेहमी रानावनात राहणारा, तो तिच्या ताव-डीत तेव्हाच सापडला असता. म्हणून हेरोदाने योव्हानाला तुरुंगात ठेवून

एक प्रकारची सुरक्षितता त्याला प्राप्त करून दिली. अंतिपाचे योव्हानाबद्दल चांगले मत होते. तुरुंगात असूनही तो योव्हानाला आपल्याकडे नेहमी बोलावी व त्याचे तत्त्वज्ञान मन लावून ऐकत असे.

योव्हान हेरोद अंतिपाच्या अंधारकोठडीत खितपत पडला होता. योव्हानाचे नाव ऐकले की हेरोदिया चवताळून उठे. त्याला खाऊ की गिळू असे करी. तो जिवंत राहू नये असेच तिला वाटे. पण इकडे आपला नवरा हेरोद खुशाल त्या भिकारड्याबरोबर गप्पागोष्टी करीत बसतो, निरनिराळ्या विषयांवर त्याच्याबरोबर वादविवाद करतो, हे पाहून हेरोदियाच्या पायाची आग मस्तकाला जाई. योव्हान जर तुरुंगात नसता तर नाही ते कारस्थान करून तिने त्याचे हालहाल करून त्याचा प्राण घेतला असता. पण काय करणार? तिचा नाइलाज होता. हेरोदाचा राजवाडा आणि तुरुंग जवळच होता. संधी सापडली की हेरोद हळूच चोरपावलांनी योव्हानाच्या कोठडी-जवळ येई. लहान मुलाप्रमाणें त्याला खाऊ आणी, राजवाड्यातील पक्वान्ने पाठवी, पण योव्हानाला त्याचा काय उपयोग? नुसता रान मध त्याला पुरेसा होई. योव्हानाचे आत्मिक बळ किती श्रेष्ठ आहे हें हेरोद स्वतःच पाहात होता. त्याच्याशिवाय का "तुला तुझ्या भावाची बायको ठेवणे शोभत नाही" असे हा योगी पुरुष म्हणेल? त्याला मनाची खंबीरता हवी, तरच हें धाडस त्याला करता येईल हे हेरोदाला समजत होते व तो योव्हानाला वचकूनच होता. योव्हान जे जे कांही बोले, सांगे, त्याच्यावर हेरोद विचार करीत बसे. त्याच्या मनात खळबळ माजली होती हे खरे.

योव्हान जरी तुरुंगांत असला तरी त्याचे शिष्य मोकळेच होते. मधून मधून ते त्याला भेटतही. हेरोदाने अशी सवलत ठेवली होती. बाहेरच्या जगात काय चालले आहे हे ते योव्हानाला सांगत असत. येशू कसे चमत्कार करतो आहे हें सर्व त्याला सांगत असत. एका रोमी अधिकाऱ्याच्या चाकराला येशूने जवळ न जातां लांबूनच कसे बरे केले, येशू त्याच्या घरी जाण्यास तयार असतानाही हा रोमी अधिकारी "गुरुजी, आपण माझ्या घरी यावे इतकी माझी लायकी नाही. आपण नुसता शब्द उच्चारा आणि माझा नोकर बरा होईल." नाईन गावात गेला असताना एका विधवेच्या

मलाची प्रेतयात्रा कशी निघाली होती व ती येशूने रस्त्यातच थांबवून त्या मलाला कसे उठविले वगैरे गोष्टी योव्हानाचे शिष्य योव्हानाला सांगत.

योव्हान व हेरोद यांच्या जेव्हा गप्पा सुरू होत तेव्हा बोलता बोलता तो हेरोदाला येशूबद्दल माहिती सांगे. हेरोद व योव्हानाचें सूत चांगलेच जमले होते. बोलता बोलता हेरोद योव्हानाला म्हणे,

" योव्हान, किती दिवस तुरुंगात खितपत पडणार तू ? एकच शब्द बोल. माझा व हेरोदियाचा विवाह हा शास्त्रसंमत आहे, असं जाहीर कर. म्हणजे मी तुला ताबडतोब बंधमुक्त करतो. एवढेच नव्हे तर तुझें लग्नहि लावून देतो. " त्यावर योव्हान म्हणे,

" महाराज, काय या संन्याशाची थट्टा? आईबापाचा आधार तुला आणि मी संन्यासी झालो, रानावनांत राहू लागलो. आता मला पुन्हा कशाला या संसाराच्या जंजाळात ढकलता ? तुम्ही मला राजवाड्यातील पक्वान्ने पाठविता ! पण अशा अन्नाची मला सवय तरी आहे काय ? माझ्या जिभेने असले पदार्थ कधी चाखले नाहीत. तिला जर का या पदार्थांचा चटका लागला तर मी मोहात पडेन. "

योव्हान असे बोलू लागला की हेरोद अगदी रेशमासारखा मऊ पडे. महान हेरोदाचा हा मुलगा. योव्हानाची भेट होईपर्यंत जगात काही चांगले शुचिर्भूत, पवित्र व मंगल आहे असे हेरोदाला कधीच वाटले नाही. सर्वांकडे साशंक नजरेने तो पाही. पण योव्हानाचा संबंध येताच हेरोदाच्या मनात खळबळ उडाली खरी.

बोलता बोलता योव्हान हेरोदाला येशूचे मशिया स्वरूप विशद करून सांगे. नाईन गावातील विधवेच्या मुलाला त्याने तो मेला असतानाही कसे उठविले याचे रसभरित वर्णन योव्हान हेरोदाजवळ करी तेव्हां हेरोद विकट हास्य करीत म्हणे, " योव्हान, तुझं सर्व आयुष्य एकलकोंडेपणात गेले. तुला काय जगाचे डावपेच माहीत ? हा तुझा येशू एखादा जादूगार नसेल कशावरून ? या जादूगाराला तू काय देव म्हणतोस ? अरे वेड्या, शास्त्री-पंडितांनी जर हे ऐकले तर सर्व धर्ममंडळ तुझ्या जिवावर उठेल. आहेस कुठे ? या तुझ्या भ्रामक कल्पना आहेत. त्या तू ताबडतोब सोडून दिल्या पाहिजेस. या तुझ्या येशूची एकदा भेट घेतली पाहिजे म्हणजे त्याचे सर्वच ढोंग बाहेर पडेल. "

नंतर थोडा वेळ थांबून व योव्हानाकडे प्रेमानें पाहात हेरोद म्हणे, "बरं पण योव्हान, माझं ऐक, माझा विवाह शास्त्रसंमत आहे असं जाहीर कर आणि बंधमुक्त हो." त्यावर योव्हान तितक्याच कोमल स्वरात म्हणे, "राजन, माझ्या मुखातून शब्द गेला तो गेला आहे. आपला शब्द वरचेवर बदलायला मी काहीं राजा किंवा राजकारणी पुरुष नाही! सत्य केव्हाही दडविता येत नाही. पूर्ण खात्री झाल्यानंतरच आपला विवाह शास्त्रसंमत नाहीं. भावाची बायको ठेवणे हे धर्मबाह्य वर्तन आहे, हे मी आपल्या तोंडावर नाही का सांगितलं? मग मी आता माझा शब्द कसा बदलू? लोक मला काय म्हणतील? जग मला काय म्हणेल? मी जर माझा शब्द बदलला व तुमचा विवाह शास्त्रसंमत आहे असं म्हणालो व तुरुंगातून सुटलो तर लोक मला स्वार्थाकरता मत बदलणारा ढोंगी संन्यासी असं नाही का बोलणार? आणि लोक तुम्हांलासुद्धां जुलुमानं संन्याशाची कबुली घेणारा राजा, असं नाही का बोलणार? नाही, राजन, मी त्रिवार सांगतो की तुम्ही हे भयंकर पाप केलं आहे. तुमचा विवाह शास्त्रसंमत नाही!"

"योव्हान, योव्हाम, विचार कर, आपल्याच पायावर दगड पाडून घेऊ नकोस." हेरोद त्याला समजाविण्याच्या दृष्टीने म्हणाला, "हेरोदिया राणी किती दुष्ट, किती क्रूर आहे हे तुला माहीत नाही. ती तुझ्यावर सूड घेतल्या शिवाय राहणार नाही. फुकटचा मृत्यूच्या खाईत का पडतोस?"

"नाही महाराज, असत्य वाणी ही जीभ उच्चारणार नाही. मग माझं काहीही होवो!" योव्हान निश्चयाने म्हणाला, "तू आणि तुझं नशीब!" असे म्हणून हेरोद रागारागाने तेथून निघून गेला.

हेरोदिया राणी योव्हानावर सूड घेण्याकरिता नुसती टपली होती. ती अत्यंत क्रूर होती. दयामाया तिला माहीत नव्हती. हेरोदाला तिने आपला दास करून ठेवले होते, व योव्हानावर सूड घेण्याची ती वाट पाहू लागली.

वाढदिवस साजरा करण्याची प्रथा यहुदी लोकांत नव्हती. पण हेरोद राजा रोमचा मांडलिक राजा. तो वरचेवर रोमला जाई. रोमची छान-छोकीची व खर्चिक रहाणी त्याने उचलली होती. आपला राजवाडा त्याने रोमच्या धर्तीवर सजविला होता. नेहमी मेजवान्या देई. नाचरंग, गाणे-

बजावणे करी. रोमच्या पद्धतीप्रमाणे खेळ, नाटक, तमाशे करी. आणि त्यांतच त्याचा वाढदिवस आला व हा वाढदिवस राजाच्या इतमामाला साजेल अशाच थाटाने साजरा करावा असे हेरोद व हेरोदिया यांनी ठरविले. मग काय विचारता? राजाचा शब्द का कोणी खाली पडू देणार? रोमहून उंची मद्य व फळफळावळ आणली गेली. नटनर्तकांना आमंत्रणे देण्यात आली.

मागे सांगितले आहेच की, हेरोदिया राणीला पहिल्या घरची सलोमी नावाची एक मुलगी होती. तिचे सर्व शिक्षण रोममध्येच झाले होते व त्या लोकांच्या पद्धतीप्रमाणे तिने रोममध्ये असताना नृत्याचेही शिक्षण घेतले होते. सडसडीत बांधा, विशाल डोळे, लांबसडक केस व अत्यंत तेजस्वी असा गौरवर्ण यामुळे ही युवती मोठी सुंदर दिसे.

रोमच्या नर्तकांचा नाच चालला असताना या दोघीही मायलेकी उठल्या व आतल्या दालनात गेल्या. हेरोदियाने सलोमीच्या अंगावरचा मेजवानीचा पोषाक बदलला व नृत्याचा पोषाक तिच्या अंगावर चढविला व नाचण्याची तिची तयारी करून दिली.

मेजवानीनंतर शेवटचा गोड घास म्हणून काहीतरी नवीन पाहुण्यांना दाखविण्याची प्रथा रोममध्ये होती. एखाद्या जादूगाराचा खेळ, नावाजलेल्या नर्तकीचा नाच, कुस्ती वगैरे खेळ होऊन मेजवानी संपे. पण एखाद्या राजकन्येस पाहुण्यांच्या समोर येऊन नृत्य करण्याची प्रथा खुद्द रोममध्येही नव्हती व हेरोदाची सुद्धां तशी अपेक्षा नव्हती. पण हेरोदिया राणी कसली वस्ताद! कसली कारस्थानी! योहानावर सूड घेण्याची ही एक नामी संधी आहे असे तिला वाटून ती सलोमीला नृत्याला साज चढवून दिवाणखान्यात घेऊन आली. हेरोदला आश्चर्याचा मोठा धक्का बसला पण हेरोदियानें त्याला भरपूर मद्य पाजल्यानें तो बेहोष झालाच होता. जमलेल्या पाहुण्यांचे डोके सलोमीच्या आकर्षक देहावर स्थिरावले होते. वाद्यवृंदांनी आपली वाद्ये सरसावली व सलोमीचा नाच सुरू झाला.

नाच अगदी अप्रतिम होता. सलोमीसारखी सौंदर्यवान युवती नृत्य करणार! मग करमणुकीला काय कमतरता! सर्वजण अगदी तिच्याकडे डोळे फाडफाडून पाहूं लागले. नाच अगदी रंगात आला होता. आणि

सलोमी नाचतही होती. अप्रतिम रीतीने मद्याचे पेले पाहुण्यांमधून फिरतच होते. सर्वजण अगदी बेहोष झाले होते. नाचून नाचून सलोमी अगदी थकली. कपाळावरचा घाम पुसून ती हेरोदच्या जवळ जाऊन बसली.

"सलोमी, तुझा हा अप्रतिम नाच पाहून मी अगदी खूष झालो आहे. काय पाहिजे ते माग. ते तुला तावडतोब देण्यात येईल. वर मागून घे सलोमी! तुझा वर मी पूर्ण करीन." सलोमी आपल्या आईच्या कानाशी लागली व हेरोदाकडे पुन्हा येऊन म्हणते,

"महाराज, मी काय मागेन ते तावडतोब द्याल ना? मागू मी वर?"

"हो हो, माग वर. मग अर्धे राज्य मागितलंस तरी ते तुला देईन." हेरोद म्हणाला.

"महाराज, मला वचन पाहिजे." सलोमी म्हणाली.

हेरोद मद्याने आता अगदीच बेहोष झाला होता. तो म्हणतो, "वचन? हे घे वचन. तू जे मागशील ते मी तुला तावडतोब देईन."

"मग ऐका तर माझा वर!" सलोमी उभी राहून म्हणाली, "मला आताच्या आता बाप्तिस्मा करणाऱ्या योव्हानाचे शीर चांदीच्या तबकात घालून येथल्या येथे या पाहुण्यांच्या समोर दिले पाहिजे!"

"काय म्हणालीस, योव्हानाचे शीर? सलोमी, हे काय मागितलंस? त्याच्याऐवजी दुसरा वर माग!"

"नाही, नाही, माझं हेच मागणं आहे!" सलोमी निश्चयाने म्हणाली. "सर्वांसमक्ष तुम्ही वचन दिले आहे, की मी जे मागेन ते तावडतोब मला देण्यात येईल म्हणून. योव्हानाचे शीर मला येथल्या येथे तबकात आणून द्या."

हेरोद फार दुःखी झाला. मद्याचा प्रभाव त्याच्यावर असूनही त्याच्या डोळ्यांसमोर योव्हानाची ती ओबडधोबड मूर्ती त्याला दिसू लागली. त्याला वाईट वाटत होते. पण सर्वांसमक्ष त्याने सलोमीला वचन दिले होते. ते त्याला पुरे करणेच भाग होते. त्याशिवाय गत्यंतरच नव्हते. त्याने योव्हानाचे शीर आणण्यास सैनिकांना हुकूम दिला,

रोमच्या पाहुण्यांनाही मोठे आश्चर्य वाटले. रोमच्या लोकांचा हा रोजचा खेळ होता. कोणाच्या अंगावर सिंह सोड, वाघ सोड, तरवारीचे खेळ कर,

हा त्याचा नित्याचा कार्यक्रम होता. परंतु एखाद्या निरपराधी माणसाला केवळ एका क्षुल्लक नृत्यांगनेच्या सांगण्यावरून सर्वांसमक्ष त्या माणसाचे शीर तोडून आणायचे हा प्रकार त्यांनाही नवा होता. सर्व पाहुणे हळहळत होते. इतक्यात हेरोदाच्या एक दोन आडदांड सैनिकांनी योव्हानाचे शीर केसाने धरून दिवाणखान्यात आणून चांदीच्या तबकात घालून हेरोदापुढे ठेवले. क्रूर रोमी लोकानासुद्धा हा खाटीकपणा आवडला नाही. एक एक जण बाहेर जाऊ लागला. शीर हेरोदापुढे पडले होते. डोळे निस्तेज होते. पण त्याच्यातून अग्निवर्षाव होत आहे असे हेरोदाला वाटले आणि योव्हानाचे ओठ "तुझा विवाह शास्त्रसंमत नाही. तू हे धर्मबाह्य वर्तन केले आहेस" असे बोलल्याचा भास त्याला झाला. त्याने तावडतोब एक रुमाल त्या शिरावर टाकून तबक सलोमीला देऊन जड अंतःकरणाने तोही तेथून निघून गेला.

योव्हान व येशू हे दोघेही सत्पुरुष दोनचार महिन्यांच्या अंतरानेच जन्माला आले व त्यांचा अंतही लवकरच झाला. दोघांचेही नशिबी हलाखीचे मरण होते. भवितव्य त्यांना हासत होते.

हेरोदिया राणी इतकी दुष्ट व क्रूर होती की तिने योव्हानाचा देह किल्ल्याच्या बाहेर फेकून दिला. योव्हानाच्या शिष्यांनी नंतर त्या देहावर शेवटचे संस्कार केले. शिराचे मात्र तिने काय केले हे समजले नाही.

योव्हानाचा अमानुष मृत्यू मात्र हेरोदाला सतावीत होता. येशू जेव्हा चमत्कार करू लागला तेव्हा "हा योव्हानच पुन्हा जिवंत होऊन आला आहे" असे तो म्हणू लागला. कालांतराने हेरोदाला रोमच्या सम्राटाने हद्दपार केले व त्याच्यावर राज्यद्रोहाचा आरोप ठेवला. तो व हेरोदिया अज्ञातवासात गेली व तेथेच त्याचा अंत झाला. अशी दंतकथा आहे की, सलोमीचा अंतही असाच हालात झाला.

* * *

## प्रकरण सोळावे

# दृष्टिलाभ

येशूचे प्रचारकार्य व रोग्यांना बरे करणे चालूच होते. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली होती. त्याच्या वाणीत प्रभावी सामर्थ्य होते व माधुरी होती. आणि म्हणूनच हजारो लोक त्याचे प्रवचन ऐकण्यास जमत. हजारो माणसे त्याच्या भोवती जमत. येशूबद्दल बोलताना अता एक विचारप्रवाह समाजात प्रचलित होता की, जे लोक त्याच्याभोवती गर्दी करीत त्यांनीच शेवटी त्याचा यरूशेलमात धिक्कार केला नाही काय ? त्यांनीच त्याला वधस्तंभी दिले ना ? त्यांनीच रोमन प्रांताधिकारी (गव्हर्नर) मिलात याच्यावर वजन आणून येशूला शिक्षा देण्यास भाग पाडले ना ? हे सर्व जरी खरे असले तरी त्याचा धिक्कार करणारे, त्याला धरून देणारे हे लोक नव्हते. जे लोक त्याच्या भोवती जमत, स्वत:चे रोग बरे करून घेत, स्वत;ची आध्यात्मिक उन्नती करून घेत ते लोक या गर्दीपैकी नव्हते. सदोकी परूशी, धर्ममार्तंड व त्यांचे पित्त्ये या लोकांनीच ही येशूविरुद्ध कारवाई केली.

तेव्हा येशूच्या भोवती जे लोक नेहमी गर्दी करून असत त्यांनी येशूला धरून न देता सदोकी व परूशी आणि धर्ममार्तंडांचा जो एक वर्ग होता त्यांनीच येशूचा नाश घडवून आणला आहे.

गॅलली प्रांतात येशू असतानाच त्याच्याभोवती गर्दी जमत असे असे नसून तो यरूशलेम येथे गेल्यावरही ही गर्दी त्याच्याभोवती जमत होतीच. यरूशलेमचे व येशूचे सूत केव्हाच जमले नाही. त्याचा घात यरूशलेमनेच केला. पण या घातात सर्वसामान्य यहुदी जनता सहभागी नव्हती. जो धर्ममार्तंडांचा वर्ग होता त्यानेच हा घात घडवून आणला. शेवटच्या ओलांडण्याच्या सणाचे दिवशी जेव्हा हा धर्ममार्तंडांचा वर्ग येशूला जाळ्यात अडकविण्यास टपून बसला तेव्हा त्यांच्यापैकी काही बोलू लागले, "आताच नको. या सणात नको. लोक काय म्हणतील आपण त्याला आताच धरले तर ? " अशी भीती या वर्गाला वाटत होती. येशूला रात्रीचे वेळी निजानीज झाल्यानंतर धरण्यात आले.

येशूचा दुःखद अंत झाल्यावर दुःखाचा हुंदका फोडला तो याच गर्दीने. गर्दीचे येशूवर प्रेम होते व येशूचे गर्दीवर प्रेम होते. गर्दीचे दुःख पाहून त्याचे मन कळवळे. रानावनात पाच हजार, सात हजार, चार हजार लोकांना अन्न कसे मिळणार? पण नाही, येशूला ते सहन होत नाही. तो आपल्या शिष्यांना म्हणतो, "नाही, त्याच्या भाकरीची व्यवस्था करा." गर्दीत तर दीन चार भाकरी होत्या. पण त्याच घेऊन येशूने गर्दीला वाटल्या व गर्दी पोटभर जेवली. येशू व ही गर्दी यांचे हृदय एक झाले होते. गर्दीचे दुःख जसे येशूला पाहावत नसे, तसेच येशूला आपल्याकरता किती त्रास होतो याचीही जाणीव गर्दीला होती. या गर्दीत त्याचा नुसता स्पर्श झाला तरी पुरे, म्हणजे माझा रोग बरा होईल असे वाटे कित्येकांना! अनेक वर्षे रक्तस्रावाने पीडलेली एक स्त्री या गर्दीत येते. पण आपल्याला किती भयंकर रोग आहे हे तिला इतक्या लोकांसमक्ष कसे सांगता येणार? घरंदाज घराण्यातील होती ती! घराबाहेर पडुन इतक्या गर्दीत मिसळण्याची सवय नव्हती तिला. येशूवर तर पूर्ण विश्वास. पण त्याला जवळ जाऊन सांगायचे कसे? मोठाच प्रश्न होता तिच्यापुढे. गर्दीत तर ती सामील झाली, पण शब्द उच्चारण्याचे धैर्य कोठे आहे? तिनं विचार केला, याच्या झग्याला नुसता स्पर्श केला तरी माझे काम होईल, माझा रोग बरा होईल. आणि तिने हळूच येशूच्या झग्याला स्पर्श केला; व काय आश्चर्य! त्याच क्षणी तिचा रक्तस्राव थांबला. पण येशूला हे कळल्याशिवाय कसे राहील? कोणताही रोग बरा केला की येशूची शक्ती कमी होई. त्या स्त्रीने येशूच्या झग्याला स्पर्श करताच येशूची शक्ती कमी झाली व त्याची जाणीव त्याला झाली. तो शिष्यांना म्हणतो, "कोणी मला स्पर्श केला?" त्यावर एक शिष्य म्हणाला, "गुरुजी, हे काय विचारता?" हजारो लोक गर्दी करून आपल्या बरोबर खेटाखेटी करून चालले आहेत. तेव्हा कोणी स्पर्श केला हें कसं समजणार?" पण येशूचे समाधान झाले नाहीं. तो म्हणतो, "नाही, पण माझी शक्ती कमी झाल्याचे मला स्पष्ट दिसते." ती स्त्री घाबरली. आपण जर मुग्धता स्वीकारली तर गुरुजींचा रोष आपल्यावर होऊन आपला रोग पुन्हा उद्भवेल या भीतीने ती थरथर कापत त्याच्यापुढे उभी राहिली. पण येशू तिच्यावर रागावला म्हणता? मुळीच नाहीं. जास्त विचार-पूस न करता तो तिला म्हणतो, "मुली, तुझ्या विश्वासाने तुझा रोग बरा झाला आहे. सुखानं घरीं जा." असे होते या गर्दीचे व येशूचे नाते!

१०४६९

येशूला गर्दी आवडे. परमेश्वराला सामान्य माणसे आवडतात असे म्हणतात. ही गर्दी सामान्य माणसांची होती. सर्वच काही आजारी, दुःखी, रोगग्रस्त होते असे नव्हे. पुष्कळ लोक धडधाकट होते. परंतु तेही त्याच्याबरोबर वाळवंट तुडवीत जातच होते ना? का? तर त्यांचे येशूवर प्रेम होते! आता ही गर्दी कशी तयार झाली होती पाहा. ही गर्दी सामान्य माणसांची होती. धर्ममार्तंडांनी ज्या लोकांना त्याज्य मानिले होते त्यांची होती. येशूने या सामान्य माणसांना जवळ घेऊन त्यांच्या डोक्यावरून हात फिरविला, त्यांच्या सुखःदुःखांशी समरस झाला तेव्हाच या दोघांमध्ये जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले व ही गर्दी त्याच्याकडे आकर्षिली गेली.

येशू या गर्दीचे नुसते रोगच बरे करीत नव्हता, तर त्यांना चांगल्या चांगल्या गोष्टी सांगत होता. धर्मशास्त्रांतील अनिष्ट रूढींविरुद्ध शस्त्र उचलून प्रत्येक अनिष्ट रूढी तंतोतंत पाळणें किती अव्यवहारी आहे हे येशू या गर्दीला शिकवीत असे. शाब्बाथ दिवशी काही कामधंदा करू नका? ठीक आहे, माणसाला विश्रांती ही हवीच. त्याशिवाय जोमाने काम कसे होणार? पण एखाद्याचे मेंढरू जर शाब्बाथ दिवशी खड्ड्यात पडले तर त्याला काय तसेच मरू द्यायचे? धडपड करून जर त्याला वर काढले तर शाब्बाथ दिवसाला हरताळ कसा फासला जाईल? एखादा माणूस जर असाध्य रोगाने पीडलेला आहे, तर त्याला शाब्बाथ दिवशी बरे करण्यात धर्माज्ञेचे उल्लंघन कोठे होते, हे येशू या गर्दीला समजावून सांगे व हीच त्याची शिकवण धर्माधिकाऱ्यांना आवडत नसे.

अशीच एक सभा संपवून येशू आपल्या शिष्यांसह गावातील अरुंद रस्त्याने जात होता. त्याला एक जन्मांध दिसला. त्या माणसाची स्थिती अगदीच शोचनीय व करुणास्पद होती. येशूने थोडीशी माती आपल्या थुंकीने ओली केली व त्या चिखलाचा लहानसा लेप त्या माणसाच्या डोळ्यांवर थापून म्हटले, " जा, शिलोह तळ्यात जाऊन डोळे धू!"

तो माणूस ताबडतोब काठी टेकीत धडपडत त्या तळ्याकडे गेला. डोळे धुतल्यावर लगेच डोळस होऊन तो परत आला. त्याला आता सर्व काही दिसत होते. तो आता पूर्वीसारखा आंधळा भिकारी राहिला नव्हता. त्याला सर्व वस्तू दिसत होत्या. लोकांनी त्याला पाहून आश्चर्य व्यक्त केले.

" रस्त्याच्या कडेला बसून भीक मागणारा हाच तो आंधळा भिकारी नव्हे काय ? मग याला डोळस कोणी केले ? " लोक आपसांत विचारू लागले. लोकांचे कुजबुजणे हा आंधळा पण आता डोळस झालेला माणूस ऐकत होता. " होय, तोच मी ! " तो माणूस सांगत होता. " मग तुला कोणी बरं केलं ? " लोकांनी प्रश्न केला. " येशू नावाच्या मनुष्याने मला डोळे दिले. ज्या दिवशी येशूने हे सत्कार्य केले तो दिवस पवित्र शाब्बाथ दिवस होता. " त्या दिवशी काही करायचे नाही ना ? होय, तशी धर्माज्ञाच आहे. मग येशूने धर्माज्ञेचे उल्लंघन केले म्हणायचे ! लोक आपसात बोलत होते. छे, याला धर्ममंडळाकडे नेलंच पाहिजे. धर्ममंडळच करील याची चौकशी. जो माणूस शाब्बाथ दिवशी खुशाल रोग्यांना बरे करतो, आंधळ्यांना दृष्टी देतो, पांगळ्यांना पाय देतो, महारोग्यांना बरे करतो, त्या माणसाची धर्मावर श्रद्धा कशी राहणार ? महत्पाप, महत्पाप ! येशूने हे महान कार्य केले खरे, पण ते शाब्बाथ दिवशी ! त्याला काय दुसरे वार नव्हते ? म्हणूनच तो देवाचा माणूस नाही. काही परूशी म्हणू लागले. पण ... पण, पापी माणसा-कडून असं महान कार्थ होईल का ? दुसरे काही म्हणू लागले, पापी माणसाला असा चमत्कार करता येणारच नाही असे काही लोक बोलू लागले. शेवटी या आंधळया माणसाला काहींनी विचारले,

" कायरे, ज्यानं तुला दृष्टी दिली त्याच्याबद्दल तुझं काय म्हणणं आहे ? "

" माझं काय म्हणणं असणार ?" तो मनुष्य न घाबरता म्हणाला, " तो संदेष्टा आहे इतकं खरं. " पण एवढयावर या शंकेखोरांचे समाधान होईना. हा चमत्कार म्हणजे एक जादूगिरी आहे एवढेच या लोकांना सिद्ध करायचे होते. प्रथम हे लोक या माणसाला दृष्टिलाभ झाला हे मानण्यास कबूल होईनात. या माणसाची दृष्टीच गेली नव्हती, असेही ते लोक आपल्या अधिकारवाणीनें म्हणू लागले. हा माणूस खोटा आहे व त्याला काही तरी प्रक्षोभकारक कारवाई करून सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावयाचे आहे. म्हणून त्याने ही थाप ठोकली की, आपण आंधळे होतो व येशूने आपल्याला डोळस केले. सर्व काही खोटे ! निव्वळ जादूगिरी आहे ही. धर्माधिकारी आपले म्हणणे सोडीनात.

" अरे, वेडयासारखं काय करतोस ? तू कोठे संपूर्ण आंधळा होतास ?

थोडं थोडं दिसतच होतं तुला. होय ना ? मग का आडरानात शिरतोस ? सरळ रस्त्यावर ये ना ! हा येशू मोठा पापी माणूस आहे, त्यानं तुला डोळे दिले असं का म्हणतोस ? "

" ते काही मला माहीत नाही. " तो माणूस मोठ्या धिटाईनें म्हणाला, " मला एवढं मात्र माहीत आहे की, मला येशूनेच दृष्टी दिली. आता तो पापी आहे की नाही, हे तुमचे तुम्ही पाहा. धर्ममंडळाची विचारसरणी ही अशी होती. येशूचा उत्कर्ष व गर्दीने त्याच्यामागे जाणे हे मंडळाला आवडत नव्हते. एकदा का लोक त्याच्या अधीन झाले की आपल्या धर्मातल्या अनिष्ट रूढी बंद पडून लोकांकडून धर्माच्या नावाखाली जी लूट करता येते ती करता येणार नाही व आपण उपाशी मरू, ही धास्ती त्यांना होतीच. सत्कार्य करताना सुद्धा येशू शक्य तितके करून रूढीला व धर्माज्ञेला विरोध करीत नसे. त्याने एका महारोग्याला बरे केले ते उदाहरण पाहा.

येशूनें त्याचा सुप्रसिद्ध डोंगरावरचा उपदेश नुकताच दिला होता. त्याची विश्रांतीची वेळ आहे हे पाहून त्याच्या भोवतालची गर्दी आता पांगू लागली. येशूही आता हळूहळू डोंगर उतरू लागला. मागदला, बेथ सैदा ही गावे ओलांडली की तो कपर्णहुम गावात जाणार होता.

तो व त्याचे शिष्य रस्ता कापीत होते. इतक्यात त्यांना एक अत्यंत हृदयद्रावक दृश्य दिसले. एक महारोगी त्यांच्या समोरून येत होता. कसला हा महारोग ! अत्यंत किळसवाणा ! सर्व शरीरावर फोड, जखमा व त्यांतून रक्त वाहात आहे. माणूस त्या वेदनांनी अगदी हताशपणे हृदयद्रावक किंकाळ्या फोडीत आहे, व आपणाला बरे करावे म्हणून येशूची विनवणी करीत आहे. येशूने व त्याच्या शिष्यांनी अनेक महारोगी पाहिले असतील. पण हा महारोग फार भीषण, फार भयंकर ! त्या माणसाची घाण कितीतरी लांबवर येत होती. तेव्हा काय व आज काय, महारोग हा भयंकरच मानण्यात येतो. यहुदी धर्मात तर महारोग्यांना बहिष्कृत करून एका बाजूला टाकले होते. एवढेच नव्हे तर त्यांना कोणी शिवू नये, त्याच्या जवळ जाऊ नये, त्यांनी गावाच्या बाहेर वसाहत करून राहावे अशी धर्माज्ञा होती. यदाकदाचित महारोग बरा झालाच तर याजकाने

तो रोगी बरा झाला असे म्हटल्याशिवाय तो माणूस समाजात मिसळत नसे. "बेनहर" या चित्रपटात महारोग्यांची त्या वेळची स्थिती विशद केली आहे. तो महारोगी येशूच्या जवळ येऊन म्हणाला, "महाराज, तुमची इच्छा असल्यास मला आपण बरे करू शकाल." या रोग्याचा येशूवर व त्याच्या शक्तीवर पूर्ण विश्वास होता. महारोगातही साध्य आणि असाध्य असे दोन प्रकार होते. या माणसाचा रोग अगदी असाध्य होता व जर कोणी आपल्याला बरे केले तर तो येशूच होय असा त्याचा विश्वास असल्याने मोठ्या आशेने तो त्याच्याकडे आला होता. महारोग म्हणजे पापाचे मूळ असे हे लोक मानीत. तो माणूस अगदी कळवळून येशूला विनंती करतो त्याअर्थी त्याला त्याच्या पापाची जाणीव झालीच असली पाहिजे असे येशूने ओळखले. पापाची जाणीव म्हणजेच पश्चात्ताप आणि पश्चात्ताप म्हणजेच पापाची क्षमा. हे सर्व ओळखून येशू त्याला म्हणतो, "मुला, माझी इच्छा आहे तू बरं व्हावं अशी. जा, बरा हो!" आणि असे म्हणताना येशूने आपला हात त्या माणसाच्या शरीरावर फिरवून त्याला स्पर्श केला. तो ताबडतोब स्वच्छ व निरोगी झाला.

आता येथे येशूने उल्लंघन केले असे धर्ममार्तंड म्हणतील. कारण महारोग्यांना स्पर्श करणे हे पाप आहे असे मानण्यात आले होते. पण धर्माज्ञेचा मूळ हेतू काय, तर दया. आणि दया केव्हाही श्रेष्ठच हेच येशूने दाखविले. येशूने त्या रोग्यावरून हात फिरविला म्हणून येशूचा हात भ्रष्ट झाला नाही, तर तो हात त्याच्यावरून फिरविला गेला. येशूचा स्पर्श झाला म्हणून तो महारोगी बरा झाला.

आणि इतका सारासार व बारीक विचार करण्याला येशूला वेळ होता कोठे? ते दृश्यच फार भयंकर होते व कोणताही कठोर हृदयाचा माणूस दयेने विरघळल्याशिवाय राहिला नसता. पण त्यातल्या त्यात तो त्या रोग्याला म्हणतो, "जा, याजकांना दाखव व तू बरा झाला आहेस असे त्यांच्याकडून वदवून घे. आणि मोशेने जे काही अर्पण सांगितले असेल ते अर्पण देऊन टाक." म्हणजे येशूने धर्माज्ञेचे येथे उल्लंघन केले नाही.

* * *

# मुलगी झोपली आहे !

मागे सांगण्यात आले आहेच की, यहुदी लोकांचे एक धर्ममंडळ होते. या धर्ममंडळाला सन्हेद्रीन सभा हे नाव होते. या शब्दाचे मूळ ग्रीक भाषेत सापडते. यहुदी लोकांत एक दंतकथा प्रचलित होती की, मोश्याने ही सभा स्थापन केली. ही सभा न्यायदानाचे कार्य करी. सामान्य लोक या सभेत बसत नसत. तर अमीरउमराव, मंदिराचे पदाधिकारी व इतर श्रेष्ठ लोक या सभेवर असत. हिचे हिब्रू नाव बेथ दीन असे आहे. अरमथाईकर योसेफ ज्याने आपली कबर येशूचा देह ठेवण्यास दिली तो या सभेचा एक सभासद होता. यरूशलेमाच्या नाशानंतर म्हणजे इ. स. ७० मध्ये ही समा रद्द करण्यात आली.

येशूला साधारण व सामान्य जनतेबद्दल प्रेम व आस्था होती व त्यामुळे परोश्यांचे व त्याचे सारखे खटके उडत व त्याच्या लोकप्रियतेमुळे यरूशलेमची शांतता भंग पावेल म्हणून मुख्य याजक व त्याचे हस्तक सदोकी येशूच्या विरुद्ध उठले व परोशी सुद्धा त्याचेविरुद्ध होते.

सन्हेद्रीन सभेचा एक सभासद कपर्णहुम येथे राहात होता. राहायला मोठा वाडा, मागे पुढे प्रशस्त बाग, वाड्यात दासदासी व नोकरचाकर असत. त्यामुळे वाडा कसा अगदी गजबजलेला दिसे. पैसा आणि सत्ता असल्यावर माणसाला एक महत्त्व प्राप्त होते, तसे या गृहस्थालाही झाले होते. त्याचे नाव जायरूस. धर्मसभेवर किंवा या सन्हेद्रीन सभेवर त्याचे वजन असे. कोणत्याही महत्त्वाच्या बाबतीत ही सभा जायरूसचे मत घेई. सभेच्या बैठकासुद्धा पुष्कळ वेळेला याच्याच वाड्यात बसत. त्याला एकच लहान मुलगी होती. मुलगी मोठी गोड, चुणचुणीत व लाघवी. सदा तिची बडबड चाले. पऱ्यांच्या आणि राजांच्या गोष्टी ऐकण्याला हिला फार आवडे व अशा गोष्टी सांगण्याकरतां वाड्यातील नोकरमाणसांना ती अगदी सतावून सोडी. जायरूस, त्याची बायको व ही चुणचुणीत मुलगी व त्याची नोकरमाणसे मोठ्या आनंदात व सुखात या वाड्यात राहात.

जायरूस हा मूळचाच गरीब स्वभावाचा. चाकर-माणसालासुद्धा तो एका शब्दाने दुखवीत नसे. त्यांना काय हवे नको ते स्वतः पाही. कोणी आजारी पडल्यास त्याचे औषधपाणी करी, त्यांची देखभाल करी. यामुळे चाकर-माणसांचेही त्यांच्यावर प्रेम होते. त्याची बायकोसुद्धा इतक्या श्रीमंती घरात असून अगदी साध्वी होती. घराणे श्रीमंत व श्रीमंत पाहुण्यांची सारखी ये-जा. पण ही साध्वी सर्वांची अगदी चांगली बडदास्त ठेवी. कोणाला कमी पडू देत नसे.

येशूची कीर्ती आता चोहोकडे पसरली होती. जायरूसची चाकरमाणसे पुष्कळ वेळेस येशूच्या गर्दीत सामील होत. त्याने केलेले चमत्कार स्वतःच्या डोळ्यांनी पाहात व चाललेल्या गोष्टी स्वतःच्या कानांनी ऐकत व वाड्यात येऊन त्याच्यावर चर्चा करीत. अर्थातच या गोष्टी जायरूस व त्याच्या बायकोच्या कानांवर ओघाओघाने जातच. ज्या धर्ममंडळाचा जायरूस सभासद होता ते धर्ममंडळ येशूच्या विरुद्ध होते. पण जायरूस हा काही दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारा नव्हता. ज्याअर्थी इतके लोक येशूकडे जातात व तो रोग बरे करतो, त्याअर्थी त्याच्यात काहीतरी तथ्य असावे असे त्याला वाटत असे. त्याच्या वाड्यात जी चर्चा चाले ती सर्वस्वी काही येशूच्याच बाजूची होती असे नव्हे. कोणी कोणी त्याच्या विरुद्धही बोलत. कोणी म्हणे, येशू मशिया आहे, तर कोणी म्हणे हे नुसते थोतांड आहे. पण जायरूसने येशूबद्दल कधीही दुर्भाषण केले नाही की त्याची हेटाळणी केली नाही. येशूचे कर्मभूमिस्थान कपर्णहूमच असल्याने तो जे जे काय करतो ते ते सर्व या जायरूसच्या कानांवर येई व तोही ते सर्व मोठ्या आस्थेने ऐकत असे. केव्हा केव्हा त्याला वाटे येशूने आपल्या घरी यावं, आपला पाहुणचार घ्यावा, आपल्याशी वादविवाद करावा. तो आपल्या बायकोचेही मत घेई. "काय हो, समजा, येशू आपल्या घरी आला तर तुम्ही त्याचा पाहुणचार कराल?"

"का नाही करणार?" पत्नी निश्चयानें म्हणे, "मी यहुदी गृहिणी आहे म्हटलं! शत्रू जरी घरात आला तरी त्याचं स्वागत यहुदी गृहिणीला करावंच लागत!"

"हो, ते सर्व खरं, पण सदोकी परूशी, सर्व याजक वर्ग व धर्ममंडळ त्याच्या विरुद्ध आहे ना? तरीही तुम्ही त्याचं स्वागत करणार? आणि आपल्या वाड्यात?"

"त्यात काय आहे? तुमचा वाद असेल तर तो मंदिरात, न्यायसभेत! आपला वाडा त्याच्यापासून अलिप्त नाही काय? पण जाऊ द्या. येशू कसला येतो आपल्याकडे आणि आपण कसलं करतो स्वागत त्याचं!" पत्नी म्हणे.

पण येशूचे स्वागत करण्याची व त्याचा पाहुणचार करण्याची संधी लवकरच या दोघां प्रेमळ पतिपत्नींना मिळाली.

येशूची चंद्रकलेप्रमाणे वाढणारी कीर्ती धर्ममंडळाला सहन होईना. काही तरी करून येशूला शिक्षा केल्याशिवाय, येशूची शिकवण, त्याचे चमत्कार व त्याच्याभोवती जमणारी गर्दी कमी होणार नाही असे आता धर्ममंडळाला वाटू लागले. यरूशलेमहून मंडळाने मुद्दाम चौकशीमंडळ कर्पणहूमला पाठविले. चौकशी जायरूसच्या वाड्यातच होणार होती व त्या सभेपुढें उभे राहण्याचे पाचारणही येशूला करण्यात आले.

पण आजचा दिवस काही शुभ नव्हता. सकाळपासून पावसाची रिपरिप चालूच होती. थंडीही बरीच पडली होती. पावसामुळे घराबाहेर तोंड काढण्याची सोय नव्हतीं. मंडळाचे दुपारचे जेवण जायरूसच्या वाड्यातच होणार असल्याने नोकर-चाकरांची एकच धांदल उडाली होती. छोटी शमरोन, तर उगीचच इकडं तिकडे वाड्यात मिरवीत होती. तिला हा वाडासुद्धा अपुरा वाटू लागला. तिला काय, पाहुणे येणार एवढ्याशीच तिचें काम. आपल्या बापाला ती म्हणालीसुद्धा —

"पण आब्बा, हे पाहुणे कोण? मला गोष्टी सांगतील ना ते?"

"छे हो वेडाबाई, गोष्टी कसे सांगतील ते तुम्हांला? ते आपल्याकडे जेवायला येणार आहेत. आणि बरं का वेडाबाई, तुम्ही इकडं जेवणघरात यायचं नाही. आईबरोबरच बसा तुम्ही जेवायला." असे म्हणून जायरूस तिला गप्प करी, पण शमरोन कसली वस्ताद! मधून मधून ती जेवणघरात डोकावून जाईच.

पावसाची रिपरिप काही थांबेना. पाहुणे तर एक एक येऊ लागले. जायरूस एकटाच विचार करीत बसला. वास्तविक पाहता धर्ममंडळाने या येशूच्या प्रकरणात हात घालावयास नको होता असेच त्याचे मत होते.

येशू काही शांतताभंग करीत नाही किंवा राजद्रोहही करीत नाही. तो जर लोकांना चार सदुपदेशाच्या गोष्टी सांगतो, तर सांगेना बापडा! मंडळाने काय म्हणून त्याला अडथळा करावा? तो जर रोग बरे करतो म्हणतो, तर त्यात मंदिराचे काय नुकसान होणार आहे? उगीच पराचा कावळा करीत आहे हे मंडळ, असेच जायरूसला वाटत होते.

जेवण यथासांग पार पडले. सर्वजण आता दिवाणखान्यात जमून येशूच्या चौकशीची तयारी करू लागले. पाऊस जरी थांबला असला तरी विजेचा कडकडाट चालू होताच. वाराही सुटला होता व सबंध वाडा उडून जातो की काय असे प्रत्येकाला वाटू लागले. इतक्यात " महाराज, नाझरेथकडे येशू आले आहेत! " असे येशूचा शिष्य पेत्रस म्हणताच जायरूसने आत येणाऱ्या व्यक्तीकडे पाहिले. अस्सं, हा येशू तर मग! उगीच नाही हजारों लोक याच्यामागे तहानभूक विसरून जातात! येशूचे व्यक्तिमत्त्व अत्यंत श्रेष्ठ आहे असेच जायरूसला वाटले व तो येशूला म्हणाला, "गुरुजी, आपलं व आपल्याबरोबर आलेल्या लोकांचं स्वागत असो. या आत. पुन्हा एकदा विजेचा कडकडाट झाला. ज्या खोलीत ते उभे होते ती खोली सुरक्षित नाही असे पाहून की काय, जायरूस म्हणतो, " गुरुजी, आपण त्या दुसऱ्या खोलीत जाऊ. तेथे वीज दिसणार नाही आपल्याला."

" जायरूस, भीती वाटण्याचे कारण नाही. मी आहे ना तुमच्याबरोबर?" येशू म्हणाला.

येशूबरोबर लोकांची गर्दी होतीच. हा वाडा कोणाचा आहे व पाऊस जरी पडत असला तरी आपल्याला तेथे आश्रय कसा मिळणार असे वाटून की काय, लोक पावसातच बागेच्या बाहेर उभे होते. त्यांच्याकडे जायरूसचे सहज लक्ष.गेले व तो येशूला म्हणतो, "अरेरे! गुरुजी, तुमचे लोक भिजतात ना पावसात! त्यांना येऊ द्या आत." असे म्हणून लोकांना आत घेण्याचा हुकूम त्याने चाकरमाणसांना केला.

आता ज्या खोलीत येशू व जायरूस उभे होते त्याच्या छपराची उभारणी निराळ्याच पद्धतीने केली होती. उन्हाळ्याच्या दिवसांत वाड्यातील मंडळी या खोलीत बसत व उन्हाचा कल पाहून वरचे छप्पर सरकून घेत. छपराची उघडझाप करता येई.

पण एकाएकी छपरावर काय ही गडबड? कोण सरकवतो आहे छप्पर? अरे, ही काय थंड हवा खायची वेळ आहे? छप्पर का सरकावता? पाणी येईल ना आत. मंडळाचे लोकही येऊन पाहू लागले. दारावर ही गर्दी. काय हे आश्चर्य! ज्या ठिकाणी येशू उभा होता त्याच्या अगदी समोरं वरून कोणीतरी एक बाज खाली सोडली. बाजेवर एक पक्षघाती माणूस पडला होता. त्याला उठता येत नव्हते की हालचाल करता येत नव्हती. मूर्तिमंत कारुण्य त्याच्या डोळ्यांत दिसत होते. सर्व लोक आळीपाळीने येशूकडे व त्या बाजेवरच्या माणताकडे पाहात होते. येशूने त्या माणसाकडे पाहिले व धीरगंभीर स्वरात म्हणाला, "मुला, तुझ्या पापाची क्षमा झाली आहे!"

झाले! येरूशलेमाच्या मंडळींचे पित्त खवळले. हा देवद्रोह आहे. परमेश्वराचा द्रोह आहे. पापाची क्षमा करणारा हा कोण? याला काय अधिकार? पण या माणसाला पापाची क्षमा नको आहे. त्याला बरे व्हावयाचे आहे. त्याला बरं कर. हे लोक बोलू लागले. त्यांच्या मनातील खळबळ ओळखून येशू या मंडळाच्या लोकांना उद्देशून म्हणाला,

"तुम्ही माझ्या पापाची क्षमा करण्याच्या अधिकाराची शंका मनात बाळगली आहे. पण मी तुम्हांला असे विचारतो की, "तुझ्या पापाची क्षमा झाली आहे असं म्हणणं सोपं की या माणसाला ऊठ आणि चालू लाग असं म्हणणं सोपं? मला हा अधिकार मिळाला आहे म्हणूनच मी असं म्हणतो." नंतर येशू त्या दुःखणाइताकडे वळून म्हणतो, "मुला, ऊठ आणि चालू लाग!"

मुलाने उठण्याचा प्रयत्न केला. हळूहळू तो उठून बसला. बाजेखाली त्यानें हळूच आपले दोन्ही पाय सोडून दिले. बाजेच्या लाकडाला धरून तो उभा राहिला. येशूने त्याला धरून उभे केले. तो नंतर चालू लागला.

"थोतांड आहे, ढोंग आहे. हा मुलगा पक्षघाती नव्हताच मुळी! मंडळाचे लोक बोलू लागले. दारात गर्दी होतीच. तो मुलगा हळूहळू दाराच्या बाहेर गेला. त्याच्या बरोबर असलेल्या माणसांनी त्याची खाट उचलून बाहेर नेली. पाऊस आता थांबला होता. धर्ममंडळाचे लोक नुसते दातओठ खात होते. आता पुढची चौकशी करण्याचे कारणच नव्हते. प्रत्यक्ष सर्व काही त्यांनी पाहिले होते व ऐकले होते. गर्दी आता कमी होऊ लागली. मंडळाचे लोकही आपआपल्या ठिकाणी गेले. जायरूसकडे पाहात

येशू म्हणाला, "बरं आहे, मीही जातो आता." जायरूस त्याला म्हणाला,

"गुरुजी, आपण फार थकलेले दिसता. आजची रात्र माझ्याकडेच राहा. सकाळी मी तुमच्या जाण्याची व्यवस्था करतो."

"जायरूस, मला व माझ्या लोकांना पावसात आश्रय देऊन धर्ममंडळात सुद्धा माणसकी आहे हे तुम्ही सिद्ध केले आहे. तुझ्या घरावर परमेश्वराचा आशीर्वाद सतत नांदो!" येशू त्याला म्हणाला.

त्या रात्री येशू जायरूसच्या घरी राहणार असल्याने त्याचे शिष्य गप्प आपल्या ठिकाणी गेले. जायरूसच्या वाड्यात एक प्रकारचा आनंद व एक प्रकारचे समाधान नांदू लागले. जायरूस व त्याची पत्नी दोघेही आतिथ्यशील. येशूने आपला पाहुणचार घ्यावा ही दोघांची मनीषा. तेव्हा येशू आपल्या घरी आल्याचे पाहून त्यांना आनंद वाटणे अगदी साहजिकच होते. आणि चाकरमाणसे काय, येशूच्या गर्दीत नेहमी मिसळणारी. त्याचे अमृताचे बोल नेहमी ऐकणारी. येशू आपल्या सान्निध्यात आला आहे याचाच त्यांना अभिमान वाटला. आपण काही ना काही तरी येशूचे काम करावे, त्याच्या उपयोगी पडावे, त्याच्या जवळ यावे असेच सर्वांना वाटे.

आणि छोटी शमरोन? यरूशलेमचे पाहुणे गेले आहेत व वाडा शांत झाला आहे हे पाहून आता ती मोकळ्या मनाने वाड्यात फिरू लागली. या दालनातून त्या दालनात तिच्या फेऱ्या चालूच होत्या. त्या दालनात येशू बसला आहे हे पाहून न भिता ती बापाजवळ आली. तिच्या डोक्यावरून हात फिरवीत जायरूस येशूला म्हणतो,

"ही आमची शमरोन बरं का गुरुजी? मोठी गोष्टीवेल्हाळ. राजे-राण्यांच्या व पऱ्यांच्या गोष्टी ऐकण्याची भारी हौस तिला!" नंतर तो शमरोनला म्हणतो, "बरं का वेडाबाई, गुरुजींना त्रास द्यायचा नाही." जा पाहू आता खेळायला."

"राहू द्या तिला!" येशू म्हणाला, "स्वर्गाचे राज्य अशांचेच आहे. माणूस बालकाप्रमाणें निष्पाप व स्वच्छ मनाचा झाल्याशिवाय त्याला स्वर्गाच्या राज्यात जाता येणार नाही." नंतर येशू शमरोनला म्हणाला, "ये बाळ

माझ्याकडे. गोष्टी पाहिजेत ना तुला? माझ्याजवळ पुष्कळ छान छान गोष्टी आहेत." असे म्हणून त्या मुलीला आपल्या मांडीवर घेऊन तो कुरवाळू लागला.

आता आपले आसन स्थिर झाले हे पाहून शमरोनही धीट झाली. आवीच ती धिटुकली. माणसाकडे नेहमी आकर्षिली जाणारी. येशूच्या मांडीवर बसून व त्याच्या छातीवर आपले डोके ठेवून ती म्हणते,

"गुरुजी, तुमच्या राज्यात पऱ्या आहेत का हो? राजाराणी आहेत? आमच्या बागेसारखी सुंदर सुंदर फुले आहेत?"

"होय, सर्व काही आहे. मी सांगतोच आता तुला एक गोष्ट."

शमरोनने येशूला आता सर्वस्वी कबज्यात घेतले आहे हे पाहून जायरस तेथून दुसऱ्या कामाला निघून गेला. शमरोन व येशूच एकटे राहिले. येशूने तिला स्वर्गाच्या राजाच्या गोष्टी सांगण्यास सुरुवात केली. मधून मधून जायरूस व त्याची बायकोही गोष्टी ऐकण्यास बसत. स्वर्गाचे राज्य म्हणजे आनंदाचे, सुखासमाधानाचे, सहोदरांचे राज्य! त्या राज्यात मृत्यू नाही, दुःख नाही, वर्णभेद नाही, दारिद्र्य नाही, गुलाम मालक हा भेद भाव नाही. सर्व परमेश्वराची लेकरे. सर्व सुखी आणि आनंदी. गोष्ट ऐकता ऐकताच शमरोन येशूच्या मांडीवर झोपी गेली.

येशूचे मानवतेचे कार्य सुरू होतेच. गर्दी सारखी वाढतच होती. तो त्यांना दाखले देऊन अनेक चांगल्या गोष्टी शिकवी. सन्मार्गाने जाऊन सदाचरणाने आपले आयुष्य व्यतीत करावे असे तो त्यांना शिकवी. नुसते डोळे झाकून धर्मविधी करणे, शाब्बाथ दिवशीसुद्धा सत्कार्य न करणे, या सर्व गोष्टी परमेश्वराला अप्रिय आहेत असे तो त्यांना शिकवी.

असेच एके दिवशी कपर्णहुम गावात तो त्यांना उपदेश करीत असताना एक चमत्कार झाला. अथांग लोक जमले होते व गर्दीच्या मानसशास्त्राप्रमाणे प्रत्येकाला पुढे पुढे जायला हवे होते. त्या वेळी समाजात रांगेने उभे राहण्याची शिस्त नव्हती. येशूच्या भोवती गर्दी जमे ती सामान्य माणसांची! प्रत्येकाला वाटे आपण येशूला अगदी खेटून उभे राहावे! म्हणून प्रत्येक जण रेटारेटी करी. स्त्रियांचे व मुलांचे तर फार हाल होत. आजसुद्धा गर्दीचें हे मानसशास्त्र बदलले नाही.

या गर्दीपुढे येशू चमत्कार करीत होता. प्रवचन करीत होता. एकाएकी गर्दीत खळवळ माजली. "वाट सोडा, वाट सोडा, जायरूस येत आहेत." असे कोणी तरी ओरडले. जायरूस अत्यंत खिन्न मुद्रेने गर्दीतून वाट काढीत येशूकडे येत होता. जायरूस हा काही सामान्य माणूस नव्हे. तो एक श्रीमंत व मोठा पदाधिकारी. त्याला गर्दीने वाट करून दिली हे योग्य तेच झाले. पण जायरूस आज असा खिन्न का ? त्याच्या दुःखाचे काय बरे कारण असावे ? येशूजवळ येऊन तो म्हणतो, "गुरुजी, माझ्यावर कृपा करा, आपली छोटी शमरोन मृत्युपंथाला लागली आहे !"

"काय, शमरोन ? दोनचार दिवसांपूर्वी तर ती बरी होती ना ?" येशूने पृच्छा केली.

"होय गुरुजी ! पण आपण येता ना तिला पाहायला ?" जायरूस दुःखाने म्हणाला.

"आता कशाला गुरुजींना त्रास देता ? छोटी शमरोन देवाघरी गेली !" कोणी तरी बोलले.

"जायरूस, घाबरू नका. विश्वास धरा. मी येतो तुमच्याबरोबर." असे म्हणून जायरूसच्या पाठीवर हात ठेवून तो त्याच्याबरोबर चालू लागला.

शमरोन येशू गेल्यानंतर चांगली धडधाकट होती. फुलपाखरे तर तिचे जीवन ! पण तिला एकाएकी ताप येऊ लागला. लगेच वाड्यात धावपळ सुरू झाली. वैद्यांना बोलावण्यात आले. सर्व उपचार झाले, पण ताप काही हटेना. तिच्या आईबापांच्या तोंडचे तर पाणीच पळाले. तिच्या बाललीलांची व बोबड्या बोलांची आठवण झाली की त्यांच्या काळजाचे पाणी पाणी होई. चाकरमाणसांची तर ती जीव की प्राण ! त्यांच्याही डोळ्याचे पाणी खळेना. सर्व मानवी उपाय हरले. कोणाचा इलाज चालेना आणि ही गोड बालिका बोलता बोलता देवाघरी निघून गेली. वाड्यावर प्रेतकळा पसरली !

येशू वाड्यात आला. सगळीकडे रडारड चालू होतीच. या लोकांच्या रिवाजाप्रमाणे भाड्याने शोक करणारे लोक आणले होते. ते छाती पिटून रडत होते. येशू आल्यावर तो या सर्वांना म्हणाला, "तुम्ही सर्वजण बाहेर

जा पाहू ! हा गोंधळ शांत करा. आपली शमरोन मरण पावली नाही. ती शांत झोपली आहे. तिला त्रास देऊ नका."

काहीं लोक त्याची हेटाळणी करू लागले, "मुलगी देवाघरी गेलेली आणि हा म्हणतो झोपली आहे ! पुन्हा उठणार आहे का ती झोपेतून ?"

सर्व गर्दी गेल्यावर येशू जेथे शमरोनला ठेवले होते त्या दालनात गेला. त्याच्याबरोबर तिथे आईबाप होतेच. शमरोन अगदी शांतपणाने झोपली होती. तिचे ओठ आता बोलू लागतील, असे पाहणाऱ्याला वाटावे. येशू तिच्याजवळ गेला. तिच्या डोक्यावरून त्याने हात फिरविला आणि मृदु स्वरात म्हणाला, "शमरोन! किती वेळ झोपायचं बाळ ? उठायचं नाही का ? मी बघ तुला एक चांगली गोष्ट सांगणार आहे. ऊठ, ऊठ!" आणि काय आश्चर्य ! माणूस झोपेतून उठल्यावर ज्या क्रिया करतो त्या शमरोनने केल्या. आपले डोळे उघडून तिने आईबापांकडे व येशूकडे पाहिले व म्हणाली,

"कोण, गुरुजी ? मला घ्या ना आपल्या मांडीवर! मी तुमच्या स्वर्गाच्या राज्यात गेले होते. चंद्रप्रकाश सगळीकडे पसरला होता. गुरुजी, कित्ती कित्ती चांगले आहे तुमचे स्वर्गाचे राज्य !"

आईबापांना किती आनंद झाला असेल याचे वर्णन आम्ही कसे करावे ? वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच आम्ही ते काम सोपवितों. येशूने अगदी फुलाप्रमाणे उचलून आपल्या मांडीवर तिला घेतली. तिच्या डोक्यावरून हात फिरविला व तिला कुरवाळले व आईकडे पाहात म्हणाला, "पोर फार थकली आहे. तिला काही तरी खायला द्या."

मरण पावलेली शमरोन पुन्हा या लोकांत आली हे पाहून सर्व वाड्यात आनंदीआनंद झाला. शमरोनही आतां चांगली ताजीतवानी झाली. जो तो तिला कुरवाळू लागला. दुःखी मातापितरांना व नोकरचाकरांना येशूने पुन्हा आनंदी केले.

* * *

# आई, ऊठ !

बेथ सैदा गावात हन्ना नावाची एक विधवा स्त्री होती. तिला आबिगेल नावाची एक मुलगी होती. या आबिगेलचे व येशूचा शिष्य शिमोन किंवा पेत्रस (पीटर) यांचे लग्न झाले होते. हा पीटर पुढे ख्रिस्ती धर्मात सेंट पीटर किंवा संत पेत्रस म्हणून प्रसिद्धीस आला. शिमोन व त्याचा भाऊ आंदियस हे दोघेही कोळी – मासे धरणारे, पण त्यांचा व येशूचा संबंध येताच ते मासे धरण्याऐवजी माणसे धरू लागले. शिमोन व आंदियस दोघेही कपर्णहुमचे. त्यांचे कपर्णहुम येथे वडिलोपार्जित घरही होते. परंतु शिमोनचे लग्न हन्नाची मुलगी आबिगेल हिच्याशी झाल्यावर तो हन्नाच्याच घरी राहून तिच्या घरादाराची व्यवस्था पाही. आंदियस मात्र कपर्णहुम येथेच आपल्या घरी राहू लागला. हन्नाला तिचे स्वतःचे घरदार व थोडी शेतीभाती होती. यहुदी लोकांच्या घराच्या मागेपुढे द्राक्षे व अंजिरांची बाग असे व त्यांना फुलांचे वेड असल्याने ते फुलेही तयार करीत. फुलांचे सुवासिक तेल काढून ते अंगाला लावीत व दिवाबत्तीकरिता त्यांना तेल गाळावे लागे. त्याप्रमाणे हन्नाच्याही घरी होते. द्राक्षे, अंजिरे, फुले, कोंबड्या वगैरे तिचा सरंजाम बराच असे. आबिगेलचे लग्न झाल्यावर व शिमोनसारखा कर्तबगार जावई मिळाल्यावर व तोही तिच्याच घरी राहूं लागल्यापासून हन्नाचा बराचसा बोजा कमी झाला. तिची सर्व व्यवस्था शिमोन किंवा पेत्रसच पाहूं लागला. हन्ना वृद्ध होती पण फार काटक. स्वैपाक-पाणी, घराची सर्व व्यवस्था पाहून ती द्राक्षे-अंजिरांकडे व फुलांकडे लक्ष देई.

पेत्रस हा फार दांडगा, उंचापुरा, सशक्त व दिसायला फार उग्र दिसे. त्यातच त्याच्या त्या मोठ्या दाढीची भर पडे व त्याच्याकडे पाहणाऱ्याला हा कोणीतरी एक राक्षसच आहे असे वाटे. इतका तो भव्य होता. त्याच्या उलट त्याची बायको आबिगेल होती. अगदी नाजूक गुलाबकळी ! लांब सडक बांधा, नितळ गौर वर्ण व लांबसडक बोटे. यामुळें ही आबिगेल फार

आकर्षक दिसे. पाहणारे म्हणत हन्नानें काय हा विजोड जोडा शोधून काढला! पेत्रस जितका उग्र तितकीच त्याची बायको सौम्य. हा जितका आडदांड व द्रांडगा तितकीच ती नाजूक. पीटर बोलायला लागला की अगदी कर्कश असा आवाज होई आणि आबिगेलचे बोलणे कसे मंजूळ, जणू काय दाविदाची वीणाच वाजत आहे असा भास निर्माण व्हावा. असो.

परंतु पेत्रसला वैवाहिक सौख्य काही फार दिवस लाभले नाही. तशी आबिगेलची प्रकृती दणगटच. यहुजी स्त्रियांना घरातली व बाहेरची सर्व कामे स्वत: करावी लागत असल्याने त्यांना नाजूक राहून भागतच नसे. पण काहीतरी निमित्त होऊन आबिगेल आजारी पडली ती पुन्हा उठलीच नाही. पेत्रसने पुष्कळ उपचार केले पण काही उपयोग झाला नाही. शेवटी ही आबिगेल पेत्रसला विधुरावस्थेत सोडून देवाघरी गेली.

हन्नाला आता पेत्रसशिवाय दुसरा आसरा नव्हता. पेत्रस मासे धरी व विकी. त्याच्या दोन-तीन मच्छीमारी बोटी होत्या. इतर कोळीही त्याच्या बोटी भाड्याने घेत. एकंदरीत पेत्रसला प्राप्ती चांगली होई व आपला भार तो हन्नावर पडू देत नसे.

आबिगेल वारल्यानंतर पेत्रस आता मोकळा झाला. संसाराचा पाश असा त्याला राहिला नव्हता. याच वेळेला आंदियसने त्याला येशूची माहिती दिली व पेत्रस येशूकडे आकर्षिला गेला. परंतु तो एकदम त्याचा शिष्य झाला नाही. गॅलली प्रांतात येशूने आपले मानवतेचे कार्य सुरू करताच हा निव्वळ कुतूहल म्हणून गर्दीत सामील होई. रेटारेटी, चेंगरा चेंगरी झाली की हा पुढे होऊन ती गर्दी आपल्या शारीरिक शक्तीच्या जोरावर मागे हटवी व लोकांना शिस्तीत उभे राहावयास लावी. बायका, मुले व वृद्ध माणसांना व आजारी माणसांना तो येशूचे दर्शन प्रथम घडवी. "हं, अशी ही रेटारेटी चालणार नाही. तुम्हांला गुरुजींचे दर्शन हवे ना, रोग बरे करून घ्यावयाचे आहेत ना? मग ही रेटारेटी का करता? गुरुजी सर्वांनाच भेटतील. सर्वांचे आजार बरे करतील. तूच का पुढं येतोस? मागे हाट ना! तुझ्यामागं ती स्त्री आजारी मुलाला घेऊन उभी आहे दिसत नाही? नुसता बघ्या ना तू? मग जरा मागं होऊन

पाहा की." असें पेत्रस अधिकारवाणीने बोलू लागला की गर्दी जरा शिस्तीने वागे.

पेत्रस दिसायला जितका ओबडधोबड व उग्र तितकाच तो प्रेमळ होता. दुसऱ्याचे दुःख पाहून त्याला कळवळा येई व म्हणूनच तो गर्दीत घुसून स्त्रियांना व मुलांना व वृद्ध पुरुषांना येशूकडे जाण्यासाठी वाट करून देई. येशू अर्थातच हे सर्व पाहात होताच. पेत्रस असला म्हणजे गर्दी कशी शिस्तीने वागते व आजारी माणसांना आपल्या जवळ येता येते हे सर्व येशू पाहात होताच व म्हणूनच एके दिवशी तो त्याला म्हणाला, "शिमोन, माझ्या मागं ये. मला तुझी जरुरी आहे." आणि शिमोन येशूचा शिष्य झाला. पेत्रस किंवा पीटर हे नाव येशूनेच त्याला दिले.

आता कपर्णहुम येथे आंदियस एकटाच त्याच्या घरात राहात असे. मात्र मधून मधून तो पेत्रसकडे येत असे. एके दिवशी हन्ना त्याला म्हणाली, "त्या घरात एकटे राहण्यापेक्षा दोघेही भाऊ येथेच राहा ना! मला असं काय जास्त काम पडणार आहे? दोघांकरतां तरी मला स्वैंपाक करावाच लागतो ना? तो तिघांचा करीन. पण असं एकटं राहणं तरुण माणसाला शोभत नाही." आणि त्या दिवसापासून आंदियसही हन्नाकडेच राहू लागला. मात्र मधून मधून तो कपर्णहुमला जाऊन आपल्या घरची व्यवस्था पाही. येशूने आपले केंद्र कर्पणहुम येथे केल्यावर तो याच घरात राहू लागला.

हन्ना जरी वृद्ध असली तरी बरीच काटक असे. सर्व व्यवहार ती करी. कधीही स्वस्थ बसत नसे. सारखा हात चाललेला. त्यामुळे तिची प्रकृती नेहमी ठणठणीत असे. पण पावसाळ्याचे दिवस आले आणि सर्दी-पडशाने सासूबाईंना घेरले. खेड्याची माणसे! तावडतोब थोडेच वैद्या-कडे जाणार? अंगावरच ते दुःखणे हन्नाने नेले. दोन चार दिवस तसेच गेले. आणि एके दिवशी सकाळी सासूबाई बिछान्यातून काही उठल्या नाहीत. मग मात्र पेत्रस घावरला व गावातील वैद्यांना बोलावून आणून हन्नाची प्रकृती त्यांना दाखविली. वैद्याचे औषधोपचार सुरू झाले. दोनचार दिवस आणखी गेले, पण प्रकृती मूळ स्वरूपावर येईना. वैद्याच्या औषधाचा काही गुणच येईना. शेजार-पाजारच्या बायका समाचाराला येत. आप-आपल्या परीने उपचार सुचवीत व निघुन जात. पण हन्नाला उतार

पडेना. तेव्हा कोणीतरी सुचविले की येशूला तरी आणा. तेव्हा कुठे पेत्रस बुवा जागे झाले व येशूला घेऊन आले. येशू यायला आणि वैद्यबुवा हन्नाला औषध देऊन निघायला एकच गाठ पडली आणि त्यांच्या पायाची आग मस्तकाला गेली. "म्हणजे हा जादूगार का हन्नाला बरा करणार? अहो, या थोतांडाने का रोग बरे होतात? तसे असते तर जगात वैद्य राहिलाच नसता." तणतण करीत व पाय आपटीत वैद्यबुवा निघून गेले.

येशूने घरातील बायकांचा गोंधळ आधी काढून टाकला. आणि हन्नाच्या खोलीत गेला. हन्ना अगदीच क्षीण झाली होती. ती आता शेवटच्या घटका मोजीत होती. तिची आशा कोणालाच वाटत नव्हती. घटका दोन घटकांची ती सोबतीण आहे असेच सर्वांना वाटत होते. येशूने हन्नाकडे पाहिले व म्हटले, "आई, ऊठ! किती वेळ पडून राहायचे?" आणि काय आश्चर्य! जी हन्ना क्षणापूर्वी हातसुद्धा हालवीत नव्हती ती आता आपल्या हाताने डोळे चोळू लागली, जांभई देऊ लागली व अंगाला आळोखेपिळोखे देऊन बिछान्यावर उठून बसली. तिला उठल्याचे पाहून येशू कोणाला तरी म्हणाला, "आईला खायला काहीतरी पातळ द्या."

हन्ना आजारातून उठली ही बातमी वाऱ्यासारखी बेथ सैदा गावात पसरली. अनेक वर्षे हन्ना त्या गावी राहात असल्याने व नेहमी दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचे तिचे धोरण असल्याने सर्वांना ती हवीशी वाटे व म्हणूनच लोक सारखे तिच्या समाचाराला येत. गावात एकच वैद्य. त्याच्याही हाताला गुण आला नसता येशूसारख्या सुताराने हन्नाला मृत्यूच्या जबड्यातून वाचविले हा एक आता लोकांच्या चर्चेचा विषय झाला होता. बेथ सैदा गावात धर्ममंदिर व याजक सदोकी परोशी होतेच. हे लोक व सामान्य लोक आपापल्या परीने हन्नाच्या या चमत्काराकडे पाहात होते. कोणी म्हणे, हे सर्व थोतांड आहे. आजारातून माणसे काय उठत नाहीत काय? वैद्यबुवांच्या औषधाला गुण यायला उशीर लागला असेल. गुण यायला व येशू यायला एकच गाठ पडली, म्हणून का येशू याचे सर्व श्रेय घेणार? फांदीवर कावळा बसायला व फांदी मोडायला एकच वेळ झाली म्हणून का कावळ्याने फांदी मोडली असे तुम्ही म्हणणार? तर दुसरा पक्ष म्हणे, अहो, हन्ना अगदी मरायला टेकली होती. वैद्यबुवांनीही तिच्या आजारापुढे हात टेकले होते.

तिची आशा कोणालाच नव्हती आणि तिला येशूने उठविले. हा चमत्कार नाही काय ? म्हणजे हा चमत्कार म्हणावा तर येशूच्या ठायी दैविक शक्ती वास करीत आहे, असे म्हणायचे आहे काय तुम्हांला ? हा मशिया सुद्धा असू शकेल ! कोणीतरी म्हणे, अहो, आतापर्यंत अनेक मशिया आले आणि गेले. पण धर्मशास्त्रात त्यांच्यासंबंधी जे भविष्य वर्तविले होते ते एकाने तरी पुरे केले आहे काय ?

नाही, मशिया यहुद्यांचे गतवैभव व त्यांचे गेलेले राज्य परत मिळवून देणार आहे, हे भविष्य कोठे पूर्ण झाले आहे ?

अशी चर्चा या निरनिराळ्या थरांच्या लोकांमध्ये चाले. सामान्य यहुदी माणसाची मशियाबद्दल जी अपेक्षा होती, ती मात्र येशूने पुरी केली नाही. मशिया म्हणजे कोणी तरी बलाढ्य योद्धा, की जो रोमन सत्तेशी दोन हात करू शकेल व आपले स्वातंत्र्य व स्वराज्य परत मिळवून देईल, ही अपेक्षा येशूने पुरी केली नाही. उलट, सामान्य माणसाचे जीवन तो जगला, त्याचा जन्म झाला तो सुद्धा सामान्य व गरीब आईबापांच्या पोटी. जन्मला तेव्हा त्याला नीट जागासुद्धा मिळाली नाही. मिळाली ती जनावरांच्या गोठ्यात. मूल जन्मल्यावर मंदिरात जे अर्पण करावे लागते ते सुद्धा गरीब माणसाला शोभण्यासारखे. दोन लहान कबुतरे मरियेला मंदिरात अर्पण करावी लागली. हेरोद राजाच्या रोपापासून प्राण वाचविण्याकरिता इजिप्तला पळून जावे लागले ते सुद्धा सामान्य माणसाप्रमाणे, तिकडून परत आल्यावर नाझरेथसारख्या लहान व त्याज्य मानलेल्या गावात राहून सुतारकीच्या धंदा करून आपली उपजीविका करावी लागली. आपल्या महान् कार्याला सुरुवात केल्यावर रखडतच पायीच त्याला एका गावाहून दुसऱ्या गावाला जावे लागले. आपल्यासारख्याच गरीब व दरिद्री माणसाच्या घरी राहावे लागले व म्हणूनच डोंगराच्या प्रवचनात तो म्हणतो, " जे आत्म्याने दीन ते धन्य. कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. पृथ्वीतलावरचे त्याचे तेहतीस वर्षांचे आयुष्यही सर्व दारिद्र्यातच गेले. त्याच्या एका शिष्याने त्याला शत्रूला विकले. ते तीस शेकेला ( त्या वेळचे प्रचलित नाणे ) किंमत घेऊन. हीच बाजारात एखाद्या सामान्य गुलामाची किंमत होती. त्याचे जे शिष्य होते, (एक मत्तय सोडून) तेही गरीबच होते. त्याने जे चमत्कार केले तेही गरिबांमध्येच. जेथे जेथे दुःख व अन्याय असेल तेथे तेथे येशूचा हात पोहोचला आहे.

परंतु येशू फक्त गरिबांचेच रोग बरे करीत असे व श्रीमंत व रोमीय लोकांकडे त्याचे लक्ष नसे, हे म्हणणे खरे नाही. जायरूसची कन्या त्याने मरणातून उठविली हे आपण मागे पाहिलेच आहे. तसेच हेरोद राजाच्या अमलदाराचा मुलगाही त्याने बरा केला होता हेही आपण पाहिलेच आहे. रोमन सैन्यात एक रोमन सेनाधिकारी होता. त्याचा एक गुलाम अत्यंत विश्वासू असल्याने मालकाचा मोठा आवडता होता. मालक व गुलाम यांच्यामध्ये जिव्हाळ्याचा संबंध होता व असे दृश्य गुलाम पद्धतीत क्वचितच दिसे. रोमन लोकांत गुलामांची पद्धत होती व जनावरांप्रमाणे गुलामांची विक्री व खरेदी चाले. रोमी लोक आपल्या गुलामांना अत्यंत निर्दयपणे वागवीत. तेव्हा या रोमी माणसाने आपल्या गुलामाला माणसाप्रमाणे वागविले आहे, हे पाहून येशूला मोठे समाधान वाटले. मालक रोमी तेव्हा येशू त्याच्या विरुद्ध असणार हे याजकवर्ग समजून होता. व येशूने या गुलामाला बरे करावे म्हणून ते मालकाच्या वतीने येशूकडे मध्यस्थी करू लागले. पण येशूला मध्यस्थीची जरुरी होती काय? नाही, गुलामाला म्हणजे एका माणसाला, म्हणजे एका गरीब माणसाला बरे करावयाचे एवढेच येशूला माहीत होते. तो तात्काळ अंमलदाराच्या घरी जाण्यास निघाला. पण रोमी असूनही या सेनाधिकाऱ्याचा येशूवर अढळ विश्वास व श्रद्धा. येशू आपल्याकडे येण्यास निघाला आहे हे पाहून हा अंमलदार म्हणतो, "गुरुजी, माझ्या घरी आपण यावं इतकी माझी लायकी नाही. नुसता शब्द उच्चारा की माझा सेवक बरा होईल." आणि शेवटी हा गुलाम बरा झाला.

येशूचा जन्म गरिबीत व त्याचे जीवनही गरिबांकरिता, सर्व माणसांकरिता होते. त्याला राज्य, सिंहासन, सैन्य, तलवार असले शब्द माहीतही नव्हते. त्याला स्वर्गाचें म्हणजे समतेचे व बंधुप्रेमाचे राज्य स्थापावयाचे होते व ते राज्य मनुष्याचा हृदयपालट करूनच, हे यहुदी लोक व रोमी सत्ता यांना कळले नाहीं व येशूचा अंत त्यांनी घडवून आणला.

* * *

# लाजरा, बाहेर ये !

गॅलली प्रांत ही येशूची कर्मभूमी होती. तेथील वातावरण त्याच्या स्वभावाशी जुळणारे होते. गॅलली समुद्राचा तो सुंदर काठ, समुद्राच्या पृष्ठभागावर सतत डोलणाऱ्या त्या कोळ्यांच्या होड्या, त्याचे प्रवचन ऐकण्यास जमणारे माणसांचे थवेच्या थवे, येशूला हा भाग उगीचच नाही आवडला ! परंतु या भागातले त्यांचे कार्य संपत आले होते. त्याला यहुदा भागात म्हणजे यरूशलेमात जाणे आवश्यक होते.

यरूशलेमच्या जवळच बेथणी म्हणून एक लहानसे टुमदार गाव होते. गाव मोठे सुंदर व टापटीपीचे. लोकवस्ती अगदी तुरळक आणि निसर्गाच्या सौंदर्याने नेहमी नटलेले. यहुदी लोकांना फुलांचे फार वेड. या गावांत तर रानटी फुले आपोआपच वाढत. फुलांबरोबर सुंदर सुंदर पक्षीही या गावात भरपूर होते. त्यांचे कूजन कानाला गोड वाटे. गॅलली प्रांतातील काम आटपून येशूला आता या भागात यावे लागले.

या बेथणी गावात लाजर नावाचा एक तरुण मनुष्य व त्याच्या दोन बहिणी मार्था व मरिया राहात होते. हे कुटुंब लहानच पण अगदी टाप-टिपीचे असे. ज्या ज्या वेळी येशू यरुशलेमला येई त्या त्या वेळी तो बेथणी गावाला या लाजरच्या घरी येऊन दोन चार दिवस जशी सवड मिळे तसा मुक्काम करून राही व कुटुंबाचा पाहुणचार घेऊन पुढे जात असे. हे कुटुंब फार आतिथ्यशील असल्याने येशूचा सत्कार व पाहुणचार या कुटुंबात चांगल्या रीतीने होई. शिवाय हे कुटुंब त्या गावात आदर्श असे कुटुंब असल्याने या माणसांना गावात मान होता. हे तिघेही बहीणभाऊ मोठ्या सौजन्याने वागत असत. त्यामुळे नाव ठेवण्यास तिळभरही जागा मिळत नसे. आपण बरे की आपले घर बरे, अशा रीतीने हे तिघेही वागत असल्याने त्या गावात या कुटुंबाचा एकप्रकारचा दबदबा असे. घरात दोन तरुण अविवाहित बहिणी असूनही त्यांच्याबद्दल कोणाला ब्र काढण्याची संधी लाजर देत नसे.

लाजर हा कुटुंबप्रमुख असला व घर त्याच्यावरच चालत असले तरी तो आपल्या बहिणींवर अधिकार मुळीच चालवीत नसे. तो स्वभावतःच शांत, निगर्वी व लाजाळू असे. तो फार कमी बोलत असून चारचौघांत जायला त्याला आवडत नसे. प्रामाणिकपणाने श्रम करून दोन पैसे मिळवावे व ते आणून आपली बहीण मार्था हिच्या हवाली केले की लाजर मग घरातील कोणत्याच गोष्टीत लक्ष घालीत नसे. सर्व घर मार्थाच चालवीत असे. तीच थोरली असल्याने घराची जबाबदारी तिच्यावर होती. आपले दैन्य बाहेर दिसू न देता काटकसरीने व टापटिपीने ती भावाचा संसार करीत असे. केव्हाही पाहावे तेव्हा एखाद्या आदर्श गृहिणीप्रमाणे मार्था नेहमी गृहकृत्यात दंग असे. झाडसारवण, स्वैंपाकपाणी, पाहुण्यांची बरदास्त या सर्व गोष्टींकडे मार्था एखाद्या आदर्श पोक्त गृहिणीप्रमाणे जातीने लक्ष देत असे. घरात येणारा कोणताहि पाहुणा, मग तो श्रीमंत असो की गरीब असो, त्याचा सत्कार उत्तम प्रकारे करून व त्याला उत्तम प्रकारचा स्वैंपाक करून घालून त्याचा पाहुणचार ती करी. येशू घरी आला की मग आमच्या मार्थाची घाई काही विचारू नका. घर आरशासारखे स्वच्छ ठेवण्यापासून तो निरनिराळी पक्वान्ने करून येशूला खायला घालीपर्यंत तिची धावपळ काही विचारू नका. एवढा थोर पाहुणा आपल्या घरी आपल्या पायांनी येतो तेव्हा त्याच्या आदर-सत्कारात व पाहुणचारात तिळभरही कमतरता पडू नये याबद्दल मार्था नेहमी दक्षता घेई. पौर्वात्य स्त्रियांप्रमाणें गृहकृत्ये व गृहदक्षता तिच्या रोम-रोमात भिनली होती. आपल्या घरकुलाबाहेरचे जग तिला माहीत नव्हते. येशूच्या कार्याचे मर्म तिला समजत नव्हते. तो एक सत्पुरुष आहे एवढेच तिला समजत होते. स्वतंत्र रीतीने विचार करण्याची संवय तिला नव्हती व त्याची तिला गरजही भासत नसे. द्राक्षारस कसा काढावा व घर कसे स्वच्छ ठेवावे यापलीकडे तिचे लक्ष कधीच जात नसे.

मार्थेच्या अगदीं उलट स्वभावाची मरिया होती. घरकामाचा तिला अगदी मनापासून कंटाळा. गृहकृत्यात ती जरी मार्थेला मदत करीत असे, तरी तिला नवीन ज्ञान संपादन करावे, नवे विचार आत्मसात् करावे, नवीन माहिती मिळवावी, धर्म, तत्त्वज्ञान, स्वर्ग, नरक यांचा विचार करावा याच गोष्टी तिला आवडत असत. लाजरकडे जेव्हा पुरुष मंडळी जमत तेव्हा

दाराच्या आडून ती त्यांचे संभाषण कान देऊन ऐकत असे. संसारात मार्थे-इतके लक्ष तिने कधीच घातले नाहीं. आध्यात्मिक विचारातच ती नेहमी गुंग असल्यामुळे मरिया स्वप्नाळू बनली होती. येशूबद्दलच्या गोष्टी तिच्याही कानांवर येत होत्या. जेवणाच्या वेळीं भावाबरोबर ती चर्चाही करी. येशू हा एक धर्मात्मा, सत्पुरुष आहे असेच तिचे मत होते, व त्याच्याकडे ती आदराने पाही. अशा या सुखी कुटुंबात येशूचा प्रवेश होऊन त्याच्याशी त्यांचा स्नेह जमला. इतका की, येशू त्यांना आपला भाऊ व बहिणी मानू लागला. आपल्या प्रवासात असतांना येशू हटकून बेथणी गावाला येई व मार्थेच्या घरी राहात असे. असाच एकदा तो तिच्या घरी आला होता. मार्थेने त्याला पाय धुवायला पाणी दिले व ताजा द्राक्षारसाचा पेला त्याच्या हातात देऊन म्हटले,

"गुरुजी, आता चांगले चार दिवस तरी येथे विश्रांती घ्या. मी ताजी द्राक्षे मुरू घातली आहेत व अंजिराचे लोणचेही पण मी करणार आहे. तेव्हा हे पदार्थ तयार होईपर्यंत तुम्ही येथून जाऊच नका." त्यावर हसत हसत येशू तिला म्हणतो, "मार्थे, तुझं लक्ष या संसारात किती गुरफटले आहे ? या गोष्टी का शाश्वत आहेत ?"

अशा या सुखी व आनंदी कुटुंबावर एकाएकी वज्राघात झाला. लाजर आजारी पडला. प्रथम या बहिणींना वाटले, आजार साधा असेल, भिण्याचें कारण नाहीं. तरी पण त्यांनी औषधोपचार सुरू केलेच. पण आजार हटण्याची चिन्हे दिसेनात. दिवसेंदिवस आजाराने उग्र स्वरूप धारण करायला सुरुवात केली. बहिणीच्या काळजाने ठाव सोडला. घरात कोणी वडीलधारे माणूस नाही. दोघीही पोरसवदाच. तरी शेजारच्या पोक्त बायका येऊन सल्ला देत.

आजार हटेना असे पाहून शेवटी या बहिणींनी येशूकडे निरोप पाठविला की गुरुजी, ज्याच्यावर आपले प्रेम आहे तो लाजर आजारी झाला आहे ! त्यांना मोठी आशा होती की, निरोप जाताच येशू धावतच त्यांच्या घरी येईल ! पण कसचे काय आणि कसचे काय, येशूचा उलट निरोप आला की, हा आजार मरणासाठी नाहीं, तर देवाच्या गौरवार्थ आहे. म्हणजे या-योगे देवाच्या पुत्राचा गौरव होणार आहे ! आता या निरोपाचा काय अर्थ घ्यावा या दोन्ही दुःखी बहिणींनी ? तो तेथेच दोन दिवस राहिला. इकडे

लाजरचा आजार जास्तच बळावत जाऊन शेवटी त्याचा अंत झाला. या दोन्ही असहाय बहिणींवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली! त्यांना आता कोणाचा आधार होता? कोणाचा नाही. घरात कोणी पुरुष माणूस नाही. शिवाय त्यात तरुण वय. घराबाहेर तर मानवीरूपी लांडगे टपून बसलेलेच! कोणाच्या तोंडाकडे पाहावे या दोन तरुण मुलींनी? येशू इतका जिवाभावाचा पण तोही येईना. सर्वांनीच त्यांना निराधार सोडले असे त्यांना वाटू लागले.

लाजर देवाघरी गेल्याचा निरोप नंतर येशूकडे आला नाही. पण तो एकाएकी आपणहून आपल्या शिष्यांना म्हणतो, "चला, आपण यहुदा भागात जाऊ!" येशू यहुदा भागात जाणार हे ऐकून शिष्यांना मोठा धक्का बसला. कारण याजकवर्गाचे मुख्य केंद्रस्थान यरूशलेम येथे होते व बेथणी व यरूशलेम ही गावे यहुदा प्रांतातच मोडत. हा याजक वर्ग, त्याच्या जोडीला सदोकी व परोशी वर्ग, काही असंतुष्ट आत्मे येशूविरुद्ध होते. येशूने येरूशलेम येथे पुन्हा जाणे म्हणजे मृत्यूच्या जबड्यात जाणे, हे त्यांना स्पष्टच दिसत होते. येशूने गॅलली प्रांतात केलेले मोठे मोठे चमत्कार, त्याने लोकांना केलेला सदुपदेश वगैरे गोष्टी यहुदा प्रांतातील लोकांच्या, विशेषत: येशूने यरूशलेम किंवा बेथणीला जाणे म्हणजे आपली मान आपणहून या वर्गाच्या हाती देणे, असे या शिष्यांना वाटत होते. म्हणून ते म्हणाले,

"गुरुजी, यहुदा भागात जाणे धोक्याचे आहे. तेथला याजक वर्ग व यहुदी लोक तर आपल्या नाशाकरता टपून बसले आहेत! जाणूनबुजून मृत्यूच्या जबड्यात पाय का घालता?"

"ते जरी खरं असलं तरी परमेश्वराचे कार्य करणाऱ्याला भीती कसली?"

लाजर मृत्यू पावल्याचा बहिणीचा किंवा दुसऱ्या कोणाचा निरोप येशूला आला नव्हता, मग ही बातमी त्याला कशी कळली असेल हा प्रश्नच आहे. त्याला समर्पक उत्तर देता येत नसले तरी एवढे मात्र खात्रीने म्हणता येईल कीं, ईश्वरी प्रेरणा येशूला झाली असली पाहिजे. बहिणीचा निरोप जेव्हा येशूला मिळाला तेव्हाच लाजर मृत्यू पावला होता. तरी येशूने निघण्याची घाई केली नाही. एक दिवस प्रवासातच गेला व बेथणी गावाला गेल्यावरही तो ताबडतोब लाजरच्या घरी जात नाही, याचा काय अर्थ असेल? लाजर

आजारी आहे येवढा निरोप आल्यावरही येशू काही हालचाल करीत नाही याचा एकच अर्थ निघतो तो हा की, लाजरचा मृत्यू व्हावा व आपण त्याला पुन्हा जिवंत करून लोकांचा मशियाबद्दलचा विश्वास दृढ करावा असाही कदाचित् येशूचा हेतू असावा. नाही तर आपला प्राणप्रिय मित्र मृत्युशय्येवर पडला आहे व घटका पळे मोजतो आहे, असे समजताच येशू धावतच बेथणीला गेला असता. परंतु तसे झाले नाहीं.

लाजरला जाऊन चार दिवस झाले होते. पौर्वात्य देशांत मृतदेह फार दिवस ठेवीत नाहीत. त्याप्रमाणे लाजरचा दफनविधी झाला होता. यहुदी लोकांमध्ये दफन करताना माती ढकलीत नाहीत. तर देह तसाच खड्डयात ठेवून त्यावर मोठा दगड बसवितात. या कबरी बहुतेक डोंगराच्या दगडांत खोदलेल्या असतात. येशूचा पार्थिव देह अशाच कबरीत पुढे ठेवण्यात आला होता. या प्रथेप्रमाणे लाजरचा देह त्याच्याच घराच्या बागेत एका कबरींत ठेवण्यात आला होता. युरोपमध्येही श्रीमंत लोकांचे मृतदेह खड्डयांत पुरत नसत. शवपेटीत घालून ती पेटी तळघरात लोटून देत.

लाजरच्या घरावर एक प्रकारच्या औदासीन्याची कळा पसरली होती. लोक समाचाराला येत होते व या बहिणींचे समाधान करीत होते. इतक्यात येशू गावात आल्याची बातमी तिला लागली व ती धावतच येशूकडे गेली. त्याला पाहून थोडचा चिडक्या स्वरातच ती त्याला म्हणते, "गुरुजी, तुम्ही आला असता तर माझा भाऊ गेला नसता!" तिचे शांतवन करीत येशू म्हणतो, "मार्था, घाबरू नकोस. तुझा भाऊ पुन्हा उठेल!" सर्वसाधारण यहुदी लोकांचा समज असा की, सर्व लोक शेवटच्या दिवशी न्यायदानाकरता उठतील. येशू याच अर्थाने बोलत आहे असे समजून मार्था म्हणते, "होय गुरुजी! तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानाच्या वेळेस सर्वांबरोबर उठणार आहे हे मला माहीत आहे." येशू तिला म्हणाला, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो मजवर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल आणि जो जिवंत असून माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही. मार्था! या विचारसरणीवर तुझा विश्वास आहे ना?" मार्था खाली मान घालून म्हणाली, "होय गुरुजी, जगात येणारा देवाचा पुत्र ख्रिस्त आपण आहात

ठाणे. स्थळ
४७७८९
चरित्र

याच्यावर माझा विश्वास आहे." असे म्हणून मार्था आपल्या बहिणीकडे गेली. मरण आणि जीवन याचा अर्थ मार्थाला कळला नाही हे येशूने ताडले. आपण जे काही बोललो ते मरियेलाच चांगले पटेल म्हणून त्याने मार्थेजवळ तिची चौकशीही केली व तिला बोलावण्याकरिता मार्था मरियेकडे गेली.

मरिया रडतच त्याला म्हणाली, "गुरुजी, तुम्ही असता तर माझा भाऊ मेला नसता!" तिला शोकावेग असह्य झाला होता. आपल्या हृदयातील खळबळ याच्यापेक्षा स्पष्ट शब्दांत तिला व्यक्त करताच आली नसती. एकाच्या मृत्यूने त्या कुटुंबावर केवढा घाला पडतो याची जाणीव येशूला झाली व म्हणूनच तो आपले तत्त्वज्ञान व आध्यात्मिक विचार मरियेला न सांगता तिच्या दुःखाशी समरस झाला आणि तिला शांत करीत म्हणाला, "बरं, त्याला कोठे ठेवले आहे?" त्याला घेऊन लोक लाजरच्या कबरीकडे आले. कबर म्हणजे एक गुहा होती व तोंडावर दगड ठेवला होता. येशू म्हणाला, धोंडा काढा. लोक आश्चर्यचकित झाले. मरिया व मार्था यांनाही मोठे आश्चर्य वाटले. तो प्रसंगच मोठा हृदयद्रावक होता. कबरीसमोर लोक उभे आहेत, या दोघी बहिणीही रडत येशूजवळ उभ्या आहेत, व येशूच्याही डोळ्यांतून अश्रुधारा वाहात आहेत व सगळीकडे शोकाकुल व गंभीर वातावरण पसरले आहे; व येशू म्हणतो कबरीवरचा धोंडा काढा. त्या कबरीत हा काय दृश्य दाखविणार? येशू काही तरी चमत्कार करणार असे कोणालाच वाटले नाही. मृताच्या नातेवाईकांना जर शेवटच्या विधीला हजर राहता आले नाहीं, तर मागून जाऊन मृताच्या कबरीवर ते फुले वाहतात. कबर कोणी उघडी करीत नाही. तेव्हा येशू कबर उघडा म्हणतो याचे लोकांना आश्चर्य वाटल्याशिवाय कसे राहील? मार्था हीच सर्वांत वडील. येशूला दोन शब्द बोलण्याचा तिलाच अधिकार. आता जास्त ताणून धरण्यात अर्थ नाही असे पाहून ती येशूला म्हणते, "गुरुजी, त्याला जाऊन चार दिवस झाले. आतां दुर्गंधी सुटली असेल. कबर कशाला उघडी करता?" येशू तिला म्हणाला, "मार्थे! मी तुला सांगितले नव्हते काय, की तू विश्वास धरल्यास देवाचा गौरव पाहाशील? तो गौरव पाहण्याची संधी आता आली आहे!" आता आपला नाइलाज झाला, किती भयंकर दृश्य आता आपणास पाहावयाला मिळणार म्हणून मार्था फार घाबरली होती. येशूने आपली

दृष्टी वर आकाशाकडे लावून म्हटले, "हे पित्या तू माझं ऐकलंस म्हणून मी तुझे आभार मानतो." असे म्हणून तो कबरीच्या दारासमोर उभा राहिला. गर्दी जरा बाजूला हटली. येशू आपल्या धीरगंभीर वाणीने म्हणाला, "लाजरा, बाहेर ये!" सर्व लोक श्वास रोखून चित्रासारखे तटस्थ झाले. झाडाचे पानसुद्धा हालत नव्हते. सर्व शांत होते व आधीच असलेल्या गंभीर वातावरणात या शांततेची भर पडली होती. सर्वांच्या नजरा कबरीच्या दरवाज्यावर खिळल्या होत्या.

कबरीत काही तरी हालचाल चालली आहे असा भास लोकांना झाला. सूर्याचे ऊन अगदी लख्ख पडले होते. सर्व काही अगदी स्पष्ट दिसत होते. आणि लाजर हळूहळू कबरीबाहेर येत होता. त्याच्या सर्व अंगाभोवती प्रेतवस्त्र बांधले होते. तोंड पांढऱ्या रुमालाने बांधले होते. येशू लोकांना म्हणाला, त्याला मोकळा करा. लोक घाबरू लागले. दिवसा ढवळ्या जरी हा माणूस कबरीतून आला असला तरी तो मृत पिशाच्चच असला पाहिजे असेच सर्वांना वाटत होते. पण त्यातल्या त्यात दोघेचौघे जे धीट होते ते पुढे होऊन लाजरला मोकळे करू लागले. लाजर अगदीं ताजातवाना, सर्व शरीरातून गरम रक्त वहात असलेला, सतेज असा पुरुष त्यांच्यापुढे उभा राहिला. बहिणींच्या आनंदाला तर पारावार नव्हता. त्यांना येशूचे आभार कसे मानावेत हे समजेना. पुष्कळ लोकांनीं येशूच्या दैविक सामर्थ्यावर विश्वास ठेवला. पण जे विघ्नसंतोषी लोक होते ते तावडतोब यरूशलेमला गेले व ही सर्व हकीकत त्यांनी याजक वर्गाच्या कानांवर घातली व पुढे काय होते ते पाहात बसले.

आता लाजरच्या पुनरुत्थानाचा याजक वर्ग व धर्ममंडळ स्नेहाद्रीनवर काय परिणाम झाला ते पाहू. या धर्ममंडळाची माहिती मागे दिली आहेच. लाजरने जिवंत होणे व येशूने त्याला जिवंत करणे म्हणजे या धर्ममंडळाच्या प्रतिष्ठेला व वर्चस्वाला तडा लावण्यासारखेच आहे हे धर्ममंडळ ओळखून होते. मुख्य याजकानें ही सभा बोलाविली. लाजर जिवंत झाला आहे हे कोणालाच अमान्य करता येत नव्हते. येशूचे यामुळे प्रस्थ वाढत आहे व आपले कमी होत आहे. तो जर मोकळा राहिला तर लोक त्याच्याभोवती

जमा होतील. राजा म्हणून लोक त्याचा स्वीकार करतील व तसे झाले की रोमी सरकार मध्ये पडणार व आपले मंदिर व राष्ट्र पुन्हा धुळीला मिळणार हे या मंडळाला व मुख्य याजक खईफाज यांना कळत होते. तो म्हणाला, "प्रजेसाठी, राष्ट्रासाठीं, धर्म व धर्ममंदिरासाठी एका माणसाने मरावे व सर्वांचा नाश टाळावा, हेच या वेळी उचित आहे." व त्याच दिवसापासून ते सर्व येशूच्या नाशाकरता टपून बसले. येशू नंतर तेथून एफ्राईम नगरात गेला व तेथे आपल्या शिष्यांबरोबर राहिला. हे नगर यरूशलेमपासून तेरा मैलांवर होते. तूर्त तरी वादळ शमले. पण ती शांतता पुढच्या भयंकर वादळापूर्वीची शांतता ठरली.

* * *

# वादळ जमत चालले !

मागच्या प्रकरणात सांगितलेली लाजरची घटना घडून आल्यावर येशू एफ्राईम गावाकडे गेला. परंतु आता ओलांडण्याचा सण अगदी जवळ आला होता. या महत्त्वाच्या सणाच्या आधी शुद्धीकरणाचा एक मोठा सण यहुदी लोक यरूशलेमात जाऊन पाळीत असत. शिष्यांना वाटत होते की, येशूने यरूशलेमात पुन्हा जाऊ नये. कारण याजक वर्ग त्याच्या नाशाकरता टपून होता. पण येशूला यरूशलेमात त्याच्या भवितव्याने ओढतच नेले.

एफ्राईम गावाहून तो जेरीको (यरीहो) गावाकडे निघाला. हे गाव म्हणजे यहुदा प्रांताची बागायत पेठ. येथे फळफळावळ पिकत असे व रोम सरकारचे ते जकात नाकेही होते. या जकात नाक्याचा जक्कय नावाचा एक जकातदार अधिकारी होता. तो यहुदी असून रोमकरता जकात वसूल करी व म्हणून त्याला लोकांनी वाळीत टाकले होते. या जक्कयच्या मनात येशू-बद्दल कुतूहल होते व कसेही करून त्याला एकदा पाहून घ्यावे अशी त्याची धडपड होती. परंतु हा माणूस अत्यंत ठेंगणा असल्याने येशूभोवती जम-णाऱ्या गर्दीत त्याची डाळ शिजत नव्हती. जेरीकोहून येशू बेथणी गावाकडे निघाला आहे ही बातमी त्याला कळली होती. तो ज्या रस्त्याने जाणार होता त्या रस्त्यावर एक अंजिराचे झाड होते. झाडावर बसल्याशिवाय आपल्याला येशू दिसणार नाही हे ओळखून त्या झाडावर स्वारी चढली. येशू त्या झाडाजवळ येताच त्याने सहज वर पाहिले तो ही स्वारी वर ! येशूने त्याला म्हटले, " जक्कय, खाली ये. मी आज तुझ्याच घरी उतरणार आहे! " हे ऐकून जक्कयला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. कारण आता-पर्यंत यहुदी लोकांनी त्याला वाळीत टाकले होते व कोणताही यहुदी माणूस तो जकातदार, म्हणून त्याच्याशी अन्नोदकाचा व्यवहार करीत नसे.

जक्कय तावडतोब झाडावरून खाली उतरला व येशूला त्याने मोठ्या आदराने आपल्या घरी नेऊन त्याचे आदरातिथ्य केले. त्याच्याकरता मोठी मेजवानी केली. वाऱ्यासारखी ही बातमी याजक वर्गाच्या कानांवर गेली

व आगीत तेल पडले. येशूनें या पापी, त्याज्य व वाळीत पडलेल्या माणसाच्या घरी जावे व तेथे अन्नोदक घ्यावे, म्हणजे केवढे पाप ! याजक वर्ग जास्तच खवळला. लाजरचे जिवंत होणे व जक्कयच्या घरी येशूने जाणे या दोन महत्त्वाच्या घटना ओलांडण सणाच्या आधी घडून आल्या व येशूबद्दल यरूशलेममध्ये वादळ जमू लागले.

नंतर तेथून येशू बेथणीला गेला. तेथे मार्थेने त्याच्याकरता मोठी मेजवानी केली होती. जिवंत झालेला लाजरही त्याच्या पंक्तीला होता. त्याला पाहून याजक वर्गांच्या पायाची आग मस्तकाला जात होती व आपण कधीं येशूचा घात करतो असे त्यांना झालें होतें.

येशूचा अंतकाल आता समीप आला होता. त्याने आपल्या शिकवणीने तत्कालीन समाजात एक प्रकारची आचारविचारांची क्रांती करून सोडली होती. आईबापांची सेवा तीस वर्षे करून तीन वर्षे तो जनसेवा करीत होता. या तीन वर्षांच्या पूर्वतयारीच्या कालावधीत त्याने समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. समाज व लोक परमेश्वराला विसरून ऐहिक सुखाच्या मागे कसे लागले आहेत, हे ओळखून समाजाला पुन्हा परमेश्वराकडे वळविण्याचे कार्य त्याने केले. येशूच्या तत्कालीन समाजात धर्मविधीचे फारच प्रस्थ माजले होते. उपासतापास, यज्ञयाग, बलिदान वगैरे बाह्य साधनांनी परमेश्वराला संतुष्ट करण्याच्या मागे यहुदी लोक लागले होते. परमेश्वर कोणत्या साधनांनी प्रसन्न होतो याकडे लोकांचे लक्ष नसून ठराविक धर्मविधी, यज्ञ, पशुबलिदान, शाब्बाथ दिवस, यांवरच त्यांची सारी भिस्त. पुरोहित वर्गाच्या शिकवणीमुळें लोक खरा भक्तिमार्ग विसरले. तो खरा भक्तिमार्ग येशू शिकवू लागताच पुरोहित व सनातनी वर्ग खवळून उठला व येशूच्या विरुद्ध त्यांनी वादळ उठविले. त्यातच लाजर व जक्कय यांच्या चमत्काराने भर पडली. येशूला कायद्याच्या कचाट्यात गोविण्याचा हे लोक प्रयत्न करू लागले.

ओलांडण सण म्हणजे मोठा आनंदाचा व उत्साहाचा सण. लाखो लोक लांबून यरूशलेमच्या मंदिरात या सणाकरता येत. हा सण वसंत ऋतूतच येत असल्यानें सृष्टिसुंदरीसुद्धा नवा साजशृंगार करून या सणाचे स्वागत करण्यास सिद्ध होती.

यरूशलेम आता अगदी जवळ आले होते. सणाचे जेवणही हे लोक मोठे पवित्र मानीत. आपण सर्वजण सणाकरिता यरूशलेम येथे जात आहोत खरे, पण भोजनाची सिद्धता कोठे करावयाची हा शिष्यांच्या पुढे प्रश्न होता. त्यांनी आपली शंका येशूजवळ व्यक्त करताच तो म्हणाला, "हे पाहा, प्रथम जवळच्या गावात जा, तेथे गेल्यावर दारातच एक गाढवी व तिचे शिगरू बांधलेलें तुम्हांस दिसेल. ते शिगरू सोडून मजकडे आणा. कोणी अडविल्यास गुरूजीला त्याची जरुरी आहे असें सांगा, म्हणजे तुम्हांला कोणी अडथळा करणार नाही."

आणि झालेही तसेच. गावात गेल्यावर रस्त्याच्या कडेलाच ते घर होते. दारातच गाढवी आपल्या शिगराला मोठ्या प्रेमाने चाटीत होती. ते शिगरू तरी किती देखणे होते! त्याला पाहताच वात्सल्य निर्माण व्हावे व त्याच्या मऊ पाठीवरून हात फिरवावा असे पाहणारास वाटावे. त्या शिगरावर आतापर्यंत कोणी बसले नव्हते. शिष्य त्यांच्या जवळ येताच जणू काय आपल्याच ओळखीचे लोक आले आहेत असे त्या मायलेकरांना वाटले व त्यांच्या हस्तस्पर्शाकरता ही मुकी जनावरे धडपड करू लागली. शिष्यांनी प्रथम त्या गोजिरवाण्या शिगराला गोंजारले. त्याचे तोंड आपल्या छातीजवळ घेऊन त्याच्या तोंडावरून हात फिरविला. त्याच्या आईलाही त्यांनी तसेच कुरवाळले. नंतर शिगराची दोरी सोडून ते त्याला घेऊन चालू लागले. त्यांना कोणीही अडथळा केला नाहीं. शिष्यांनी शिगरू येशूजवळ आणल्यावर त्यावर आसन घालून शृंगारले व येशू त्यावर आरूढ झाला. फार वर्षांपूर्वी भविष्यवाद्यांनीं केलेली भविष्यवाणी खरी ठरली. ही भविष्यवाणी अशी होती : "सियोनेच्या कन्येला सांगा, पाहा, तुझा सौम्य व शांतताप्रिय राजा गाढवावर बसून तुझ्याकडे येत आहे!"

या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयास हवी की, यरूशलेमकडे जाताना येशू गाढवावर बसून जात आहे. गाढव हे जरी एक त्या देशाचे वाहन असले, तरी ते राजाचे किंवा मोठ्या योद्धयाचे वाहन नव्हे. आणि ज्याअर्थी येशू गाढवावर बसून जात आहे व लोक झाडाच्या फांद्या घेऊन होयान्ना म्हणून त्याचा जयजयकार करीत आहेत व 'यहुद्यांचा राजा' म्हणून त्याचा जयघोष होत आहे, तरी हा राजा किती सौम्य व शांतताप्रिय आहे,

हे त्याचे वाहनच सिद्ध करीत आहे. येशूच्या ठिकाणी जर लढाऊ वृत्ती असती व त्याला जर सिंहासनांची उलथापालथ करावयाची असती, तर जगात अत्यंत हलके मानलेले वाहन त्याने केव्हाच स्वीकारले नसते.

येशू गाढवावर बसून चालला असताना त्याच्याभोवती आणखी लोक जमले. हे लोक गॅलिली प्रांतातून यरूशलेमला सणाकरिता आले होते व येत होते. त्यांच्या जयघोषांनी सर्व प्रदेश दुमदुमला होता. अशा मोठ्या विजय-महोत्सवात येशू व त्याचे शिष्य यरूशलेमात येऊन पोचले.

आता सणाची व भोजनाची त्यांना तयारी करावयाची होती. येशू त्यांना म्हणाला, "असेच पुढे जा. तुम्हांला खांद्यावर पाण्याची घागर घेतलेला एक माणूस दिसेल. त्याच्या पाठोपाठ जा व घरात गेल्यावर त्या माणसाला सांगा, कीं आमचे गुरुजी याच ठिकाणी ओलांडण सणाचे भोजन करणार आहेत, म्हणजे तो पुढील सर्व व्यवस्था करील."

हा पाण्याची घागर घेऊन जाणारा माणूस कोण असावा? समीक्षक म्हणतात, तो योव्हानाचा (चित्रकार व शिष्य) बाप असावा. कारण पुढे येशूच्या मृत्यूनंतर या माणसाच्याच घरात शिष्यांच्या बैठका होत. ही एक असाधारण खूण येशूने शिष्यांना सांगितली असावी. कारण यहुदी पुरुष पाणी कधीच आणीत नाही. हे काम सर्वस्वी बायकांचे आहे असे ते मानीत. शिष्यांना घर शोधण्यास अडचण पडू नये म्हणून येशूने ही खूण सांगितली असावी इतकेच.

ते घर बरेच प्रशस्त व टापटिपीचे होते. येशू आपल्या घरी सणाचे भोजन करणार आहे, हे ऐकून त्या घरमालकाला फार आनंद झाला व त्याने आपली वरची माडी मोकळी करून दिली. शिष्य भोजनाच्या तयारीला लागले. आपल्या गुरुजींबरोबरचे हे शेवटचे भोजन आहे याची कल्पनासुद्धा त्यांना शिवली नाही. भोजनाच्या तयारीत असताना मनुष्यस्वभावानुसार मुख्य शिष्य कोण, कनिष्ठ कोण व मध्यम प्रतीचा कोण याबद्दल शिष्यांमध्ये मजेने वादविवाद चालला होता. हे जरी सर्वजण येशूचे अनुयायी असले तरी येशूच्या तत्त्वांचा त्यांच्या मनावर अजून पक्का पगडा बसला नव्हता. तीही माणसेच होती. माणसांच्या मनोविकारांनीं अद्याप त्यांना सोडले नव्हते. संतकोटीत जाण्याला त्यांना अवकाश होता. ऐहिक गोष्टींचे त्यांच्या मनावर प्राबल्य

होते. शिष्यांमध्ये चाललेला वाद येशू कान देऊन ऐकत होता. त्याने त्यांच्या मनोदौर्बल्याबद्दल त्यांची कानउघाडणी केली व त्यांना सदुपदेश केला.

भोजनाची आता तयारी झाली होती. भोजनापूर्वी हातपाय धुण्याची पद्धत या लोकांमध्ये होती. सामान्य माणसाच्या घरात चाकर असल्यास चाकरच पाहुण्यांचे हातपाय धुई. चाकर नसल्यास घरमालकच पाहुण्यांचे हातपाय धुण्याचे काम करी. आता ताटावर बसण्याची वेळ आली. येशूने आपला वरचा झगा काढून बाजूला ठेवला. कमरेला रुमाल बांधून एका भांड्यात पाणी घेऊन तो आपल्या एक एक शिष्याचे पाय धुऊ लागला. शिष्यांना हे कसे पाहावेल ? पेत्रा म्हणाला, "गुरुजी, हे काय करता ? आपण माझे पाय धुणार ? असं कसं होईल ? नाही, मी नाही आपणांस असे करू देणार !" येशूने त्याला शांतपणे उत्तर दिले, "मी जे काही करतो त्याचा अर्थ तुम्हांस आज कळणार नाही, पुढे कळेल. "

परंतु पेत्राला त्याच्या म्हणण्याचा अर्थ कळला नाही. गुरूने शिष्याचे पाय धुवावयाचे म्हणजे काय ? कोणता शिष्य आपल्या गुरूकडून आपले पाय धुऊन घेईल ? तो म्हणाला, "नाही, गुरुजी, माझे पाय आपण कधीही धुवावयाचे नाहींत." येशू पुन्हा म्हणाला, "पेत्रा, मी जर तुझे पाय धुतले नाहीत, तर तुला माझ्याबरोबर सहभागी होता येणार नाही." येशूने आपल्या सर्व अकरा शिष्यांचे पाय धुतले व त्यांना शुद्ध करून घेतले. नंतर तो बारावा शिष्य यहुदा इसकारीयत याच्याकडे आला.

यहुदा हा येशूचा शिष्य खरा, पण तोच येशूचा विश्वासघात करणार होता. याजक वर्गाशी संगनमत करून व त्यांच्याकडून तीस शेकेल (नाणे) घेऊन तो त्यांच्या हवाली आपल्या गुरूलाच करणार होता. ही एक विचित्र विधिघटना नव्हती काय ? येशू आपले शिष्य अगदी पारखून घेत असे. मग हा यहुदा विश्वासघातकी का निघावा ? जगाचा नियम, दुसरं काय ? जगात चांगल्याबरोबर वाईटही असतेच. यहुदा हा येशूचे शिष्यसांप्रदायाचा खजिनदार होता. येशू इतर शिष्याचें पाय धूत असताना यहुदा त्याच्याकडे निरखून पाहात होता. त्याला काही तरी विचित्रच वाटत असावे. आपण करतो ते चांगले नाही याची तर जाणीव त्याला झाली नसावी ? त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. आज केवढा तरी आनंदाचा दिवस ! मग यहुदी दुःखी

का झाला? गुरूने आपल्या शिष्यांचे पाय धुणे हे काही सामान्य माणसाचे काम नव्हे. केवढी ही नम्रता! केवढे हे विशाल हृदय! असेच यहुदाला वाटत असले पाहिजे. आता यहुदाचे पाय धुण्याची वेळ आली. येशू त्याच्याजवळ गेला, त्याने आपले गुडघे टेकले, आपल्या पवित्र हातांनी त्याचे पाय धुतले व पुसून टाकले.

नंतर येशू व सर्व शिष्य भोजनाला बसले. भोजन मोठे आनंदात चालले होते. बोलता बोलता येशूने पाय धुण्याचा प्रश्न काढला. तो म्हणाला, " मी तुमचा गुरू असूनही व तुम्ही मला गुरू मानीत असूनही मी तुमचे पाय धुतले. शिष्याचे पाय धुण्यात मी कमीपणा मानला नाही. तुम्हीसुद्धा एकमेकांचे पाय धुण्यात कमीपणा मानू नका. नम्रता व लीनता हे बहुमोल गुण अंगी आणण्याचा प्रयत्न करा. मीपणा व अहंकार नाशाला कारणीभूत होतात. तुमच्यापैकींच एकजण माझा विश्वासघात करून मला शत्रूच्या हवाली करणार आहे."

हे ऐकून शिष्यांना आश्चर्याचा धक्का बसला. आमच्यापैकी प्रत्यक्ष आपल्या गुरूला शत्रूच्या हवाली करणारा नराधम कुणी निघेल काय? मशियाला त्याचे मित्रांपैकीच एकजण शत्रूला विकील, असे मागचे भविष्य होते खरे, पण त्या भविष्यावर शिष्यांचा विश्वास बसावा कसा? येशूचे आपल्या शिष्यांशी वर्तनच इतके प्रेमळ व सौजन्यपूर्ण होते की, त्यांच्यापैकी एक असा नराधम निघेल असे त्यांना वाटणे शक्यच नव्हते. आता तर प्रत्यक्ष येशूने शिष्यांचे पाय धुतले होते. तेव्हा प्रत्येक जण गंभीर मुद्रा धारण करून "मीच का तो ?" असा प्रश्न करीत होता. त्या प्रश्नाला उत्तर म्हणून येशू म्हणाला, " मी ज्याला घास देईन तोच हे अमानुष कृत्य करील!" असे म्हणून यहुदाच्या तोंडात त्याने घास घातला. आणि काय आश्चर्य! घास तोंडात पडताच झपाट्याने यहुदा ताटावरून उठून बाहेर गेला.

नंतर ताटातील भाकरीचा तुकडा हातात घेऊन येशू गंभीरपणाने म्हणाला, "हे खा! हे माझे शरीर आहे. माझ्या शरीराच्या बलिदानातच तुमचे तारण आहे."

नंतर द्राक्षारसाचा पेला हातात घेऊन तो म्हणाला, "हे प्या. हे माझे रक्त आहे. माझे रक्त सांडल्याशिवाय तुमचे तारण होणार नाही."

आज ख्रिस्ती लोक हा विधी प्रभुभोजनाचा विधी म्हणून मोठ्या गंभीरपणाने ख्रिस्ती मंदिरात करतात. भोजन आटोपल्यावर येशू शिष्यांना म्हणाला,

" मित्रांनो, माझी वेळ आता आली आहे. मी तुमच्यामधून जाणार आहे. पण एवढे मात्र आपल्या मनावर बिंबवा की, तुम्ही एकमेकांवर स्वतःप्रमाणे प्रेम करा. प्रेमातच परमेश्वर आहे. मी माझे बलिदान करीत आहे ते तुमच्या प्रेमामुळे. तुम्हीसुद्धा सर्वांची सेवा करून परमेश्वराची सेवा केली पाहिजे. "

इकडे यरूशलेमात काय चालले होते ? मुख्य याजक खईफा व त्याचा सासरा हन्ना यांच्या वाटाघाटी चालल्या होत्या व येशूविरुद्ध वादळ उठवून त्याला गोत्यात कसे आणावयाचे याबद्दल ते संगनमत करीत होते. खईफाचा सासरा हन्ना हा जरी मुख्य याजक नसला तरी यरूशलेमाची सर्व सूत्रे तो आपल्या कृश झालेल्या हातांनी हालवीत होता. तो अत्यंत वृद्ध झाला होता, पण यरूशलेमाच्या मंदिराचे कोणतेही काम त्याच्या सल्ल्याशिवाय पार पडत नसे. पिढीजात श्रीमंती व सत्ता अविरतपणे त्याच्याकडे चालत आल्याने या हन्नाला व त्याच्या घराण्याला एक प्रकारचे महत्त्व प्राप्त झाले होते. सर्व याजक व सदोकी परूशी वर्ग रोमच्या सिंहासनाचा हस्तक असल्याने हन्नाही रोमच्या व रोमचा प्रतिनिधी पिलात याच्या कच्छपी लागला होता. येशूचे प्रकरण त्याच्या कानी गेले होते, नाही असे नाही. पण त्याकडे हन्नाने फारसे लक्ष दिले नाही. तो म्हणे, " आमच्या जरमिया व यशाया या संदेष्ट्यांनी मशियासंबंधी भविष्य वर्तवून इस्रायल लोक व यरूशलेम यांच्यावर संकटपरंपरा मात्र आणून सोडली. आजवर मशियावर मशिया थोडे का झाले? ते आले आणि गेले आणि आम्ही मात्र रोमच्या रोषाला बळी पडलो. त्यांपैकीच हा येशू ! त्याच्याकडे काय लक्ष द्यायचे एवढे ?"

"पण तुम्ही म्हणता तसे येशूचे प्रकरण सोपे नाही, मामासाहेब." जावई खईफा म्हणाला. " या येशूचे आता इतके काही प्रस्थ माजले आहे, की सर्व लोक त्याच्या पाठीमागे लागले आहेत. बेथणी गावाच्या लाजरला त्यानं उठविलं ही हकीकत मी आपल्या कानांवर घातली आहेच. आणि विजयोत्सवात गाढवाच्या पाठीवर बसून यरूशलेमात झालेले त्याचे आगमन आपणांस विदित आहेच !"

"पण गाढवावर बसून येणारा मशिया कसा असेल ?" हन्ना म्हणाला.

"पण तो मशिया आहे यावर आपले मूर्ख लोक विश्वास ठेवतात त्याला काय करणार ?" खईफा म्हणाला, "याचा परिणाम शेवटी असा होणार आहे की, या मूर्ख लोकांच्या उत्सवाचा अतिरेक होऊन पिलातला मध्ये पडून त्याला रोमन सैन्याची मदत घ्यावी लागेल. आणि तसे झाले की लोकही प्रतिकाराला तयार होणारच. मग सारी घडीच विघडून जाणार. जाळपोळ, धरपकड, अत्याचार, हाणामारी, हे सर्व काही घडून येणारच ! हा प्रसंग घडून येण्याच्या आधीच जर आपण येशूला अटकाव केला, तर रोमचाही विश्वास आपल्यावर नाही का बसणार? सहकार्याचा हात आपण नेहमीच पुढे करतो असं रोमला नाही का वाटणार ?"

"काय करायचं ठरविलं आहे तुम्ही ?" हन्नाने विचारले.

"आमची सर्व तयारी आहे." खईफा म्हणाला, "मात्र धर्ममंडळाने रात्री जमून येशूची चौकशी केली पाहिजे."

"पण ते कसं शक्य आहे ?" हन्नाने आपली शंका व्यक्त केली. "भयंकर गुन्ह्याची चौकशी रात्री करू नये, असा आपला व रोमचाही कायदा आहे."

"ते सर्व काही खरं आहे." खईफा म्हणाला, "पण आपणही कायद्याला मुरड घातली पाहिजे. येशूला मोकळं ठेवणं किती घातक आहे, हे धर्म-मंडळाला पटविलं पाहिजे. येशूला मृत्यूची शिक्षा झालीच पाहिजे. त्याशिवाय हे वादळ शमणार नाही."

"काय? मृत्यूची शिक्षा ?" हन्नाने पुन्हा आपली शंका व्यक्त केली. "पण अहो, पिलातानं मृत्यूची शंका मंजूर करावयास हवी ना ? इतक्या घाईनं झालेल्या चोकशीत दिलेली देहदंडाची शिक्षा पिलात कशी मंजूर करणार? धर्ममंडळ रोषास पात्र नाही का होणार ?"

"आम्ही वादळ उठविलं आहे खरं !" खईफा म्हणाला.

"येशू चौकशीला पुढं आला की लोक जमाव करून त्याला सोडविण्याचा प्रयत्न करतील. तेव्हा लोकांना कळण्याच्या आधी हे चौकशीचं नाटक पुरे करून येशूला पिलाताच्या हवाली केलं म्हणजे आपली जबाबदारी संपली. आता पिलातावर जर कोणाचे वजन असेल तर तुम्हांला

पिलाताची नाडी चांगली कळते. तेव्हा तुमचे वजन खर्च करून पिलाताने ही मृत्यूची शिक्षा कायम करावी. ही कामगिरी तुम्ही पार पाडली पाहिजे."

"पण साक्षीदार ? त्यांचं काय ?"

"आम्ही भाडोत्री साक्षीदार मिळविले आहेत. कारण लोकांपैकी कोणीच साक्षी देण्यास कबूल नाहीत. तेव्हा आम्ही पैसे चारून काही साक्षीदार मिळविले आहेत." खईफा म्हणाला. "नंतर थोडा वेळ थांबून हलक्या आवाजात तो हन्नाला म्हणाला! आणि विशेष म्हणजे त्याच्या एका शिष्यालाच फोडला आहे आम्ही !"

"पण येशूवर आरोप तरी कसले ठेवले आहेत तुम्ही ?" हन्नाने विचारले.

"धर्माज्ञेविरुद्ध वर्तन आणि राजद्रोह !" खईफाने उत्तर दिले.

"दोन्ही आरोप भयंकरच आहेत व त्यांना देहदंडाचीच शिक्षा कायद्यात सांगितली आहे. पण तुम्ही हे आरोप सिद्ध कसे करणार ?"

"ते अगदी सोपं आहे." खईफा घाईने म्हणाला. "आपले धर्ममंडळ – सन्हेद्रीन सभा. याजक वर्ग व सदोकी व परोशी या आमच्या धर्मरक्षकांचा येशूने वेळोवेळी आपल्या प्रवचनांत निषेधच केला आहे. चांगला शमरोनी याचा दाखला देताना आम्हां धर्ममार्तंडांचा त्याने उपहासच केला आहे."

"काय म्हटलं आहे त्यानं या दाखल्यात ?" हन्नाने विचारले.

"ऐका तर !" खईफा म्हणाला, "एक मनुष्य यरूशलेमाहून खाली यरीहोस (जेरीको) जात होता. तो लुटारूंच्या हाती सापडला. त्यांनी त्या माणसाचें सर्वस्व लुटून त्याला मार देऊन अर्धमेला करून सोडले व ते लुटारू पुढे गेले. मग एक याजक त्याच वाटेने जात होता. तो त्या माणसाला पाहून दुसऱ्या वाटेने निघून गेला. तसाच एक लेवीही त्या रस्त्याने आला, पण तोही तसाच निघून गेला. या दोघांनीही त्या दुर्दैवी माणसांना काही एक मदत केली नाही. कर्मधर्मसंयोगाने एक शमरोनी माणूस त्याच मार्गाने आला. त्या माणसाला पाहून तो हळहळला. लगेच तो आपल्या गाढवावरून उतरून त्या माणसाजवळ गेला. आपल्या जवळच्या द्राक्षा-

रसाच्या व तेलाच्या बाटल्या त्याने काढल्या व त्या माणसाच्या सर्व जखमा धुऊन बांधून टाकल्या. नंतर त्या आजारी माणसाला आपल्या गाढवावर बसवून जवळच्या उतारशाळेत त्याने आणले. उतारशाळेच्या मालकाला पैसे देऊन हा शमरोनी माणूस त्याला म्हणाला, "मी येईपर्यंत या दुर्दैवी माणसाचा चांगला सांभाळ करा. त्याला औषधपाणी करा व त्याची सर्व व्यवस्था करा. मी लगेच माझे काम आटपून परत येतो व जे काही जास्त पैसे लागले असतील ते मी तुम्हांला देईन. त्याची काळजी नको. पण या माणसाची काळजी घ्या."

खईफाने आपली हकीकत संपविली. दोघेही त्याच्यावर विचार करू लागले. नंतर थोड्या वेळाने खईफा हन्नाला म्हणतो, "या कथेत येशूने आपल्या वर्गाची नालस्तीच केली आहे व ज्या शमरोनी लोकांना आपण त्याज्य मानले त्याच लोकांना त्याने उंचावले आहे. शिवाय जाहीर सभेतही त्याने आपल्या वर्गाचा ढोंगीपणा, धर्मवेड व अशुद्ध अंत:करणाचा निषेध केला आहे.

"अस्सं!"

"पण एवढ्यावरच येशूचे पाप थांबत नाही." खईफा पुन्हा म्हणाला, "आपल्या या पवित्र मंदिराला शेहेचाळीस वर्षे लागली ना शलमोन बादशहाला? पण हा येशू म्हणतो, 'हे मंदिर पाडा. मी पुन्हा ते तीन दिवसांत उभारून दाखवितो!' आहे की नाही गंमत?"

"शहाणाच आहे म्हणायचा हा येशू!" हन्ना म्हणाला, "येशू आपल्या शरीररूप मंदिराबद्दल बोलत आहे, हे या घमेडखोरांना कळले आही."

"बरं, पुढं?"

"धर्माज्ञेविरुद्ध त्याचे वर्तन तर पुढेच आहे." खईफा म्हणाला. "आपलं मंदिर किती पुरातन कालचे. यव्होव्हाला अर्पण करण्याच्या वस्तू मंदिराच्या आवारात विकतात. ही आपली रूढीच आहे व या वस्तू विकत घेण्याला यहुदी नाणे लागते होही आपली परंपरा आहे. पण या येशूने मंदिरात जाऊन सर्व बाजार उधळून लावला आणि आमचं नुकसान केलं. हा काय लहान सहान धर्मद्रोह आहे? आणि वर म्हणतो कसा, "माझ्या पित्याचे प्रार्थनामंदिर बाजारपेठ आहे काय?"

" म्हणजे, मंदिर काय त्याच्या एकटयाचे आहे ? हा कोण मंदिराची परंपरा बिघडविणारा ? " हन्ना म्हणाला,

" आणि सदोकी परोशी व याजक यांच्या विरुद्ध तर त्याने शस्त्रच धरलं आहे ! " खईफा पुन्हा सांगू लागला, " गरीब व श्रीमंत यांच्यात भेद का असावा ? गरिबांना श्रीमंतांप्रमाणे समान हक्क का नसावेत ? याजकवर्गाने यथेच्छ पोटभर खावं-प्यावं, पण गरिबाला गोळाभर अन्नही मिळू नये हा कसला न्याय ! देवासमोर सर्व सारखेच, समान दर्जाचे. त्याचीच सर्व लेकरे ! "

" म्हणजे, हा उघड उघड वर्गद्वेष आहे ! " हन्ना म्हणाला.

" एवढंच नव्हे, मामासाहेब ! " खईफा पुढे म्हणाला, " हा येशू लोकांना असंही सांगतो की, यव्होव्हाला अर्पणाची, बलिदानाची, धर्मविधीची मुळीच जरुरी नाही. आपण आपला स्वतःच यव्होव्हाला बळी देणार आहोत, तेवढंच अर्पण त्याला पुरे. यव्होव्हाला खऱ्या व शुद्ध प्रेमळ अंतःकरणाची जरुरी आहे. खरा भक्तिभाव त्याला हवा. खोटया परोशी, सदोकी व याजका-प्रमाणे चव्हाटयावर जाऊन लांबलचक प्रार्थना त्याला नको ! "

" अस्सं ! असं म्हणण्याचं धाडस तरी कसं करवतं त्याला ? " हन्ना म्हणाला.

" शाब्बाथाविरुद्धही त्यानं शस्त्र उगारलं आहे ! " खईफा म्हणाला, " चांगलं काम शाब्बाथ दिवशी करण्यास हरकत नाही, असं तो उघड उघड लोकांना शिकवितो. मग आपली प्रतिष्ठा राहिली कोठे ? आपण मशिया म्हणजे यहुद्यांचा राजा आहो, असेही तो म्हणतो. "

" काय राजा ? मग हा उघड राजद्रोह झाला. रोमच्या राजाशिवाय दुसरा कोण राजा असणार आम्हां यहुद्यांना ? धर्मद्रोह, समाजद्रोह ! छे छे, हा येशू म्हणजे द्रोहाची गाळीव मूर्ती आहे. " हन्ना रागाने म्हणाला.

" मग मामासाहेब ! तुम्ही पिलातावर वजन आणणार ना ? " खईफा अजीजीच्या स्वरात आपल्या सासऱ्याला म्हणाला.

" हो, तसं केलंच पाहिजे. सन्ह्रेद्रीन सभेनं त्याला देहदंडाची शिक्षा केली, की मी पिलाताकडे जाऊन तिला मंजुरी आणतो. हा माणूस मेलाच पाहिजे, हो, मेलाच पाहिजे. तो जर मेला नाही तर सर्व यहुदी

लोक त्याच्या मागं जातील, आपली प्रतिष्ठा कमी होईल व आपण उपाशी मरू. आणि याशिवाय रोमी सम्राट आपल्या देशाची पुन्हा धूळधाण करून टाकील. सर्व राष्ट्राचा नाश होण्यापेक्षा एका माणसाचा नाश झालेला काय वाईट! पण रात्रीच्या वेळी हा येशू तुम्हांला सापडणार कसा?" हन्ना म्हणाला.

"त्याची नको तुम्हांला काळजी. त्याचा एक शिष्य आम्ही वश केला आहे. त्याला तीस शेकेल देऊन तो आम्हांला हा येशू दाखविणार आहे. त्याला झटपट धरून सन्हेद्रीन सभेपुढे नेले की झाले आपले काम. तेथे खोटे साक्षीदार आहेतच."

अशा रीतीने येशूच्या विरुद्ध वादळ जमत चालले होते व त्यात तो संपूर्णपणे अडकला गेला.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २००८१ ........ वि: चरित्र ......
क्रमांक ८६१ ........ नोंद दि: २८।१।५६

# पिलातासमोर

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे वृद्ध याजक हन्ना पिलाताकडे येशूची देहदंडाची शिक्षा मंजूर करून घेण्याकरिता निघाला. हन्ना ही काही सामान्य व्यक्ती नव्हती. यहुदी धर्ममंडळातील सर्वोच्च पदावर तो विराजमान झाला होता व रोमी सरकारावर त्याचे वजनही होते, पिलात हा रोमचा प्रतिनिधी, यरूशलेमचा प्रांताधिकारी किंवा गव्हर्नर होता. यालाच प्रोक्युरेटर म्हणतात. येशूचे नाव या पिलाताच्या नावाशी निगडित झाले आहे. कारण या पिलाताकडूच येशूला देहान्ताची शिक्षा मिळाली.

पिलात जरी क्रूर असला तरी दुबळ्या मनाचा होता. येशूच्या शत्रूंनी एकत्र गिल्ला करून "तू या मनुष्याला सोडून दिल्यास तू रोमच्या सम्राटाचा मित्र नव्हेस" असे म्हणून ओरडू लागताच पिलात घाबरला व त्याने येशूला लोकांच्या स्वाधीन केले.

हन्ना पिलाताकडे मेण्यात बसून निघाला. तो अती श्रीमंत व सत्ताधारी असल्याने त्याचा स्वतंत्र मेणा, मशालजी, मेणावाहक असा सरंजाम असे. रात्रीची वेळ असल्याने मशालजी मागेपुढे मशाली घेऊन जात होते. हन्ना फार वृद्ध असल्याने मेण्याचे हेलकावे त्याला सोसवत नसत. म्हणून मेणावाहक अत्यंत सावकाश मेणा चालवीत होते. पिलाताच्या निवासस्थानी मेणा येताच हन्नाने आपले नाव व येण्याचे कारण द्वाररक्षकाला सांगितले व पिलाताकडे रीतसर वर्दी जाऊन हन्नाचा प्रवेश पिलाताच्या दिवाणखान्यात झाला. पिलात व हन्ना यांचे बोलणे बराच वेळ चालले होते. पण जेव्हा हन्ना बाहेर आला, तेव्हा त्याची मुद्रा अगदी आनंदी दिसत होती. येशूला मृत्यूची शिक्षा द्यावी, ही हन्नाची विनंती पिलाताने मान्य तर केली नसावी ? काही का असेना, पण हन्ना पिलाताकडून आला तो अगदी खुषीतच. आपल्या निवासस्थानी आल्यावर खईफा त्याची वाट पाहातच होता. त्याला काही विचारण्याची संधी न देता हन्ना मोठ्या आनंदाने म्हणाला, "झालं एकदाचं तुमचं

काम ! पिलात नाही होय करता करता शेवटी कबूल झाला. आता तुम्ही तुमचे साक्षीदार तयार ठेवा."

"ते तयारच आहेत. येशूचा शिष्य यहुदा इस्कारियत आपलीच वाट पाहात आहे." खईफा म्हणाला.

"अस्सं का ? मग पाठवा त्याला आत."

यहुदा येऊन त्याच्या समोर उभा राहिला. त्याला पाहून हन्ना म्हणाला,

"अस्सं ! तू यहुदा का ? कोठला तू ?"

"किरॉथचा !"

"किती वर्षांपासून तू या येशूला ओळखतोस ?"

"तीन !"

"पण काय रे ! तू किरॉथचा, म्हणजे यहुदा प्रांतातला. मग तू या येशूच्या आडदांड गॅललीच्या शिष्यांत कसा सामील झालास ? आणखी कोण आहे यहुदा प्रांतातील त्याचा शिष्य ?"

"मी एकटाच यहुदा प्रांतातील. बाकीचे अकराही शिष्य गॅलील प्रांतातीलच आहेत. त्याच्या शिकवणीवर माझा विश्वास बसला, म्हणून मी त्याचा शिष्य झालो."

"मग, आताच का तू त्याचा विश्वासघात करण्यास प्रवृत्त झालास ?"

"ते काही मला सांगता येत नाही. पण आपण माझ्या गुरूच्या केसालाही धक्का लावू नये, अशी माझी विनंती आहे !"

"आपल्या सन्हेद्रीन सभेचा न्याय व दया यांच्यावर तुझा विश्वास आहे ना ?"

"होय !"

"काय रे, तू छुपा क्रांतिकारक आहेस ना ? तुझी मतं ही क्रांतीकडे झुकणारी मतं आहेत. कबूल ?"

"नाही !"

"या येशूच्या शिष्यमंडळात तू काय करीत होतास ?"

"मी खजीनदार होतो."

"येशूच्या जवळ पैसे असत का ?"

"नाही. तो एका दमडीलाही शिवत नसे. सर्व पैसा माझ्याजवळच असे."

" मग, तू येशूचा, तुझ्या गुरूचा घात करण्यास का तयार झालास ? "

" मला त्याची काही काही तत्त्वे पसंत पडली नाहीत. त्याची शिकवण अगदीच सौम्य व धोरण पडतं घेण्याचं. काय म्हणे, एका गालावर मारलं तर दुसरा गाल पुढं करा. प्रतिकार करू नका. शत्रूवर प्रेम करा. आपल्या-जवळचं असेल नसेल ते गरिबांना द्या. काय म्हणे, देवाचं राज्य येणार आहे. त्या राज्यात सर्वांनी यावं. मला ही त्याची विचारसरणी पटली नाही. भोळे लोक त्याच्या पाठीमागं जाऊन त्याचाच घात करतील, म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीनं येशूला कैदेत ठेवणं उचित आहे, म्हणून मी हें धाडस करीत आहे ?

" आता एकच प्रश्न. हा येशू आम्हां याजकांचा निषेध करतो, हे खरं ना ? "

" होय. त्याने निरनिराळे दाखले दिले. याजकवर्गावर त्यानं टीकास्त्र सोडलं होतं. याजकवर्ग धर्माचा बाजार मांडीत आहे, अशी त्याची शिकवण होती. " हन्ना नंतर त्याला म्हणतो, " बरं, तू जा. महामंडळापुढं जेव्हा तू उभा राहशील, तेव्हा हे सर्व बिनचूक सांग म्हणजे झालं. "

यरूशलेमजवळच एक सुंदर बाग होती. ही बाग अगदी शांत व वनश्रीने नटलेली असल्याने रमणीय दिसत असे. येशूची ही एक आवडती बाग होती. केव्हा केव्हा निसर्गाच्या सान्निध्यात यावे व परमेश्वराची प्रार्थना करावी, म्हणून येशू या बागेत येत असे. पण आज रात्री तो आपल्या शिष्यांना घेऊन का बरे आला असावा ? यरूशलेमची हवा बरीच थंड. आज थंडीही बरीच पडली होती व अंधारही पडला होता. सर्वजण थंडीने कुडकुडत होते. एका सोईस्कर ठिकाणी येशूने आपल्या अकरा शिष्यांना बसविले व जरा पुढे जाऊन तो परमेश्वराची प्रार्थना करू लागला. सर्व शिष्य तात्काळ झोपी गेले.

येशू एकटाच प्रार्थना करीत होता. त्याच्या अंतःकरणात भयंकर खळबळ माजली होती. आपला अंतिम काल समीप आला आहे, हे त्याला माहीत होते. आपला शेवट होणार याचे त्याला फारसे वाईट वाटत नव्हते. पण आपला अपमान व्हावा, आपली अवहेलना व छी: थू: व्हावी, लोकांनी आपला धिक्कार करावा, याबद्दलच त्याला वाईट वाटत होते आणि याबरोबरच असह्य व निर्दय शारीरिक यातनाही त्याला सोसाव्या लागणार होत्या.

त्या सोसण्याचे सामर्थ्य परमेश्वराने आपणास द्यावे, म्हणून तो मोठ्या श्रद्धेने प्रार्थना करीत होता. येशूची प्रार्थना अशी होती : "परमेश्वरा, माझ्या स्वर्गीय पित्या ! तुला सर्व काही शक्य आहे. माझ्यापासून हा दु:खाचा प्याला दूर कर. पण माझ्या इच्छेप्रमाणेच होऊ दे. हा पेला मी प्यालाच पाहिजे अशी जर तुझी इच्छा असेल तर तो मला प्यायलाच पाहिजे.

येशूच्या अंत करणातील वादळ आता शमले होते. प्रार्थना आटोपल्यावर येशू आपल्या शिष्यांकडे येण्यास निघाला. त्याची मुद्रा शांत पण निश्चयी दिसत होती. धीरगंभीरपणे तो आपले एक एक पाऊल टाकीत होता. आता रात्रही बरीच झाली होती. दुसऱ्या बाजूने यहुदा त्याला धरून देण्याकरिता शिपाई घेऊन येत होता. किती सोईस्कर वेळ होती ही त्याला दुष्कृत्य करण्याकरता ! जो बहुजनसमाज येशूच्या बाजूने होता तो केव्हाच निद्रिस्त झाला होता. फक्त यहुदासारखे निशाचरच जागे होते. " मी ज्याचे चुंबन घेईन त्याला धरा म्हणजे झालं. " यहुदा शिपायांना सांगत होता. हे शिपाई मंदिराचे होते व काही रोमी होते. आणि तसेच झाले. हा प्रसंगच मोठा नाटयमय होता. वरच्या बाजूने येशू सावकाश येत आहे. त्याचे शिष्य डोळे चोळीत उठत आहेत व खालच्या बाजूने यहुदा दांभिकपणे शिपायांना घेऊन येशूला भेटण्याकरिता येत आहे. पेत्रसला यहुदाचा फार राग आला. व्यवसायाने तो कोळी असल्याने त्याच्या कंबरेला तलवारीसारखा मोठा चाकू नेहमी असे. तो चाकू काढून एका फटकाऱ्यासरशी एका शिपायाचा कान त्याने कापला. ते दृश्य पाहून येशू म्हणाला "पेत्रस, हात आवर ! तलवार चालविणारे तलवारीनच विनाश पावतात. तलवारीचे राज्य केव्हाही टिकत नाही. शांतीचे व प्रेमाचेच राज्य टिकते !" त्याने त्या जखमी शिपायाचा कान तावडतोब बरा केला. शिपाई येशूला घेऊन चालू लागले. त्याचे शिष्य निघून गेले. येशू एकटा राहिला. हो, शेवटपर्यंत एकटा, एकटा !

येशूला प्रथम हन्नापुढे उभे करण्यात आले. ज्या याजक वर्गाला येशू "चोरांची गुहा" म्हणत असे, त्याच एका चोरापुढे येशू आता उभा राहिला. हन्नाने येशूला मामुली प्रश्न विचारले. येशू त्याला म्हणाला, " मला हे प्रश्न का विचारता ? मी सार्वजनिक ठिकाणी मंदिरात सगळीकडे लोकांना उघड-

पणे जाहीर रीतीने मला जे काय सांगायचे ते सांगतच होतो. मग ही गुप्तता कशाला ? " पण हन्नाला येशूच्या उत्तराचा राग आलेला दिसला. तो राग पाहून एका शिपायाने येशूला चपराक मारून म्हटले, "नीट बोल. कोणासमोर उभा आहेस, माहीत नाही ? " हन्ना म्हणाला, "याला आता खईफा व सन्हेद्रीन सभेपुढे उभा करा. तेथे तो नीट उत्तर देईल."

त्या सभेपुढे जातानाच येशूचा शिष्य पेत्रस याने येशूला तीनदा नाकारले व कोंबडा आरवला. पहाट झाली. येशू पेत्रसला म्हणाला होताच की कोंबडा आरवण्याच्या आधी मला तू तीनदा नाकारशील." तसेच झाले.

सन्हेद्रीन ही सभा न्यायदानाचे काम करीत असे. या सभेला देहदंडाची शिक्षा देता येत असे व तिचे न्यायदान अगदी चोख असे. ही सभा कायद्याचे पालन अगदी काटेकोरपणाने करीत असे. मात्र येशूच्या न्यायदानाच्या बाबतीत तिने हा काटेकोरपणा पाळला नाही, असे काही ख्रिस्ती पंडितांचे मत झाले. या सभेचे वतीने असेही म्हणता येईल की, रोमने जगाला कायदा शास्त्र दिले. न्यायदानाच्या बाबतीत रोमी न्यायाधीश फार न्यायनिष्ठुर असत व आपल्या साम्राज्यात कोणावर अन्याय होऊ नये, सर्वांना सारखा न्याय मिळावा, असा रोमच्या सम्राटाचा कटाक्ष होता. तेव्हा जरी या सभेने येशूवर काही न्यायदानाच्या कामी अन्याय केला असता तर तो अन्याय रोमी सरकारने चालू दिला नसता. शिवाय गंभीर गुन्हे ही सभा पिलाताकडेच पाठवी. मात्र धार्मिक गुन्ह्याचे सर्वाधिकार या सभेला होते. येशूवर जे सामान्य धार्मिक आरोप होते, ते म्हणजे मंदिर पाडून पुन्हा तीन दिवसांत उभारणे, शाब्बाथ दिवशी काम करणे, धर्मविधी न पाळणे, वगैरे. अपराधांची वासलात येशूने जर आपला बचाव केला असता तर तावडतोब लागली असती. पण येशू आपला बचाव करीना. शेवटी मुख्य याजकाला म्हणावे लागले,

"तू बोलत का नाहीस? हे साक्षीदार काय सांगतात ते ऐकतोस ना? बोल, बोल, तू देवाचा पुत्र मशिया आहेस काय ? "

नंतर येशू म्हणाला, "होय, मी मशाया आहे. एके दिवशी तुम्ही मनुष्याच्या पुत्राला आकाशात येणाऱ्या शक्तीच्या उजव्या हाताला बसलेला पाहाल."

हे शब्द ऐकताच खईफाने आपला झगा टरटर फाडला. कारण हे लोक

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ... वि: ...
... नों. दि. ...



काही वाईट घटना झाली की आपले कपडे फाडीत व अंगाला राख फासीत असत. आपण मशिया आहोत असे म्हणणे म्हणजे शुद्ध ईश्वरनिंदा होय, आणि या अपराधाला शिक्षा म्हणजे मृत्यू. ! मग पाठवा येशूला पिलाताकडे, कारण मृत्यूची शिक्षा तोच देऊ शकतो.

खईफाने भाडोत्री लोक आधीच जमवून ठेवले होते. ते येशूवर तुटून पडले. कोणी त्याच्या तोंडावर थुंकले तर कोणी त्याला लाथाबुक्क्या मारू लागले. यहुदा हे सर्व पाहातच होता. येशूवर असा प्रसंग येईल याची त्याला कल्पनाच नव्हती. येशूला सरकारच्या ताब्यात दिले की तो सुरक्षित राहील अशी त्याची कल्पना होती. पण झाले विपरीतच. आणि यहुदाला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊ लागला.

आता येशूला घेऊन हे सर्व लटांवर पिलाताच्या दरबारात जाऊ लागले. यहुदाही त्यांच्यामागे जाऊ लागला. पण तो आता मागचा यहुदा राहिला नव्हता. हळूहळू त्याला बुद्धिभ्रंश होऊ लागला. सर्व कपडे फाटलेले, केस अस्ताव्यस्त झालेले, मोठमोठ्याने याजकांच्या नावाने शखध्वनी करीत तोही गर्दीबरोवर जात होता. त्याच्या हातात याजकांनी दिलेले पैसे होते. ते सर्व त्याने रस्त्यावर उधळून टाकले. पिलाताच्या दरवाज्यात यहुदाला आत जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आणि तो जास्तच भडकला. त्याला पुरा बुद्धिभ्रंश झाला होता. तो ओरडत होता, “ केवढं मोठं पाप, केवढं मोठं पाप मी केलं. मला वाटलं लोक येशूला वाचवितील. मूर्खांनो, काय केलं होतं तुमचं या येशूनं ? तुम्हांला मदतच केली ना त्यानं ? मग त्याला का हे प्रायश्चित्त ? तुम्हांला केव्हाही सद्गती मिळणार नाही. मी एका सत्पुरुषाचा खून करण्यास कारणीभूत झालो. मलाही सद्गती मिळणार नाही. अरेरे, मी या संताला तीस नाण्यांकरता विकलं ना ? मी विश्वासघात करणार हे येशूला माहीत होतं. पण त्यानं माझ्यावर विश्वास टाकला. विश्वासघातक्याचे चुंबन घेऊन की हो मी माझ्या गुरूला धरून दिलं ! कोठे फेडू मी हे पाप ? देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरं प्रायश्चित्त दुष्ट दैवानं माझ्या नशिबी ठेवलं नाही. ” असे म्हणून तो तेथून धावतच निघून गेला आणि त्यानें गळफास घेतला. अशा रीतीने यहुदाचा शेवट झाला.

पण यहुदा जात्याच काही वाईट माणूस नव्हता. तसे असते तर येशूने त्याला आपल्या सांप्रदायात घेतलेच नसते. पण यहुदा काही तरी विशिष्ट हेतू मनात धरूनच येशूच्या शिष्यमंडळात आला असावा. हन्ना याजकाने त्याला क्रांतिकारक म्हटले होते, ते कदाचित खरेही असेल. येशू येणार म्हणजे क्रांती होणार, रोमचे सिंहासन उलथेपालथे होणार व आपल्या लोकांचे राज्य येणार, अशी त्याची कल्पना होती. परंतु येशूची भाषा क्रांतीच्या अगदी उलट. रोमच्या सत्तेला शह देण्याची भाषाही येशू बोलेना. त्याचे बोलणे, चालणे, वागणे सर्वच सौम्य, शांत व प्रेमळ. तेव्हा येशू हा क्रांतिकारक नाही अशी यहुदाची खात्री झाल्यावर त्याच्या मनोविकारांनी कलाटणी घेतली. येशू जेव्हा स्वर्गाच्या राज्याची भाषा बोलू लागला तेव्हा यहुदाला जरा हाय वाटले. येशूचे राज्य या भूतलावरचेच राज्य असणार त्या राज्यात आपणाला काही तरी अधिकार मिळणार असेही यहुदाला वाटत होते. पण येथही त्याची निराशा झाली. येशूचे राज्य भौगोलिक राज्य नाही, असे यहुदाला कळताच तो येशूवर चिडला व त्याला जास्त दिवस मोकळा ठेवला तर लोकच त्याच्यावर सूड घेतील, असे त्याला वाटले. सुरक्षिततेच्या दृष्टीने येशूने सरकारच्या ताब्यात जाणेच त्याला योग्य दिसले, म्हणून त्याने येशूला धरून दिले. तीस चांदीच्या नाण्यांकरता नव्हे !

येशू आता पिलाताच्या समोर उभा राहिला. याच पिलाताकडून त्याला न्याय मिळावयाचा होता. हाच पिलात त्याचे भवितव्य ठरविणार होता. याजकानें जरी पिलातावर वजन आणून येशूला देहदंडाची शिक्षा मंजूर करण्याचा डाव रचला होता, तरी पिलाताची सहानुभूती येशूकडेच होती. रोमी साम्राज्य व रोमी न्यायालयाची स्थापनाच उदात्त पायावर केली असल्याने खरा न्याय मिळावयाचा असेल तर रोमच्याच न्यायालयात, अशी सर्वसाधारण समजूत होती. आरोपीला बचावाची योग्य संधी दिल्याशिवाय व फिर्यादी व आरोपी समोरासमोर आल्याशिवाय आरोपीला शिक्षा करू नये, हे रोमन कायद्यातले तत्त्व पुढे सर्व जगाने स्वीकारले. तेव्हा येशूला सुद्धा या न्यायाचे तत्त्व पटून आपल्याला खरा न्याय पिलाताकडून मिळेल असे वाटले असावे. पण विधिघटना निराळीच होती.

रोमच्या कायद्यात ज्याला आज आपण सरकारी वकील किंवा प्रॉसि-

क्चूटर म्हणतो ती व्यक्ती अभावाने तळपत होती. फिर्यादीनेच आपली बाजू मांडून कायद्याला आव्हान करायचे अशी प्रथा होती व त्या प्रथेप्रमाणे स्नेहाद्रीन सभा फिर्यादी बनून पिलातासमोर आपली बाजू मांडू लागली व खालील आरोप तिने येशूवर ठेवले :

(१) राष्ट्रद्रोह, (२) सम्राटाला कर देऊ नका, असा उपदेश लोकांना करणे. (३) आपण स्वत: मशिया म्हणजे राजा आहोत, असे भासविणे. असे तीन आरोप येशूवर या सभेचे होते. पहिले दोन आरोप तर अगदीच पोकळ होते. येशूची शिकवण राष्ट्राविरुद्ध नव्हतीच व कर देण्याबद्दल तर त्याने स्पष्टच म्हटले होते की, राजाचे राजाला व देवाचे देवाला द्या. तिसरा आरोप मात्र गंभीर स्वरूपाचा होता. पिलाताच्या न्यायसभेने मशिया या शब्दाला हरकत घेतली नसती. पण मशिया म्हणजे राजा असा अर्थ जेव्हा स्नेहाद्रीन सभा लावू लागली तेव्हा मात्र पिलाताला विचार करावा लागला.कारण राजा म्हटले की सिंहासनाची उलथापालथ, क्रांती, बंड, धरपकड या सर्व गोष्टी आल्याच. पॅलेस्टाईनमध्ये यहुदी लोक वारंवार बंडाळचा माजवीत. रोमच्या सत्तेला विरोध करीत व पॅलेस्टाईनच्या गव्हर्नरला रोमहून त्याविरुद्ध कडक उपाययोजना करावी असे हुकूम सुटले होते. तेव्हा पिलाताला मशियासंबंधी सुद्धा कडक विचार करणे भागच होते. शिवाय पश्चिम युरोपात गॉल लोक नुकतेच उदयाला येत होते व त्यांनी रोमला शह देण्याचे ठरविले होते. तेव्हा अशा चळवळी उद्‌भवल्या की रोमच्या सम्राटाच्या पायाची आग मस्तकाला जाई. पिलाताने येशूला सरळच प्रश्न केला, "तू राजा आहेस काय?" येशू हा काही मुत्सद्दी नव्हता की राजकारणी पुरुष नव्हता. कायद्याचे डावपेच त्याला काय माहीत असणार ? रोमच्या दृष्टीने राजा या शब्दात किती गहन अर्थ गोविला आहे, हे येशूला माहीत नव्हते. तो सरळ उत्तर देतो, "होय, मी राजा आहे. पण माझं राज्य भूतलावरचं नव्हे. तसं असतं तर माझं सैन्य उठलं असतं !"

"तुझं राज्य? तुझं सैन्य? मग तू राजा आहेस तर?" पिलात रागाने म्हणाला.

"होय, मी राजा आहे." येशूने पुन्हा उत्तर दिले व त्याच्या स्पष्टीकरणार्थ तो म्हणाला, "पण कोणाचा? जे सत्य शोधतात त्यांचा. ज्यांना सत्याची आवड आहे ते माझे म्हणणे ऐकतात."

पिलाताची खात्री झाली की, येशूच्या उपदेशात कोणत्याही प्रकारचा राजद्रोह नाही. हा जरी यहुद्यांचा मशिया असला तरी रोमला त्याच्यापासून धक्का नाही. नंतर तो स्नेहाद्रीन सभेकडे वळून म्हणतो, "मला या माणसात काही अपराध दिसत नाही. राजद्रोह तर नाहीच नाही."

पण स्नेहाद्रीन सभेच्या मते येशू कबूल करतो ना की आपण राजा आहोत? झाले तर मग. जो स्वतःला राजा म्हणविनो तो सीझरचा द्रोह करतो, हे उघडच आहे. रोमच्या सम्राटाने नेमल्याशिवाय कोणीही राजा होत नाही. इतक्यात लोकांनीही आपला आवाज उठविला, "गॅलील प्रांतात येशूने अशीच खळबळ माजविली होती. त्याला शिक्षा झालीच पाहिजे."

"म्हणजे? आरोपी गॅलील प्रांतातला आहे काय?" पिलाताने विचारले. "मग प्रथम त्याला हेरोदकडे जाऊ द्या. माझ्याकडे कशाला आणलं?" आणि पुन्हा येशूला हेरोदाच्या दरबारात नेले. हेरोदचा दरबार जेरूसलेममध्येच होता. या हेरोदच्या समोर मात्र येशूने आपले तोंड उघडले नाही. हा हेरोद बाप्तिस्मा करणाऱ्या योव्हानाचा मारेकरी नव्हता काय? पण हेरोद या राजद्रोहाच्या खटल्यात स्वतःला गुंतवू पाहात नव्हता. त्याने पुन्हा येशूला पिलाताकडे पाठविले.

पिलातापुढे मोठाच पेच निर्माण झाला. पण यहुद्यांच्या राजाला एका कैद्याची मुटका करण्याची प्रथा होती, म्हणून पिलाताने लोकांना विचारले, "बोला, तुम्हांला येशू पाहिजे की बाराबास हा कैदी पाहिजे?"

बाराबास हा क्रांतिकारक होता म्हणून त्याला कैदेत टाकण्यात आले होते. लोक एका आवाजाने म्हणाले. "बाराबास पाहिजे."

"मग या येशूचे काय करू?"

लोक एकदम म्हणाले, "त्याला वधस्तंभी दे."

पिलात हा जरी क्रूर होता, तरी तो दुबळ्या मनाचा होता. त्याला मनातून लोकांची भीतीच वाटत होती. यहुदी लोक एवढ्या तेवढ्या कारणावरून रोमकडे शिष्टमंडळे पाठवीत असत. येशूला जर दया दाखविली तर लोक सम्राटाच्या कानांवर आपल्याबद्दल कागाळी करतील, ही भीती पिलाताला होतीच. लोक पुन्हा ओरडले, "त्याला वधस्तंभी दे."

पिलात म्हणाला, " वधस्तंभी कसं देता येईल? त्याचा गुन्हा काही गंभीर स्वरूपाचा नाही. मी त्याला फटके मारून सोडून देतो."

आणि येशूला नंतर फटके मारण्यात आले. पण फटके मारूनचलोकांचे समाधान झाले नाहीं. त्यांनी त्याच्या डोक्यावर काटेरी मुकुट ठेवला, जांभळ्या रंगाचा झगा राजवेष म्हणून घातला व अनेक तऱ्हेने येशूची अवहेलना केली. पुन्हा लोक ओरडले, "वधस्तंभी दे, वधस्तंभी दे. तो देवाचा पुत्र म्हणवितो. त्याला मृत्यूचीच शिक्षा पाहिजे."

लोकांनी बराच गोंधळ घातला. पिलाताला काहीच करता येईना. येशूच्या ठिकाणी त्याला जरी काहीच अपराध दिसत नव्हता, तरी लोकमत येशूच्या विरुद्ध होते व पिलात लोकमताला भीत होता. " या माणसाला सोडलंस तर तूं कैसरचा मित्र नव्हेस असंच आम्ही समजू" असे लोक त्याला उघड उघड म्हणत होते, म्हणून लोकमताला बळी पडून त्याने येशूला लोकांच्या हवाली केले व त्याला वधस्तंभी देण्याचा हुकूम दिला.

* * *

## प्रकरण तेविसावे

# अखेर

पिलाताने येशूला वधस्तंभी देण्याचा हुकूम दिला असला तरी त्याच्या मनात खळबळ उडून गेली होती. येशू निरपराधी असून त्याच्याकडून राजद्रोह झाला नाही, अशी त्याची खात्री होती. पण लोकमतापुढे त्याला हार खावी लागली. नंतर पिलाताने चांदीच्या तबकात आपले हात धुऊन 'आता माझा व येशूचा संबंध नाही,' असे जाहीर केले. पिलाताला यहुदी लोकांशी भांडण करावयाचे नव्हते. रोमचा प्रतिनिधी म्हणून त्याला पॅलेस्टाईनमध्ये शांतता राखावयाची होती एवढेच त्याचे काम. मग निरपराधी सत्पुरुष प्राणाला मुकला तरी त्याचे त्याला सोयरसुतक नव्हते. पिलात हात धुताना लोक जयघोष करीत होते. त्यांचा विजय झाला होता. याजक वर्गाचा विजय झाला होता व स्नेहाद्रीन सभा तर आनंदाने नाचत होती. येशूचे शिष्य बाजूला उभे राहून हा सर्व प्रकार पाहात होते. ते आता हताश झाले होते. आपल्या गुरूला वाचविण्याचे त्यांच्या हातात नव्हते.

येशू आपला वधस्तंभ आपणच मोठ्या कष्टाने वाहात होता. तो आता बराच थकला होता. त्याच्याने ते भलेमोठे ओझे ओढवत नव्हते. लोकांच्या बरोबर काही रोमी शिपाई शांतता राखण्यासाठी होतेच. त्यांनासुद्धा येशूची दया आली.

बघे लोक बरेच जमले होते. त्यांच्यापैकी काहीजणांनी येशूचे कार्य पाहिले होते व त्याची शिकवण ऐकली होती. अशा सत्पुरुषाचा असा हृदयद्रावक शेवट व्हावा, याचे त्यांना मोठे वाईट वाटले. त्यांना वाटले, येशूने आपले आयुष्य निष्कारण या कृतघ्न लोकांकरता खर्च केले. लोकांना, जगाला येशूची किंमत कळली नाही, आणि अशा सत्पुरुषाची किंमत जगाला कधीच कळणार नाही. जगाने आपले कान बधिर करून घेतले होते. येशूची वाणी त्या कानांवर आदळत होती, पण आत शिरत नव्हती. येशूने आपले आयुष्य उधळून लावले, असेच या लोकांना वाटत होते. येशूचा अंतकाल जवळ आला

होता. कठोर जग त्याचा प्राण घेईल, स्वार्थी जग त्याला मातीआड करील व लगेच त्याला विसरून जाईल. येशू या व्यक्तीची स्मृतीसुद्धा या जगाच्या पटावरून पुसली जाईल, असे कित्येकांना वाटत होते.

रोमी शिपायांच्या डोक्यांतसुद्धा हेच विचार चालू होते. खरेच, येशूने काय मिळविले ? इतक्या हालअपेष्टा, इतका अपमान, इतक्या यातना सोसल्या त्यानें ! कोणाकरिता ? मानवाकरिता, लोकांकरिता. पण हेच लोक पाहा कसे आनंदाने टाळ्या पिटीत येशूबरोबर चालले आहेत. त्याचे सत्कार्य, त्याची शिकवण, त्याचे निर्मल चरित्र हे लोक इतक्या लवकर कसे विसरले ? असा सुद्धा विचार या शिपायांच्या डोक्यांत आला. मधून मधून ते येशूकडे दयार्द्र दृष्टीने पाहत, त्याच्या वधस्तंभाला हात लावीत व त्याच्या बरोबर चालत.

पुढच्या घटना अती जलद रीतीने घडून आल्या. मिरवणूक आता गुलगुथा या ठिकाणी आली. या ठिकाणी भयंकर गुन्हेगारांना वधस्तंभी देत. वधस्तंभी देणे ही रोमच्या शिक्षेची प्रथा होती. वधस्तंभावर मनुष्याचा देह बांधीत नसत, तर हाताला व पायाला मोठेमोठे खिळे ठोकून तो वधस्तंभाला जखडण्यात येई. या अत्यंत क्रूर व अमानुष कृतीत त्या दुर्दैवी माणसाला किती यातना भोगाव्या लागत असतील, याची कल्पनाच केलेली पुरवली. येशूला आता वधस्तंभावर खिळण्यासाठी त्याच्याबरोबर आणखी दोन चोर व दरोडेखोर यांना वधस्तंभी देण्यांत आले.

येशूच्या आईला – मरियेला – निरोप गेलाच होता. ती आपल्या मुलाच्या जवळ आली. त्याचे हाल पाहून या थोर मातेला किती यातना झाल्या असतील याची कल्पनाच केलेली बरी. मरिया मागे जेव्हा यरूशलेमाच्या मंदिरात, आली होती तेव्हा मंदिरातल्या एका वृद्ध स्त्रीने म्हटले होते, " तुझं हृदय रक्तबंबाळ होईल. " तिचे हे भाकीत खरे झाले. मरियेने येशूकरिता सबंध विणीचा झगा आपल्या हाताने तयार केला होता. तोच या वेळेला येशूने अंगावर घातला होता. तो झगा काढून घेऊन चिठ्या टाकून शिपायांनी तो घेतला होता.

येशूच्या खांबाजवळ आई व मावशी दोघीही होत्या. येशू मावशीच्याच मांडीवर वाढला होता. तिच्या हृदयाचे पाणी पाणी झालें होते. तिसरी स्त्री

त्याच्या खांबाजवळ उभी होती ती मरिया मग्दालिन, जिने येशूला सुवासिक तेल लावले होते ती होती व त्याचे शिष्यही आले होते.

येशूची हेटाळणी चाललीच होती. " तू देवाचा पुत्र म्हणवितोस, मग ये की खांबावरून खाली ! दुसऱ्याला वाचविलंस, आता वाचव की स्वतःला ! "

असे म्हणून हे दुष्ट लोक त्याची हेटाळणी करीत होते. येशूच्या उजव्या व डाव्या बाजूला दोन दरोडेखोर खांबावर खिळले होते. एक म्हणाला,

" येशू, तू जेव्हा तुझ्या स्वर्गाच्या राज्यात वैभवाने जाशील, तेव्हा माझी आठवण ठेव. "

येशू त्याला म्हणाला, " मित्रा, तू माझ्याबरोबर आजही स्वर्गात यशील ! " आईकडे पाहून येशू म्हणाला,

" आई, जातो मी ! " नंतर आपल्या शिष्यांकडे वळून तो पुन्हाम्हणाला, " आई, हे पाहा तुझे पुत्र व ही तुमची आई ! " असे म्हणून येशूने आपला प्राण सोडला.

येशूचे जेव्हा प्राणोत्क्रमण झाले, तेव्हा सगळीकडे अंधार पडला आणि यरूशलेमाच्या मंदिरातला मोठा मखमलीचा पडदा दुभंगला गेला येशूने मरणापूर्वी म्हटले होते की, " परमेश्वरा. या लोकांना क्षमा कर. ते काय करतात हे त्यांना समजत नाही ! " केवढे मोठे हृदय हे ! लोकांनी येशूचा इतका छळ केला असतानाही तो त्यांना क्षमा करण्यास परमेश्वराला विनंती करतो यावरूनच त्याचे श्रेष्ठत्व प्रस्थापित होते.

यानंतर अरमथाईकर योसेफ हा येशूचा गुप्त शिष्य होता. परंतु याजकांच्या भयामुळे त्याला उघड येशूचे शिष्यत्व स्वीकारता आले नाही. तो पिलाताकडे गेला व त्याने येशूच्या पार्थिव देहाची मागणी केली. कारण तो देह हा योसेफ आपल्या स्वतःच्या कबरीत ठेवणार होता. हा योसेफ फार श्रीमंत असून वजनदार होता. त्याने येशूचे शरीर घेऊन यहुद्यांच्या उत्तरकार्याच्या रीतीप्रमाणें सुगंधी द्रव्यांसहित तागाच्या वस्त्रानिशीं गुंडाळून आपल्या कबरीत ठेवले.

आठवड्याच्या पहिल्या दिवशी मरिया मग्दालिन पहाटेच येशूच्या कबरीजवळ आली. कारण त्याला आज तीन दिवस होत होते. शुक्रवारी त्याचे निधन झाले. मरिया कबरीजवळ गेली, तेव्हा तेथील दृश्य पाहून मरिया

अनुक्रम ७८०८९ दि: २१K७ ८०९ २८११४५

आश्चर्यचकित झाली. कबरीची शिळा एकीकडे लोटली असून येशू तिच्यावर बसला आहे, त्याचें रूप विजेसारखे लखलखत आहे, त्याची वस्त्रें बर्फशुभ्र आहेत. सभोवती रम्य पहाटेचे वातावरण दरवळत आहे. शांत, प्रशांत वेळ आहे. जवळपास या दोघांशिवाय दुसरं कोणी नाही. मरिया जरा घाबरली. भीतभीतच तिने आत कबरीत डोकावले, तो काय ? कबर रिकामीच ! प्रेतवस्त्रे व्यवस्थेशीर गुंडाळून उशागत ठेवली आहेत. मरियेला पुन्हा आश्चर्याचा धक्का बसला. काय करावे ते तिला सुचेना. कबरीत तर कोणी नाही ! मग ही सुगंधी द्रव्ये लावायची तरी कोणाला ? जवळच ही तेजस्वी व्यक्ती स्वस्थ बसली आहे. मरियेला वाटले की, बागेचा हा माळीच असावा. त्याच्या जवळ जात ती म्हणाली,

"माळीदादा, माझ्या प्रभूला कोठे वर ठेवलं आहे ? त्यांची हीच ना कबर ? हो, मला नक्की आठवतं, याच कबरीत त्यांना ठेवलं होतं ? पण कबर रिकामी कशी ?" नंतर आणलेल्या सुगंधी द्रव्यांकडे पाहात ती म्हणाली, "आपल्या रूढीप्रमाणे त्यांच्या देहाला लावण्याकरिता मी ही सुगंधी द्रव्ये आणली होती. पण गुरुजी कोठे वरे गेले असतील ?" ती व्यक्ती हळूच उठली व तिच्याकडे पाहात मृदु स्वरात म्हणाली,

"मरिये !"

"कोण, गुरुजी आपण ?"

"होय मरिये, मीच आहे." येशूने उत्तर दिले. "मी मृत्युंजय होऊन, मृत्यूवर विजय मिळवून पुन्हा या भूतलावर आलो आहे. मी तुम्हांला मागं सांगितलच होतं की, मी पुन्हा उठेन म्हणून !"

"गुरुजी, गुरुजी, किती मी धन्य ! आपलं हे दिव्य दर्शन प्रथमच मला होत आहे. किती भाग्यवान मी !" नंतर त्याच्याजवळ जात ती म्हणाली, "गुरुजी, मला पदस्पर्श करू द्या." असे म्हणून ती वाकली.

"नाही. मरिया, मला तुला स्पर्श करता येणार नाही." तिला थांबवून येशू म्हणाला, "मी माझ्या पित्याजवळ अद्याप गेलो नाही. तू आता माझ्या शिष्यांच्याकडे जा आणि हे शुभवर्तमान, ही शुभवार्ता त्यांना कळव. मी त्यांना दर्शन देईन व नंतर सदेह स्वर्गात तुझ्या माझ्या पित्याजवळ जाईन."

मरिया आनंदित होऊन धावतच तेथून गेली. गुरुजी उठले आहेत, मृत्युंजय झाले आहेत, प्रथम दर्शन मला झालं आहे, या आनंदाने ती बहरून गेली होती. तिने धावत जाऊन ही शुभवार्ता शिष्यांना दिली.

येशू मृत्युंजय झाला तो रविवार होता. येथूनच ख्रिस्ती धर्माची स्थापना झाली. ज्या दिवशी येशू पुन्हा उठला, तो दिवस पुढे ख्रिस्ती लोक ईस्टर सण म्हणून मोठ्या आनंदाने पाळू लागले. युरोपमध्ये, विशेषतः फ्रान्समध्य ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर एकमेकांना नमस्कार व वंदन करतांना —

"येशू ख्रिस्त मरणातून उठला आहे."

"होय, तो खरोखरच उठला आहे."

अशी नमस्काराची प्रथा पडली.

येशूने नंतर आपल्या शिष्यांना दर्शन देऊन म्हटले, "पित्याने जसे मला भूतलावर पाठविले, तसे मी तुम्हांला जगात पाठवीत आहे. तुम्ही जगामध्ये मानवतेचा व नम्रतेचा मंत्र प्रसारित करा. तरवारीने मिळवलेले साम्राज्य टिकत नाही, प्रेमाचे टिकते. शस्त्रे बोथट होतात, पण मानवतेचा मंत्र अखेरपर्यंत टिकतो. शत्रूवर प्रेम करा. माणूस हा कधीच वाईट नसतो आणि परमेश्वर क्षमाशील आहे, हे माझे तत्त्वज्ञान जगाला शिकवा."

असे म्हणून येशू सदेह त्यानेच विशद केलेल्या स्वर्गाच्या राज्यात गेला व येथेच ख्रिस्त चरित्र समाप्त झाले.

ख्रि स्ता र्प ण म स्तु

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १४४६८